म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0000103
REFBK-0000103

# सौराष्ट्र

अथवा

# काठेवाड

( प्रांताचें संक्षिप्त वर्णन व इतिहास ).

अ तीं

अ पक्षी।

REFBK-0000103

वामन.

गणेश बळवंत मोडक, बी. ए.

सौराष्ट्र हायस्कूल, राजकोट.

निर्णयसागर छापखाना, मुंबई.

(श. १८२४ इ. स. १९०२.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

॥ श्री ॥

# सौराष्ट्र

अथवा

# काठेवाड.

कि० रु० १-४.

पुस्तकें आमचेकडे अथवा कोल्हापूर येथें प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांचेकडे मिळतील.

श्रीमंत नामदार नारायणराव

बाबासाहेब घोरपडे,

इचलकरंजी संस्थानचे अधिपति,

यांस

प्रेमानें व आदरानें

अर्पण केलें असे.

To humbler functions, awful Power!
I call thee: I myself commend
Unto thy guidance from this hour;
O let my weakness have an end!
Give unto me, made lowly wise,
The spirit of self-sacrifice;
The confidence of reason give;
And in the light of Truth thy bondman let me live.

Ode to Duty,

W. Wordsworth.

। श्री ।

श्रीमंत नामदार नारायणराव बाबासाहेब घोरपडे,

यांचे सेवेसी,

समुद्रमर्यादित परशुरामक्षेत्ररूपी विस्तृत वेदीवर रचिलेली विशाल शैलसोपानपंक्ति चढून वर आलें ह्मणजे सह्यपर्वताच्या सपाट चवथऱ्यावर महाराष्ट्रांतील जीं राजवंशीय नररत्नें विराजमान झालेलीं दृष्टीस पडतात त्यांत आपण आपल्या उज्ज्वळ यशानें झळकत आहां. श्री व सरस्वती या दोघींशीं समानभावानें राहून राज्यसूत्रें चालवीत असतां दोघींच्याही कृपाछत्राची अपेक्षा करणाऱ्या भक्तजनांस वेळोवेळीं आपण उत्तेजन देत आलां आहां. संपादन केलेल्या ज्ञानद्रव्याचा व्यय स्वप्रजेच्या हिताकडेसच करितां असें नव्हे, परंतु अखिल महाराष्ट्रीय जनांच्या हिताची कळकळ पुत्रवत्सल पित्याप्रमाणें बाळगून वेळोवेळीं सार्वभौमसत्तेश्वरास योग्य सलाहमसलत देण्यांत अतुल मानसिक धैर्य दाखवून खऱ्या लोकहितैषूंस आपण उत्कृष्ट कित्ता घालून दिला आहे. मी आपणाबरोबर पाठशाळेंत आपला सहाध्यायी असतां साप्ताहिक संमेलनाच्या प्रसंगीं वारंवार दृष्टिगोचर होत असलेली आपली विद्याभिरुचि, व कुशाग्रबुद्धि, व जनपदहितास्तव कोणत्याही सत्कार्यांत झीज सोसण्याची तत्परता, वगैरे सद्गुण दिवसेंदिवस केवळ वृद्धिंगतच होत असल्यानें प्रत्येक महाराष्ट्रीयास व विशेषकरून प्रत्येक 'राजारामीयास' त्यांचा अभिमान वाटावा हें साहजिकच आहे. ह्या व आपल्या अंगीं असलेल्या दुसऱ्या अनेक गुणांविषयीं मनांत आदर उत्पन्न होऊनच महाराष्ट्रवाचकवृंदाची यथामति सेवा करण्याच्या उद्देशानें रचिलेलें 'सौराष्ट्र' नांवाचें हें पुस्तक आपल्या अनुज्ञेनें प्रेमभक्तिपूर्वक व निर्मळ अंतःकरणानें मी आपणांस अर्पण करीत आहें.

शुभकृन्नामसंवत्सर, चैत्र शु. १ श. १८२४.

आपला नम्र सेवक,

ग. ब. मोडक.

# प्रस्तावना.

सौराष्ट्र अथवा काठेवाड हें द्वीपकल्प फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. या सुपीक व विस्तृत प्रांताच्या हकीकतीचें लहानसें पुस्तक मराठी वाचकांस सादर करावें असें मनांत आल्यावरून हें पुस्तक तयार केलें आहे. तीन वर्षांपूर्वी मी येथें आलों तेव्हांपासून ही गोष्ट मनांत होती, परंतु गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या सुटीपर्यंत हें काम हातीं घेण्यास फुरसद मिळाली नाहीं. इ. स. १९०१ च्या मे महिन्यांत या पुस्तकाचा ऐतिहासिक भाग सर्व पुरा झाला. पुढें इतर भागही हळूहळू तयार होऊन आज शके १८२४ शुभकृन्नाम संवत्सराच्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर या लहानशा पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचा सुयोग जुळून येत आहे ही त्या जगन्नियंत्या परमेश्वराची कृपा होय.

हें पुस्तक लिहिण्यांत मुख्यत्वेंकरून मुंबई ग्याझिटियरपैकीं काठेवाड व गुजरात या दोन भागांचा उपयोग केलेला आहे. इतर पुस्तकांचा व व्यक्तींचा ठिकठिकाणीं उल्लेख केलेलाच आहे.

जिच्या सप्रेम सहवासांत मी आपले या प्रांतांतील बरे वाईट दिवस आनंदानें व सुखासमाधानानें घालवीत आहें, व हें पुस्तक लिहिण्यांत प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष रीतीनें जिचें फार सहाय झालें त्या माझ्या प्रिय पत्नीचा मी फार उतराई आहें.

बहुतेक सर्व पुस्तकाची हस्तलिखित प्रत माझे मित्र रा. सा. श्री. भि. सरदेसाई यांनीं कृपा करून वाचून पाहिली व पुष्कळ उपयुक्त

सूचना केल्या, व त्यांच्या उत्तेजनाशिवाय मीं हें पुस्तक कदाचित छापिलेंही नसतें. प्रांताच्या सामान्य वर्णनांतील कांहीं भाग मीं पूर्वी कोल्हापूर येथील समर्थ पत्रांत पाठविला होता, तो फिरून या पुस्तकांत छापण्याची परवानगी समर्थ पत्राच्या चालकांनीं मोठ्या आनंदानें दिली हे त्यांचे माझ्यावर उपकार आहेत. कै. शेट जावजी दादाजी यांच्या प्रसिद्ध निर्णयसागर छापखान्याचे मालक रा. रा. तुकाराम जावजी यांनीं आपल्या छापखान्याच्या नांवानुरूप पुस्तक सुंदर छापून काढल्याबद्दल त्यांचे, व रा. रा. शं. ग. जुनेरकर यांनीं मुद्रितें तपासण्यांत मदत केल्याबद्दल त्यांचे मी अत्यंत आभार मानितों.

सौराष्ट्र हायस्कूल; ग. ब. मोडक.
राजकोट.
चैत्र शुद्ध प्रतिपदा, श. १८२४,
शुभकृन्नाम संवत्सर.

# उपोद्घात.

सौराष्ट्र ह्मणजे हल्लींचें काठेवाड, हें जरी हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यांत असलें व साधारणपणें ह्मटलें तर जरा आडवळणीं असलें, तरी कालचक्राच्या तडाख्यांतून तें कांहीं निसटलें नाहीं इतकेंच नव्हे, पण महाराष्ट्राप्रमाणें वेळोवेळीं अनेक राज्यलोभी राजांच्या हातीं त्याची फारच कुतरओढ झालेली आहे. तरी सुद्धां या प्रकारच्या असंख्य उलाढालींतून निघून आजमितीस सौराष्ट्रपटावर ३०।३५ मुख्य व लहानमोठे सरसकट धरले तर अदमासें २०० संस्थानिक विराजमान आहेत. यावरून सौराष्ट्राच्यां इतिहासाचें महत्व कोणाच्याही लक्षांत येईल. रा. रा. गणेश बळवंत मोडक यांनीं आपल्या 'सौराष्ट्र' नांवाच्या प्रस्तुत पुस्तकांत हा इतिहास मराठी वाचकांसाठीं थोडक्यांत सादर केला आहे.

सौराष्ट्र प्रांताचें सामान्य वर्णन प्रथम देऊन नंतर इ. स. पू. ३०० पासून आजमितीपर्यंत एकाच्या मागून दुसरा व दुसऱ्याच्या मागून कोणी तिसराच याप्रमाणें सौराष्ट्रावर ज्या अनेक राजांनीं आपल्या प्रभुत्वांचा झेंडा रोंवण्याचा प्रयत्न केला त्यांची संक्षिप्त माहिती दिली आहे. लेखकांनीं ह्यांत अगदीं मुख्य मुख्य गोष्टीच गोड भाषेंत थोडक्यांत व ओघानें येत गेल्या तशाच सांगितल्या असल्यामुळें हा भाग ऐतिहासिक असूनही कंटाळवाणा वाटावयाचा तो तसा मुळींच न वाटतां, उलट सौराष्ट्रपटावरील जयध्वजाचा रंग काळपरत्वें कसकसा पालटत गेला हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा प्रश्न दृष्टीसमोर स्पष्ट उभा राहून गोडच वाटेल. लहान मिळकतीसंबंधीं

पुष्कळ भाऊबावांत तंटे चालेले असतां व 'बळी तो कान पिळी' या न्यायाचा पूर्ण अंमल गाजत असतां तटस्थ शेजाऱ्यास स्वभाववैचित्र्याचें व मिळकतीच्या दुर्दशेचें निरीक्षण करण्याची संधि सांपडल्यामुळें जशी त्यास मौज वाटते त्याचप्रमाणें सदरील प्रकरणाच्या वांचनानें वाचकांस मौज वाटून श्रमाचा मोबदला दामदुप्पट भरून मिळेल यांत संशय नाहीं. लेखक स्वतः देशभक्त महाराष्ट्रीय असून मराठी राज्याचे पूर्ण अभिमानी आहेत तरी सौराष्ट्रांत सरसावून आलेल्या मराठ्यांच्या लांछनास्पद व खऱ्या पेशवाई बाण्यास कधींही न साजे अशा वर्तणुकीवर त्यांनीं आपली लेखणी बरीच झाडली आहे हें इतिहासलेखक या नात्यानें त्यांच्या अंगीं असलेल्या निःपक्षपातबुद्धीस व कळकळीस उचितच आहे.

'लोक' हें प्रकरण फार चांगलें साधलें असून तें अत्यंत मोहक आहे. तें जरा आणखी लांब असतें तरी चांगलें झालें असतें असें प्रत्येक वाचकास वाटेल इतकें तें रसभरित आहेच. आपलेकडे ज्याप्रमाणें १२।१२ कोसांवर भाषा व रीतभात यांत सूक्ष्म फरक पडत जातो त्याचप्रमाणें इकडेही अठरा पगड जातींत स्थलमानाप्रमाणें पुष्कळ फरक दृष्टीस पडतात ही गोष्ट लक्षांत ठेऊनच लेखकांनीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र या प्रत्येकांतून १।२ जातींच्याच लोकांचा स्वभाव व चालीरीती यांचें वर्णन दिलें आहे. आपल्यांत ज्याप्रमाणें तुकाराम, जीवनतनय, मुक्तेश्वर वगैरे संतमंडळ होऊन गेलें त्याप्रमाणें या लोकांतही भगवद्भक्त, संत व कवी होऊन गेले त्यांपैकीं कांहींचें जीवनचरित्र संक्षिप्त व चटकदार रीतीनें लेखकांनीं 'कविवृंद' या प्रकरणांत वर्णिलें आहे; यांपैकीं बऱ्याच भक्तांचे प्रेमळ व भक्तिपूर्ण ग्रंथ गुजराती भाषेंत अजूनही छापून उपलब्ध झालेले नाहींत. 'उपसंहारांत' ऐतिहासिक प्रकरणाचें सिंहावलोकन असून खरोखर तें तसेंच वठलें आहे. पुस्तकाच्या शेवटीं जोडलेलें सौराष्ट्राची 'भूगर्भ-

रचना' नांवाचें परिशिष्ट साधारण वाचकांसही समजेल इतक्या सोप्या भाषेंत लिहिलें असून माहितीही मजेदार आहे.

ऐतिहासिक पुस्तक डोळ्यांसमोरही नको अशांच्या हातीं पुस्तक पडलेंच तर 'सामान्यमाहिती' व त्या पुढील प्रकरणें तरी त्यांनीं वाचल्याशिवाय राहूं नये अशी माझी त्यांस नम्र सूचना आहे.

इतिहासाची नैसर्गिक अभिरुचि, व महाराष्ट्र वाचकवृंदाची यथाशक्ति सेवा करण्याची उत्कट इच्छा या दोन गोष्टींनींच प्रस्तुत पुस्तक हातीं धरण्यास लेखक प्रवृत्त झाले असावे. टोपल्यावारीं शाळोपयोगी पुस्तकें दररोज प्रगट होत आहेत त्यांचा उद्देश निराळा व प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश निराळा हें पुस्तकाच्या विषयावरूनच व्यक्त होत आहे. ऐतिहासिक पुस्तक लिहिण्यांत फार अडचणी येतात हें लिहिणारासच चांगलें समजतें. रा॰ रा. ग. ब. मोडक यांनीं हें काम उत्सुकतेनें माथीं घेऊन पूर्वभाग तडीसही नेला आहे. उत्तरभागांत 'पंचायतनांतील' राहिलेल्या चार संस्थानांची हकीगत येणार आहे. हीं संस्थानें ह्मणजे जुनागढ, नवानगर, पोरबंदर व भावनगर हीं होत. यापुढें 'स्थलवर्णनाचा' मनोहर भागही जोडण्याचा विचार आहे. प्रस्तुत उद्योग स्तुत्य व अभिनंदनीय आहे हें रसिक वाचकांस कळून येईल.

| | | |
|---|---|---|
| चैत्र शु. ९ मी १८२४,<br>शुभकृन्नामसंवत्सर. | } | व्यं. त्रिं. चां. |

। श्री ।

# सौराष्ट्र.

## अनुक्रमणिका.

### पुस्तक पहिलें.


भाग १ प्रांताचें सामान्य वर्णन. पृ. १–१५.

भाग २ पौराणिक काल. पृ. १६–१९.

श्रीकृष्णजन्म–कंसवध–जरासंध व कालयवन–द्वारका अथवा कुशस्थळी–कौरवपांडवयुद्ध–युधिष्ठिरराज्यस्थापना–कृष्णक्रिया–अनिरुद्ध व सांब–यादवकुलाचा नाश–कृष्णनिधन–यादवांचें द्वारकेहून मथुरेस व तेथून काबुलांत प्रयाण–हिंदुस्थानांत पुनरागमन.

भाग ३ प्राचीन इतिहास. पृ. २०–२५.

मौर्यवंश–अशोक–बाक्ट्रिया–क्षत्रप अथवा शहावंश–गुप्तवंश–वलभीवंश अनहिलवाडचे चावडे–गुंजरातचे राजे–सौराष्ट्रांतील प्रदेशाची स्थिति–चूडासमा रजपूत वंथळीस राज्य स्थापितात–जेठवा रजपूत व मोर्वी–मेर व तमाणा.

भाग ४. मुसलमानांचा प्रवेश. पृ. २६–३२.

इ. स. १०२४–१४०३.

गझनीच्या महमदाची सोमनाथावरील स्वारी–अनहिलवाडचा मूळराज सोळंकी–जुनागढचे चावडे–सिद्धराज जयसिंहाची जुनागढावर स्वारी–राणिकदेवी–नोंघण–कुमारपाल–वाढेल रजपूत व वाजा अथवा विंजल रजपूत–सेजकजी व गोहेल रजपूत–महमदतघलखाचा सरदार अनहिलवाडची गादी घेतो व पुढें सोमनाथावर जाऊन जुनें सोरठही घेतो–मांगळोरच्या गोहिल्यांचा मोड व मुसलमानी सत्तेचा फैलाव–झुफरखानाची सोमनाथावरील स्वारी.

भाग ५. अमदाबादचे सुलतान. पृ. ३३–४१.

इ. स. १४०३–१५२५.

सुलतान अहमदशहाची रा मलेकवर स्वारी–सुलतानांचें प्राबल्य–सुलतान महमद बेगडा व रा मंडलीक मुसलमानांचा जुनागढांत प्रथमचा व कायमचा शिरकाव–उखामंडळचा भीम–जुनागढचा जाहागिरदार व ठाणेदार–कुव्याचे झाला रजपूत–नवीन राज्यव्यवस्था–सुलतान दुसरा मुझाफर व तातारखान घोरी–काठ्यांची वावटळ–लोमा खुमाण–वाळाकाठी लोक आणि जेतपूर व मेंदरडा.

भाग ६. स्वतंत्र संस्थानांचा उद्भव व सुलतानशाहीचा अंत. पृ. ४२–४६.

इ. स. १५२५–१५७३.

दीव बेट बळकावण्याविषयीं फिरंग्यांची 'खटपट' व जय–इसाज्यावर रजपुतांचा हल्ला–कुव्याचा मानसिंह–नवानगरची स्थापना व जाडेजांचें वर्चस्व–तातारखान घोरी व फत्तेहखान बलोच–जेठवा व झाला रजपूत–सुलतानाच्या राज्याची वांटणी –घोरी व फोलादी–गुजरातेंत उमरावांचा बखेडा–अकबर गुजरात जिंकितो.

भाग ७. अमदाबादचे सुभेदार. पृ. ४७–५५.

इ. स. १५७३–१६८६.

मिरझाखानाची जुनागढावर स्वारी–त्याची त्रेधा–सुलतात मुझाफराचें बंड–सौराष्ट्रांतील गडबड–भूचर मोरीचें संग्राम–बादशाही अंमल व सौराष्ट्रांतील स्वतंत्रतेचा नाश–जुनागढचे फौजदार–प्रांतांतील गडबड पुनः एकदां–वसूलाची पद्धत–मलिक अंबर–जहांगीरचें गुजरातेंत येणें–भयंकर दुष्काळ व अंदाधुंदी–आझमखान सुभेदार व मिरझा इसातरखान–शिहोरचा अखेराजजी–कुतुबुद्दीन–सरदारखान.

भाग ८. मराठ्यांचा प्रवेश. पृ. ५६–६४.

इ. स. १६८६–१७२९.

बादशाही मुल्खाची वाताहत–पोरबंदर, शिहोर व ध्रांगध्रा–जुनागढचे फौजदार–सुजाअतखानाकडून कांठी लोकांचें पारिपत्य–मुलुखगिरी–गुजरातेंतील मराठ्यांच्या वावटळीचा सौराष्ट्रावर परिणाम–अवरंगजेबाचा मृत्यु व त्याचे सौराष्ट्रावर परिणाम–महाराजा अजितसिंह–हैदरकुलीखान–अजितसिंह पुनः एकदां व प्रांतांत

दंगाधोपा–पिलाजी गाईकवाडाचें सोनगडास ठाणें–गुजरातेंतील व सौराष्ट्रांतील गैरव्यवस्था व मराठ्यांचें पुढें पाऊल–पिलाजी व कंठाजी–शिहोर व छाया यांची भरभराट–मराठ्यांची खंडणी–पिलाजी वडोदें घेतो–सरबुलंदखान–भावनगर व छाया–जामतमाची–जुनागढच्या फौजदारीची दैना.

भाग ९. मराठेशाही. पृ. ६५–६९.

इ. स. १७२९–१८०५.

मराठ्यांत दुफळी करण्याचा प्रयत्न–मुबारिझ उल्मुल्क–महाराजा अभयसिंह–सोहराबखान व धोळीची लढाई–दमाजीचें विरमगांवास ठाणें–खंडणीचा दुहेरी सपाटा–फौजदारीचा अंत व जुनागढास स्वतंत्र राज्यस्थापना–मराठ्यांची कायदेशीर खंडणी—झोरतलबी.

भाग १०. इंग्रजी. पृ. ७०–८१.

इ. स. १८०५–

गाईकवाडी सत्ता व शिवराम गार्दी–उखामंडळच्या चांचे लोकांचें पारिपत्य—सौराष्ट्राच्या खंडणीसंबंधीं कायमची व्यवस्था–सौराष्ट्रांतील गाईकवाडी मुलूख–कंडोरणा किल्ला–वाघेरे व मियाणा–छायाचा कुंवर–जामबरोबर लढाई–फतेमहमदाची लूट व त्याचें पारिपत्य–वाघेरे–संग्राम खवासाचा मोड–उखामंडळ येथें गाईकवाडी अंमल–इंग्रजी खंडणी–पोलिटिकल एजंटी–वाघेऱ्यांचें बंड–इंग्रजी साम्राज्य–प्रांतांत बंदोबस्त फौजदारी कोर्ट–वाघेऱ्यांचें शेवटचें बंड–अंतर्व्यवस्था–गिराशियाचे तंटे–इंग्रजी राजकारण–सौराष्ट्राची परकीय मुलखांत गणना–त्रेसष्ट सालची सुधारणा व प्रांतांत बंडाळी–ज्युडिशिल असिस्टंट–राजस्थानिक कोर्ट–पब्लिक वर्क्स खातें–राजकुमार कॉलेज.

भाग ११. सामान्य माहिती. पृ. ८२–११४.

१ शेतकी २ वसूल ३ व्यापार ४ दुष्काळ ५ शिक्षण ६ न्यायखातें ७ आरोग्य.

भाग १२. लोक. पृ. ११५–१३८.

रजपूत–काठी–लुआणा व भाट्ये–श्रावक व मेश्री वाणी–भाट अथवा बारोट आणि चारण–वाघेर, संघार, मियाणा व जत–नागर, औदीच व श्रीमाळी ब्राह्मण–वैष्णव महाराज.

भाग १३. सौराष्ट्रकविवृंद. पृ. १३९–१४५.

स्कंदपुराण व भट्टिकाव्य–नरसी मेहेता–मेहेराज केशव–नाथजी मालजी–मुक्तानंद व कालिदास–रणछोडजी अमरजी दिवाण–करसनदास मूळजी—मनोरदास स्वामी–नागजी–दलपतराम डाह्याभाई–अमरजी जीभाई शुक्ल–मणिशंकर जटाशंकर–भोजो भगत–केशवलाल हरिराम–हिराचंद कानजी कमळा कुंवरी–हरदास–गट्टुजी घनश्यामजी.

भाग १४. उपसंहार. पृ. १४६–१५९.

## पुस्तक दुसरें.

भाग १. ध्रांगध्रा संस्थान. पृ. १६१–१९०.

भाग २. झाल्यांचीं इतर संस्थानें. पृ. १९१–२००.

वांकनेर–लिमडी–वढवाण.

परिशिष्ट; सौराष्ट्राची भूगर्भरचना. पृ. २०३–२२४.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | २४ | नावानगर | नवानगर |
| ७ | ९ | झालवाड | झालावाड |
| ७ | २६ | सुटका करणें | पकडणें |
| २१ | १४ | ध्स | ह्स |
| ३५ | २५ | दंड करूं, नये | दंड करूं नये |
| ४२ | १० | पोलादी | फोलादी |
| ४३ | २० | सुघाइला | सुधारला |
| ८३ | ११ | बाटवा | कुतिआणा |
| ८५ | ४ | Fair Dholera | Fair Dholera or Bhavnagar. |
| ८८ | २१ | १८८२ | १८१२ |
| १२० | ७ | त्यांच्या | त्याञ्च्या |
| १२० | २१ | कापी | काफी |
| १२२ | ३ | जीच्या, दर्शनास | जीच्या दर्शनास |
| १२६ | ५ | सूर्यनी | सूरजनी |
| १२१ | ६ व ७ | वजाना | वजाणा |
| १४० | २२ | रा. मंडलिक | रा मंडलीक |
| १४६ | २३ | पुन्हां | पुन्हा |

# सौराष्ट्र.

## पुस्तक पहिलें.

ना. क्र. 903

### भाग १

### प्रांताचें सामान्य वर्णन.

या प्रांतास "सौराष्ट्र" हें नांव फार प्राचीन काळापासून आहे. सौराष्ट्र या शब्दाचा अर्थ दोन प्रकारें करितात. सु, ह्मणजे चांगला व राष्ट्र या दोन शब्दांपासून चांगला देश असें याचें नांव असें ह्मणतात. कित्येक तर याचा सूर्याशीं संबंध जोडतात. सौर व राष्ट्र ह्मणजे सूर्याचा प्रदेश असें याचें ह्मणणें. हिंदुस्थानांतील याच प्रांताशीं सूर्याचा विशेष काय संबंध असावा हें समजत नाहीं. येथील लोक सूर्योपासक आहेत ह्मणावें तर तसेंही नाहीं. सर्व हिंदुस्थानांत सूर्याचा ताप विशेषेंकरून येथेंच फार होतो असेंही पण नाहीं. सूर्यवंशी राजांचा येथें अंमल असतांना हें नांव मिळालेलें नव्हे. तें कसेंही असो; सौराष्ट्र हें नांव या प्रांतास फार प्राचीन काळापासून आहे हें खरें. ग्रीक लोकांस हा प्रदेश सौराष्ट्र ह्मणूनच माहीत होता. हुएनसंग व टेरी या प्रवाशांच्या हकीकतींत सुराट हेंच नांव सांपडतें. हल्लींही याज्ञिकांत ब्राह्मण लोक हेंच नांव वापरतात. मुसलमानी अमदानींत सौराष्ट्र सोरठ बनलें व हल्लीं सोरठ हें नांव या प्रदेशांतील एका प्रांताला मात्र आहे. सुमारें सतराव्या शतकांत काठी नांवाच्या लोकांनीं या प्रांतावर स्वाऱ्या करून बराच

मुलुख जिंकिला. याच वेळेपासून या देशास "काठेवाड" हें नांव पडलें. याचे चार पोटप्रांत आहेत; सोरठ हा त्यांपैकीं एक आहे. हें हल्लीं एका लहान पोटप्रांताचेंही नांव आहे. जरी या सर्व प्रांतास काठेवाडच ह्मण-तात तथापि याचा उल्लेख सौराष्ट्र या पुरातन नांवानेच यापुढें केला जाईल. या प्रांताचा आकार द्वीपकल्पाचा आहे व जमिनीशीं संबंध पूर्वेकडून आहे.

पूर्वीं या प्रांतांत दंगेधोपे फार असत, परंतु ब्रिटिश साम्राज्याखालीं लोकांची दंग्याधोप्याकडील प्रवृत्ति मोडत चालली आहे व ते पुष्कळ नरम येत चालले आहेत. आधुनिक सुधारणेचा प्रवेश हळुहळु होत आहे व त्यामुळें लोकांचा रानटीपणा व आडमुठेपणा मोडून सौराष्ट्रांतील लोकांत विलक्षण सौजन्य व मार्दव येत चाललीं आहेत. तीस पस्तीस वर्षांपूर्वीं सौराष्ट्रांत रस्ते मुळींच नव्हते तेथें आतां हजार दीडहजार मैल चांगल्या सडका आहेत. मुंबई—बडोदा रेल्वेनें सौराष्ट्राच्या नाक्यावरच येऊन मुक्काम केला. इ०.स० १८८० पर्यंत आगगाडीचा प्रवेश सौ-राष्ट्रांत झाला नव्हता, परंतु आज २१ वर्षांत आगगाडीचे निरनिराळे फांटे मिळून ५८० मैल विस्तार आहे. सौराष्ट्र द्वीपकल्प असल्यामुळें येथें पुष्कळ बंदरेंही आहेत व तेथें व्यापारही चांगला चालतो. इ० स० १८८५ चे सुमारास सरकारी तारआफिसें फक्त चारच होतीं व रेलवेचीं सुमारें तीस होतीं; आजमितीस सरकारी तार आफिसें ४४ आहेत व रेलवेचीं सुमारें ७५ वर आहेत. फक्त वीसच वर्षांपूर्वीं हा प्रांत फार मागसलेला होता, पण या वीस वर्षांत त्यानें सुधारणेच्या मार्गांत मोठीच भरारी मारली आहे. सरकाराकडून थोडेंसें उत्तेजन मिळाल्यास सुधार-णेच्या मार्गांत पाऊल पुढें टाकण्यास हे लोक अगदीं तत्पर असतात. स्वतःच्या कलाप्रमाणें वागूं दिल्यास इतक्या झपाट्यानें कामें होतील किंवा नाहीं हा प्रश्न वादाचा आहे. सौराष्ट्रांतील हवा बरीच निरोगी आहे. कांहीं ठिकाणीं उष्मा अधिक होतो व थंडीच्या दिवसांत थंडीही विशेष

असते परंतु एकंदरींत हवा बरी. जमीन चांगली सुपीक असून मुख्य उत्पन्नाचे जिन्नस ह्मणजे कापूस, गहूं, हरभरा, बाजरी, ज्वारी, हे होत. ऊंस व कांहीं किरकोळ धान्येंही पिकतात. जमिनींत लोखंड पुष्कळ सांपडतें व एकदोन ठिकाणीं कारखानेही सुरू होते; परंतु दगडी कोळशाच्या अभावामुळें विलायती लोखंडाशीं निभाव लागेना. दगडी कोळशाचाही एकदोन ठिकाणीं शोध लागला आहे, परंतु अद्याप या गोष्टीकडे आमच्या लोकांचें जावें तसें लक्ष्य गेलें नाहीं. आतां इंग्रजी विद्येनें शहाणेसुरते झालेले कित्येक संस्थानिक राज्यभार वाहूं लागलेले आहेत. त्यांच्या हातून या बाबतींत कांहीं उपयोग होईल अशी आशा आहे. गिरनार पर्वतावरून वहात येणाऱ्या सोनरेखा नदींत पूर्वीं सोन्याचे कण सांपडत असत असें ह्मणतात. सध्यांच सोन्याचा सांठा कमी कां व्हावा कळत नाहीं. जुनागढच्या नबाबांनीं, किंवा गाईकवाड सरकारांनीं सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीस मारणाऱ्या धन्याप्रमाणें या नदीच्या उगमापाशींच खाण खोदली असल्यास नकळे, पण ही गोष्ट कोठें ऐकिवांत नाहीं. इतर खनिज द्रव्यें असोत वा नसोत, इमारती दगडाची मात्र इकडे समृद्धि आहे. पोरबंदरी दगड अलीकडे फारच प्रसिद्धीस आला आहे. हा दगड पोरबंदरच्या आसपासच नव्हे, पण पुष्कळच ठिकाणीं सांपडतो. पूर्वीं पोरबंदराहून तो परदेशीं रवाना होत असे ह्मणून पोरबंदरी हें नाव त्यास मिळालें इतकेंच. जामनगरच्या हद्दींत कच्छच्या अखातांत चांगल्या प्रकारचीं मोत्यें सांपडतात. खालीं जुनागढ आणि भावनगरच्या हद्दींतही कोठें कोठें मोत्यें मिळतात. मीठ इकडे विपुल पिकतें. मीठ दोन प्रकारचें, *वडागर व घसीऊं. पैकीं वडागर ध्रांगध्रा संस्थानांतील कुडा या गांवीं

---

* समुद्राच्या पाण्याचीं वरच्यावर पुटें देऊन मिठागरांत तयार केलेल्या मिठास वडागर ह्मणतात (Crystal salt). समुद्राचें पाणी जमिनींवर येऊन वाळून गेल्यावर जो मिठाचा थर बसतो तो काढून घेतात व त्यांस घसीऊं मीठ ह्मणतात.

पिकत असे तेंही गेल्या वर्षी इंग्रज सरकारनें बंद केलें. हें गांव कच्छच्या रणाच्या किनाऱ्यावर आहे. घसीऊं मीठ १०—१२ ठिकाणीं होतें.

पूर्वी सौराष्ट्राचे दहा पोटविभाग होते परंतु सध्यां चारच प्रांत केले आहेत. झालावाड, हालार, सोरठ व गोहिलवाड अशीं यांचीं नांवें आहेत. या जिल्ह्याचा बंदोबस्त सर्व इंग्रज सरकारच्या पोलिटिकल एजंटाच्या मार्फत होतो. पोलिटिकल एजंटाचें ठाणें राजकोटास असतें. चार प्रांतांवर प्रत्येकीं एक असिस्टंट पोलिटिकल एजंट व त्याला दुय्यम डेप्युटी पोलिटिकल एजंट असे सरकारचे कामगार असतात. सर्व संस्थानिकांचा यांच्या मार्फत पोलिटिकल एजंटाशीं व्यवहार चालावयाचा.

या प्रांतांतील घोडे पूर्वीपासून फार प्रसिद्ध तेव्हां त्यांच्याविषयीं दोन शब्द लिहिणें जरूर आहे. या प्रांताच्या इराणी भाषेंत लिहिलेल्या इतिहासांत या घोड्यांस नेहमीं कच्छी ह्मणतात. अमदाबादचे सुभेदार व जुनागढचे फौजदार या जातीचे घोडे बादशहास वरचेवर नजर करीत. रणाच्या किनाऱ्यावर काळ्या रंगाचे उत्तम प्रतीचे घोडे अद्यापही होतात. पांचाळ जातीच्या घोड्यांचे रंग तांबडा, उदी, काळा वगैरे निरनिराळे असतात, परंतु काळे घोडे आतां क्वचित् सांपडतात. काळा रंग, पाठीवर लांबचलांब पट्टा व पुढील पायांवर विद्यापट्टी वाळपट्टी सारख्या पट्ट्या हा काठेवाडचा जुना अस्सल रंग. पूर्वी पावसाच्या दिवसांत रणामधील बेटांत घोड्या पाठवून तेथील रानगाढवाकडून भरवीत असत हें संभवनीय दिसतें. काठी लोकांनीं पांचाळांत स्थायिक ठाणें दिल्यावर ते उत्तम प्रकारचे कच्छी घोडे वाळगूं लागले. या लोकांचें घोड्यांशिवाय मुळीं चालतच नसे. बादशहासाठीं आरबी घोडे येत ते वेरावळ, सोमनाथपाटण, दीव व सुरत या बंदरांहूनच येत. या प्रांतांतून जातांना वाटेंत आरबी वळू वापरून काठी लोकांनीं आपल्या घोड्यांची जात सुधारली, व त्यायोगें नवीन रंगही आले. आरबी जातीची भेसळ

जेथें काळजीनें व हुशारीनें राखिलेली असते तेथें जातींत फारच सुधारणा होते. या प्रांतांत पालिटाणा, गोंडळ, भावनगर व इतर कांहीं ठिकाणीं फारच चांगल्या रीतीनें घोड्याची उपज करितात.

एकंदर लहान मोठीं सुमारें दोनशें संस्थानें सौराष्ट्रांत आहेत. पैकीं तीन ३०।४० लाख उत्पन्नाचीं आहेत, इतर बहुतेक लहान लहान आहेत. कांहींना तर अर्ध्या खेड्याची वांटणी असून गाईकवाडी वगैरे कराची भरती करतांना पुरेवाट होते.

सौराष्ट्रांत उत्तरेच्या भागांत गाई व बैल फार चांगले होतात, व दक्षिणेकडे ह्मशी चांगल्या होतात. या दोनही प्रकारच्या जनावरांची पैदास्त फार उत्तम प्रकारची आहे. काठेवाडी घोडे तर सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध आहेत. काठी लोकांस या जनावरांचा फार शोक, व विशेषेंकरून माद्यांची तर ते फारच काळजी घेतात. कांहीं ठिकाणीं उंटही असतात, पण ते उत्तमापैकीं नव्हत. मेंढ्याही इकडे चांगल्या निपजतात, आणि त्यांची लोंकर चांगल्या दर्ज्याची व लांब धाग्याची ह्मणून प्रसिद्धि आहे.

या प्रांतीं पवित्र स्थानेंही वरींच आहेत. द्वारका व सोमनाथ हीं जगत्प्रसिद्ध स्थानें येथेंच आहेत. शत्रुंजय व गिरनार पर्वतावरील जैन लोकांची या स्थानांवर फारच भक्ति आहे. गिरनारवर दत्ताचें फार मोठें स्थान आहे. जगत्प्रसिद्ध अशोक राजाचे पुष्कळ लेख येथें आहेत. प्राचीपिंपळा हें स्थानही पवित्र मानलेलें आहे.

जुन्या विभागापैकीं झालावाड व काठेवाडचा आणखी कांहीं उत्तरेकडील प्रदेश हे हल्लींच्या "झालावाड" प्रांतांत मोडतात. ह्या प्रांतांत मुख्य दहा संस्थानें आहेत. संस्थानच्या दर्ज्याप्रमाणें त्यांचे *वर्ग केले आहेत. झालावाडांतील दहा संस्थानांपैकीं ध्रांगध्रा हें पहिल्या वर्गांतील, व लिंमडी आणि वढवाण हीं दुसऱ्या वर्गांतील संस्थानें होत. उरलेल्या-

* पुढें दहाव्या भागांत पहा.

पैकीं ३ तिसऱ्या, ३ चवथ्या व १ पांचव्या वर्गांतील आहे. यापेक्षां लहान ह्मणजे ६ व्या व ७ व्या वर्गांचींही संस्थानें आहेत परंतु तीं येथें दिलीं नाहींत. झालावाड प्रांताच्या असिस्टंट पोलिटिकल एजंटाचें (ब्रिटिश प्रांतआफिसराचें) ठाणें वढवाणास असतें.

मच्छुकांठा, हालार, व काठेवाडचा पश्चिमेकडील कांहीं भाग हे अलीकडील "हालार" प्रांतांत मोडतात. या प्रांतांत १५ संस्थानें आहेत. नवानगर (जामनगर), मोर्वी व गोंडळ हीं पहिल्या वर्गाचीं संस्थानें आहेत. ध्रोळ, राजकोट व वांकानेर हीं दुसऱ्या वर्गांतील होत. शिवाय ३ चवथ्या प्रतीचीं व ६ पांचव्या प्रतीचीं संस्थानें आहेत. येथील ब्रिटिश प्रांतआफिसरचें ठाणें राजकोटास असतें.

"सोरठ" प्रांतांत वरडा, सोरठ, बाबरिआवाड व काठेवाडांतील दक्षिणेकडील प्रदेश यांचा समावेश होतो. यांत जुनागढ व पोरबंदर हीं पहिल्या वर्गांतील व जाफराबाद दुसऱ्या वर्गांतील आहे. शिवाय ३ तिसऱ्या, २ चवथ्या व १० पांचव्या वर्गांतील आहेत. प्रांतआफिसरचें ठाणें गोंडळच्या हद्दींत जेतलसर येथें आहे.

जुनें गोहिलवाड, ऊंडसरवैया, व खुद्द काठेवाडचा पूर्वेकडील भाग हे सध्यांच्या "गोहिलवाड" प्रांतांत मोडतात. भावनगर हें पहिल्या प्रतीचें संस्थान या प्रांतांत आहे, पालिटाणा हें दुसऱ्या प्रतीचें आहे. तिसऱ्या प्रतीचीं २ व चवथ्या प्रतीचें १ अशीं संस्थानें या भागांत आहेत. ब्रिटिश प्रांतआफिसरांचें ठाणें सोनगड मुक्कामीं असतें.

लहान मोठ्या सर्व संस्थानांची गणती केली तर तीं १८७ आहेत. पैकीं झालावाड प्रांतांत ६३, हालार प्रांतांत ३२, सोरठ प्रांतांत २९, व गोहिलवाड प्रांतांत ६३ अशीं आहेत. वसूलाच्या मानानें तीनच काय तीं मोठीं आहेतः—भावनगर ३८,३७,०००, नावानगर २७,६०,००० व जुनागढ २४,००,०००. मोर्वी व गोंडळ या संस्थानांचा वसूल प्र-

त्येकीं ११,००,००० आहे. इतर सर्व संस्थानांचा वसूल दहा लाखांच्या खालींच व बहुतेकांचा पांचांच्याही खालींच. गोहिलवाड प्रांतांत वैजानोनेस ह्मणून जहागीर आहे तिचें उत्पन्न ५०० रुपये आहे, पैकीं ३१ रुपये गाईकवाडी खंडणी जातें! याच प्रांतांत चित्रावाव ह्मणून जहागीर आहे, तिचें उत्पन्न ६०० रुपये! पैकीं गाईकवाडी खंडणी ४९१ रुपये व जुनागढची झोरतलबी नांवाची खंडणी ३८ रुपये! बाकी जहागिरीचें निवळ उत्पन्न रुपये ७१, ह्मणजे सरासरी खेडेगांवच्या तलाठ्याच्या पगारापेक्षां थोडें कमी!

झालवाड, हालार, सोरठ व गोहिलवाड या अलीकडील चार राजकीय प्रांतांत पूर्वींचे नऊ प्रांत मोडतात असें वर सांगितलें आहेच. याशिवाय दहावा जो ओखामंडळ ह्मणून प्रांत आहे तो व आणखी थोडा आमरोळी महालांतील मुलूख गाईकवाडी अमलाखालीं आहे. या दहा प्रांतांचें संक्षिप्त वर्णन पुढें देतों.

१ झालावाड प्रांत हा सौराष्ट्रांत ईशान्येस आहे. या प्रांतांत मुख्यत्वेंकरून झाला नांवाचे रजपूत संस्थानिक राज्य करीत असल्यामुळें याचें नांव पडलें आहे.

झाला रजपूत संस्थानाशिवाय मुळी संस्थानचे राजे "परमार" जातीचे

---

* झाला या नांवाची पूर्वपीठिका अशी सांगतात कीं पूर्वीं त्यांनां "मकवाणा" ह्मणत असत. सुमारें एक हजार वर्षांपूर्वीं "केसर मकवाणा" राजाचा मुलगा हरपाळ नांवाचा होऊन गेला. या हरपाळाची आई ही प्रसिद्ध "करणघेला" याची मुलगी. गुजरातची पूर्वींची राजधानी जें पाटण शहर तेथील करणघेला हा सोळंकी वंशांतील राजा. यानें हरपाळास १८०० गांवांची जहागीर दिली व हरपाळानें पाटडी हें राजधानीचें शहर केलें. एकदां एक मत्त हत्ती सुटून हरपाळाचे तीन मुलगे त्याच्या पायांखालीं सांपडून मरणार इतक्यांत त्याच्या आईनें त्यांची सुटका केली. तेव्हांपासून हरपाळाच्या वंशजांस झाला ह्मणजे सुटका केलेले हें नांव मिळालें, ( झालवुं, सुटका करणें ) व त्यांच्या मुलखास झालावाड ह्मणूं लागले.

आहेत. कांहीं संस्थानें सिंध मधून आलेल्या जत नांवाच्या मुसलमान जहागिरदारांचीं आहेत. हे पूर्वी रजपूतच होते, पण पुढें मुसलमान बनले. यांच्या मुलखास जतवाड ह्मणतात. झिंझुवाडा तालुक्यांत मेलाणी आणि रासाणी जातीचे कोळी तालुकदार आहेत, व पाठडी येथें कुणबी तालुकदार आहे.

या प्रांतांच्या उत्तरेस कच्छ संस्थानच्या हद्दीवर कच्छचें रण आहे. हें पावसाळ्यांत पाण्यानें आच्छादलेलें असतें, व उन्हाळ्यांत पाणी सर्व वाळून जाऊन सर्व रणावर मिठाचा थर बसतो. या प्रांतांतील पूर्वेकडील भाग नेहमीं पाण्यानें भरलेला असतो. ह्याला नळकांठा ह्मणतात. रणाच्या कांठीं मीठ पुष्कळ पिकतें. संस्थानिकांनीं मिठावर फारसा कर ठेविला नाहीं. सौराष्ट्रांत जेथें जेथें मीठ पिकतें तेथील संस्थानिकांशीं ब्रिटिश सरकारचे तहनामे आहेत व त्याअन्वयें त्यांना प्रांतांच्या बाहेर मीठ पाठवितां येत नाहीं, व सौराष्ट्रांतून मीठ बाहेर जाऊं नये यासंबंधीं जबाबदारीही त्यांच्यावरच असते. या व्यवस्थेमुळें संस्थानांचा खर्च बराच वाढला आहे, व तो मिठाच्या डोक्यावर लादला जातो. नाहीं तर पैशास टोपलीभर मीठ मिळण्यास हरकत नव्हती.

या प्रांताची जमीन सपाट असून त्यांत रेती फार आहे. रेतीच्या जमिनींत ज्वारी, बाजरी आणि कापूस पिकतो. भाल ह्मणून कांहीं भाग आहेत तेथें जमीन काळी व सुपीक आहे. तेथें गहूं, हरभरा, व कापूस पुष्कळ उत्पन्न होतो. या प्रांतांत कांहीं भले मोठे ओढे आहेत त्यांसच नद्या ह्मणतात. या पावसाळी नद्या उन्हाळ्यांत कोरड्या खडखडीत असतात. या नद्या कच्छच्या रणापर्यंत व खंबायतच्या आखातापर्यंत जाऊन तेथें नाहींशा होतात. भादर नांवाची सर्वांत मोठी नदी आहे तिला मात्र बारा महिने गोडें पाणी असतें.

२ मच्छुकांठा प्रांत मच्छुनदीचे कांठीं आहे, व तेथील संस्थानिक

जाडेजा रजपूत जातीचे आहेत. गुजरातचा सुलतान मुजफरशाहा याला पकडून दिल्याबद्दल अकबर बादशाहानें हा मुलूख कच्छचे रावाला जहागिरीदाखल १६७७ त दिला होता; परंतु १८ व्या शतकाच्या आरंभीं कच्छच्या गादीसंबंधीं वाद चालला असतांना पूर्वींच्या रावाचा कायाजी नांवाचा लहान मुलगा मच्छुकाठ्याकडे आला व त्यानें मोर्वी येथें स्वतंत्र गादी स्थापन केली. मच्छुकाठ्यांतील हल्लींचे जाडेजा रजपूत राजे हे कायाजीचे वंशज आहेत.

जाडेजा रजपुतांची यापूर्वींची हकीगतही थोडी मौजेची आहे. सोमनाथाहून ४ यादव पळून गेले, व सिंध मधील देवी हिंगळाज माता हिच्या पाठीं पडले. तिनें त्यांच्यांपैकीं एकाला आपल्या जबड्यांत (जडबुं) ठेवून त्याचें रक्षण केलें. तेव्हांपासून या समा राजांस जाडेजा ह्मणूं लागले, व त्यांनीं सिंधमध्यें पुष्कळ दिवस राज्य केलें. पुढें मोंगलांच्या स्वाऱ्यांस कंटाळून सिंध देश सोडून ते कच्छमध्यें उतरले व तेथेंच राज्य करूं लागले. येथें हमीर नांवाचा राजा राज्य करीत असतां त्याच वंशांतील जाम रावळ यानें त्याचा खून केला. जाम रावळ आपल्या तीन मुलांचेही खून करणार होता; परंतु ते पळून गेल्यामुळें बचावले. पुढें या तिन्हीपैकीं वडील मुलानें मोंगलाच्या सहाय्यानें आपल्या बापाची गादी मिळविली. यावेळेस मोंगल बादशाहानें त्यास राव ही पदवी दिली. त्याचें नांव खेंगार होतें. राव खेंगारानें बापापासून गादी हिरावून घेतली, तथापि त्याला थोडीशी जहागीर (मिरास) दिली. पुढें जाम रावळ यानें हालार प्रांतांतील कांहीं प्रांत जिंकून १५४० त नवानगर (जामनगर) शहर वसविलें, व तेंच शहर आपली राजधानी केली. राजकोट, गोंडळ, कोटडा, वीरपूर वगैरे संस्थानांचे मालक जाम रावळच्या वंशांतीलच होत. जामरावळाचा भाऊ हरधोळ यानें ध्रोळ येथें गादी स्थापन केली.

मच्छुकाठ्यांतील जमीन सपाट असून बऱ्याचपैकीं आहे, परंतु त्यांत

ज्वारीशिवाय कांहीं पिकवीत नाहींत. सौराष्ट्रांतील नद्या बहुतेक उथळ, परंतु मच्छुनदी खोल आहे व तिचे कांठ खडकाळ व तुटलेले आहेत. या प्रांतांत ववाणिआ नांवाचें एक लहानसें बंदर आहे.

३ **हालार** प्रांत सौराष्ट्रांत पश्चिमेस आहे. जाम हाला नांवाच्या जाडेजा जातीच्या कच्छच्या रावानें हा प्रांत १५३५ सालीं वसविला म्हणून याला हालार म्हणतात. या प्रांतांतील बरीच जमीन काळी व सुपीक आहे. कोठें कोठें तांबडी जमीनही आहे. बाजरी, ज्वारी, तूर, कापूस वगैरे जिन्नस पिकतात व उंसाचेंही उत्पन्न बरेंच आहे. येथील गूळ व काकवी लोक फार वाखाणतात. जोडीआ, सलाया व बेडी अशीं तीन बंदरें या प्रांतांत कच्छच्या अखातावर आहेत. पूर्वी जोडिआचा व्यापार चांगला होता, पण आगगाडी झाल्यापासून अगदीं बसला. या प्रांतांत लहान लहान बऱ्याच नद्या आहेत. येथील पाणी सर्व सौराष्ट्रांत उत्तम व निरोगी म्हणून प्रसिद्ध आहे. कोठें कोठें एखादी टेंकडीही दृष्टीस पडते.

४ **बरडा** अथवा जेठवाड प्रांत नैर्ऋत्येस आहे. यांत बरडा नांवाचा पर्वत आहे त्यावरूनच याचें नांव पडलें असावें. येथें जेठवा रजपुतांचा अंमल असल्यामुळें याला जेठवाड असेंही म्हणतात. हनुमानाचा वंशज मकरध्वज याचे वंशज हे लोक आपणास म्हणवितात. कोणी म्हणतात कीं प्राचीन सिथिअन किंवा जाठ लोकांचे हे वंशज आहेत. यांची सत्ता पूर्वी बरीच होती, परंतु हळु हळु कमी होत होत आतां अगदींच संपुष्टांत आली आहे.

या प्रांताची जमीन खडकाळ आहे, त्यांत ज्वारी, बाजरी व कापूस हीं उत्पन्न होतात. या भागांत गुरें पुष्कळ आहेत व येथून मनस्वी तूप बाहेर रवाना होतें. पोरबंदर व नवीबंदर अशीं व्यापाराचीं दोन बंदरें आहेत. पांच चार नद्याही या भागांत आहेत, व बरडा पर्वताच्या कांहीं भागांत दाट जंगलही आहे.

सं. ग्र. २

५ **सोरठ** हा दक्षिणकडील प्रांत होय. या प्रांतांत बहुतेक राजे मुसलमान आहेत; पण अम्मल मुसलमानी नाहीं, तो इकडच्या हिंदूंच्याच हातीं आहे. पूर्वी या प्रांतावर **चूडचंद्र** राजाचे वंशज **चूडासमा** रजपूत राजे राज्य करीत होते, परंतु १४७२ पासून हा प्रदेश मुसलमानांचे ताब्यांत आहे. **अकबराच्या** वेळेपासून **अवरंगजेबाच्या** वेळेपर्यंत येथें बादशहाच्या **अमदाबाद** येथील सुभेदाराचे **फौजदार** काम पहात, परंतु बादशाहत बुडाल्यावर **शेरखान** नांवाच्या अंमलदारानें **नबाब** ही पदवी धारण करून स्वतंत्रपणें राज्य करण्यास सुरुवात केली. सध्यांचे **जुनागढचे नबाब** हे याचेच वंशज आहेत.

सोरठची जमीन काळी असून उत्तम सुपीक आहे. या जमिनींत कोणचेंही पीक होण्यास हरकत नाहीं. कापूस व ऊंस यांचें उत्पन्न विपुल होतें. बाजरी, ज्वारी, व इतर धान्येंही पिकतात. **वेरावळ, मांगरोळ** वगैरे व्यापाराचीं उत्तम बंदरें या भागाला आहेत. **गीरच्या** दाट जंगलांतून वहात जाणाऱ्या नद्याही पुष्कळ आहेत. **गिरनार** व **गीर** हे प्रसिद्ध डोंगर याच प्रांतांत आहेत. सौराष्ट्रांतील बहुतेक डोंगर येथेंच जमा झालेले दिसतात. या प्रांतांत हिंदूंचीं पुष्कळ पवित्र स्थानें आहेत. सर्वांत श्रेष्ठ ह्मणजे प्रसिद्ध **सोरठी सोमनाथाचें** देवालय होय. **प्रभासपाटण** या गांवांत हें देवालय आहे. येथून जवळच **भालकापुरी** आहे. येथेंच श्रीकृष्णांनीं आपला अवतार संपविला. **पाटणहून** सुमारें १५ मैलांवर **प्राचीपिंपळा** नांवाचें पवित्र स्थान आहे.

६ **बाबरिआवाड** हा अगदीं दक्षिणेकडील प्रांत होय. बाबरिआ जातींच्या लोकांच्या वस्तीवरून याचें नांव पडलें. या लोकांच्यासंबंधीं विशेष माहिती नाहीं. अलीकडे निरनिराळ्या रजपुतांशीं लग्नव्यवहार पुष्कळ झाल्यामुळें त्यांच्यांत बऱ्याच जाती झाल्या आहेत. या भागाची जमीन बहुतेक खडकाळ आहे. बाजरी, ज्वारी वगैरे कांहीं धान्यें उत्पन्न

होतात. या प्रांतांत नद्याही नाहींत. जाफराबाद हें एक बंदर आहे व तेथें थोडा बहुत व्यापार चालतो. हें जंजिऱ्याच्या हबशाच्या ताब्यांत आहे.

७. **गोहिलवाड** प्रांताचा बराच भाग **गोहेल रजपुतांच्या** ताब्यांत असल्यावरून या प्रांतास हें नांव पडलें. **गोहेल रजपूत** आपणास **शालिवाहनाचे** वंशज ह्मणवितात. हे पूर्वीं **मारवाडांत** होते, परंतु १३ व्या शतकाच्या शेवटीं **गुजरातेंत** आले. या प्रांताच्या एका बाजूस **खंबायतचें** आखात आहे. **भावनगर** हें पहिल्या प्रतीचें व **पालिटाणा** हें दुसऱ्या प्रतीचें अशीं दोन मोठीं **संस्थानें** या भागांत आहेत. या प्रांतांतील पूर्वेकडील **खंबायतच्या रणाच्या** किनाऱ्यावरील **भाळची** सखल जमीन काळी असून सुपीक आहे. दक्षिणेकडील जमीन खडकाळच आहे. इतर ठिकाणीं बहुतेक तांबडी जमीन आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणें गहूं, कापूस, बाजरी, ज्वारी, ऊंस वगैरे पिकवितात. सर्वांत मोठी नदी **शेत्रुंजी** होय. हिला **मच्छुनदीप्रमाणें** बारा महिने पाणी असतें.

प्रसिद्ध **शत्रुंजय** पर्वत या प्रांतांत आहे. या पर्वतावर **जैन** लोकांचीं देवालयें फारच पहाण्यालायक आहेत. दुसरा **तळाजा** पर्वत हा जरी **शत्रुंजयाहून** फारच लहान आहे तरी याच्यावरही **श्रावक** लोकांचीं चांगलीं देवालयें असल्यामुळें याचें बरेंच महत्व आहे. या पर्वताचा देखावा दुरून फारच रमणीय दिसतो. येथें **बुद्ध** लोकांचीं प्राचीन लेणींही फार सुंदर आहेत. अनेक वर्षांपूर्वीं हा ज्वालामुखी पर्वत होता असें ह्मणतात. **भावनगर** व **महुवा** हीं दोन व्यापाराचीं बंदरें या प्रांतांत आहेत. याशिवाय लहान लहान बंदरेंही कांहीं आहेत. समुद्र किनाऱ्यावर **गोपनाथ** हें यात्रेचें स्थळ आहे. येथें गेल्यावर सर्व **रजपुतांनां** क्षौर करावें लागतें. सध्यां येथें उन्हाळ्यांत हवा पालटण्यासाठी लोक जातात. येथील सफेत व काळी रेती गुजरातेंत पुष्कळ ठिकाणीं जाते.

८ **ऊंदसरवइया** प्रांत. **गोहिलवाडच्या** मध्यावर असल्याप्रमाणेंच आहे.

ऊंड, ह्मणजे खोल. याची सपाटी इतर भागापेक्षां खोल असल्यामुळें नदीच्या पात्रापेक्षां याची मुळींच उंची वर नाहीं. सरवइया जातीचे रजपूत तालुकदार या प्रांतावर अंमल चालवितात ह्मणून त्यांचेवरून याचें नांव पडलें आहे. पूर्वीं हा सोरठ प्रांताखालीं मोडत असे, परंतु भीम नांवाच्या एका सोळंकी रजपूत राजानें सरवागांव आपल्या भाऊबंदांस जहागिरीदाखल दिला, तेव्हांपासून या प्रांताला सरवइया ह्मणूं लागले. येथील कांहीं तालुकदार स्वतंत्र आहेत, व कांहीं भावनगरच्या ठाकूर साहेबांचे अंकित आहेत. इतर सर्व गोहिलवाडप्रमाणें.

९ काठेवाड प्रांत सौराष्ट्राच्या अगदीं मध्यावर आहे. या प्रांताचा कांहीं भाग गाईकवाडी अंमलाखालीं आहे, व बाकीचा काठी जहागिरदारांच्या हातांत आहे. काठी जहागिरदारांच्या मुख्य तीन जाती आहेत— खाचर, खुमाण आणि वाळा. यांचें निरनिराळे भाग हल्लींच्या निरनिराळ्या प्रांताखालीं मोडतात. पांचाळ ह्मणून प्रदेश आहे तो झालावाड प्रांतांत मोडतो, कांहीं भाग गोहिलवाड प्रांतांत येतो, व कांहीं सोरठ प्रांतांत आहे. काठी जहागिरींत दायविभागाची चाल असल्यामुळें या जहागिरींचें एकंदरीनें फार नुकसान होत आहे. प्रत्येक संस्थानचे लहान लहान विभाग होत चालले आहेत, व चांगल्या जहागिरींचे पुष्कळ तुकडे पडून त्यांची खराबी होत आहे.

काठी लोक या प्रांतांत प्रथम चवदाव्या शतकांत उत्तरेकडून शिरले व लुटालुटीचाच क्रम त्यांनीं बरेच दिवस चालविला. सोळाव्या शतकांत पांचाळ प्रदेशांत मांडव डोंगराजवळ त्यांनीं आपलें ठाणें वसविलें. याच सुमारास मुसलमानी अंमल डळमळूं लागला असल्यामुळें काठी लोकांनीं आपल्या करामतीनें बराच मुलूख जिंकून घेतला. पुढें जेव्हां झाला आणि जाडेजा रजपुतांच्या स्वाऱ्या इकडे होऊं लागल्या तेव्हां त्यांपुढें त्यांचें कांहीं चालेना. परंतु त्यांनीं इकडे जो मुलूख गमाविला त्याच्या मोबदला

दक्षिणेकडील वराच मुलूख कावीज केला. परंतु ब्रिटिश लोक इकडच्या भागांत आल्यापासून या शतकांत हा सर्व बंडाव्याचा प्रकार बंद पडला.

या प्रांतांतील जमीन बहुतेक खडकाळच आहे. कांहीं थोडे भाग सुपीक आहेत आणि तेथें कापूस, ऊंस वगैरे पिकवितात. पांचाळ मुलूख इकडे फार प्रसिद्ध आहे. त्यांत पांच जिन्नस मुख्यत्वेंकरून सांपडतात अशा अर्थाची एक गुजराती ह्मण आहे. ते पांच जिन्नस हे होतः—पथ्थर (इमारतीचे नव्हत), पनडा, ह्मणजे गवत (गुरांच्या उपयोगाचें नव्हे), पाणी (पिण्याजोगतें नव्हे), मूर्ख लोक व चोर. इतक्या आयुधांची या प्रांतीं सामुग्री असतांना काठी लोकांचें या प्रांतावर प्रथम मन कसें गेलें नकळे. भादर आणि सुकभादर या मोठ्यापैकीं नद्या होत. या प्रदेशांत थोडें खणल्यास पाणी लागतें. उंच उंच डोंगर जरी या प्रांतांत नाहींत तरी बऱ्याच लांबच्या लांब टेंकड्या पसरलेल्या आढळतात. कित्येक टेंकड्यांच्या माथ्यावर पाण्याचे झरेही आहेत.

१० **ओखामंडळ** प्रांत ह्मणजे **सौराष्ट्राचें** अगदीं पश्चिमेचें टोंक होय. हा प्रांत **गाईकवाडच्या** ताब्यांत आहे. **ओखामंडळ** या नांवाबद्दल दोन तीन प्रकारचे तर्क लोक चालवितात. कोणी ह्मणतात कीं **ओखा** नांवाचा दैत्य या ठिकाणीं राज्य करीत होता ह्मणून यास हें नांव पडलें. भाषाकोविदांचें ह्मणणें कीं 'ओखा' ह्मणजे अवघड किंवा खराब आणि 'मंडळ' ह्मणजे स्वतंत्र भाग. **श्रीकृष्णाचा** नातू अनिरुद्ध याची बायको उखा हिच्यावरून हें नांव पडलें असेंही ह्मणतात व हेंच अधिक सयुक्तिक दिसतें.

अकराव्या शतकापासून ते चालू शतकापर्यंत या प्रांतांत निरनिराळ्या रजपूत लोकांचा धुमाकूळ चालला होता. इ. स. १८१६ त इंग्रज सरकारानें या सर्व लोकांस ताळ्यावर आणून हा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. पुढील वर्षीं ह्मणजे १८१७ त गाईकवाड सरकारनें इंग्रज सरकारास या कृत्यांत जो खर्च लागला तो सर्व देऊन हा मुलूख आपल्या ता-

ब्यांत घेतला. द्वारका व बेट हीं दोन हिंदूंचीं पवित्र स्थळें या प्रांतांत आहेत.

या प्रांताची जमीन बहुतेक खडकाळच आहे. बाजरी, तीळ, ज्वारी वगैरे धान्यें कोठें कोठें पिकतात. द्वारका, बेट आणि पोसित्रा हीं तीन बंदरें आहेत. पैकीं द्वारकेस आठवड्यांतून एकदां मुंबईहून कराचीस जाणारी आगबोट लागते. द्वारका बंदर फारच धोक्याचें आहे, आणि हवेंत किंचित् फेरबदल झाल्यास लाटा मनस्वी उसळतात. गोमती नांवाची पवित्र नदी या प्रांतांतून वहाते.

# भाग २.

## पौराणिक काल.

श्रीकृष्णजन्म—कंसवध—जरासंध व कालयवन—द्वारका अथवा कुशस्थळी—कौरवपांडवयुद्ध—युधिष्ठिरराज्यस्थापना—कृष्णस्त्रिया—अनिरुद्ध व सांब—यादवकुलाचा नाश—कृष्णनिधन—यादवांचें द्वारकेहून मथुरेस व तेथून काबुलांत प्रयाण—हिंदुस्थानांत पुनरागमन.

फार प्राचीन काळीं मथुरा येथें यादव वंशांतील राजे राज्य करीत होते. कंसानें आपला बाप उग्रसेन याला कैदेंत टाकिलें व आपण राज्य करूं लागला. उग्रसेनाची पुतणी देवकी हिचा वसुदेवाशीं विवाहसंबंध झाला. या प्रसंगीं 'वसुदेव आणि देवकी यांच्या अपत्याच्या हातून कंसाला मृत्यु येईल' अशी आकाशवाणी झाली. कंस देवकीचा प्राण घेण्यास सिद्ध झाला, परंतु वसुदेवानें आपलीं सर्व अपत्यें जन्मतांच कंसाच्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें. कंसानें वसुदेवाचीं सहा अपत्यें मारिलीं. सातवा पुत्र बळदेव याचा गर्भ देवकीच्या उदरांतून रोहिणीच्या उदरांत प्रवेश करिता झाला. हा गोकुळांत जन्मला. आठवा पुत्र श्रीकृष्ण याला वसुदेवानें जन्मताक्षणींच गोकुळास नंदगृहीं नेऊन त्याच वेळेस जन्मास आलेल्या नंदकन्येस आणून कंसाच्या स्वाधीन केलें. ही कन्या कंसाचे हातून सुटून आकाशपंथें निघून गेली. वसुदेवानें मुलगा अदलाबदल करून छपविल्याची गुप्त बातमी कंसास कळल्यावरून कंसानें सर्व लहान मुलांची कत्तल करण्याविषयीं हुकूम सोडला. याप्रमाणें कंस राजाचे जाचाला त्रासून पुष्कळ यादववंशीयांनीं मथुरा सोडिली.

गोकुळांत असतां श्रीकृष्णाची गोपींशीं क्रीडा तर प्रसिद्धच आहे. श्रीकृष्णाचा नाश करण्याविषयीं कंसानें पुष्कळ प्रयत्न केले, परंतु ते सर्व

व्यर्थ गेले. श्रीकृष्णाच्या अकराव्या वर्षीं कंसानें त्याला आपल्या दरबारीं बोलावून त्याचा नाश करण्याचा विचार केला, परंतु तो सिद्धीस न जातां उलट श्रीकृष्णाच्या हातून कंसाचाच वध झाला. कृष्णानें उग्रसेनास बंधमुक्त करून त्याच्या नांवानेंच आपण राज्य चालविलें. कंसाचा सासरा मगध देशाचा चंद्रवंशी राजा जरासंध यानें मथुरेवर सतरा स्वाऱ्या केल्या, पण त्याचें कांहींच चाललें नाहीं.

पुढें म्लेंच्छ राजा कालयवन हा मथुरेवर चालून आला, व इकडे जरासंधानेंही लढाईची तयारी चालविली. या दोघांशीं युद्ध करण्यापेक्षां मथुरेहून आपली राजधानी हालविणें हें बरें असें वाटून बलराम व कृष्ण ह्यांनीं द्वारका शहर वसविलें आणि तेंच राजधानीचें शहर करिते झाले. कृष्णानें मुचकुंदाकरवीं कालयवनाचा वध करविला व मथुरेहून हळुहळु तो द्वारकेस येऊन पोंचला. मथुरेहून निघाल्यावर बरेच देशांतून येत येत श्रीकृष्णाची स्वारी आनर्त देशीं दाखल झाली. याच देशाची राजधानी द्वारका होय. द्वारकेस पूर्वीं कुशस्थली ह्मणत. बलरामाची पत्नी रेवती हिचा बाप रेवत हा येथें राज्य करीत होता. पुढें तो द्वारकेहून गिरनार पर्वतावर गेला. गिरनारास अद्यापही रेवताचल ह्मणतात.

हस्तिनापुरीं कौरव राज्य करीत असतां पांडवसहाय श्रीकृष्णानें पांडवांस राज्याचा कांहीं भाग मिळावा ह्मणून अक्रूराला कौरवांकडे पाठवून खटपट केली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं द्रौपदीविवाहसमयीं कृष्णानें पांडवांस इंद्रप्रस्थ नगर मिळवून दिलें. इंद्रप्रस्थीं पांडवांची सत्ता व यश इतकीं वाढलीं कीं त्यांनीं राजसूय यज्ञ आरंभिला. यज्ञांत एका प्रसंगीं द्रौपदी दुर्योधनास हंसल्यामुळें त्यास फार वाईट वाटलें. दुर्योधनानें पांडवांना द्यूतासाठीं आव्हान केलें. द्यूतांत हरल्यामुळें पांडवांस बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागला. त्यानंतरही कौरव आपल्या बंधूंस राज्याचा वांटा देईनात. यावरूनच प्रसिद्ध भारती युद्धास

सुरुवात झाली. या युद्धांत पांडव विजयी झाले. हस्तिनापूरच्या राज्यावर युधिष्ठिराची स्थापना करून श्रीकृष्ण द्वारकेस परत गेले.

रुक्मिणी, सत्यभामा आणि जांबुवती अशा कृष्णाच्या तीन नायका. रुक्मिणीच्या पोटीं प्रद्युम्न जन्मास आला, व प्रद्युम्नाचा पुत्र अनिरुद्ध. शोणितपूरचा राजा बाणासूर याच्या उखा नांवाच्या कन्येशीं अनिरुद्धाचा विवाह झाला. उखामंडळ हें नांव हिच्यावरूनच पडलें असावें असें मागें सांगितलेंच आहे.

जाम्बुवतीचा पुत्र सांब हा मनस्वी उपद्यापी असे. बरेंच ऋषिमंडल घेऊन दुर्वास ऋषि एकदां यात्रेसाठीं द्वारकेस आले असतां, यादवांचीं बरींच मुलें जमा करून सांब ऋषींस त्रास देण्यासाठीं गेला. ऋषींनीं क्रोधानें यादवकुलाचा समूळ नाश होईल असा शाप दिला. या शापाचें प्रतीकरण करण्यासाठीं श्रीकृष्ण, सर्व यादवांस बरोबर घेऊन सोमनाथाच्या यात्रेस गेले. या ठिकाणीं यादवांचा एकमेकांत तंटा उद्भून सर्व मरण पावले. मात्र बळराम, श्रीकृष्ण त्यांचा सारथि, व इतर तीन, चार असामी शिल्लक राहिले. सांबानें प्रद्युम्नास मारिलें व आपण मथुरेस निघून गेला. बळराम समाधिस्थ झाला. पिंपळाच्या झाडाखालीं निद्रिस्त असतां भिल्लाचा बाण पायांत गेल्यामुळें श्रीकृष्णाचाही येथेंच अंत झाला. कृष्णाच्या सांगण्यावरून अर्जुनानें यादववंशांतील सर्वत्रांस द्वारकेहून मथुरेस नेलें. वाटेंत हल्लींच्या वाघेरे लोकांचे पूर्वज काबा लोक यांनीं त्यांनां लुटलें. अर्जुनासारख्या महा योद्ध्याचीही अशी धांदल झालेली पाहून एका कवीनें पुढील दोहरा लिहिला आहे.

**समय सदा बळवान है, नहि पुरुष बळवान ।**
**काबे अर्जुन लूटीयो, एहि धनुख एहि बाण ॥**

यादवांस मथुरेस नेऊन वज्रनाभाचा मुलगा अनिरुद्ध याला अर्जुनानें गादीवर बसविलें. हस्तिनापुरीं परीक्षितास गादीवर बसवून अर्जुन स्वतः

अरण्यवासास उत्तरेकडे निघून गेला. तेथेंच सर्व पांडवांचा अंत झाला. कांहीं यादव काबुलांत गेले व तेथें त्यांनीं अराच प्रांत काबीज केला. यापैकीं कांहीं लोक पुनः हिंदुस्थानांत परत आले व त्यांनीं सामीनगरचा समावंश स्थापन केला. कांहीं खालीं मारवाडांत उतरले व जेसलमीर संस्थान स्थापून तेथें राज्य करूं लागले.

# भाग ३.

## प्राचीन इतिहास.

(इ. स. पू. ३००—इ. स. १०२४).

मौर्यवंश—अशोक—बाक्ट्रिया—क्षत्रप अथवा शहावंश—गुप्तवंश—वलभीवंश—अनहिलवाडचे चावडे—गुजरातचे राजे—सौराष्ट्रांतील प्रदेशाची स्थिति—चूडासम रजपूत वंथळीस राज्य स्थापितात—जेठवा रजपूत व मोर्वी—मेर व तमाणा.

इ. सनापूर्वी तिसऱ्या शतकांत मौर्यवंशी राजे राज्य करीत होते. यांच्या राज्याचा विस्तार उत्तरेस हिमालयापासून ते दक्षिणेस पांड्य अथवा दूरपर्यंत व पूर्वेस मगध अथवा बहारपासून ते पश्चिमेस सौराष्ट्रापर्यंत होता. या वंशांतील जगत्प्रसिद्ध राजा अशोक याचे लेख अनेक ठिकाणीं सांपडतात. जुनागढ नजीक गिरनार पर्वतावरील खडकावर याचे नियम कोरलेले आहेत. हा राजा बौद्धधर्मी होता, तथापि इतर धर्मांच्या लोकांना कोणच्याही प्रकारें त्रास देत नसे. त्याची गरीब लोकांसंबंधीं सहानुभूति व औदार्य हीं अवर्णनीय होतीं. देवब्राह्मणांसही तो फार मान देत असे. रस्ते, विहिरी, तलाव धर्मशाळा बांधणें औषधि व इतर झाडें वाढविणें या गोष्टींत त्यानें आपलें नांव अगदीं अजरामर केलें आहे.

गिरनार पर्वतावर यावेळचे पुष्कळ लेख अद्यापही सांपडतात त्यावरून या स्थानाचें माहात्म्य फार प्राचीनकाळापासून चालत आलें आहे हें उघड आहे. अशोकाचे सुभेदार जुनागढास राज्य करीत असत. याच्या मरणानंतर बाक्ट्रियाचा अंमल सौराष्ट्रावर बसला. परंतु सौराष्ट्रांतील बाक्ट्रियाचे सुभेदार स्वतंत्र झाले. हाच क्षत्रप अथवा शहा वंश होय. याचें राज्य कच्छ, सौराष्ट्र, गुजरातचा खंबायतपर्यंतचा भाग, व माळवा इ-

तक्या प्रदेशावर होतें. या वंशाच्या २४ राजांचीं नांवें दिलेलीं आहेत.*

या वेळच्या नाण्यांवरून तसेंच गिरनारामधील व इतर लेखांवरून, या वंशांतील राजे फार बलाढ्य होते असें अनुमान काढतां येतें. नाण्यांवर एका बाजूस राजाचें चित्र व दुसऱ्या बाजूस अग्निकुंड व सूर्यचंद्रांच्या मूर्ति काढलेल्या आढळतात. हे राजे यांच प्रदेशांतील आहीर, मेर वगैरे सरदारांनां नोकरीस राखीत असत.

क्षत्रप वंशानंतर हा देश गुप्त वंशाच्या ताब्यांत गेला. कुमारगुप्तानें प्रथम देश काबीज केला, व वंथळी (वामनस्थळी) येथें एक सुभेदार

---

* या चोवीस राजांचीं नांवें खालीं दिलीं आहेत. कै. डा. भाऊ दाजी यांच्या ह्मणण्याप्रमाणें हे राजे इ. स. १४० व ३८० च्या दरम्यान होऊन गेले. हल्लीं सांपडलेलींही कांहीं नांवें शेवटीं दिलीं आहेत.

१ **न**हपान इ. स. ७०
२
३ ध्समोतिक्त
४ **स्वा**मीचष्टन ९०
५ **ज**यदामा
६ **जी**वदामा ११३
७ **रु**द्रदामा
८ **रु**द्रसिंह १८०-१९६
९ **रु**द्रसेन २०५
१० **श्री**सेन
११ **सं**घदामा
१२ **दा**मसेन
१३ **य**शोदामा
१४ **दा**मजतश्री २२६
१५ **वी**रदामा
१६ **ई**श्वरदत्त
१७ विजयसेन (१४०-१५४) इ. स. २१८-२३२
१८ **दा**मजटश्री
१९ **रु**द्रसेन २६६, २७६, २७०
२० **वि**श्वसिंह २७८
२१ **अ**त्रिदामा २८८, २९२
२२ **वि**श्वसेन २९५, ३०३
२३ **रु**द्रसिंह ३२८
२४ **य**शोदामा
२५ **स्वा**मीरुद्रसेन
२६ **स्वा**मीरुद्रसेन
२७ **श्री**दामा
२८ **स**त्यसिंह
२९ **सिं**हसेन

नेमून स्वतः आपल्या देशीं निघून गेला. याच्या मागून स्कंधगुप्त गादीवर आला. स्कंधगुप्ताच्या पश्चात् गुप्ताचे सुभेदार सूर्यवंशी वलभी रजपूत हेच राजे बनले. गुप्तवंशांतील राजांना महाराजाधिराज ह्मणत, आणि पार्वती, मोर व त्रिशूळ हीं त्यांचीं राजचिन्हें होतीं. कुमारगुप्ताचीं नाणीं अजून सौराष्ट्रांत सांपडतात. नुकतीच वळ्यास (वलभी) १२००० रुप्याचीं नाणीं एके ठिकाणींच सांपडलीं. तीं सर्व कुमारगुप्ताचींच आहेत.

वलभीराजांच्या वेळचे बरेच ताम्रपट सांपडल्यामुळें त्यांच्या संबंधी माहिती अधिक मिळते. हे हिंदूराजे शिवभक्त होते, तथापि बौद्धधर्मीयांबद्दल यांच्या मनांत आदर असे. डा. बुल्हरनीं या वंशाच्या एकोणीस* राजांचीं नांवें शोधून काढिलीं आहेत. वलभी संवत इ. स. ३१८ व्या वर्षीं सुरू झालें.

वलभी वंशाचा मोड झाल्यावर अनहिलवाडचे चावडे प्रबल झाले. परंतु त्यांचा अंमल सौराष्ट्रांत चोहींकडे पसरला नाहीं. मूळराज सोळंकीच्या वेळेपासून गुजरातच्या राजांचाच अंमल सौराष्ट्रावर बसला.

---

*या एकोणीस राजांचीं नांवें येणेंप्रमाणें.

१ भट्टारक सेनापति
२ धरसेन (पहिला)
३ द्रोणसिंह
४ ध्रुवसेन (पहिला)
५ धरपट्ट
६ गुहसेन
७ धरसेन (दुसरा)
८ शिलादित्य (पहिला)
९ खरग्रह (पहिला)
१० धरसेन (तिसरा)
११ ध्रुवसेन (दुसरा)
१२ धरसेन (चवथा)
१३ ध्रुवसेन (तिसरा)
१४ खरग्रह (दुसरा)
१५ शिलादित्य (दुसरा)
१६ शिलादित्य (तिसरा)
१७ शिलादित्य (चवथा)
१८ शिलादित्य (पांचवा)
१९ शिलादित्य (सहावा)

सौराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांत फार प्राचीनकाळापासून वस्ती असे. येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांच्या योगानें इतर देशांशीं संबंध झाल्यामुळें किनाऱ्यावरील प्रदेश बराच पुढें सरसावला होता. प्राचीनकाळीं सौराष्ट्र हें बहुतकरून बेट होतें. माधवपुरापासून जाफराबादेपर्यंतच्या पट्टीस नाघेर ह्मणतात व येथेंच फार दाट वस्ती होती. याशिवाय घोघा, द्वारका, पोरबंदर, दीव वगैरे ठिकाणेंही बरींच दळणवळणाचीं होतीं. समुद्रकिनाऱ्यापासून पंधरा सोळा मैलांवर आंत मनुष्याचें पाऊल फारसें दृष्टीस पडत नसे. मुख्यत्वेंकरून अहीर लोकांची वस्ती फार होती. वळभी, वंथळी, जुनागढ, वढवाण व इतर कांहीं स्थळें खेरीजकरून बाकी सौराष्ट्राच्या मध्यभागीं दाट जंगल होतें. घोघा, धोळका, धंधुका व वढवाणच्या आसपासचा प्रदेश वगैरे वलभीराज्यांतील भाळमुलखांत विशेष वस्ती असे. जुनागढ आणि वंथळी ही वलभीराजांच्याच ताब्यांत असत. नाघेर प्रांतावर सुद्धां त्यांचाच अंमल असावा असें पुष्कळ संभवतें.

सौराष्ट्राचा अपभ्रंश सोरठ हें नांव हळुहळु आंतील भागास लावूं लागले. प्रथम चूडासमीचें राज्य व पुढें जुनागढ फौजदाराच्या हाताखालील प्रदेश ह्यांचा याच नावांत समावेश होऊं लागला. जाडेजा रजपुतांनीं झालावाड व हालार हे प्रांत काबीज केल्यावर ते सोरठ या नांवाखालीं येत नसत. मराठ्यांच्या वेळेपर्यंत (·१७२५) गोहेलवाड व काठेवाड हे सोरठप्रांतांतच मोडत. शेरखान बाबी जुनागढास स्वतंत्र झाल्यावर त्याच्या हाताखालच्या मुलखासच फक्त सोरठ हें नांव देऊं लागले.

---

* अबुल फाजल यानें आपल्या अइन-ई-अकबरी ग्रंथांत सोरठप्रांताचे खालीं लिहिल्याप्रमाणें विभाग दिले आहेत. नव्या सोरठचे परगणे:—जुनागढ, हवेली, सुलतानपूर, सरवा, वांसावड, चूडा, राणपूर, कंडोरणा, हाथसणी, ऊंद, मेंदरडा, भाद्रोद, वगैरे. जुन्या सोरठ (नाघेर) चे परगणे:—पाटण, सोमनाथ, ऊना, देलवाडा, मांगरोळ, कोडिनार, मूळद्वारका, चोरवाड, दीव, वगैरे. हे सोळाव्या शतकांतील विभाग होत. यावेळेस उत्तरेकडील समुद्रकिनाऱ्यावरील

सौराष्ट्र व आभीरिया हे दोन्ही बहुतकरून इराणच्या राज्याचेच भाग असावेत, आणि शहाराजे हे बाक्ट्रियाच्या राजांचे सुभेदार असावेत. पुढें गुप्त व वलभी या वंशांच्या ताब्यांत जेव्हां हा देश गेला तेव्हां हा मध्यभागही त्यांच्याकडेच बहुतकरून गेला असला पाहिजे. वलभीचा मोड झाल्यावर मध्यभागीं पुनः जंगल पसरूं लागलें, मनुष्याचें दळणवळण कमी झालें. किनाऱ्यावरील प्रदेशांत पूर्वीप्रमाणें व्यापार व व्यवहार चाले. हा प्रदेश चावडे व गोहिलोट ( गोहेल ) यांच्या हातांत होता. चावडे हे एका पुरातन रजपूत घराण्यांतील होते, व गोहेल हे सूर्यवंशी होते. सोगडिअन ( सोढा ) व गांधार यांचीं नांवेंही चावडे व गोहिल यांच्या नजीकच सांपडतात. उमरकोट व नगरपारकरचे सोढालोक यांचा चूडासमाशीं नजीक संबंध दिसतो. कच्छमधील चावड्यांच्या ठाण्यापासून हे फारसे दूर नव्हते. काठीलोक पार्थिअन लोकांचे वंशज असावे ह्मणतात. या लोकांची पहिली स्वारी बहुशः वळाचमारडीच्या वाळाकाठीनीं केली, पुढें ते तळाजा आणि भाद्रोदकडे पसरले, व तेच हल्लीं ढांकचे वाळा रजपूत ह्मणून प्रसिद्ध आहेत. चूडासम, जेठवा, व बाबरीआ या लोकांशीं प्रथम यांनीं लग्नव्यवहार सुरू केला, व नंतर चूडासम व जेठवा लोकांप्रमाणें आपणासही हे रजपूत ह्मणवूं लागले. पोरबंदर किंवा नवानगरच्या राजाचें जेव्हां ढांकवाळाजातीच्या मुलीशीं लग्न होतें तेव्हां तिला अद्याप काठिआणिबा अथवा काठिआणिमा ह्मणतात.

चावडा वंशांतील अनहिलवाड राजे गुजरातेंत राज्य करीत असतां यादवांचे वंशज चूडासम रजपूत लोकांनीं सिंधांतील ठठ्ठामधून येऊन वं-

---

चिरोटी हालारप्रांतांत मोडत होती, व नैर्ऋत्येकडील मियानी व माधवपूर यामधील भागाला बरडा ह्मणत असत. महुवा व आसपासचा प्रदेश याचा वालकमध्यें, व घोघा आणि सभोंवारचा प्रदेश याचा गोहेलवाडमध्यें समावेश होई. नाघेरचे जुनें सोरठ हेंच नांव अद्याप चालू होतें.

थळी व जुनागढ येथें राज्य वसविलें. त्यांच्या सत्तेनें त्यांनीं हळूहळू सर्व देश व्यापिला. वंथळी येथें राज्याची स्थापना करणारा जो चूडचंद्र त्याच्यावरून चूडासम हें नांव पडलें असावें.

सुमारें इ. स. ९०० मध्यें अथवा कदाचित् त्यापूर्वी २५० अडीचशें वर्षें जेठवा रजपूत सिंधमधून मोर्वी येथें येऊन दाखल झाले. मोर्वी जिंकून घेऊन बरड्याचा किनाऱ्यावरील मुलुख त्यांनीं ताब्यांत घेतला व श्रीनगर येथें ठाणें वसविलें. हळुहळु बरडा डोंगराच्या आसपासचा मुलुख हाताखालीं आणून सालकुमारानें घुमली शहरची स्थापना केली. याला भुमली अथवा भूभृतपल्ली असेंही ह्मणतात. चावडे रजपूतांच्या वाटेस केव्हांही गेले नाहींत. बरडा डोंगरांतून अद्याप रहाणारे मेर लोक हे जेठवा रजपूताबरोबरच सौराष्ट्रांत आलेले, मात्र ते नेहेमीं त्यांच्या तंत्रानेंच चालत. कदाचित् मेर व जेठवा हे एकाच जातीचे असून जेठवा हे राजकुलांतील असावे. परंतु पुढें मेर लोकांनीं शत्रुंजयी नदीकाठीं तमाणा (तिम्बाणक) येथें राज्य केलें. चावड्यांच्या अंमलाखालीं मेर लोक बरेच उच्चपद पावले. तमाणा येथील ताम्रपटांत तेथील मेर राण्याला मेहर श्रीजगमाल हे नांव दिलें आहे.

# भाग ४.

## मुसलमानांचा प्रवेश.

(इ. स. १०२४–१४०३).

गझनीच्या महमदाची सोमनाथावरील स्वारी—अनहिलवाडचा मूळराज सोळंकी—जुनागढचे चावडे—सिद्धराज जयसिंहाची जुनागढावर स्वारी—राणिकदेवी—नोंघण—कुमारपाल—वाढेल रजपूत व वाजा अथवा विंजल रजपूत—सेजकजी व गोहेल रजपूत—महमद तघलखाचा सरदार अनहिलवाडची गादी घेतो व पुढें सोमनाथावर जाऊन जुनें सोरठही घेतो—मांगरोळच्या गोहिल्यांचा मोड व मुसलमानी सत्तेचा फैलाव—झुफरखानाची सोमनाथावरील स्वारी.

अशा प्रकारची सौराष्ट्राची स्थिति असतां गझनीच्या महमदानें सोमनाथावर १०२४ त स्वारी केली. यावेळेस सोमनाथाला जाण्यास तीन रस्ते होते—एक कछच्या आखाताच्या बाजूनें द्वारकेवरून, दुसरा जुनागढावरून, व तिसरा दक्षिणकिनाऱ्यानें घोघ्यावरून. शेवटचा रस्ता अंमळ लांबचा आहे खरा तथापि द्वारका अथवा जुनागढ येथें महमदानें धुमाकूळ केल्याचें कोठें लिहिलें नसल्यामुळें, व एका ग्रंथांत यासंबंधीं दबलवाड ( देलवाड ) या गांवाचें नांव आलें असल्यामुळें असें दिसतें कीं महमद बरेंच चक्कर खाऊन दक्षिणकिनाऱ्यानेंच सोमनाथपाटणवर चालून आला असावा. यावेळेस खंबाळिआपर्यंतचा उत्तर किनाऱ्यावरील प्रदेश जेठवा रजपुतांच्या ताब्यांत होता. उखामंडळ व मिआनीपर्यंतचा किनाऱ्याचा भाग चावड्यांच्या हातांत होता. गोहेल रजपुतांचा अंमल मांगरोळ व किनाऱ्यावरील माधवपूरपर्यंतच्या पट्टीवर होता. बरडा जेठव्यांच्या, व थेट महुवापर्यंत नाघेर मुलुख चावड्यांच्या राज्यांत मोडत असे. खुद्द महुवा व वालाकपर्यंत किनाऱ्याचा प्रदेश वाळा रजपुतांच्या

स्वाधीन असे, व बाकी राहिलेल्या किनाऱ्याच्या भागांत कोळीलोकांचा अंमल होता. जुनागढच्या बळकट डोंगरीकिल्याच्या आश्रयानें मध्यभागांतील प्रदेशावर चूडासमी राजे राज्य करीत. महमदानें प्रथम कामेश्वर, कोरडा या मार्गानें जाऊन मांगरोळचा मोड करून नंतर सोमनाथावर मोर्चा फिरविला. पाटणच्या राजाचा महमदानें मैदानांत एक दोन वेळ पराभव करून नंतर शहरास वेढा दिला. हिंदूराजानें शूरत्वानें पुष्कळ वेळ टिकाव धरिला परंतु शत्रूचें सैन्य फारच मोठें असल्यामुळें त्याचा निभाव लागेना. महमदानें सोमनाथाच्या देवालयाचा विध्वंस केला वगैरे इतिहास प्रसिद्धच आहे. नाघेरप्रांताची हवा महमदास फार आवडली व सोमनाथास रहाण्याचाही एक वेळ त्याचा विचार होता. परंतु शेवटीं पाटणास मिथाखान नांवाचा सुभेदार नेमून महमद परत गेला. सोमनाथाच्या देवालयाचा जो नाश केला तो या मिथाखानानेंच असें ह्मणतात.

इकडे इ. स. ९४२ त सामंतसिंह चावड्यास पदच्युत करून मूळराज सोळंकी हा अनहिलवाड पाटणाच्या गादीवर बसला. गुजरातेंत चावड्यांचा पाडाव होऊन या वेळेपासून पुढें सोळंकी वंशाचा अंमल स्थायिकपणें बसला. अनहिलवाडचा अंमल जरी गुजरातेंत सर्वत्र पूर्णपणें बसला नव्हता तरी मूळराजानें पुष्कळ दिवस व चांगल्या रीतीनें राज्य केलें, आणि सोरठप्रांतांत जुनागढच्या चूडासम राजांबरोबर त्याच्या लढाया तर फार प्रसिद्ध आहेत. या वेळेपासून अनहिलवाडचे राजे जुनागढच्या रालों आपला अंकित असें समजत. परंतु यासंबंधीं जुने लेख वगैरे कांहीं मिळत नाहींत. येवढ्या अवकाशांत किनाऱ्यावरील पट्टीवर मुसलमानी अंमल कमी होत जाऊन चावड्यांची सत्ता फैलावत चालली. समुद्रावरील प्रदेशाची व विशेषेंकरून नाघेरप्रांताची या वेळेस फार भरभराट होती. मुसलमानांशीं संबंध आल्यामुळें समुद्रापलीकडील इतर मुसलमानराष्ट्रांशीं

* जुनागढच्या राजांस रा ह्मणत.

व्यापार बराच वाढला होता. तथापि अनहिलवाडची सार्वभौम सत्ता इ. स. ११०० पर्यंत नाघेरास पोंचली नव्हती.

सिद्धराज जयसिंह हा अनहिलवाडच्या गादीवर १०९४ त बसला. सोरठप्रांत जिंकण्याचें त्याच्या मनांत फार होतें. लढाई प्रथम सुरू होण्यास दोन कारणें झालीं. सिद्धराज माळव्यांत गेला असतांना जुनागढच्या राखेंगारानें अनहिलवाडचे मोठे दरवाजे मोडून टाकिले होते. दुसरें कारण ह्मणजे सिद्धराजानें ज्या राणिकदेवीशीं लग्नाबद्दल मागणी केली होती तिच्याशींच राखेंगारानें लग्न लाविलें. या जुनागढच्या स्वारीमुळें मोठमोठे तलाव बांधले गेले. याच वेळेस अनहिलवाडहून थेट जुनागढपर्यंतचा मोठा रस्ता केला गेला. हा रस्ता नीट सरळ जंगलांतून काढला होता व उताऱ्याच्या ठिकाणीं चौक्या, तलाव, विहिरी वगैरे सोई केल्या होत्या. वढवाण, सायला, अडाळा, धांदलपूर, चोबारी, आनंदपूर, सरधार, गोंडळ, वीरपूर आणि जेतपूर या ठिकाणीं सैन्याच्या छावणीसाठीं किल्ले बांधून ठाणीं केलीं होतीं. पुढें हाच रस्ता सर्व लोक वापरूं लागले. इ० स० ११२५ त अनहिलवाडचें सैन्य या प्रांतांत शिरलें. राचा मुलुख लवकरच हातीं आला परंतु जुनागढपुढें इलाज चालेना. शेवटीं राचे देसल व विसल नांवाचे पुतण्ये होते त्यांनीं विश्वासघात केल्यामुळें जुनागढचा किल्ला शत्रूंच्या हातीं लागला व रा मारला गेला. सिद्धराजानें राच्या मुलांस ठार मारिलें व राणिकदेवीचें मन वळविण्याविषयीं फार प्रयत्न केले. त्या साध्वीनें त्याच्या मनधरण्यांस न जुमानतां त्याला शाप देऊन पतीच्या चितेवर देह अर्पण केला. वढवाणास तिचें देऊळ अद्याप तिच्या पातिव्रत्याची साक्ष देत आहे.

जुनागढ जिंकून घेतल्यानंतर सिद्धराज सोमनाथला गेला व तेथील व इतर किनाऱ्यावरील सरदारांस त्यानें आपली सत्ता कबूल करण्यास लाविलें. सौराष्ट्रांत सर्वत्र आपला अंमल बसविला असा हा अनहिलवाडचा

पहिलाच राजा. जुनागढास सुभेदार नेमून व किनाऱ्यावरील प्रदेशांतही एक अंमलदार ठेऊन सिद्धराज अनहिलवाडास निघून गेला. या अंमलदारास मांगरोळच्या गोहेल[1]राजानें ११-१३ त हांकून दिलें. पुढें लवकरच जुनागढच्या सुभेदारासही तेथील लोकांनीं घालवून दिलें व तिसऱ्या नोंघण नांवाच्या राजानें ११२५ त राज्य पटकाविलें. सिद्धराज हा असला अपमान सहन करणारा माणूस नव्हता. परंतु रा नोंघण त्यास शरण जाऊन त्यानें खंडणी दिली असल्यास नकळे. सिद्धराजाच्या दरबारी लोकांचेही हात दाबले असतील असें दिसतें.

अनहिलवाडच्या राजांमध्यें सर्वांत श्रेष्ठ असा जो सिद्धराज हा मरण पावल्यावर ११४४ त कुमारपाल गादीवर आला. ह्या राजानेंही फार प्रसिद्धीस येऊन कीर्ति मिळविली. हा प्रथम शिवभक्त असून नंतर जैन पंथांत शिरला. तो प्रथम एकदां सोमनाथास जाऊन आला होता परंतु पुढें त्याचें सर्व लक्ष्य शत्रुंजय, गिरनार व तारिंग येथील जैन देवालयांकडे लागलें. राज्यांत चोंहीकडे त्याचा अंमल चांगल्या रीतीनें बसला होता.

सुमारें १२२५ त वाढेल आणि वाजा जातीचे राठोड रजपूत द्वारकेस यात्रेसाठीं जाण्याच्या मिषानें या प्रांतांत शिरले. चावडा व हरोळ रजपुतांची त्यांनीं विश्वाघातानें कत्तल केली व उखामंडळ काबीज केलें. तेथील मूळच्या रजपुतांचा वध करून उखामंडळ काबीज केलेल्या राठोड रजपुतांनीं संस्कृत वध् शब्दापासून वाढेल हें नांव घेतलें. कच्छच्या आखाताच्या किनाऱ्याच्या दक्षिणेकडील भागांत थेट खंबाळिआपर्यंत आपला

---

१ गोहेल रजपूत हे वलभीच्या पूर्वीच्या राजांचें भायात होत, व ते आपणास सूर्यवंशी ह्मणवीत. मांगरोळ हें त्यांचें मुख्य ठिकाण होतें. परंतु समुद्रकिनाऱ्यावरील पोरबंदरपर्यंतच्या प्रदेशावर यांचाच अंमल होता. दक्षिणेकडे सोमनाथाच्या चावड्यांच्या मुलखापर्यंत हे गेले होते.

अंमल त्यांनीं बसविला. यांच्यापैकीं एक वेजो हा दक्षिणेकडे गेला व त्यानें मांगरोळचें गोहिलराज्य खेरीज करून बाकी सोमनाथ वगैरे सर्व नाघेर मुलुख चावड्यांपासून हिरावून घेतला. वेजोवरूनच वाजा रजपूत नांव पडलें. वाजा रजपुतांचें वेजो अथवा विंजल हें फार आवडतें नांव बनलें. विंजलजातीच्या दुसऱ्या एका रजपुतानें गीर पर्वतांत जाऊन रावळ नदीवर विंजलकोट ( वेजलकोट ) किल्ला बांधिला व तेथून उनादेलवाडा, उंचाकोटडा वगैरे ठिकाणें जिंकून घेतलीं. जुन्या लेखांत या वाजा राजांचें नांव पुष्कळ वेळां आढळतें.

मारवाडांत लूनी नदीचे कांठीं खेरगढ शहर आहे. तेथील ठाकुराचा मुलगा सेजक हा गोहेल रजपूत लोक बरोबर घेऊन खेरगढ सोडून सौराष्ट्रांत उतरला. राखेंगार यानें अनहिलवाडच्या झालावाड सरहद्दीवर सेजकजीस एक गांव दिलें. त्याचें नांव त्यानें सेजकपूर असें ठेविलें. राणोजी, सारंगजी आणि शाहजी असे सेजकजीस तीन पुत्र होते. हल्लींचे भावनगरचे ठाकूर हे राणोजीचे वंशज. सारंगजीचे वंशज लाठीस, व शाहजीचे पालिटाण्यास ठाकूर आहेत.

वंथळीच्या ठाकुरांची जात जरी बरोबर समजत नाहीं तथापि धोळका येथील वाढेले रजपुतांबरोबर यांचा लग्नसंबंध झालेला होता. धोळक्याचे वाढेले हे गुजराथेंत फार प्रमुख होते व त्यामुळेंच वंथळीचें राज्य बरेच दिवस टिकलें.

कालपरत्वें वाढेल्यांची सत्ता कमी झाली. दिल्लीचा अधिपति सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याच्या आलघखान नामें सेनापतीनें १२९७ त अनहिलवाड जिंकून घेतलें. पुढें लवकरच त्यानें सोमनाथ पाटण काबीज केलें व तेथें बरीच लुटालूट केली. हळुहळु सर्व नाघेरप्रांत आपल्या हाताखालीं घातला. महमद गझनीच्या स्वारीप्रमाणें याही स्वारीचा संबंध जुनागढ व द्वारका ह्यांच्याशीं सांपडत नाहीं. यावरून पूर्वीप्रमाणें

आलघखानही दक्षिण किनाऱ्यावरील मार्गानेंच आलासें दिसतें. असो याप्रमाणें जुनें सोरठ मुसलमानी अंमलाखालीं आलें परंतु नवें सोरठ अथवा चूडासम राचा मुलुख हा स्वतंत्रच राहिला. खरें पाहिल्यास इकडील मुसलमानी सत्ता यावेळेस डळमळीतच होती. गुजरातच्या सुभेदाराची राजधानी अनहिलवाड पाटण ही बरीच लांब होती, व येण्याजाण्यास रस्तेही चांगले नव्हते. गुजराथच्या सुभेदारास स्वतःचीच व्यवस्था ठेवण्यास कठीण पडत असल्यामुळें सैन्यांतून सौराष्ट्रांत लोक पाठविण्यास त्यास बनत नसे.

दिल्लीचा बादशहा महमद तघलख १३४७ त गुजराथेंत उतरला. घोघ्याजवळ लढाईंत मोखडा गोहिल्याचा पाडाव करून किनाऱ्याकिनाऱ्यानें उनादेलवाडापर्यंत मुलुख त्यानें काबीज केला. परंतु सोमनाथपर्यंत त्याची मजल पोंचली नाहीं. पुढें १३५० त त्यानें जुनागढावर चाल करून राखेंगारास जेरीस आणिलें व त्याच्याकडून खंडणी घेतली. इ. स. १३५१ त महमदाच्या मरणानंतर फेरोझ तघलख गादीवर बसला. त्यानें १३६० मध्यें गुजरात जिंकून जुन्या सोरठेंत पुनः मुसलमानी अंमल बसविला, व झुफरखान यास सुभेदार नेमिलें. याच बादशहानें मांगरोळच्या गोहेल रावळाचा पाडाव करण्यासाठीं इझउद्दीन व सय्यद शिकंदर यांच्या हाताखालीं बरेंच सैन्य पाठविलें. यांनीं रावळाचें सर्व राज्य जिंकून घेतलें व तेथें मुसलमानी धर्माचा पुष्कळ फैलाव केला. रावळाचें देवालय होतें त्याची रावळमशीद बनविली, व एक मोठी थोरली जुम्मामशीदही बांधिली. मांगरोळ हें व्यापाराचें उत्तम बंदर होतें व तें घेतल्यामुळें वायव्येकडे माधवपूरपर्यंत मुसलमानीसत्ता चांगल्याप्रकारें स्थापित झाली, व्यापाराचीही उत्कृष्ट भरभराट होऊं लागली.

माधवपुर व देलवाडा आणि दक्षिणेकडे जाफराबाद (हें शहर त्यावेळेस वसलें नव्हतें.) यामधील किनाऱ्यावरील प्रदेशांत मुसलमानी अंमल

उत्तमप्रकारें बसला. गुजरातच्या सुभेदारीवर १३९१ त झुफरखान बिन वजीहउल–मुल्क याची नेमणूक झाली व हाच सुलतान मुझाफर होय. किनाऱ्यांवरील सरदार १३९८ त बरीच गडबड करूं लागले व पूर्वी दोनदां नाश झाला असतांही जगत्प्रसिद्ध सोमनाथाची महती पुनः फार वाढली. झुफरखान एकदम तिकडे गेला व एका खडाजंगी लढाईत त्यानें हिंदूलोकांचा पाडाव करून सोमनाथाच्या विध्वंसाची तृतीयावृत्ति काढिली. याच लढाईत हमीर गोहेल व बेगडो भील यांनीं धर्मासाठीं युद्ध करीत असतां आपल्या देहाचे बळी दिले. मुसलमानी अंमलाचा पाया मजबूद करून झुफरखानानें सोरठेस एक व मांगरोळास एक असे दोन सुभेदार नेमिले. सोरठेच्या सुभेदाराचें ठाणें सोमनाथपाटण हें असे.

# भाग ५.

## अमदाबादचे सुलतान.

(इ. स. १४०३-१५२५.)

सुलतान अहमदशहाची रा मलेकवर स्वारी—सुलतानांचें प्राबल्य—सुलतान महमद बेगडा व रा मंडलीक—मुसलमानांचा जुनागढांत प्रथमचा व कायमचा शिरकाव—उखामंडळचा भीम—जुनागढच्या जहागिरदार व ठाणेदार—कुव्याचे झाला रजपूत—नवीन राज्यव्यवस्था—सुलतान दुसरा मुझाफर व तातारखान घोरी—काठ्यांची वावटळ—लोमा खुमाण—वाळाकाठी लोक आणि जेतपूर व मेंदरडा—

या सर्व घडामोडीच्या दरम्यान मध्यभागांतील रानजमिनींत हळुहळु लागवड होऊं लागली होती, व मोठमोठीं शहरें वसलीं होतीं. गिरनारचा किल्ला दुर्गम असल्यामुळें त्याच्या आश्रयानें तेथील चूडासम राजा फार बलिष्ठ होऊन बसला होता. परंतु गुजरातेंतील सुलतानाच्या दाबामुळें लूटफाट करण्यापलीकडे त्याचें कांहीं चालत नसे.

अहमदशहा गुजरातच्या गादीवर १४११ त बसला. सोरठच्या किनाऱ्यावर वेरावळ, मांगरोळ, सील व सुंतरापाडा हीं उत्तम बंदरें असल्यामुळें त्याला फार महत्व आलें होतें. जुनागढचा चूडासम राजा रा मलेक याचा पाडाव करण्यासाठीं अहमदशहानें १४१४ त मोठें सैन्य तिकडे नेलें. वंथळी मुक्कामीं एक मोठी लढाई झाली, त्यांत राचा पराभव होऊन तो जुनागढास पळून गेला. अहमदशहानें त्याचा पाठलाग केला व गिरनारचा उंच किल्ला जरी त्याच्यानें घेववला नाहीं तथापि रानें त्याचें वर्चस्व कबूल करून खंडणी देण्याचें पत्करिलें. यावेळेस अहमदशहानें सोरठचा बहुतेक मुलूख सर केला. या दिवसापासून गुजरातच्या सुलता-

नांस नव्या सोरठेच्या (मध्यभागाच्या) बाबतींत हात घालण्याचा हक्क आला असें वाटूं लागलें. जुन्या सोरठेचे सुभेदार नेमतांनाही ते विशेष खबरदारी घेऊं लागले. यावेळेस जुन्या सोरठेस सुभेदारीच्या जागेवर अहमदशहाचा मुलगा फत्तेहखान याची नेमणूक झाली. आपल्या कार-कीर्दींत यानें जुनागढावर एक स्वारी केली होती परंतु त्यांत त्याचाच मोड झाला. अहमदशहानें झाला रजपुतानांही जेरीस आणून त्यांना पाटडी-हून कुव्यास मागें हटविलें. यावेळेस सुलतानी सत्ता सर्वत्र पसरली, ती इतकी कीं अनहिलवाडचे राजे व दिल्लीचे बादशहा यांच्या नांवांच्या बदली गुजरातच्या सुलतानांचेंच नांव सोरठेंत सर्वत्र लिहिण्यांत येऊं लागलें. अहमदशहा गोहल्यांपासूनही नियमितपणें खंडणी घेऊं लागला.

इ. स. १४४१ त जेव्हां सुलतान दुसरा महमद गुजरातच्या गादीवर आला तेव्हां मुसलमानी अंमल किनाऱ्यावर अगदीं प्रबळ होता. सोमना-थपाटणाहून हांकून दिल्यामुळें वाजा रजपूत उंचा कोठडा वगैरे दक्षिण किनाऱ्यावरील ठिकाणीं निघून गेले होते. माधवपुरापासून जाफराबादपर्यंत किनाऱ्यावर सर्वत्र मुसलमानांची सत्ता पसरली होती. झाला व गोहेल सरदार हे खंडणी देत, व नव्या सोरठेंतील राजांनीं सुद्धां सुलतानाचें वर्चस्व कबूल केलें होतें. कुतुबुद्दीनसारख्या निर्बळराजाचे वेळींही ही सत्ता कायम राहिली. नव्या सोरठेंतील लहान लहान सरदार राच्या अमलास त्रासून जुनागढवर वारंवार स्वाऱ्या करीत; व गुजरातच्या प्रदेशावर जरी यांनीं स्वाऱ्या केल्या तरी सुलतान जुनागढच्या राजासच जबाबदार धरी.

गुजरातच्या गादीवर इ. स. १४५९ त सुलतान महमद बेगडा हा बसला. लांब आणि पसरट शिंगाच्या बैलास हिंदीभाषेंत "बेगडा" म्ह-णतात. या सुलतानाच्या मिशा फार लांब असल्यामुळें याला हें नांव पडलें. कोणी म्हणतात कीं जुनागढ व चांपानेर हे दोन गड जिंकल्यामुळें यास हें नांव पडलें. या सुलतानाच्या लवकरच नजरेस आलें कीं जुनागढच्या

चूडासमी राचा अम्मल नाहींसा करून, नव्या सोरठेंतील लहान लहान सरदारांची ही बंडाळी मोडली पाहिजे. जुनागढास यावेळेस रा मंडलीक राज्य करीत होता. अर्थिलयाचा गोहेल सरदार दुदा यानें सरहद्दीवर पुंडाई माजविली होती, तीं बंद करण्याविषयीं सुलतानानें मंडलिकाला हुकूम केला. रा मंडलीक शहाणा व शूर होता. त्यानें एकदम दुदावर स्वारी करून त्यास ठार केलें व अर्थिला शहर लुटलें. यामुळें सुलतानाच्या रागास जागा राहिली नाहीं. यानंतर मंडलिकानें उखा प्रांतांतील सांगण वाघेल्यांवर स्वारी करून त्यास जेरीस आणिलें. चातुर्य, नेमस्तपणा, व शौर्य या गुणांनीं रा मंडलिकानें आपल्या राज्याचा पाया बराच मजबूत करण्यास सुरुवात केली. परंतु त्याला वेळ वाईट लागली होती. यावेळचा गुजरातचा सुलतान महमद बेगडा याच्या आंगींही शौर्य व उत्साह हे गुण होते, व शिवाय त्याचें राज्य राच्या मुलुखापेक्षां फारच मोठें असल्यामुळें सुलतानापुढें राचें कांहीं चाललें नाहीं. जुनागढ जिंकून घेऊन सर्व सौराष्ट्रप्रांत आपल्या अंमलाखालीं घालण्याचा महमदानें निश्चय केला. कांहींतरी कुरापत काढून सुलतानानें जुनागढावर १४६७ त चाल केली. मंडलीक नेहेमींप्रमाणें मोठ्या विनयानें व लीनतेनें सुलतानास शरण गेला; व महमदानेंही वेळ, रंग पाहून माघार घेतली व आपला बोज राखिला. सोन्याचें छत्र व राजचिन्हें घेऊन रा देवास गेला असें मिष करून पुनः पुढील वर्षी सुलतानाचें सैन्य जुनागढाजवळ दाखल झालें. रा मंडलीक आपली लीनता विसरला नाहीं. इतराजीस कारण जें छत्र तें त्यानें इतर भेटींसह सुलतानाचे चरणीं अर्पण केलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. जुनागढचा किल्ला सर करून सर्व सौराष्ट्रप्रांत पादाक्रांत करण्याच्या हेतूनें १४६९ त सुलतानाची स्वारी सैन्यासह जुनागढाजवळ दाखल झाली. रा मंडलीकानें सुलतानाच्या छावणींत जाऊन, आपण शहाची कोणचीही चाकरी करण्यास तयार आहों, अपराधाशिवाय गरीबांस दंड करूं नये वगैरे अनेक

प्रकारें विनवण्या केल्या. "तूं काफर आहेस यापेक्षां अधिक मोठा अपराध कोणचा पाहिजे ?" हा बिनतोड मुद्दा काढून सुलतानानें रास निरुत्तर केलें. या कोटिक्रमानें राची खातरी झाली, आणि आपला नाश खचित होणार असें वाटून तो सुलतानाच्या छावणींतून जुनागढास पळून आला व तेथें शेवटपर्यंत सुलतानाशीं टक्कर देण्याचा त्यानें निश्चय केला. जुनागढास लवकरच सुलतानाचा वेढा पडला. किल्ला १४७२ त सुलतानाच्या हातीं लागला.

वेढ्याचें काम मोठ्या कुशलतेनें चालविलें होतें, किल्ल्यावरील अन्नपाण्याचा पुरवठा संपला होता, व भोंवतालच्या प्रदेशांतील सरदारांस रानें वेळोवेळीं त्रास दिला असल्यामुळें त्यांनीं रास यावेळीं बिलकुल मदत केली नाहीं. शेवटीं रानें किल्ला सुलतानाच्या स्वाधीन करून स्वतः मुसलमान बनला. व अमदाबादेस गेला. अमदाबादच्या माणिकचौकांत त्याची कबर अद्याप आहे.

जुनागढ हें फार सुंदर स्थान असल्यामुळें तें सुलतानाच्या फार मनांत भरलें, व तेथें तो बरेच दिवस राहिला, व यावेळीं शहरची तटबंदी करून त्यानें तेथें उपरकोटांत एक मोठी मशीद बांधिली. आपल्या अमीरउमरावांकडून त्यानें तेथें मोठमोठे वाडे बांधविले. मुसलमानी धर्माचा प्रसार करण्यासाठीं सय्यद वगैरे बोलावून मोठमोठ्या शहरीं काज़ी नेमिले. प्रांतांतील सर्व जमीनदारांस बोलावून आणून सुलतानानें त्यांच्याकडून प्रजाधर्माची कबुली घेतली. मिरात-इ- शिकंदरींत जुनागढच्या आसपा-

* इकडील प्रांतांत एक दोन दंतकथा प्रचलित आहेत. राच्या प्रधान विसल याच्या मोहना नांवाच्या पत्नीला रानें फूस लावून नेल्यामुळें प्रधानानें दगलबाजी केली असें ह्मणतात. नागबाई नांवाच्या एका चारण स्त्रियेच्या सुनेला भ्रष्ट करण्याचा यत्न केल्यामुळें तिचा शाप रास बाधला असेंही कोणी ह्मणतात. नागबाईचा वंश मोणिआमध्यें अद्याप आहे.

सच्या दाट जंगलाचें वर्णन आहे व खांत जातीच्या लोकांची तेथें वस्ती होती असेंही लिहिलें आहे. हे लोक या प्रांतांत अद्यापही आढळतात.

याच सुमारास उखामंडळ प्रांताच्या भीम नांवाच्या वाढेल सरदारानें फार पुंडाई मांडिली व मुल्ला महमद समरकंदीवर हल्ला केला. मुल्लाजीनें स्वतः जाऊन सुलतानापाशीं गाऱ्हाणें गाईलें, व या कृत्याबद्दल सूड घेण्याविषयीं विनंति केली. सुलतान एकदम द्वारकेस ( जगत ) गेला, व किल्ला सर करून सर्व देवळांचा त्यानें विध्वंस करून टाकिला. शंखद्वारबेट ( यालाच हल्लीं बेट ह्मणतात. ) जिंकून, व द्वारकेस एक मशीद बांधून, फराक-उल-मुल्कवर त्या प्रांताचें राज्य सोंपवून सुलतानाची स्वारी परतली. मुसलमानांच्या ताब्यांत द्वारका याच वेळीं प्रथम गेली असें मिरात-ई-शिकंदरींत लिहिलें आहे. वाढेल सरदार भीम यास कैद करून अमदाबादेस पाठवून दिलें, व तेथील सुभेदार मुहाफिझखानास त्याच्या अंगाचे तुकडे करून एकेक तुकडा शहरच्या प्रत्येक दरवाजास लटकावण्यास हुकूम केला. खानानें हुकमाप्रमाणें अम्मलबजावणी केली हें सांगणें नकोच. इ. सन १४८० त ह्मणजे जुनागढ जिंकून घेतल्यावर आठ वर्षांनीं सुलतान महमद गुजरातेंत परतला. या आठ वर्षांत उखामंडळ प्रांत नवीन सर झाला. सौराष्ट्रांतील सर्व बाबींचा निर्णय करून व खंडण्या ठरवून सौराष्ट्रांतील बादशाही मुलखाची राज्यपद्धति मुकरर ठरली गेली. मुसलमानी अमलाच्यावेळीं ईदर संस्थानांतील पद्धतीप्रमाणेंच कांहीं अंशीं ही व्यवस्था होती. रा मंडलीकच्या एका मुलास जहागिरदार नेमिलें, परंतु ठाणेदार नांवानें एक मोठा मुसलमान अंमलदार नेमून त्याच्या हातांत लष्करी सत्ता दिली. ठाणेदार आणि जहागिरदार यांचा मतभेद झाल्यास ठाणेदाराच्या मताप्रमाणें व्यवस्था व्हावी असें ठरलें. जमाबंदीची व्यवस्था सर्व जहागिरदाराच्याच हातीं होती व ह्मणूनच बादशाही मुलखांत जसा जिकडे तिकडे

इनामांचा सुळसुळाट आहे तसा येथें बिलकुल नाहीं. महाराष्ट्रांत जो मराठ्यांत व पेशव्यांत भेद तोच इकडे बादशाहांत व चूडासमा जहागीरदारांत अर्थात गुजरातच्या सुलतानांत होय. रा मंडलीकचा मुलगा भूपतसिंह ( याला मेलगही ह्मणत ) हा पहिला जहागिरदार होय. इतर चूडासमा जहागिरदाराहून हे निराळे आहेत हें दाखविण्यासाठीं जहागिरदारांस ते राचे वंशज असल्यामुळें रायजादा ह्मणूं लागले, व अद्यापपर्यंत हेंच नांव चालू आहे. तातारखान हा पहिला ठाणेदार होय, व त्याच्या मागून सुलतानाचा वडील मुलगा खलीलखान हा झाला. हाच पुढें सुलतान दुसरा मुझाफर या नांवानें गुजरातच्या गादीवर बसला.

याच सुमारास कुव्याचे झाला रजपूत प्रांतांत फार बंडाळी करूं लागले. त्यांनां ताळ्यावर आणण्यासाठीं खलीलखान चालून गेला असतां त्याला त्यांनीं परतून लाविलें. बंडखोर व बेहुकमी लोकांची सुलतानास फार चीड असे. तो एकदम कुव्यास गेला व हल्ला करून त्यानें किल्ला घेतला व शहर सर्व लुटून फस्त केलें. झाल्यांस हांकून लाविलें व त्यांचा मुख्य सरदार वाघोजी यास ठार केलें, व तेथें एक ठाणेदाराची नेमणूक करून सुलतान परतला.

प्रांतांत चोंहीकडे सुलतानाचा अंमल चांगला बसला. राजधानीचें शहर सोमनाथपाटण होतें तें आतां जुनागढ केलें, व मोठमोठ्या शहरीं ठाणीं वसविलीं. खंबायतच्या आखातावरील दीवबेटांत शेंवटीं राजधानीचें ठिकाण असे. तांबडासमुद्र व इराणचें आखात यांशीं व्यापार पुष्कळ असल्यामुळें या बेटाचें महत्व फार वाढलें होतें. खलीलखानानें आपल्या कारकीर्दींत खलीलपूर नांवाची जुनागढ येथें पेठ वसविली. जुनागढच्या रायजाद्यांना सीलबगासरा चोविसी नांवाची २४ गांवची जहागीर होती, परंतु सगळ्या सोरठ प्रांताच्या जमाबंदीचें काम तेच करीत असत. भूपतसिंहाच्या पाठीमागून १५०५ त त्याचा मुलगा खेंगार हा जहागिरीचें काम पाहूं लागला.

सुलतान महमद बेगडा हा १५१३ त वारला. व त्याचेमागून त्याचा मुलगा खलीलखान दुसरा मुझाफर या नांवानें राज्य करूं लागला. हा स्वभावानें फार शांत व मनमिळाऊ असल्यामुळें याला मुझाफर हलीम ह्मणत असत ( हलीम ह्मं० सभ्य ). या सुलतानाच्या कारकीर्दींत मलीक इयाझ सोरठचा सुभेदार होता. तातारखान घोरीची जुनागढास नेमणूक करून तो स्वतः दीव बेटावर रहात असे. माळव्यांत लढाई चालली असल्यामुळें सुलतानास सौराष्ट्राकडे विशेष लक्ष पोंचवितां आलें नाहीं. उदेपूरच्या मोहिमेवर मलिक इयाझ याची १५२१ त नेमणूक झाल्यामुळें तातारखान घोरीस सत्ता वळकावण्यास चांगली संधि सांपडली. तातारखान हा मलीकाचा केवळ गुमास्ता होता परंतु हुषार व महत्वाकांक्षी असल्यामुळें त्यानें स्वतंत्र होण्याचा घाट घातला. उदेपूरच्या मोहिमेंत मलिकास अपयश आल्यामुळें त्यास अधिकच फावलें. वास्तविक पाहिलें असतां यावेळीं मलीकइयाझ याची सत्ता समुद्रकिनाऱ्यावर चोंहीकडे होती तथापि नवीन सोरठेंत सर्वत्र घोरीचा अम्मल स्वतंत्रपणें बसला होता. मलीकइयाझ हा १५२५ त वारला. व त्याची जागा त्याचा मुलगा मलीकइषाकखास मिळाली.

सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं कच्छमधील पावरगडांतून जाडेजा रजपुतांनीं हांकून दिल्यामुळें काठी लोक खालीं सौराष्ट्रांत उतरले. शाख्यायत व एवरितया हे काठी लोकांतील दोन मुख्य पोटभेद होत. शाख्यायत खेरीज करून इतर एवरितया जाती यावेळेसच आल्या. बाबरियांपासून थान जिंकून घेऊन सर्व प्रथम तेथेंच राहिले. पुढें हाठी काठी लोक दक्षिणेकडे मालियास* जाऊन राहिले; खुमाण राजकोटाहून आठ

* हें गांव जुनागढच्या दक्षिणेस सुमारें तीस मैल आहे. यास हाठी मालिया ह्मणतात. मोर्वीच्या उत्तरेस सुमारें वीस मैलांवर असलेलें मालिया गांव हें अगदीं निराळें, यास मियाणामालिया ह्मणतात.

मैलांवर खरेडी गांव आहे तेथें राहिले; आणि खाचरांनीं परमार रजपुतांस चोटिल्याहून हांकून देऊन तेथेंच आपलें ठाणें वसविलें व तें अद्याप त्यांच्याच ताब्यांत आहे. खाचरलोक चोटिल्याहून पूर्वेकडे व दक्षिणेकडे पसरले व जसदन, बोटाद, गढडा, भीमोरा, पालिआड व इतर बऱ्याच जहागिरी त्यांनीं मिळविल्या. यांच्यामध्यें पुष्कळ पोटभेद आहेत, परंतु त्यांच्या पांच मुख्य शाखा आहेत—चोटिल्याचे रामाणी, जसदनचे लखाणी, गढडा आणि बोटादचे गोदडका, पालिआडचे थेवाणी व भदलीचे मोकाणी.

वर सांगितल्याप्रमाणें खुमाणलोक खेरडीस जाऊन राहिले होते, व तेथेंच प्रसिद्ध लोमाखुमाण राज्य करीत होता. अकबर बादशहानें गुजरात जिंकून घेतल्यावर ( १५७३ ते १५८३ ) सुलतान मुझाफरास पळून जावें लागलें; तेव्हां पुष्कळ वेळां त्याला लोमाखुमाणानें आश्रय दिला होता. पुढें १५८३ त मुझाफरानें जेव्हां अमदाबाद पुनः जिंकून घेतलें तेव्हांही पण लोमाखुमाणाची मदतच त्याच्या कामीं पडली. भूचर मोरीच्या प्रसिद्ध युद्धांत यानें आयत्यावेळेस जाम सताजीची बाजू सोडून दिली असें ह्मणतात. त्यावेळेस पुष्कळ राजे लोकांनां लोमाखुमाणाचें पाठबळ असे. हल्लीं आनंदपूरच्या ताब्यांत असलेलें लोमा कोटडी गांव यानेंच वसविलें. याला पकडून नगर येथें ( नवानगर ) मारून टाकिल्यावर खुमाणांस खेरडीहून पळून जावें लागलें. तेथून ते लोलिआणास गेले. येथें जसा खुमाण फार पुंडाई करूं लागला ह्मणून मुसलमानांनीं त्याला हांकलून दिलें व लोलिआणास ठाणें केलें. यापुढें खुमाणकाठीं कुंडळा परगण्यांत आसोदर, क्रांकज, सावर, जिरा व भोंगिरडा या गांवीं राहिले, आणि अद्यापही तेथेंच आहेत.

सध्याचे वाळालोक, व पूर्वी वाळा व तळाजा येथून आलेले वाळा हे एकच दिसतात. येवढें खरें कीं वाळा जातीची एक शाखा खुमार

काठीं लोकांबरोबर कच्छहून आली. याचीं कारणें पुष्कळ देतात. विशेष प्रचलित दंतकथा अशी आहे कीं एका वाळा रजपुतानें विसलो पाटकर या काठीच्या मुलीशीं लग्न लाविलें. त्याला ज्ञातीच्या बाहेर काढल्यामुळें तो कच्छला निघून गेला, व पुढें खाचर व खुमाण यांच्या बरोबर परत येऊन त्यानें बराच मुलुख काबीज केला. वाळ्यांनीं बहुतेक मुलुख आमरेलीच्या सरवैय्यांपासून मिळविला. भदली एकदां जिंकून घेतलें होतें परंतु पुनः गेलें. शेवटीं सरवैय्यांपासून त्यांनीं चितळ जिंकून घेतलें, व येथें आणि आमरेलीस त्यांनीं कायमचीं ठाणीं केलीं. उत्तरेस बाबरापासून ते गीरच्या जंगलांतील चेलनापर्यंत आणि पूर्वेस चितळ पासून ते पश्चिमेस बिलख्यापर्यंत सर्व मुलूख त्यांनीं व्यापून टाकिला. भादरनदीच्या दक्षिण तीरावरील जेतपूर शहर हें त्यांचें मुख्य ठिकाण; व तितक्याच महत्वाचें दुसरें गांव ह्मणजे गीरच्या हद्दीवरील मेंदरडा हें होय. यापैकीं बराच भाग मुसलमानांनीं त्यांच्यापासून जिंकून घेतला होता, परंतु मोंगलांचा ऱ्हास झाल्यावर त्यांनीं बहुतेक सर्व परत मिळविला.

# भाग ६.

## स्वतंत्र संस्थानांचा उद्भव व सुलतानशाहीचा अंत.

(ई. स. १५२५–इ. स. १५७३).

दीवबेट बळकावण्याविषयीं फिरंग्यांची 'खटपट' व जय—दसाड्यावर रजपुतांचा हल्ला—कुव्याचा मानसिंह—नवानगरची स्थापना व जाडेजांचें वर्चस्व—तातारखान घोरी व फत्तेहखान बलोच—जेठवा व झाला रजपूत—सुलतानाच्या राज्याची वांटणी—घोरी व पोलादी—गुजरातेंत उमरावांचा बखेडा—अकबर गुजरात जिंकितो.

इ. स. १५२५ त रायजादा खेंगार मरण पावल्यामुळें त्याची जहागीर त्याचा मुलगा नोंघण यास मिळाली. मलिकइयाझच्या मरणानंतर त्याच्या मुलांमध्यें तंटे सुरू झाले. सुलतान शिकंदरच्या पाठीमागून १५२६ त सुलतान बहादुर गुजरातच्या गादीवर आला. फिरंगी लोकांच्या मनांत दीव पटकावण्याचें फार होतें ह्मणून त्यांनीं मलिकइषाकबरोबर "खटपट" चालविली होती. ही गोष्ट सुलतानास कळल्याबरोबर त्यानें इषाकास काढून किवाम–उल–मुल्क यास सुभेदार नेमिलें. पुढें १५२६ त कांहीं तुर्कलोक फिरंग्यांशीं लढण्यास आले असतां सुलतानानें दीवबेट त्यांना राहण्याला दिलें, व सुभेदाराच्या जागीं मलिकइयाझचा मुलगा मलिक तोघाण याची नेमणूक केली. तातारखान घोरीच्या जागेवर जुनागढास मुजाहिदखान बेहेलिमला नेमिलें होतें परंतु तातरखानानें त्याची डाळ शिजूं दिली नाहीं.

बहादुरशहानें हुमायून बादशहाशीं वैर संपादन केलें ही चूक केली. हुमायूननें त्याचा १५३५ मध्यें पराभव करून, बहुतेक मुलूख हाताखालीं घातला. सौराष्ट्रांत मात्र कांहीं मुलुख सुलतानाच्या ताब्यांत राहिला, व तेथें जाऊन त्यानें फिरंग्यांची मदत मागितली. मोंगलांस हांकून लावण्याच्याकामीं मदत करण्याचें फिरंग्यांनीं तेव्हांच पत्करिलें. सुलतानानेंही फिरंग्यांस दीव येथें वखार घालण्यास परवानगी दिली. इ. स. १५३६ त मोंगलांच्या हातांतून गुजरातची सुटका करण्यामध्यें सुलतान गुंतला असतां फिरंग्यांनीं पाश्चिमात्य संप्रदायानुरूप वखारीचा किल्ला बनविला, व बेट आपल्या ताब्यांत घेऊन त्याची तटबंदी केली. सुलतानास भीति वाटून फुरसद झाल्यावरोबर तो परतला. दोन्ही बाजूंच्या मनांत दगलबाजीचा विचार चालला होता अशावेळीं एका चकमकींत सुलतान मारला गेला. १५३६ त वळकावल्यापासून आतांपर्यंत दीवबेट फिरंग्यांच्याच ताब्यांत आहे.

कुव्याचे झाला रजपूत कुव्यास येऊन राहिले होते त्यांनीं बहादुरशहाचे कारकीर्दींत एकाएकीं दसाड्याचे ठाणेदारावर हल्लाकरून त्यास ठार केलें. बहादुरशहा माळव्यांत होता, त्यानें विरमगामचा जहागिरदार खानखानान याची या स्वारीवर नेमणूक केली. या अनुभवी वीरानें दसाडा परत घेतलें येवढेंच नव्हे, परंतु हळवदच्या मानसिंहापासून त्यानें मांडळ, विरमगांव व हळवद हींही ठाणीं घेतलीं. मानसिंहजीनें कच्छचा रस्ता सुधारला, व तेथून तो गुजरातच्या प्रांतावर स्वाऱ्या करूं लागला, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर तो सुलतानास शरण गेला व या प्रकारानें त्यानें हळवद मात्र परत मिळविलें. बाकीचीं ठाणीं गेलीं तीं गेलींच. बहादुरशहाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं हुमायूनबरोबरच्या युद्धांत त्याला अपयश आल्यामुळें, दीवबेट व समुद्रकिनारा खेरीज इतर सर्वत्र सुलतानाचा अंमल नाहींसाच झाला होता. उखामंड-

ळाच्या यांचे लोकांनीं तेथील मुसलमान रखवालदारांस हांकून दिलें. तातारखान घोरी जुनागढास स्वतंत्र होऊन बसला. कच्छचा जाडेजा सरदार जाम रावळ यानें मोठ्या व निवडक सैन्यानिशीं रण ओलांडून सौराष्ट्राचा बराच प्रांत सर केला व आपला पूर्वज जामहाला याच्या स्मरणार्थ त्याचें हालार प्रांत नांव ठेविलें, व हेंच नांव अद्यापही चालू आहे, व जाडेजा रजपुतांच्या जहागिरी सर्व येथेंच आहेत. हा प्रांत घेण्यास त्याला फार प्रयासही पडला नाहीं. नागणीबंदरचे जेठवे, खंबाळियाचे वाढेल, ध्रोळचे चावडे व आमरणचे व आसपासचे देदा यांनीं मुसलमानी फौजेस आधींच हांकून लाविलें होतें. तथापि चांगल्या व्यवस्थित सैन्यांशीं सामना देण्याइतकें अवसान त्यांच्यामध्यें नव्हतें ह्मणून जामरावळनें त्यांची लवकरच व्यवस्था लाविली. पुढें त्यानें काठी लोकांस दक्षिणेकडे हांकून दिलें. याप्रमाणें १५४० त जय मिळवून जामरावळ यानें पूर्वीच्या जेठव्यांच्या नागणी बंदराजवळ रंगमती व नागमती या दोन नद्यांच्या संगमावर नवानगर नांवाचें आपलें राजधानीचें शहर स्थापन केलें. यासच जामनगर ह्मणतात.

बहादुरशहा १५३६ त मरणपावल्यावर त्याच्या नंतरच्या गुजरातच्या सुलतानांस सौराष्ट्रांतील सत्ता परत मिळाली नाहीं. हालार, उखामंडळ वगैरे स्वतंत्र झालेले भाग खेरीज करून इतर सर्वत्र जुनागढच्या घोरी घराण्याचा अंमल पूर्णपणें होता. तातारखानानें जुनागढच्या हिंदू जहागिरदारांची सत्ता हळुहळु संपुष्टांत आणिली, आणि आपणास सुलतानाचा अंकित असें ह्मणवीत ह्मणवीत शेवटीं तो अगदीं स्वतंत्र होऊन बसला. उत्तरेकडे मोर्वी फत्तेहखान बलोच या मुसलमान उमरावाच्या ताब्यांत होती. मोर्वी हें नाक्यावरील ठिकाण असल्यामुळें, व फत्तेहखानाचें गुजरातेंत बरेंच वजन असल्यामुळें त्याचा तातारखानास वचक असे.

अमदाबादच्या गादीवर सुलतान तिसरा महमद यानें १५३६ पासून

१५५४ पर्यंत राज्य केलें. याच्या कारकीर्दींत ह्मणण्यासारखी विशेष महत्वाची कांहीं गोष्ट झाली नाहीं. उमरावांनीं १५५४ त सुलतान दुसरा अहमद हा लहान असतां त्यास गादीवर बसविलें. गुजरातेंत उमरावांचीं आपआपसांत भांडणें सुरू झालीं व सौराष्ट्रांतील सरदारांची चढती होत गेली. जुनागढास घोरींची सत्ता चांगलीच बळावली. इकडे नवानगरास जामचा अंमल दृढ झाला. जेठव्यांनीं स्वतंत्रता मिळविली, परंतु नवानगरच्या जाडेजांनीं त्यांना पुरेपुरे करून सोडिलें. हळवदचे झाला रजपूत गुजरातच्या सरहद्दीजवळ असूनही व चोंहीकडून मुसलमानांनीं व्यापिलेले असतांही हळुहळु हात पाय पसरूं लागले. मोर्वी परगण्यांत फत्तेहखान बलोचची सत्ता स्वतंत्रपणें होतीच.

अहमदशहाच्या कारकीर्दींत उमरावांनीं आपसांत गुजरातच्या मुलखाची वांटणी केली, तींत तातारखान घोरीकडे सोरठप्रांत कायम राहिला, व फत्तेहखान बलोचला मोर्वीशिवाय राधनपूर, समी व मुंजपूर हे तालुके आले. या वांटणीनंतर जो तंटा माजला त्यांत फत्तेहखानानें इतिमादखानाची बाजू घेतली, व तातारखान आणि अनहिलवाड पाटणचे फोलादी हे विरुद्ध पक्षास होते. फोलाद्यांच्या मदतीनें तातारखानानें फत्तेहखानाचा नाश केला व मोर्वी परगणा आपल्या राज्यांत सामील करून राधनपूर, समी, आणि मुंजपुर हे फोलाद्यांस दिले. सिलबगसऱ्याची चोविशी, व केशोद आणि चोरवाडची जहागीर जुनागढच्या रायजाद्या जहागिरदारांकडे अबाधित चालली होती, परंतु इतर सर्व सोरठ प्रांताची जमाबंदीची व्यवस्था घोरीच्या हातांत गेली होती. तातारखान केव्हां मरण पावला हें बरोबर समजत नाहीं, परंतु १५७० व १५७५ याच्या मध्यंतरीं केव्हांतरी याचा अंत झाला. यानें पुष्कळ दिवस सत्ता भोगिली व पराक्रमही बराच केला, व शेवटीं स्वतंत्रराज्य स्थापिलें. त्याच्या पाठीमागून त्याचा मुलगा अमीनखान घोरी राज्याचा

मालक झाला. गुजरातचा शेवटचा सुलतान मुझाफर १५३१ त गादीवर आला, व उमरावांचा बखेडा अधिकच माजला, व शेवटीं इतिमादखानानें मोंगलांची मदत मागण्यापर्यंत मजल येऊन पोंचली.

यावेळेस दिल्लीच्या तख्तावर अकबर बादशहा होता. या तरुण, उत्साही व हौशी बादशहास हें बोलावणें आल्यामुळें आयतेंच फावलें. मोठ्या झपाट्यानें डिंसाच्या रस्त्यानें येऊन त्यानें एकदम गुजरात प्रांत काबीज केला. मिरझा अझीज कोकलताश याला गुजरातचा सुभेदार नेमून बादशहा परत गेला. या मोहिमेंत अनहिलवाड, पाटण, कडी, अमदावाद, भडोच, सुरत वगैरे सर्व प्रांत बादशहाच्या अमलाखालीं आला, परंतु सोरठ प्रांत मात्र अमीनखानाच्या हातांत स्वतंत्रच राहिला.

# भाग ७.

## अमदाबादचे सुभेदार.

(इ. स. १५७३—इ. स. १६८६.)

मिरझाखानाची जुनागढावर स्वारी—त्याची त्रेधा—सुलतान मुझाफराचें बंड—सौराष्ट्रांतील गडबड—भूचरमोरीचें संग्राम—बादशाही अंमल व सौराष्ट्रांतील संस्थानांच्या स्वतंत्रतेचा नाश—जुनागढचे फौजदार—प्रांतांतील गडबड पुनः एकदां—वसुलाची पद्धत—मलिक अंबर—जहांगीरचें गुजरातेंत येणें—भयंकर दुष्काळ व अंदाधुंदी—आझमखान सुभेदार व मिरझा इसातखान—शिहोरचा अखेराजजी—कुतुबुद्दीन—सरदारखान.

**मिरझा अझीज कोकलताश** यास काढून गुजरातच्या सुभ्यावर १५७५ त **मिरझाखान खानखानान** याची नेमणूक झाली. हा वयानें फार लहान असल्यामुळें वजीरखानच सर्व कारभार पहात असे. त्याच्या हातून येवढा मोठा सुभा निभावेना ह्मणून १५७७ त **शहाबुद्दीन अहमदखान** याची सुभेदारीवर नेमणूक झाली.

अमीनखान घोरीचा सेनापती **फत्तेहखान शिरवाणी** आपल्या धन्याशीं भांडून १५८१ त **शहाबुद्दीन** अहमदखानास जाऊन मिळाला. **सोरठ** प्रांत जिंकण्याविषयीं त्यानें सुभेदारास सुचविलें व सुभेदारानेंही उचल खाली. **शहाबुद्दीनानें** आपला पुतण्या **मिरझाखान** याच्याबरोबर ४००० घोडेस्वार देऊन त्यास जुनागढावर पाठविलें. **फत्तेहखान शिरवाणीही** बरोबर होता, परंतु वेढ्यामध्यें मारला गेला. इकडे **अमीनखानानें** बोलावल्यामुळें **नवानगरचा जाम** निवडक सैन्यानिशीं तेथें येऊन दाखल झाला. **मिरझाखान** जुनागढचा वेढा उठवून **मांगरोळाकडे** फिरला व त्यानें त्या शहरास वेढा दिला, परंतु तेथेंही **जामनें** त्याचा पाठलाग केला.

अमीनखानही जुनागढांतून बाहेर पडून जामच्या सैन्यास जाऊन मिळाला. मिरझाखान जलदी करून कोडिनाराकडे सरला, परंतु तेथेंही शत्रूनें लगट केल्यामुळें त्यास लढाई देणें भाग पडलें. या लढाईंत मिरझाखानाचा मोड होऊन याचें सर्व सामानसुमान, हत्ती व पुष्कळ मनुष्यें नाश पावलीं. मिरझाखानासही जखम लागली व तो मोठ्या प्रयासानें अमदाबादेस पोंचला.

इ. स. १५८३ त सुलतान मुझाफर दिल्लीहून पळून आल्याची बातमी आली, त्यानें सैन्याची जमवाजमव करण्यापूर्वींच शहाबुद्दीन अहमद-खानास काढून इतिमादखानाची गुजरातच्या सुभेदारीवर नेमणूक झाली. या वेळेस अंमलदार करारी व चांगला शिपाई पाहिजे होता, पण इतिमाद-खानामध्यें यापैकीं एकही गुण नव्हता. मुझाफरानें १५८३ त बंड उठविलें व कांहीं जबरदस्तीनें व कांहीं दगलबाजीनें खंबायत, सुरत, भडोच व बडोदा हीं ठिकाणें काबीज केलीं.

सौराष्ट्रांत चोंहींकडे बेबंदशाही झाली व प्रांतांत सर्वत्र विलक्षण घों-टाळा माजला. जुनागढच्या घोरीनीं आपला अंमल कायम राखण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु नवानगरचे जाडेजा रजपूत, काठी जहागिरदार व इतर लहान लहान सरदार यांच्या सतत सुळसुळाटामुळें घोरींचा बिलकुल जम बसेना. मुरझाफरनें जरी कित्येक परगणे जिंकून घेतले होते तरी त्याचें औट घटकेचें राज्य तेव्हांच आटपलें. मिरझाखान खान खानान यानें त्याचा पराभव करून अमदाबादेहून त्यास हांकून लाविलें. तो सौराष्ट्रांत पळून गेला व तेथील जमीनदार आणि लोमाखुमाण यांच्या आश्रयानें त्यानें तेथें बरेच दिवस काढिले.

इ. स. १५९१ त नवानगरचा जाम सताजी जुनागढचा दौलतखान घोरी, खेरडीचा लोमा खुमाण आणि जुनागढचा, रायजादा जहागिरदार खेंगार हे सर्व एक झाले व त्यांनीं मुझाफरची बाजू उचलली. बादशहाचा

सुभेदार खान आझम मिरझा अझीझ कोकलताश एकदम त्यांचे उलट चालून गेला आणि दोन्ही सैन्यांची गांठ ध्रोळजवळ भूचरमोरी येथील प्रसिद्ध रणांगणांत पडली. दोनही बाजू मोठ्या शौर्यानें व निकरानें लढल्या परंतु शेवटीं जयश्रीनें बादशहाच्या सैन्यासच वरिलें, व सौराष्ट्रांतील संयुक्त सैन्याची दैना झाली. पुढें लवकरच लढाईतील जखमांमुळें दौलतखान घोरी मरण पावला, व बादशहाच्या सैन्यानें १५९२ त जुनागढास वेढा देऊन तें सर केलें. यापुढें जुनागढ हें बादशहाच्या फौजदारांचें ठाणें झालें. जाम व सोरठचे सर्व जमीनदार यांना खंडणी देणें भाग पडलें; आणि सोरठ व सर्व समुद्रकिनारा येथें बादशाही अंमल बसला. जामचा मुलूख मात्र (जोडिआ व सलाया यांमधील समुद्रकिनाऱ्यासह) स्वतंत्र राहिला. पण त्याला खंडणी द्यावी लागत असे. याप्रमाणें सोरठप्रांताची खालसा मुलखांत गणना होऊं लागली, व जुनागढच्या रायजाद्यास सिलखगसरा, केशोद आणि चोरवाड या जहागिरीवर परत जावें लागलें. रायजादा खेंगार १६०८ त मरण पावला.

नवरंगखान हा जुनागढचा पहिला फौजदार होय. त्याच्या पाठीमागून कासीमखान आला. फौजदार हा बऱ्याच मोठ्या हुद्याचा कामगार असे असें दिसतें, व तो जरी गुजरातच्या सुभेदाराच्या हाताखालील अंमलदारांत मोडत असे, तथापि बहुतेक कारभार तो स्वतंत्रपणेंच करीत असे. जुनागढ जिंकून घेतल्यावर लवकरच मुझाफर कच्छमध्यें पकडला गेला व अमदावादेच्या वाटेवर त्यानें आत्महत्या केली. अकबर बादशहा असतांना व नवरंगखान आणि सय्यद कासीम यासारखे अनुभवी व हुषार फौजदार होते तोंपर्यंत सौराष्ट्रांतील धुमश्चक्रीस व बेबंदशाहीस आळा होता, व प्रजेस सुख झालें. परंतु जहांगीर बादशहाची स्वारी सिंहासनारूढ झाल्यापासून सौराष्ट्रास कोणी विचारीनासें झालें. दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावर फिरंगी लोकांनीं व उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील किनाऱ्यावर

उत्थाच्या **वाघेरे** लोकांनीं नासधूस आरंभिली. मध्यभागांत जाम हळु-हळु पाय पसरूं लागला, व काठीलोकांनीं लुटालूट चालविली.

या वेळेस वसूल दोन प्रकारांनीं करीत असत. खालसा मुलखांत **बाद**-शाही अंमलदार रयतेकडून वसूल घेत. *गिराशिया किंवा **तालुकदारी** गांवांचा वसूल त्या त्या गांवांच्या मालकांकडून **इजाऱ्यानें** ( खंडानें ) करून घेत. **गुजरातेंत** रोकड पैसा वसूल करीत परंतु **सौराष्ट्रांत**

---

* **गिरास** हा शब्द येथें फार वापरतात. हा 'ग्रास' ह्म० घांस शब्दापासून आलेला आहे, व आज कित्येक वर्षें सौराष्ट्रांत राजकुळांतील लोकांस दिलेल्या जहागिरीस हें नांव देत आले आहेत, व असल्या प्रकारची जहागीर ज्यांना आहे त्यांना **गिराशिया** ह्मणतात. पूर्वींपासून वंशपरंपरेनें **गिराशियांच्याकडे** जमीन चालत आलेली असते. कांहीं **गिराशिया** **म**य्या जातीचेही असतात; परंतु **गिराशिया** ह्मटला ह्मणजे बहुतकरून **रजपूत**. पूर्वीं तर **गिराशिया** लोकांस स्वतःच्या गांवांत दिवाणी व फौजदारी हक्कही असत परंतु सध्यां तसें कांहीं नाहीं. ज्या **रजपुतांस** **गिरास** इनाम असते त्यांस प्रांतांत विशेष मान मिळतो. **रासमालेंत** पुढील मजकूर सांपडतोः—धार्मिक लोकांस, ह्मणजे ज्यांस ' पसांव ' ह्मणतात त्यांस, दिलेल्या देणग्यांस 'ग्रास' हा शब्द प्रथम लावीत असत असें दिसतें, परंतु **चारण** लोकांच्या हकीकतींत **सं**स्थानिकांच्या कुळांतील कनिष्ठ मुलास व इतर नातेवाइकांस दिलेल्या इनाम जमिनीस 'ग्रास' हा शब्द हमेश वापरतात, व या शब्दाचा ह्याच अर्थ फक्त होता असेंच केवळ जरी ह्मणतां येत नाहीं तरी प्रचारांत मुख्यत्वेंकरून ह्याच अर्थीं शब्द वापरीत. शेवटीं तर **सं**-स्थानिकाच्या कुटुंबांतील एखाद्या पुंडास भीतीनें व त्यानें दांडगाई करूं नये ह्मणून गांवकऱ्यांनीं तोडून दिलेल्या उत्पन्नास ' **ग्रास** ' ह्मणूं लागले. या व असल्या कित्येक अर्थीं 'ग्रास' शब्द वापरूं लागले. याप्रमाणें **गिराशिया** ह्मणजे बहुमानार्थी व राजकुलाशीं संबंध दाखविणारा शब्द हळुहळु अपवादसूचक ह्मणजे धंदेवाईक लुटारू अथवा ' अंधाऱ्या रात्रीचा शिलेदार.' या अर्थीं वापरूं लागले.

हल्लीं **इंग्रजी** राज्यामध्यें **गिराशियाचा** हा निंदासूचक अर्थ नाहींसा होऊन फक्त ' जमीनदार ' या अर्थींच शब्द वापरला जातो. **गिराशी** कोणच्या प्रकारानें मिळविल्या वगैरे गोष्टी कालपरत्वें स्मृतींतून निघून जाव्या हें साहजिक आहे.

दा. क्र. ९०३

चोंहीकडे **भागवटाईची** ( ह्मणजे उत्पन्नाचा भाग घेण्याची ) रीत चालू होती.

जहांगीर बादशहा गादीवर आल्यानंतर सहा वर्षांनीं १६११ त निजामशाहींतील प्रमुख उमराव दौलताबादेचा सुभेदार मलिक अंबर यानें गुजरातेवर स्वारी केली व सुरत व वडोदा हीं श्रीमान् शहरें लुटलीं. बादशहाचें तर गुजरातेकडे बिलकुल दुर्लक्ष्य झालें व सौराष्ट्रांत सर्वत्र लुटालूट व अंदाधुंदी यांचा अंमल पूर्णपणें बसला.

इ. स. १६१६ त जहांगीर बादशहाची स्वारी गुजरातेंत आली. त्या वेळेस नवानगरचा जाम स्वतः त्याला भेटण्यास गेला. बादशहानें शहाजादा शहाजहान यास गुजरातचा सुभेदार नेमिलें, परंतु या राजपुत्रानें जेव्हां १६२२ त बंड केलें तेव्हां पुनः सौराष्ट्रांत पूर्ववत् घोटाळा सुरू झाला. जामनें महमुदी* नांवाचीं नाणीं अधिकच पाडण्यास सुरुवात केली व तो जुनागढच्या फौजदारांचा अंमल बिलकुल जुमानीना. प्रांतांतील लहान लहान जहागीरदार आपसांत कज्जे करूं लागले., काठी लोकांच्या पुंडाईस सुमार राहिला नाहीं.

इ. स. १६२७ त जहांगीर मरण पावून शहाजहान दिल्लीच्या तख्तावर आला. इ. स. १६३१-३२ ( संवत् १६८७ )त गुजरातेंत व सौराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला, तो सतियांशीयो काळ ह्मणून अद्यापि लोकांच्या स्मृतींत चांगला आहे. दुष्काळामुळें प्रांतांतील अव्यवस्था अधिकच होत गेली व सर्व मुलूख ओसाड पडून उत्पन्न कांहीं येईनासें झालें. लुटारू काठी लोकांची मात्र पोळी पिकली. ते राणपुराहून गुजरातेंत उतरले, व धोळका आणि धंधुका या सुपीक प्रदेशांवर त्यांची धाड पडली. शेवटीं ही सर्व स्थिति बादशहाच्या कानावर गेली, व त्यानें सुभेदारीवर

---

* पूर्वीची महमुदी व गेल्या ( १९०१ ) वर्षीच बंद झालेली कोरी हीं नाणीं एकच होत.

नेमणूक करून आझमखानास गुजरातेंत पाठविलें. आझमखान हा उंची दर्जाचा उमराव होता इतकेंच नव्हे तर चांगला सेनानी, चलाख शिपाई व बंदोबस्त ठेवण्यामध्यें कुशल अंमलदार होता. या हुषार सुभेदारानें गुजरातच्या कोळी लोकांचा समूळ नाश केला, व काठी लोकांस जेरीस आणिलें. त्यानें राणपूर येथें शहापूर नांवाचा किल्ला बांधून काठ्यांवर जरब रहावी ह्मणून तेथें बरीच फौज ठेविली. जामनें बऱ्याच दिवसांत उन्मत्तपणानें खंडणी दिली नसल्यामुळें आझमखानानें नवानगरास जाऊन टांकसाळ बंद करविली इंतकेंच नव्हे तर खंडणीची बाकीही वसूल केली.

आझमखानाच्या वेळेस मिरझा इसतरखान हा जुनागढचा फौजदार होता व त्याला सोरठ प्रांताची जहागीर होती. जुनागढची तटबंदी करून प्रांतांत यानें उत्तम प्रकारचा बंदोबस्त ठेविला व जमाबंदीच्या कामीं पुष्कळ सुधारणा केली. तेथें चालू असलेली 'भागवटाईची' रीत त्यास इतकी आवडली कीं पुढें आझमखानानंतर तो जेव्हां गुजरातचा सुभेदार झाला ( १६४२ ) तेव्हां तिकडेही त्यानें हीच रीत सुरू केली, व बंदोबस्तही फार चांगला राखिला.

मिरझा इसतरखानानंतर शहाजादा महंमद अवरंगजेब १६४४ त सुभेदार झाला व इसतरखानास सोरठ प्रांताची जहागीर कायमची असल्यामुळें तो तिकडे गेला. पुढें षाहिस्तेखान सुभेदारीवर आला तरी इसतरखान जुनागढासच होता. शहाजादा दाराशेकोह सुभेदार झाला तेव्हां इसतरखानास दिल्लीस बोलाविलें व त्याचा मुलगा महमद सालीह फौजदार झाला. प्रसिद्ध कुतुबुद्दीन यास १६५३ त फौजदार नेमिलें व त्याला सोरठ सरकारच्या कित्येक महालांची जहागीर मिळाली.

मिरझा इसतरखान व त्याचे मुलगे हे सोरठचे जहागीरदार असतांना त्यांचें लक्ष मुख्यत्वेंकरून जमिनीच्या महसुलासंबंधीं सुधारणा करण्याकडे

व जुनागढची तटबंदी करण्याकडेच असे. ते प्रांतांतील जमीनदारांच्या कामकाजांत ढवळाढवळ करीत नसत. जामलाखाच्या नंतर १६४५ त जामरणमल गादीवर आला. आझमखानाची अझून चांगलीच आठवण असल्यामुळें जाम स्वतंत्रतेबद्दल गडबड करीत नव्हता. शिहोरचा अखेराजजी अद्याप फारसा महत्वास चढला नव्हता, तथापि तो मोठा कारस्थानी पुरुष असावासा दिसतो. त्यानें लालिआणाच्या ठाणेदारासारख्या प्रमुख अंमलदारास आपलासा करून घेतलें, आणि घोघा बंदरच्या उत्पन्नाच्या चवथ्या हिशाची सनद करून घेतली. या वेळच्या फौजदाराचीं मुख्य कामें हींच दिसतात कीं बादशाही मुलखांतून मिळेल तितका वसूल काढावयाचा, काठीलोकांच्या लुटालुटीवर दाब राखावयाचा, व जामनगरच्या जामला चळवळ करूं द्यावयाची नाहीं. जमीनदारांनीं वेळच्या वेळीं वसूल दिला ह्मणजे प्रांतांतील हालहवालीविषयीं ते बेफिकीर असत. दरवर्षीं वसुलाचा त्रास पडूं नये ह्मणून दूरदूरचे तालुके, टप्पे, गांवें वगैरे तेथील इनामदारास इजाऱ्यानें देत. यामुळें स्थानिक इनामदार मात्र ठरीव रक्कम सरकार तिजोरीस जमा करून मुलूख आपल्याच ताब्यांत ठेवीत. जमेच्या रकमेंत केव्हां तरी कमीजास्त होत असे. शिहोरच्या जमीनदारानें या रीतीनें आपला मुलूख इतका वाढविला, व आपलें वर्तन इतक्या धूर्तपणाचें राखिलें कीं लोलिआण्याचा ठाणेदार व घोघा बंदरचे अधिकारी हे त्याच्याशीं नेहमीं आर्जवानें असत. कुतुबुद्दिनानें इतर सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणेंच चालू ठेविली, परंतु नवानगरच्या जामवर फार सावधपणानें नजर ठेविली व चोंहीकडे बंदोबस्त फार चांगला राखिला. इ. स. १६५७ त जेव्हां गुजरातचा सुभेदार शहाजादा मुरादबक्ष यानें बंड केलें तेव्हां कुतुबुद्दीन पूर्वीप्रमाणेंच व्यवस्थित व बादशहास निमकहलाल राहिला.

---

* बारा किंवा अधिक व चोविसापेक्षां कमी गांवांच्या समूहास 'टप्पा' ह्मणत.

शहाजहानास कैदेंत टाकून अवरंगझेब जेव्हां १६५८ त बादशहा झाला तेव्हां कुतुबुद्दिनानें नवीन बादशहाची इमानानें नोकरी बजाविली. दाराशेकोहानें १६५९ त गुजरातेवर स्वारी करून अमदाबाद घेतलें त्या वेळेस कुतुबुद्दिनानें बादशहाची बाजू सोडिली नाहीं. या स्वामिनिष्ठेचा मोबदलाही त्याला लवकरच मिळाला, कारण, गुजरातचा सुभेदार महाराजा जसवंतसिंह याची नेमणूक १६६१ त जेव्हां दक्षिणेच्या सैन्यावर झाली तेव्हां नवीन सुभेदारीचें काम पहाण्यास कुतुबुद्दिनालाच सांगितलें. मोहबतखान १६६२ त दाखल झाल्यावर कुतुबुद्दीन सोरठेंत परतला. येथेंही त्याला स्वस्थ बसण्यास सांपडलें नाहीं. जाम रणमलजी मेल्यानंतर त्याचा मुलगा सतोजी ह्यास खोटा ठरवून रणमलजीचा भाऊ रायसिंहजी यानें नवानगरची गादी बळकाविली. कुतुबुद्दीन नवानगरवर एकदम चालून गेला व आशिया-शेखपाट येथें त्यानें रायसिंहजीचा मोड केला, व या लढाईत रायसिंहजी पडला. कुतुबुद्दिनानें नवानगर घेतलें व तें खालसा करून त्यास इसलामनगर हें नवीन नांव दिलें. तो या मोहिमेवरून परत आल्यावर लवकरच १६६४ त महाराजा जसवंतसिंह याला मदत करण्यास दक्षिणेंत त्याची नेमणूक झाली. यानंतर सरदारखान सोरठचा फौजदार झाला.

सरदारखानानें जुनागढास पुष्कळ सुधारणा केल्या. जुनागढची सरदारबाग व सरदारतलाव हीं याच्या वेळेसच झालीं. याच्या वेळीं प्रांतांत बंदोबस्तही चांगला असे. इ. स. १६६९ त दिलेरखानावर फौजदारी सोंपवून तो इदरला गेला होता परंतु १६७० त दिलेरखान दक्षिणेंत गेला तेव्हां सरदारखान पुनः जुनागढास परत आला. फौजदारीचें काम १६८५–८६ पर्यंत केल्यावर सरदारखानास सिंधमधील ठठ्याचा सुभेदार नेमिलें, परंतु तो तेथें १६८६ तच मरण पावला. यानंतर सय्यद्द महमदखान हा जुनागढच्या फौजदारीवर आला.

हा वेळपर्यंत या प्रांताचा कारभार सुयंत्र चालला होता. सरदारखान गेल्यानंतर कारभारांत ढिलाई शिरली, तथापि अवरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत बंदोबस्त चांगला होता. या बादशहाच्या मरणानंतर मात्र सर्वत्र गैर-व्यवस्था व बेबंदशाही यांचा अंमल पूर्णपणें बसला.

सरदारखान ठठ्यास जाईपर्यंत जामरायसिंहाचा मुलगा जामतमाची हा वरचेवर स्वाऱ्या करीत असे. परंतु याला कच्छमध्यें परत हांकून लाविलें होतें. तथापि तो इतका लोकप्रिय होता कीं त्याला तमाची तगड ह्मणत (तगड=सभ्य). महाराजा जसवंतसिंहाच्या वशिल्यानें १६७३ त त्यानें गादी मिळविली, परंतु नवानगर शहर फौजदाराच्याच ताब्यांत राहिलें व जाम आपला थाटमाट सर्व खंबाळियास ठेवीत असे.

# भाग ८.

## मराठ्यांचा प्रवेश.

(इ. स. १६८६—इ. स. १७२९)

बादशाही मुलखाची वाताहत—पोरबंदर, शिहोर व ध्रांगध्रा—जुनागढचे फौजदार—सुजाअतखानाकडून काठी लोकांचें पारिपत्य—मुलुखगिरी—गुजरातेंतील मराठ्यांच्या वावटळीचा सौराष्ट्रावर परिणाम—अवरंगजेबाचा मृत्यु व त्याचे सौराष्ट्रावर परिणाम—महाराजा अजितसिंह—हैदरकुलीखान—अजितसिंह पुनः एकदा, व प्रांतांत दंगाधोपा—पिलाजी गाईकवाडाचें सोनगडास ठाणें—गुजरातेंतील व सौराष्ट्रांतील गैरव्यवस्था व मराठ्यांचें पुढें पाऊल—पिलाजी व कंठाजी—शिहोर व छाया यांची भरभराट—मराठ्यांची खंडणी—पिलाजी वडोदें घेतो—सरबुलंदखान—भावनगर व छाया—जामतमाची—जुनागढच्या फौजदारीची दैना.

**शिवाजीशीं** युद्ध चालवितांना जेव्हां **बादशाही** राज्य पेंचांत येऊन पडलें तेव्हां **बादशाहींतील** सर्व जहागीरदारांस आनंद झाला. गुजरातेंतील व **सौराष्ट्रांतील** सरदारांस तर विशेष संतोष वाटला. फक्त **शिवाजी**-बद्दलच नव्हे तर सर्व **महाराष्ट्राविषयीं** त्यांच्या मनांत अत्यंत सह्रानुभूति उत्पन्न झाली. **मराठ्यांच्या** स्वाऱ्यांकडे **राजपिंपळा** तर जाणूनबुजून दुर्लक्ष्य करूं लागलें, व दुर्लक्ष्य किंवा दौर्बल्य याची खूण पटली ह्मणजे **मराठे** सरदार अधिकच चेपीत जात. **सौराष्ट्रांतील** सरदारही पुढें पाऊल ढकलण्यास तत्परच असत. यांत प्रमुख ह्मटला ह्मणजे **नवानगरचा जाम** होय. त्याला आपलें पूर्वींचें महत्व परत मिळविण्याची साहाजिकच इच्छा होती. **छाया** येथील **जेठवा** सरदार **पोरबंदर** येथें हळुहळु डोकें वर काढूं लागला होता, व कांहींतरी बहाणा काढून त्यानें **पोरबं**-

दरास एक किल्ला उठविला. पोरबंदर राजधानीपासून एका बाजूस असल्यामुळें, व मांगरोळ बंदरच्या अंमलदाराच्या मनांतही स्वतंत्र होण्याचे गोड विचार घोळत असल्यानें 'तेरेचूप मेरेचूप' या न्यायानें पोरबंदरच्या किल्ल्यास अटकाव झाला नाहीं. इकडे आग्नेयीस शिहोरचा जहागिरदार आपल्या ताब्यांतील जमीनदारी मुलूख व केव्हां केव्हां इजाऱ्यानें दिलेला मुलूखही बळकावत चालला, व राज्यांत वरचेवर जे फेरफार होत त्यामुळें आणि लढाईच्या चोंहीकडील धामधुमीमुळें त्याला पुष्कळ मुलूख हाताखालीं घालण्यास चांगली सवड मिळाली. ईशान्येकडील ध्रांगध्राचें संस्थानही बरेच हातपाय हालवीत असे, परंतु विरमगांवाहून येणाऱ्या मुलुखगिरी फौजा यास फार हैराण करीत, व ध्रांगध्र्याचे संस्थानिक जरी दिलदार व शूर होते तरी शिहोरच्या जहागीरदाराप्रमाणें नेटाचे व राजकारणी नव्हते. या दोघां सरदारांनींच मुलखाची लाटालाटी केली असें नाहीं तर सर्वत्र हाच प्रकार चालू होता. जमीनदार, ठाणेदार, फौजदार वगैरे अधिकारी आपापल्या ताब्यांतील मुलूख बळकावून बसूं लागले. याप्रमाणें कालपरत्वें बादशाहीच्या या एका लहानशा प्रांताचे सहस्रशः तुकडे पडले.

सरदारखानानंतर सय्यद महंमदखानास सोरठचा फौजदार नेमिलें, परंतु या हुद्यावर तो फार दिवस टिकला नाहीं, कारण शहाजादा महंमद आझमशहा बहादुर याला या प्रांताची हयातीपर्यंत खासगत जहागीर १६८६ त दिली होती. तेथील व्यवस्था पहाण्यास शहाजाद्यानें आपल्या तर्फे शहावर्दीखानास पाठविलें. परंतु लवकरच कारतलबखानास सोरठची फौजदारी मिळाली, आणि नंतर शहाजादा महंमद आझमशहा सुभेदारीवर गेला. पुढें लवकरच कारतलबखानास सुभेदार नेमिलें व जोधपूरचा कारभारही त्याच्याचकडे सोंपविला. शहावर्दीखानाचा मुलगा शेरअफगाणखान जुनागढास फौजदारीवर आला. मध्यंतरीं थोडे दिवस

बहलोल शेराणी फौजदार होता, पण पुनः १६८८ त अफगाणखान परत आला.

या सुमारास खाचर व इतर काठी लोक अमदाबादच्या मुलखांत वरचेवर स्वाऱ्या करूं लागले. शेवटीं १६९२ त कारतलबखान सुभेदार असतां त्यानें या लोकांचा पाडाव करण्याचा निश्चय केला. अमदाबादेस शिपायांमध्यें बंड झालें असतां कारतलबखानानें मोठ्या शौर्यानें व नेटानें तें मोडून टाकिलें त्यामुळें त्याला सुजाअतखान (आरबी-सुजाअत ह्म. बहादुरी) असा बहुमानाचा किताब मिळाला व यापुढें तो उमरावांमध्यें मोडूं लागला. मोठें सैन्य जमा करून सुजाअतखान झालावाड व सोरठ या दोन प्रांतांवर चालून गेला. प्रथम खंडणीच्या बाकीचा वसूल करून नंतर काठ्यांचें मुख्य ठिकाण जें थान त्यावर त्यानें हल्ला केला. तेथील किल्ला जमीनदोस्त करून सुजाअतखानानें काठी लोकांस चोंहीकडे पिटाळून लाविलें.

या वेळेपासून पुढें सोरठच्या फौजदाराच्या हातून प्रांतांतील खंडणीच्या वसुलाचें काम निभावेना, ह्मणून सुभेदारास दरवर्षी या कामासाठीं मोठ्या सैन्यानिशीं मुलुखगिरी नांवाची स्वारी काढावी लागत असे. या सैन्यास सोरठचा फौजदार व पुढें पुढें विरमगांवचा फौजदार हे मदत करीत.

इ. स. १६९८ त महंमद बेगखान याला सोरठचा फौजदार नेमिलें, परंतु पूर्वीच्या फौजदारांप्रमाणें हाही बादशाही मुलूख जेमतेम संभाळून होता. धंधुका परगण्यांत काठ्यांनीं पुनः लुटालूट सुरू केली. हा परगणा प्रसिद्ध दुर्गादास राठोडास जहागीर होता. त्याच्या कामगारानें सुभेदाराकडे मदत मागितली व सुभेदारानें महंमद बेगखानास बंदोबस्त करण्यास फर्माविलें.

पुढें १७०४ त महमद बेगखानाची जागा सरदारखानानें घेतली. गुजरातच्या दक्षिण हद्दीवरील मराठ्यांच्या वावटळीनें धांदल उडून

गेल्यामुळें सौराष्ट्राकडे लक्ष्य देण्यास कोणाला फुरसद होईना. दक्षिणेकडील मुलखांत मराठ्यांनीं स्वारी करून अबदुल हमीदखान याचा पराभव केल्यावर तर सौराष्ट्रास कोणीच विचारीना. ठिकठिकाणच्या सरदारांत चळवळ उडून गेली; व मुसलमानांचा अंमल झुगारून देण्यास ते उद्युक्त झाले. वांकानेरच्या चंद्रसिंहजीनें हळवदचा जहागीरदार नझर अलीखान याला हांकलून लाविलें. इतक्यांत अवरंगजेब मरण पावला, व नंतर गुजरातेंतील व सौराष्ट्रांतील घोंटाळा पुसूंच नये. दिल्लीच्या गादीसाठीं नेहेमींप्रमाणें पुष्कळ लढालढी होऊन शेवटीं बहादुरशहा तख्तावर चढला.

इ. स. १७०७ मध्यें अवरंगजेबाच्या मरणामुळें बादशाहीस मोठाच धक्का बसला. नवानगरच्या फौजदारास हांकलून लावून १७०९ त जामनें आपली राजधानी परत मिळविली. छाया येथील सरदार आपणास पोरबंदरचा जमीनदार ह्मणवून घेऊं लागला व त्यानें आपलें ठाणें बरेंच मजबूत केलें. शिहोरचा सरदार आपली सत्ता वाढवूं लागला, व प्रांतांतील बहुतेक सर्व ठाणीं स्वतंत्र झालीं. कांहींचे मुलूख बरेच कमी झाले व कांहींना तर शेजारच्या जमीनदारांनीं अजीबाद घशांत टाकिलें. सौराष्ट्रांतील सरदारांस आपआपसांत भांडण्याची दुष्ट बुद्धि न सुचती तर थोड्याच वेळांत मुसलमानांची सत्ता या प्रांतांतून केव्हांच नाहींशी होती. जुनागढच्या फौजदाराची सत्ता संपुष्टांत आली होती, व नवें सोरठ व कांहीं लहान लहान ठाणीं खेरीज करून त्याला कोणी जुमानीत नसे. जमीनदारांकडून वसूल घेणें हें जरी त्याचें काम होतें तरी गुजरातेंतून मुलुखगिरी फौज आल्याशिवाय त्याच्या हातून हें काम आटपत नसे. बादशाही अंमलाची इमारत ढांसळण्यास दुसरींही अनेक कारणें झालीं तीं पुढें वेळोवेळीं सांगण्यांत येतील.

सय्यद अहमदजिलानी सोरठचा फौजदार झाल्यावर गुजरातच्या

सुभेदारानें त्याची कुमक मागितली व या दोघांनीं मिळून १७११ त मराठ्यांचा पराभव केला. बादशहा बहादुरशहा १७१२ त मरण पावला, व त्याच्या मागून जहांदरशहाही १७१३ त वारला व फरूकशिअर गादीवर आला. त्यानें १७१४ त मारवाडचा महाराजा अजितसिंह याच्या मुलीशीं लग्न केलें; व त्याचा मुलगा अभयसिंह यास सोरठची फौजदारी दिली. अभयसिंह स्वतः काम न पाहतां आपला कामगार फत्तेसिंह कायत याच्या मार्फत कारभार करीत असे. इ. स. १७१४ त अभयसिंहाच्या जागीं अबदुल हमीदखान आला, व दाऊदखान पन्नीची नेमणूक गुजरातच्या सुभ्यावर झाली. या सुभेदारानें सौराष्ट्रांत मुलुखगिरीवर जाऊन झालावाड व नवानगर येथून खंडणी वसूल केली, आणि परत येऊन हळवदच्या ठाकुराच्या कुंवरीशीं लग्न लाविलें मारवाडचा अजितसिंह १७१५ त गुजरातचा सुभेदार नेमिला गेला तेव्हां कुमार अभयसिंह पुनः सोरठच्या फौजदारीवर आला. पण दोन्ही ठिकाणीं उभयतांचे कामगारच राज्य चालवीत. अजितसिंहाचा प्रतिनिधि वजेराज भंडारी होता, व फत्तेसिंह कायत हा पुनः अभयसिंहाचें काम करूं लागला.

याच वर्षीं हैदरकुलीखानास सोरठ व गोहिलवाड येथील फौजदार नेमिलें, परंतु यानेंही आपल्या मार्फत काम करण्यास रोझाकुलीखान याची नेमणूक केली. फत्तेसिंह कायत यानें रिकाम्या केलेल्या जागेवर रोझाकुलीखान रुजू झाला. नव्या प्रतिनिधीस फत्तेसिंह अटकाव करील अशी भीति होती तथापि गोहिलवाडच्या कामगार सलाबतखान बाबी याच्या मध्यस्थीनें कज्जाचें बीज नाहींसें झालें. हैदरखानाच्या मनांत सलाबतखानासच जुनागढचा प्रतिनिधि नेमण्याचें होतें. परंतु तो पगार फार मागूं लागला ह्मणून तो विचार रद्द झाला, व रोझाकुलीखानाची नेमणूक झाली. महाराजा अजितसिंह १७१५ त सौराष्ट्रांत मुलुखगिरीवर आला, व त्याला जरी बराच अटथळा झाला तरी झालावाड व

नवानगर या दोनही ठिकाणची खंडणी त्यानें वसूल केली, व द्वारकेची यात्रा करून तो परत गेला.

गुजरातच्या सुभेदारीवर नवीन नवीन नेमणुका वरचेवर होऊं लागल्या. इ. स. १७१६ त समसामउद्दौल्याची नेमणूक झाली. महाराजा अजितसिंहास हा अपमान वाटून तो लढण्यास तयार झाला परंतु नंतर कसाबसा शांत होऊन जोधपुरास निघून गेला. अजितसिंह गेल्यावर हैदरकुलीखान याला दुय्यम सुभेदार नेमिलें. हा जुनागढच्या बाबीबरोबर भांडला व त्यांना त्यानें जुनागढांतून हांकून लाविलें, परंतु पालनपूरच्या गझनीखान झालोरीच्या मध्यस्थीनें दोघांमध्यें पुनः सलोखा झाला. इ. स. १७१८ त अबदुल हमीदखान या नांवाच्या दिल्लीच्या उमरावाची सोरठच्या फौजदारीवर नेमणूक झाली.

फरुकशिअर बादशहा १७१९ त मारला जाऊन महंमदशहा दिल्लीच्या सिंहासनावर आला, व त्याच वर्षी महाराजा अजितसिंह पुनः गुजरातचा सुभेदार झाला. याची नेमणूक ह्मणजे प्रांतांत दंगाधोपा करण्यास इशाऱ्या दाखलच जणूं होती. सुरत शहर लुटून व बादशहाच्या सैन्याचा पराभव करून पिलाजी गाईकवाडानें सरहद्दीवरील सोनगड येथें आपलें ठाणें दिलें. अजितसिंहानें १७२० त अनोपसिंह भंडारीस आपला प्रतिनिधि ह्मणून गुजरातेंत पाठविलें. अबदुल हमीदखानचे जागीं सोरठच्या फौजदारीवर १७२१ त आसदकुलीखानाची नेमणूक झाली, परंतु त्यानें महंमद शरीफखानास आपला कामगार ह्मणून पाठविलें.

प्रतिनिधि पाठवून राज्य करण्याची रीत या वेळीं फार प्रचारांत आली होती, व तिचे परिणाम फार वाईट होऊं लागले होते. गुजरातेंत व सौराष्ट्रांत हरतऱ्हेची गैरव्यवस्था माजली, व गुजरातेंतील बहुतेक सरदार ( व मुख्यत्वेंकरून राजपिपळ्याचा राजा ) गाईकवाडाशीं कारस्थान करून त्याला मोंगलसत्तेचा विध्वंस करण्यासाठीं बोलावूं लागला. मोंगला-

ईतील मुलूख मराठे हळुहळु हाताखालीं घालीत चालले होते ही गोष्ट अजितसिंहासही नापसंत नव्हती, कारण मोंगलांचा मोड झाल्यावर गुजरातेंतील निदान उत्तरेकडील तरी परगणे बळकावून स्वतंत्र राठोड राज्य स्थापन करण्याची त्याला फार आशा होती. इ. स. १७२१ त कोणी एका सय्यदास जुनागढचा फौजदार नेमिलें. व याच वर्षी सुजाअतखानानें सौराष्ट्रांत जाऊन खंडणी वसूल केली.

इ. स. १७२२ त पिलाजी गाईकवाड याच्या हाताखालीं एक सोनगडच्या मार्गानें, व दुसरी कंठाजी कदम बांडे याच्या हाताखालीं दोहद्च्या वाटेनें, अशा मराठ्यांच्या दोन टोळ्या गुजरातेंत शिरल्या. त्यांनीं दक्षिणेकडील मुलूख लुटून थेट सौराष्ट्रापर्यंत मजल पोंचविली व सिहोरवर हल्ला केला, परंतु सिहोरच्या भावसिंहानें मोठ्या प्रयत्नानें त्यांना मागें हटविलें. आपल्या प्रभावानें व चातुर्यानें भावसिंहजी फार प्रसिद्धीस आला व शेजारचीं गांवें व ठाणीं आपल्या राज्यांत सामील करण्याचा त्यानें झपाटा चालविला असतां कोणी त्यास अडथळाही केला नाहीं. या तऱ्हेनेंच सौराष्ट्रांतलें वायव्येकडील सर्वांत मोठें व महत्वाचें ठिकाण लोलिआणा हें त्यानें हस्तगत केलें. त्या वेळच्या दस्तुर-उल-अमाल ( ह्मणजे राज्यांतील जमाखर्चाच्या ) वहींत हें ठिकाण त्याच्या ताब्यांत असल्याबद्दल उल्लेख आहे. छाया येथील जेठवा संस्थानिक खिमोजी हा पोरबंदरास आपली सत्ता अधिकाधिक दृढ करीत चालला होता, आणि लहान लहान ठाण्यांचे हिंदू व मुसलमान जहागिरदारांनीं आपल्या ताब्यांत यावें असें खिमोजीनें त्यांच्याशीं बोलणें लाविलें. फौजदाराची सत्ता आतां संपुष्टांत आली व काठीलोकांनीं निर्धास्तपणें लुटालूट चालविली.

पुढील कांहीं वर्षांच्या इतिहासाचा सारांश येणेंप्रमाणें देतां येईल. मराठ्यांनीं आधींच गुजरातेंमध्यें बेबंदशाही व घोंटाळा उत्पन्न केला होता,

व आतां ते विरमगांव किंवा बोरसदच्या रस्त्यानें येऊन सोरठवर स्वाऱ्या करूं लागले. सौराष्ट्रांत सहज रीतीनें खंडणी वसूल करितां येते हें पाहून त्यांनीं विरमगांव व बोरसद हीं नाक्यावरचीं ठाणीं कबजांत घेण्याचा घाट घातला. विरमगांवचे महत्व सर्व जाणून होते ह्मणून बादशाहींतील एका अत्युत्कृष्ट फौजदाराच्या ताब्यांत तें देत असत. या वेळेस ह्मणजे १७२५ त सलाबत महंमदखान बाबी तेथें होता. मराठ्यांनीं १७२३ त गुजरातमध्यें पद्धतवार खंडणी बसविण्यास सुरुवात केली, व १७२४ त हमीदखानानें महीच्या उत्तरेकडील प्रदेशांत चौथाईचा हक्क कंठाजी कदम बांडे यास दिला, आणि दक्षिणप्रदेशांतील चौथाईचा हक्क पिलाजी गाईकवाडास दिला.

दक्षिणेच्या मार्गानें पिलाजी गाईकवाड १७२५ त सोरठेंत शिरला, पण तेथें कांहीं वजन न पडून त्यास गुजरातेंत परत यावें लागलें. इ. स. १७२७ त बडोदा शहर त्याच्या ताब्यांत आलें.

प्रसिद्ध मुबारिझ-उल-मुल्क सरबुलंदखान बहादुर या वेळेस गुजरातचा सुभेदार होता. तो १७२७ त सौराष्ट्रांतील खंडणी वसूल करण्यास निघाला. सलाबत महंमदखान बाबीच्या सांगण्यावरून नवानगरच्या जामनें एक लाख रुपये खंडणी देऊन सरबुलंदखानाची स्वारी बाजूस परतविली, परंतु तो सोरठेंत शिरला व छाया मुलूख त्यानें लुटला, आणि खिमोजीस समुद्रावर पळविलें. नंतर खिमोजीकडून त्यानें ५०००० रुपये घेतले. अमदाबादेस परत आल्यावर सरबुलंदानें हळवदचा राजा प्रतापसिंह याच्या मुलीशीं लग्न केलें व त्याला खंडणी माफ केली. याच वर्षी कंठाजीच्या लोकांनीं पावागड हल्ला करून घेतलें, व यापुढें वसूल करण्यास गुजरातेंत त्यानें आपले कायमचें प्रतिनिधी नेमिले.

सौराष्ट्रांतील भानगडी पूर्ववत् चालल्याच होत्या. सिहोरच्या ठाकुरानें पूर्वींप्रमाणें धूर्ततेनें हातपाय पसरण्याचा क्रम चालविलाच होता.

इ. स. १७२३ त त्यानें **भावनगर** शहर स्थापिलें, व तें लवकरच महत्वाचें बंदर होऊन बसलें. छायाच्या ठाकुरानें **मांगरोळच्या देसायास** लांच देऊन त्याजकडून १७२६ त **माधवपूर** घेतलें. आणि तें आपल्या राज्यांत सामील केलें. पुढील सालीं मुबारिझ-उल-मुल्खानें याचा जरी मोड करून पाणउतारा केला तरी नवीन मिळविलेल्या व पूर्वीच्या मुलखावर त्यानें पुनः पूर्ववत् आपला अंमल बसविला. ठाकूर १७२८ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा विक्रमातजी गादीवर आला व त्यानें कुतिआणाचें ठाणें जिंकून खालसा केलें.

**नवानगरचा** जमीनदार **जाम रायसिंहजी** याचा खून करून १७१८ त त्याचा लहान भाऊ **हरधोळजी** यानें गादी बळकाविली होती. परंतु रायसिंहजीचा लहान मुलगा कच्छ येथें सुरक्षितपणें पोंचला होता, व १७२७ त सुभेदार, हळवदचा राजा आणि सलावत महमदखान बाबी यांच्या मदतीनें तोच **जामतमाची** हें नांव घेऊन गादीवर बसला. त्यावेळचा **फौजदार असदअल्लीखान** यानें जुनागढचे परगणे कसेबसे हातीं राखिले होते, परंतु दूरचीं ठाणीं एका पाठीमागून एक त्याच्या हातांतून गेलीं आणि **मांगरोळ**, **कुतिआणा**, **उना देलवाडा**, **सुत्रापाडा** आणि **सोमनाथपाटण** हीं तर अजीबाद स्वतंत्र होऊन बसलीं होतीं. **महुवा** व **दाथा** हीं नव्या सोरठेंतील ठाणीं पूर्वीपासूनच स्वतंत्र होतीं. जुनागढचे परगणे राखून बसण्यापलीकडे जरी असदअल्लीच्या हातून कांहीं झालें नाहीं तरी त्याला इतकें समजून आलें कीं जुनागढास लेचापेचा फौजदार आल्यास सर्वच मुलखावर पाणी सोडावें लागेल. ह्मणून १७२९ त मरावयास टेंकल्यावर त्यानें सलावत महंमदखान बाबी यास आपल्या वतीनें काम करण्यास नेमिलें. सलाबतखानाची विरमगांवास फारच जरूरी असल्यामुळें त्यानें आपला मुलगा **शेरखान बाबी** याला जुनागढास पाठविलें. असदअल्लीखानाचा मुलगा महायुद्दीनखान याची जरी पुढें बादशहानें फौजदारीवर नेमणूक केली तथापि शेरखान हाच काम व्हात असे.

# भाग ९.

## *मराठेशाही.*

(इ० सन० १७२९–इ० सन० १८०५)

मराठ्यांत दुफळी करण्याचा प्रयत्न—मुबारिझ उलमुल्ख—महाराजा अभयसिंह—सोहराबखान व धोळीची लढाई—दमाजीचें विरमगांवास ठाणें—खंडणीचा दुहेरी सपाटा—फौजदारीचा अंत व जुनागढास स्वतंत्र राज्यस्थापना—मराठ्यांची कायदेशीर खंडणी—झोरतलबी.

मुबारिझ उलमुल्खानें १७२९ त मराठ्यांमध्यें दुफळी उत्पन्न करण्याचा विचार करून, कंठाजी कदम बांडे व पिलाजी गाईकवाड यांस जर प्रांतांतून हांकून काढाल तर गुजरातेंत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क आह्मी तुह्मांस देऊं असें पेशव्यांशीं बोलणें लाविलें. यावरून चिमणाजी आपा बरीच मोठी फौज घेऊन गुजरातेंत शिरला, परंतु त्यामुळें कंठाजीच्या हालचालींस कोणचीच हरकत पोंचली नाहीं. तो आपल्या खंडणीचा वसूल करून सौराष्ट्रांत गेला परंतु तेथें त्याचें बस्तान चांगलेंसें बसलें नाहीं. खंडणीच्या वसुलाची वहिवाट अशी असे कीं मुलुखगिरी फौज सरहद्दीवर असतांनाच जर संस्थानिकानें खंडणीची भरपाई केली तर त्याच्या राज्यावर स्वारी होत नसे व त्यास त्रासही पोंचत नसे.

नेहेमींप्रमाणें खंडणी वसूल करण्याच्या, व सिहोर आणि छाया येथील ठाकुरांस मुलूख वाढविल्याबद्दल पारिपत्य करण्याच्या दुहेरी हेतूनें १७३० त मुबारिझ उलमुल्ख सौराष्ट्रांत आला. भावसिंहजीस एक युक्ति उत्तम साधली होती. त्यानें एकदम खंडणीची भरपाई करून सुभेदाराचा क्रोधाग्नि शांत केला. विक्रमातजीचें नशीब इतकें चांगलें नव्हतें, व मुबारिझनें माधवपूर लुटून फस्त केलें. याच वर्षी मुबारिझचा मागून

महाराजा अभयसिंह गुजरातचा सुभेदार झाला. याच सुमारास महायुद्दीन-खानच्या वतीनें जुनागढचें काम पहाण्यास शेरखान बाबीच्या जागीं मीर इसमाईलची नेमणूक झाली. शेरखान आपल्या घोघ्याच्या जहागिरीवर परत गेला. महाराजा अभयसिंह अमदाबादेस आला, तेव्हां तेथें जाऊन शेरखानानें एक उत्कृष्ट पेशकशी* नजर केली. यामुळें संतुष्ट होऊन अभयसिंहानें त्याला जहागीर कायमची करून दिली. हें वर्ष संपतां संपतां. अभयसिंहानें मीर फकरुद्दीन याची नेमणूक सोरठच्या फौजदारीवर केली, पण मीर इसमाईल ही नेमणूक कबूल करीना. फकरुद्दीन जुनागढास जात असतां वाटेंत अमरेली येथें त्यास गांठून इसमाईलनें त्याचा पराभव केला, व या लढाईत फकरुद्दीन मारला गेला ( १७३० ).

बुऱ्हाणउलमुल्काचा एक आश्रित सोहराबखान यास १७३२ त सुरते मधून हांकून लाविल्यामुळें तो †भावनगरास आला, व त्याचें महत्व ओळखून भावसिंहजीनें त्यास आश्रय दिला. पुढील सालीं गुलाम महा-युद्दीन मरण पावला व त्याचे जागीं फौजदारीवर त्याचा मुलगा मीर हझ-बरखान आला. इ. स. १७३४ त सोरठेंतील मागील बाकी वसूल कर-ण्याचे कामीं जेव्हां सोहराबखानाची नेमणूक झाली तेव्हां वेळेवर केलेल्या पाहुणचाराचा उत्तम मोबदला भावसिंहजीस मिळाला.

सलावत महमदखान मेल्यावर त्याचा मुलगा शेरखान बाबा यासच घोघ्याच्या जहागिरीवर कायम केलें. भावसिंहजीस शेरखानाचा वचक

* फारशी, पेश ह्म. पुढें, कशीदन ह्म. ओढणें. पेशकश ह्म. पुढें ओढा. यावरून पेशकशी ह्मणजे खंडणी.

† सिहोरहून भावनगर सुमारें १२ मैल आहे व सध्यां तेंच राजधानीचें शहर आहे. कंठाजीचा भावसिंहजीनें १७२२ त जरी पराभव केला तरी आपलें बरेंच नुक-सान झालें हें पाहून १७२३ त त्यानें सुरक्षित असें ठिकाण पाहून भावनगर शहर वसविलें. वर पान ६४ पहा.

असे ह्मणून त्यानें सोहराबखानास घोघ्याची जहागीर मिळविण्याविषयीं प्रयत्न करण्यास सुचविलें. त्याचा दरबारांतील पुरस्कर्ता बुऱ्हाणउल-मुल्क यानें त्या जहागिरीवर आपलीच नेमणूक करून घेऊन सोहराबखानास आपला प्रतिनिधि नेमिलें. पूर्वी बाकी वसूल करण्याचे कामीं व घोघ्यास असतांना सोहराबखानाचे वर्तणुकीची नायब फौजदारास चीड येऊन त्यानें मीरहझबरखानाकडे फिर्याद नेली. या फिर्यादीपासून फायदा न होतां उलट बुऱ्हाणखानाची फौजदारीवर नेमणूक होऊन त्यानें सोहराबखानास आपला प्रतिनिधि नेमिलें. सोहराबखानाची महत्वाकांक्षा जबर होती. त्यानें आपणास विरमगांवचा फौजदार नेमून घेतलें, परंतु तो रुजू होण्यापूर्वी ती जागा अभयसिंहास देण्यांत आली. बुऱ्हाणउल-मुल्काचें दरबारीं वजन असल्यामुळें सोहराबखानानें युक्ति प्रयुक्तीनें पुनः आपली नेमणूक करून घेतली. तो जुनागढास जात असतां अभयसिंहाचा प्रतिनिधि रतनसिंह भंडारी यानें त्याचा मार्ग अडविला. या दोघांची १७३५ त धंधुक्या जवळ धोळी येथें लढाई झाली व तींत सोहराबखान मारला गेला.

सोहराबखानाच्या मरणानंतर मोहसेनखान खालवी यास सोरठचा नायब फौजदार नेमिलें, आणि त्याच वर्षी ह्मणजे १७३५ त दमाजी गाईकवाड* खंडणी वसूल करण्यास सौराष्ट्रांत आला. त्यास कोणत्याही प्रकारचा अडथळा झाला नाहीं. इ. स. १७३६ त पारडीच्या भावसिंह देसायाच्या दगलबाजीमुळें विरमगांव मराठ्यांच्या हातीं आलें. हें नाक्यावरील ठाणें कबजांत आल्यानें सौराष्ट्रांत जाणें येणें फार सुलभ झालें, व खंडणीच्या वसुला साठीं दमाजीची स्वारी फिरून या वर्षी सौराष्ट्रांत शिरली. पुढील वर्षी १७३७ त त्याचा भाऊ प्रतापराव प्रांतांत वसुला साठीं गेला. दरवर्षी खंडणी वसूल करण्याच्या स्वारीस मोंगलांप्रमाणें मराठेही मुलु-

* हाच हल्लींच्या बडोद्याच्या महाराजांचा पूर्वज होय.

खगिरी ह्मणूं लागले होतेच. याच वर्षीं मोहसेनखानाचे जागीं सोरठच्या फौजदार मीरहझबरखान झाला, परंतु त्यापूर्वीं सादकअल्ली व मीरदोस्त अल्ली हे अनुक्रमें नायब फौजदार होते असें दिसतें.

मराठ्यांनीं खंडणीचा सपाटाच सुरू केला. इ. स. १७३८ च्या सुरुवातीसच दमाजीनें सोरठची खंडणी वसूल केली; व तें वर्ष संपण्यापूर्वींच खंडणीच्या कामा साठींच रंगोजी सौराष्ट्रांत शिरला. याच वर्षीं शेरखान बाबी मोमीनखान सुभेदाराच्या वशिल्यानें सोरठचा नायब फौजदार झाला, व त्यानें घोघ्याची वडिलोपार्जित जहागीरही परत मिळविली. मीरहझबर नंतर हिंमतअल्लीस फौजदार नेमिलें, पण त्यानेंही शेरखानासच कायम केलें. इ. स. १७४० व १७४१ त दमाजीनें पुनः सोरठची खंडणी वसूल केली, परंतु १७४२ त रंगोजी नसल्यामुळें मोमीनखान सुभेदार दक्षिणेकडील ह्मणजे बोरसदच्या मार्गानें सौराष्ट्रांत आला. नेहेमीं प्रमाणें वेळेचा रागरंग पाहून भावसिंहजीनें एकदम खंडणी देऊन टाकिली, व मोमीनखानानें नवानगरकडे मोर्चा फिरविला. वीस दिवस युद्ध खेळून शेवटीं जाम ५०००० रुपये देण्यास तयार झाला. येवढ्या खंडणीनें संतुष्ट होऊन मोमीनखान परतला. दमाजीचा भाऊ खंडेराव यानें १७४४ त व १७४५ त सौराष्ट्राची खंडणी वसूल केली, व १७४६ त दमाजीनें या कामासाठीं कान्होजी ताकपरास पाठविलें. त्यानें वनथळी नांवाचें महत्वाचें शहर काबीज केलें. परंतु तो १७४८ त लवकरच गुजरातेंत परत आला. याच वर्षी शेरखानानें गुजरातच्या बाबतीमधून आपलें मन अजीबात काढून घेतलें, व बहादुरखान हें नांव आणि नबाब हा किताब धारण करून जुनागढास स्वतंत्र राज्य स्थापन केलें. याप्रमाणें जुनागढच्या फौजदारीचा अंत झाला. यापुढें जुनागढच्या संस्थानिकास तालुकदार नांव प्राप्त झालें.

अमदाबादचा सुभेदार जवानमर्दखान बाबी १७५१ त सोरठेंत आला

व त्यानें सरदारांकडून खंडणी वसूल केली. पुढील वर्षीं १७५२ त पांडुरंग पंडित याच कामासाठीं आला होता परंतु त्याच्या हातून फारशी कामगिरी झाली नाहीं.

इ. स. १७५३ त जेव्हां अमदाबाद मराठ्यांनीं जिंकून घेतलें त्या वेळेस सौराष्ट्रांतील मराठ्यांची खंडणी* कायदेशीर झाली. या खंडणी पासून जुनागढ सुद्धां सुटलें नाहीं. मात्र मराठे गेल्यानंतर मिळेल तेवढी खंडणी स्वतः वसूल करण्यास जुनागढास हक्क असे. या जुनागढच्या खंडणीस झोरतलबी ह्मणत व तेंच नांव अद्यापही प्रसिद्ध आहे. इ. स. १७५५ त मुसलमानांनीं अमदाबाद परत घेतलें, परंतु १७५७ त पुनः मराठ्यांनीं तें शहर कायमचें आपल्या कबजांत घेतलें. तथापि या घडामोडींचा घोघा व गोहिलवाडचा पूर्व भाग खेरीजकरून सौराष्ट्रांत इतर कोठेंही परिणाम झाला नाहीं.

* खंडणी वसूल करण्याची मराठ्यांची रीत मोंगलांच्या धर्तीवरच होती, व निरनिराळ्या करांचीं नांवेंही पण त्यांनीं तींच राखिलीं होतीं. मुलखगिरी (मुल्कगिरी) बद्दल पूर्वीं उल्लेख आलेलाच आहे. त्याचप्रमाणें घासदाणा हा शब्द मोंगली काहदानह पासून आला. पेशकश व खंडणी यांचे अर्थ एकच. नालबंदी वगैरे शब्द सुद्धां मोंगलांच्या शब्दावरूनच घेतलेले होते.

# भाग १०.

## इंग्रजी.

इ. स. १८०५—

गाईकवाडी सत्ता व शिवराम गार्दी—उखामंडळच्या चांचे लोकांचें पारिपत्य—सौराष्ट्राच्या खंडणीसंबंधीं कायमची व्यवस्था—सौराष्ट्रांतील गाईकवाडी मुलूख—कंडोरणा किल्ला—वाघेरे व मियाणा—छायाचा कुंवर—जामबरोबर लढाई—फत्तेमहमदाची लूट व त्याचें पारिपत्य—वाघेरे—संग्राम खवासाचा मोड—उखामंडळ येथें गाईकवाडी अंमल—इंग्रजी खंडणी—पोलिटिकल एजंटी—वाघेऱ्यांचें बंड—इंग्रजी साम्राज्य—प्रांतांत बंदोबस्त—फौजदारी कोर्ट-वाघेऱ्यांचें शेवटचें बंड—अंतर्व्यवस्था—गिराशियांचे तंटे—इंग्रजी राजकारण—सौराष्ट्राची परकीय मुलखांत गणना—त्रेसष्ट सालची सुधारणा व प्रांतांत बंडाळी—ज्यूडिशिअल असिस्टंट—राजस्थानिक कोर्ट—पब्लिकवर्क्सखातें—राजकुमार कालेज.

यानंतर पेशवे व गाईकवाड यांची सत्ता हळुहळु कमी होऊं लागली होती. परंतु गाईकवाड व इंग्रज यांमध्यें १८०५ त जेव्हां तह झाला त्या वेळेस सर्व मनु पालटला, आणि सौराष्ट्रांतील खंडणी वसूल करण्यास गाईकवाडास फुरसद सांपडली, व अमरेली, कोडिनार वगैरे सुपीक प्रदेश गाईकवाडाच्या प्रत्यक्ष अमलाखालीं आला. सौराष्ट्रांतील गाईकवाडी अमलाचें पुनरुज्जीवन अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं झालें व तें शिवराम गार्दीच्या श्रमाचें फळ होय. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं बाबाजी आप्पाजी आणि विठ्ठलराव देवाजी यांनींही पुष्कळ परिश्रम करून हा अंमल बराच दृढतर केला.

उखामंडळच्या चांचे लोकांनीं सभोंवारच्या दर्याकिनाऱ्यावर फार दिवसांपासून अतिशय अनर्थ मांडला होता. त्यांनीं १८०४ मध्यें मुंबईचें

एक जहाज लुटिलें, व नुकसानी भरून देण्याचें नाकारिलें. कर्नल अलेक्झांडर वॉकर हे त्या वेळेस बडोद्याचे रेसिडेंट होते. त्यांनीं १८०७ त माळिआ(मियाणा) जिंकून घेतल्यावर या चांचे लोकांचें पारिपत्य करण्यासाठीं इंग्रजी व गाईकवाडी फौज घेऊन तिकडे कुच केलें. *वाघेरे व वाढेल्यांनीं पाहिलें कीं एवढ्या कवायती लष्करापुढें आपला निभाव लागणें कठीण, ह्मणून ते कर्नल वॉकरला शरण गेले आणि त्यानें त्यांपासून ११०००० रुपये दंड घेण्याचें ठरविलें. इतकी रोकड देण्याची या लोकांमध्यें शक्ति नाहीं असें पाहून त्या वेळेस रेसिडेंटानें दंड वसूल केला नाहीं.

कर्नल वॉकर व गाईकवाडी अंमलदार यांनीं मिळून १८०७–८ मध्यें सौराष्ट्रांतील खंडणीची रक्कम कायमची ठरविली. ही व्यवस्था करतांना कोणकोणच्या राजांनीं गाईकवाडास परस्पर खंडणी द्यावी, व स्थानिक राजांच्या मार्फत कोणीं द्यावी यासंबंधीं कांहीं एक नियमित तत्व ठरलें होतें असें दिसत नाहीं. प्रथमची व्यवस्था फक्त दहा वर्षांपुरतीच होती, व पुढें १८२० त गाईकवाडाशीं केलेल्या कराराअन्वयें या कामीं कांहीं कायमपणा निश्चित झाला. त्या वेळेस मोठे मोठे ठाकूर आपल्या राज्यांतील भायात (भाऊबंद) जहागिरदारांच्या वतीनें खंडणी देण्याची जबाबदारी आपणावर घेईनात, व ह्मणून या भायातांच्या लहान लहान जहागिरीच्या खंडणीचा वसूल पोलिटिकल अंमलदारांच्या मार्फतच होत जावा असें त्या वेळीं ठरलें असावें असें दिसतें व तीच रीत आजपावेतों चालू आहे. ज्या कित्येक प्रबळ जातींनीं आपल्या खंडणीची रक्कम शेजारच्या संस्थानिकांमार्फत देण्याचें कबूल केलें त्या हळुहळु त्याच संस्थानिकांच्या ताब्यांत येऊन पडल्या. ह्यांसच हल्लीं मूळगिराशिया ह्मणतात. खंडणीसंबंधीं कायमची

* वाघेरे या बंडखोर लोकांहून वाढेले रजपूत अगदीं निराळे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. वाघेऱ्यांचे पूर्वज काबालोक यांनीं अर्जुन व गोपींस लुटल्याबद्दल उल्लेख पूर्वीं आला आहे.

व्यवस्था झाल्यानंतर सौराष्ट्रांत जोंपर्यंत गाईकवाडी अंमल पूर्णपणें होता तेवढ्या अवधींत निराळी खंडणी देणाऱ्या कित्येक लहान जहागिरदारांचा मुलूख जवळच्या बलिष्ठ संस्थानांमध्यें सामील झाला.

ही व्यवस्था इतरांपेक्षां गाईकवाडाच्याच विशेष फायद्यांत पडली. विठ्ठलराव देवाजीनें अमरेली सभोंवारचा बराच मुलूख काठी वगैरेपासून जिंकून घेतला, व परस्पर खंडणी देणाऱ्या जहागिरीही कित्येक आपल्या मुलखांत सामील केल्या. कोडिनार, शियानगर, भीमकांठा वगैरे प्रदेशही गाईकवाडी अमलाखालीं आला. नवानगरच्या जामजसाजीनें किल्लेदारांस लांच लुचपत देऊन पोरबंदरचा कंडोरणा किल्ला घेऊन तो परत देण्याचें जेव्हां नाकारिलें तेव्हां सौराष्ट्राच्या कामांत हात घालण्याची संधि इंग्रजांस मिळाली. कर्नल वॉकरनें गाईकवाडी फौज घेऊन किल्ल्यावर चाल करून तो घेतला व पोरबंदरच्या राण्यास परत दिला (१८०७). या प्रसंगीं मदत केल्याबद्दल पोरबंदरच्या राण्याकडून गाईकवाडानें १०००० रुपये नजराणा घेतला. "याच वर्षीं कच्छचा दिवाण फत्तेहमहमद (हा नांवाचा दिवाण पण वास्तविक राजाच होता) रण्ण ओलांडून कांहीं हक्काच्या बाबी वसूल करण्यासाठीं नवानगरांत उतरला, परंतु कर्नल वॉकरनें त्याची समजूत करून त्यास परत लाविलें."

वाघेरे लोकांची लूट १८०७ त पुनः सुरू झाली, परंतु द्वारकेस घोडेस्वारांची एक तुकडी पाठवून त्यांना ताळ्यावर आणिलें. याच वर्षीं कर्नल वॉकर मियाणा जातीच्या बंडखोर लोकांस ताळ्यावर आणण्यासाठीं माळियास गेला. त्यास थोडासा प्रतिबंध झाला. परंतु शेवटीं तें शहर हस्तगत करून सर्व तटबंदी त्यानें जमीनदोस्त करून टाकिली. याप्रमाणें या साहसी लुटारूंच्या टोळधाडीपासून वारंवार होणारा त्रास एकदाचा नाहींसा झाला.

इ. स. १८०४ मध्यें पोरबंदरच्या कुंवरा (राजपुत्रा) नें छाया व खिरासरा हीं गांवें सर करून आपला बाप सुलतानजी यास पदच्युत केलें. परंतु १८०७ त ब्रिटिश फौज तेथें जाऊन तिनें छाया आणि खिरासऱ्यावर हल्ला केला व बंड मोडून *टाकिलें.

इ. स. १८११ त कच्छच्या रावानें नवानगरकडून खंडणी येणें होती त्याबद्दल तकादा लाविला, आणि इंग्रेजी व गाईकवाडी अंमलदारास मध्यस्थी करण्याविषयीं विनंति केली, परंतु जाम या अंमलदारांची सल्ला मान्य करीना. याच सुमारास नवानगरच्या एका आरबानें एका इंग्रज अंमलदारास गोप येथें गोळी घातली व आपण मोरपूरच्या किल्ल्यांत आश्रयास राहिला. जाम या आरबास इंग्रजांच्या स्वाधीन करीना. यामुळें इ. स. १८१२ च्या सुरुवातींतच इंग्रजी व गाईकवाडी फौजा नवानगरवर चालून आल्या, व थोडीशी लढाई झाल्यानंतर जाम टेंकीस आला, व फेब्रुआरीच्या २३ वे तारखेस तह करण्यास राजी झाला. या तहांतील विशेष महत्वाच्या शर्ती पुढें लिहिल्याप्रमाणें होत्या. १ इंग्रज अंमलदाराला गोळी घालणाऱ्या आरबास इंग्रजांच्या स्वाधीन करावें. २. †मोरपूरचा किल्ला पाडून टाकावा. ३. कच्छच्या मागण्यांचा निकाल लावावा. ४. आपला भाऊ सताजी यास जामनें राणपूर व आणखी बारा गांवें द्यावीं. ५. जामनें फत्तेहसिंह गाईकवाडास २५००० रुपयांचा नजराणा करावा. ६. सरपदड परगणा ध्रोळ संस्थानच्या ताब्यांत परत द्यावा.

कच्छचा दिवाण फत्तेहमहमद १८१३ त पुनः रण ओलांडून हालार प्रांत लुटण्याच्या उद्योगास लागला. रणछोडजी जुनागढचा दिवाण व-

* कांहीं लोक या छायाच्या हकीकतींत अशी गोष्ट सांगतात कीं छायावरील हल्ल्याच्या वेळीं फौजेंतील लोकांनीं राण्याच्या आईच्या पायांमधून सोन्याच्या सांखळ्या ओढून काढण्याचा प्रयत्न केला, व त्या निघेनात ह्मणून तिचे पाय कापून सांखळ्या लांबविल्या ! † किल्ला अद्याप तसाच आहे.

गैरे नवानगरच्या कुमकेस आल्यामुळें दोनही पक्षांची हडीआणा येथें लढाई जुंपली, व त्यांत फत्तेहमहमदास हार खावी लागली. फत्तेहमहमदानें इंग्रजांचा वकील सुंदरजी शिवजी याच्या मध्यस्थीनें बडोद्याचा रेसिडेंट क्यापटन कारनॅक याच्याकडून लढाई बंद राखण्याबद्दल पत्र आणिलें. लुटालुटीमुळें झालेलें नुकसान भरून देण्याचें क़बूल केल्यावरून लढाई तहकूब ठेवण्यांत आली. फत्तेहमहमद प्रांतांतून लवकर हालेना तेव्हां इंग्रजी व गाईकवाडी फौजांनीं त्याचा पाठलाग करून पिच्छा पुरवून त्याला प्रांतांतून हांकून लाविलें. कर्नल वॉकरनें १८०७ त वाघेरे लोकांवर लादलेल्या दंडाची भरपाई करण्याविषयीं १८१३ त बडोद्याचे क्यापटन बालंटाईन यांनीं वाघेरे लोकांशीं बोलणें लाविलें. परंतु त्यांनीं दंडाचा फक्त तिसरा हिस्साच दिला, व आपला लुटालुटीचा धंदा अव्याहत चालविला, ह्मणून त्यांचा देश कावीज करण्याचें कायमचें ठरलें.

जाम रणमल्जी १८१४ त मरण पावल्यावर त्याचा भाऊ सताजी गादीवर आला. याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच मस्कत येथील कांहीं आरबांनीं येऊन कंडोरणा आणि पडधरी हे किल्ले छापा घालून घेतले. जामनें इंग्रज व गाईकवाड सरकारांकडे मदत मागितली, व त्यांनीं आरबांकडून किल्ले परत घेऊन जामच्या स्वाधीन केले. संग्राम खवासाच्या पाठीं पडून आरब आश्रयासाठीं जोडियाच्या किल्ल्यांत गेले. खवासानें स्वतंत्र तालुक़दाराप्रमाणें गाईकवाडास परस्पर खंडणी द्यावी असें कर्नल वॉकरनें ठरविलें असल्यामुळें तो जामच्या डोळ्यांत सलत होताच; इतक्यांत त्याच्यावर हल्ला करण्याचीही आयतीच संधि आली. जामनें इंग्रज व गाईकवाड यांकडे एकदम मदत मागितली, व कर्नल ईस्ट फौज घेऊन खवासावर चालून आला. खवासास आपल्या ताब्यांतील सर्व मुलूख सोडून द्यावा लागला व इंग्रजांनीं तो जामच्या स्वाधीन केला. पुढें इंग्रज

व गाईकवाड यांच्या मध्यस्थीनें खवासास आमरण परगण्याची जहागीर करून दिली. ही सर्व घडामोड इंग्रजांचा वकील सुंदरजी शिवजी याच्या मार्फतीनें झाली असल्यामुळें त्यास जोडिआ व बालंभा ह्या दोन परगण्यांचा इजाऱ्याचा हक्क मिळाला.

जमादार उमेर मुखासम जुनागढच्या नबाबावर अत्यंत जुलूम करीत असे, व १८१६ त नबाबाच्या विनवणीवरून इंग्रजांनीं जमादारास जुनागढांतून हांकून काढिलें. या कामगिरीचा मोबदला ह्मणून नबाबानें धोलेरा, धंधुका, राणपूर व घोघा येथील झोरतलबीचे हक्क सोडून दिले. याच वर्षीं कर्नल ईस्टनें उखामंडळांत सैन्य नेऊन तो प्रांत जिंकून घेतला. व १८१७ त गाईकवाड सरकारास दिला तो अद्याप त्यांजकडेच आहे.

महीकांठ्याचे पोलिटिकल एजंट क्यापटन बालंटाईन यांस पेशव्यांची खंडणी वसूल करण्यासाठीं १८१७ त सौराष्ट्रांत पाठविलें होतें. इ० स० १८१८ तील पुण्याच्या तहाच्या अन्वयें पेशव्यांचे सर्व हक्क इंग्रज सरकारास मिळाले, व तेव्हांपासून इंग्रजांचा एजंट खंडणीसाठीं दरवर्षीं येऊं लागला.

इ. स. १८२० मध्यें सौराष्ट्रांत स्वतंत्र पोलिटिकल एजंटाची नेमणूक झाली. पहिला पोलिटिकल एजंट क्यापटन बार्नेवेल यानें गाईकवाडास खंडणी देणाऱ्या संस्थानांची स्थिति तपासण्यास सुरुवात केली. तपासणीचा परिणाम असा झाला कीं सौराष्ट्रांतील संस्थानांकडून खंडणी वसूल करणें ती गाईकवाडानें परस्पर न करितां इंग्रजांच्या मार्फत करावी असें ठरलें. याप्रमाणें हा वेळपर्यंत सौराष्ट्रांत असलेली गाईकवाडाची सार्वभौम सत्ता जाऊन ती इंग्रजांच्या हातांत पडली. इ. स. १८२२ त लहान लहान बाबी सर्व इंग्रजांनीं आपल्या हातांत घेतल्या.

उखामंडळच्या वाघेऱ्यांनीं १८२० त पुनः बंडाळी केली, व तिकडे

त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं कर्नल स्टानहोप यास बरोबर फौज देऊन पाठविणें भाग पडलें. यानें द्वारका सर केली व वाघेऱ्यांस जेरीस आणिलें.

इंग्रज सरकारानें १८२२ त सौराष्ट्रांतील सार्वभौम सत्ता आपले हातीं घेतल्यावर प्रांतांत सर्वत्र बंदोबस्त राखण्यांत, तंटेबखेडे मोडण्यांत, व संस्थानिकांचें एकमेकांच्या मनांतील वैमनस्य नाहींसें करण्यांत अथवा बाहेर दाखवूं न देण्यांत पुष्कळ तत्परता दाखविली व बरेच श्रम घेतले. जुनागढची फौज आजूबाजूच्या लोकांस फार त्रास देत असे, व धोराजीच्या ठाकुरास तिनें अगदीं भंडावून सोडिलें होतें. इ. स. १८२४ त या फौजेस हात आटोपावा लागला व जुनागढ संस्थानास ६८५००० कोरी (सुमारें १७१२५० रुपये) नुकसान भरून द्यावें लागलें. या लुटारू फौजेचा मुख्य जेमलखान यास पकडून दंड करण्यांत आला. याच वर्षीं खुमाणा लोकांची दंगल माजली होती ती मोडून टाकिली, परंतु लवकरच पुनः त्यांनीं बंडाळी आरंभिली. या व पुढील वर्षीं दंगाधोपा सर्व नाहींसा होऊन सर्वत्र शांतता झाली. कयापटन म्याकमर्डकनें बरीच मेहेनत घेतल्यामुळें कच्छच्या रणाकडून मोर्वी व झालावाडवर होणाऱ्या स्वाऱ्या बंद पडल्या व संस्थानिकांस त्रास दिल्याबद्दल, कच्छच्या रावास भूर्दंड भरावा लागला.

ज्या लहान लहान संस्थानिकांच्या हातीं फौजदारी सत्ता नव्हती त्यांच्या हद्दींत झालेल्या गुन्ह्यांची चवकशी करण्यासाठीं, व रयतेस योग्य न्याय मिळावा ह्मणून सरकारानें १८३१ मध्यें सौराष्ट्रांत एक फौजदारी कोर्ट स्थापन केलें. कर्नल वॉकरनें १८०७ त प्रांताची व्यवस्था लावल्यानंतर १८२० पर्यंत गाईकवाडी सत्ता प्रांतांमध्यें पूर्णपणें होती, व या अवधींत नेमलेल्या गाईकवाडाच्या सुभ्यांनीं कांहीं जबरदस्तीनें व कांहीं कारस्थानानें गाईकवाडी मुलूख वाढविण्यास कमी केलें नव्हतें. हे सुभे प्रांतांत स्वच्छंदानें मन मानेल तसा अंमल करीत. यांच्या अंमलापेक्षां

इंग्रज सरकारची राज्य करण्याची पद्धति लोकांस अधिक आवडली. चोहींकडील तंटेबखेडे व असंतोष मोडून सर्व मुलूख शांततेच्या साम्राज्याखालीं आणण्यास पूर्वीच्या पोलिटिकल एजंटांनीं वर्णनीय परिश्रम केले; त्यांमध्यें प्रमुखत्वानें नांव घेण्याजोगे ह्मणजे कर्नल लँग व कर्नल जेकब हे होत. जेकबसाहेबाचें नांव तर महाराष्ट्रांतही प्रसिद्ध आहे. या दर्जाचे व या शीलाचे अंमलदार जर हमेश येतील तर लोकांस तक्रार करण्यास बिलकुल कारण रहाणार नाहीं हें उघड आहे.

इ. स. १८५८ सालीं पुनः वाघेरे लोकांनीं उचल खाली, व लोकांस फारच त्रास दिला. द्वारका व बेट हीं त्यांनीं जिंकून घेतलीं. या ठिकाणांहून त्यांस मोठ्या प्रयासानें बाहेर काढिलें. परंतु ते सौराष्ट्रांत येऊन आभपुऱ्याच्या (बरड्याच्या) डोंगरांत शिरले. तेथून १८५९ त कर्नल हॉनरनें त्यांस काढिलें व तेव्हांपासून त्यांची बंडाळी बहुतेक मोडली. या बंडखोर वाघेऱ्यांपैकीं कांहीं लोक बडोद्याच्या तुरुंगांत होते तेथून १८६२ त पळून गेले. त्यांनां उखामंडळांतील व किंबहुना सर्व सौराष्ट्रांतील बदमाश लोक सामील झाले, सर्व प्रांतांत त्यांनीं अतोनात पुंडाई व अनर्थ मांडिला, व त्यांच्याकडे सरकारनेंही विशेष लक्ष्य दिलें नाहीं. शेवटीं १८६७ साल संपतां संपतां नवानगरच्या हद्दींत माचरड्या नजीक तोबार टेंकडी शेजारीं युद्ध होऊन त्यांत वाघेऱ्यांचा पराभव झाला, परंतु फौजेचे मुख्य क्यापटन हेबर्ट व क्यापटन लाटुश हे मारले गेले. इ. स. १८६८ च्या मेच्या ७ व्या तारखेस वाघेऱ्यांचा सरदार मुलुमाणेक याला पोरबंदरच्या शिबंदीनें घेरून राणपुराजवळ ठार केलें.

कर्नल कीटिंजच्या पोलिटिकल एजंटीच्या वेळीं १८६३ त या प्रांताची अंतर्व्यवस्था बदलून सुधारावी असें ठरलें. सर्व संस्थानिकांचे ७ *वर्ग केले, व निरनिराळ्या दर्ज्याप्रमाणें देहांत शासनापासून ते १५ दिव-

* संस्थानिकांचे ७ वर्ग हे कांहीं नियमित एकच तत्वावर केले होते असें दिसत

मांची कैद व २५ रुपये दंड येथपर्यंत त्यांना निरनिराळे अधिकार दे-
पाठ॰ आले. खालील वर्गांतील कित्येकांस दिवाणी अधिकार बिलकुलच
इंग्रज यांच सुमारास असेंही दिसून आलें कीं मोठमोठ्या संस्थानि-
घेतल्यावगेराशियांशीं तंट्यामध्यें सरकारानें फार ढवळाढवळ केल्यानें फा-
स्थानिकां होतां उलटा परस्परांमधील भिन्नभाव वाढून गिराशियांस संस्था-
दाखकांशीं विरोध करण्यास उत्तेजन मिळतें, आणि एकंदरींत परिणाम अनिष्ट
होतो. या मतान्वयें गिराशियांचे सर्व तंटे त्या त्या संस्थानिकांवर सोंपवून,
संस्थानिकांस योग्य न्याय करण्याविषयीं उत्तेजन व समजूत देण्यांत आली.

---

नाहीं. वर्गीकरणाचे वेळीं संस्थानचें उत्पन्न व विस्तार आणि त्याच्या घराण्याचा पूर्वीचा प्रतिष्ठितपणा व कोठें कोठें संस्थानिकांच्या स्वतःच्या आंगचे गुण हे पाहून वर्ग पाडले असावेतसें दिसतें. निरनिराळ्या वर्गांतील संस्थानिकांचे हक्क खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

ब्रिटिश प्रजा खेरीज करून इतरांची देहांत शासनापर्यंतच्या गुन्ह्याची चवकशी करण्याचा अधिकार **पहिल्या** वर्गांतील संस्थानिकांस आहे; व दिवाणी कामांत पूर्ण अखत्यार आहे. **दुसऱ्या** वर्गाच्या संस्थानिकांनीं फक्त स्वतःच्या प्रजेपैकींच कोणीं गुन्हा केला असल्यास देहांत शासनाची शिक्षा पोलिटिकल एजंटाच्या परवानगीवांचून द्यावयाची व दिवाणी कामांत त्यांस पूर्ण अखत्यार आहे. सात वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा व १०००० रुपये दंड इतका फौजदारी व २०००० रुपयेपर्यंत कज्जे चालविण्याचा दिवाणी असे **तिसऱ्या** वर्गांतील संस्थानिकांस हक्क आहेत. **चवथ्या** वर्गांतील संस्थानिक तीन वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा व ५००० रुपये दंड करूं शकतात व दिवाणी कामांत १०००० रुपयांपर्यंत कज्जे चालवितात. दोन वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा व २००० रुपये दंड **पांचव्या** वर्गांतील जहागिरदार करतील, व ५००० रुपयेपर्यंत दिवाणी काम पहातील. **सहाव्या** वर्गांतील **तालुकदार** तीन महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा देतात व २०० रुपयेपर्यंत दंड करतात व दिवाणी कामांतही पांचशे रुपयेपर्यंत कज्जाचे स्वतः निकाल करतात. **सातव्या** वर्गांतील तालुकदारास दिवाणी अधिकार बिलकुल नाहीं. परंतु फौजदारी कामांत १५ दिवसांची सक्त मजूरीची शिक्षा व २५ रुपये दंड करण्याचा त्यांस अधिकार आहे.

या फेरफारांपासून इंग्रजी राजकारणास अनुरूप असेच परिणाम झाले. कोणच्याही कामांत उताव्ळ न करितां सावकाशपणानें व युक्तीनें कोणतीही गोष्ट साध्य करण्याची हातोटी इंग्रजांप्रमाणें इतर राष्ट्रांस साधणें नाहीं. संस्थानांचें वर्गीकरण व त्यांचे अधिकारनिर्णय, तसेंच उपसंस्थानिकांस संस्थानिकांच्या स्वाधीन करणें या दोन गोष्टींचे परिणाम पाहूनच त्या हातांत घेतल्या होत्या. संस्थानिकांच्या राज्यांत वाटेल तेव्हां हात घालतां यावा हें इंग्रजी राजकारणाचें धोरण ध्यानांत राखूनच हे दोन महत्वाचे फेरफार केले होते. बाहेरून अगदीं साध्या व किरकोळ दिसणाऱ्या फेरफारांतून इंग्रजांनीं फारच मोठा मतलब साधला. त्या वेळेस इंग्रजांचा अंमल चांगलाच बसला असल्यामुळें कोणचीही गोष्ट एकदम करण्यास त्यांच्या हातीं सत्ता नव्हती असें नव्हे, परंतु होतां होईल तों लोकांस न दुखवितां आपला कार्यभाग साधून घ्यावा ही त्यांची नेहेमींची शिस्त. अलीकडे हळुहळु हा मार्ग कसा सुटत चालला आहे हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. असो. संस्थानिकांचें वर्गीकरण व अधिकारनिर्णय यांपासून येवढें ठरलें कीं नियमित अधिकारांच्या तालुकदारांचे इतर सर्व अधिकार व ज्यांस बिलकुलच अधिकार नव्हते अशाच्या मुलुखांतील सर्वच अधिकार पोलिटिकल एजंटाच्या हातांत येऊन पडले. तालुकदारांस संस्थानिकांच्या हातांत सोंपविल्यामुळें सार्वभौम सत्ताधिकारी या नात्यानें पोलिटिकल खात्यास संस्थानिकांच्या तालुकदारी कज्जांत वरचेवर थोडाबहुत हात घालण्यास संधि झाली. इतकी सर्व व्यवस्था पूर्वींपासून केली असतांनाही हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरींनीं सौराष्ट्र हा परकीय मुलूख (Foreign territory) असें ठरविलें. या मताचें निरसन त्या वेळचे मुंबईचे गव्हरनर सर बार्टल फ्रीअर यांनीं केलेलें आहे. सार्वभौम सत्ता कोणाच्या तरी हातांत पाहिजे व गाईकवाडानें आपले सर्व हक्क इंग्रजांस अर्पण केल्यामुळें ती सत्ता इंग्रजांचीच असली पाहिजे. प्रांतांतील बंदरें तर नेहेमींच मुख्य सरकारच्या हातांत असत. प्रथम गुजरातच्या सुल-

तानाच्या ताब्यांत व पुढें बादशहाच्या हातांत अशी ह्यांची पूर्वपीठिका आहे. जामचा मुलूख खेरीज करून इतर सर्व प्रांत खालसांत मोडत असे. इ. स. १७५३ त जेव्हां अमदाबाद मराठ्यांच्या हातांत गेलें तेव्हां मात्र सौराष्ट्रांतील संस्थानिक कांहीं वेळ स्वतंत्र होते असें ह्मणतां येईल. एकंदरींत सार्वभौमत्व इंग्रजांकडे येऊन सौराष्ट्रांतील राजे वास्तविक होतेच ते नांवानेंही ताबेदार वनविण्याचा सर बार्टल फ्रिअर यांचा हेतु होता. तथापि सौराष्ट्र प्रांत अद्यापपर्यंत परकीय मुलखांतच गणला जातो.

त्रेसष्ट सालच्या सुधारणेस पुष्कळांनीं अडथळा केला व प्रांतांत बंडाळी फार झाली. गाईकवाडावर बिथरलेल्या लोकांस वाघेरे लोक मिळाले व सर्वत्र बेबंदशाही माजली. इंग्रज सरकारनें वेळेवर कडक उपचार योजिल्यामुळें वाघेऱ्यांचें बंड लवकरच मोडलें, परंतु त्यांनीं दोन असिस्टंट पोलिटिकल एजंटांचे बळी घेतले. सरकारनें प्रांतांतला दंगाधोपा सर्व नाहींसा केला. संस्थानिकांस न्यायपद्धति सुधारण्याविषयीं समजावण्यांत आलें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कित्येक संस्थानांतील वरिष्ठ प्रतीचे व कित्येकांतील सर्वच गुन्हे चौकशीसाठीं पोलिटिकल एजंटाकडे येऊं लागल्यामुळें या अधिकाऱ्यावर कामाचा बोजा फार पडूं लागला. ह्मणून १८७२ त ज्युडिशिअल असिस्टंट नांवाचा एक पोलिटिकल एजंटास मदतनीस नेमिला, व त्याजकडे सेसन जज्जाचे अधिकार देण्यांत आले.

इतकें करूनही लोक असंतुष्ट होते ते होतेच. संस्थानिकांकडून त्यांच्या ताब्यांतील गिराशियांना योग्य न्याय मिळत नसे, व इकडे बंडाळीचीही सोय राहिली नाहीं. आणि एजंटाकडेही दाद लागेना. हीं सर्व दुःखें नाहींशी करण्याबद्दल सरकारनें फार प्रयत्न केले. शेवटीं संस्थानिक व त्याच्या ताब्यांतील गिराशिया यांच्यामधील तंट्यांचा निकाल करण्यासाठीं राजस्थानिक कोर्टाची राजकोटास स्थापना व्हावी असें संस्था-

निकांस वाटलें. या कोर्टाचा मुख्य--प्रेसिडेंट--एक ब्रिटिश अंमलदार असावयाचा. संस्थानिक व गिराशियांचे हक्क व कर्तव्यें हीं एकदांचीं नक्की करण्यांत यावीं, गिराशियांच्या मुलखाच्या हद्दी ठराव्या वगैरे या क्रोर्टीचीं मुख्य कामें होतीं. ब्रिटिश सरकारचा यास रुकार मिळाला व १८७३ मध्यें राजस्थानिक कोर्टाची स्थापना झाली. प्रथम संस्थानिक गिराशियांचे हक्क ठरवीत व ते गिराशियांस पसंत न पडले तर ते राजस्थानिक कोर्टाकडे अपील करीत. राजस्थानिक कोर्टाचे निकाल कायमचे असत. हें कोर्ट नुकतेंच बंद करण्यांत आलें आहे.

या व्यवस्थेमुळें जमीनदारांची कुरकुर नाहींशी झाली, परंतु प्रांतांत दरोडेखोरांचा त्रास फार होत असे तो अद्याप नाहींसा झाला नाहीं. कर्नल कीटिंजनीं हत्याराच्या परवान्याची चाल सुरू केली होतीच त्यामुळें लुटारूचा धंदा अंमळ मंदावला, परंतु योग्य मार्गाची सुधारणा ह्मणजे कीटिंज साहेबांनीं प्रथम सुरू केलेलें पब्लिक वर्क्स खातें होय. यामुळें लोकांस योग्य रोजगार मिळून त्यांची दरोड्याकडील प्रवृत्ति साहजिकच नाहींशी झाली.

इ. स. १८७० त राजकोट येथें राजकुमार कॉलेजाची स्थापना झाली. हें जरी कर्नल अँडरसन याच्या कारकीर्दींत मुंबईचे गव्हरनर नामदार सर सीमोर फिटझराल्ड यांच्या हातून उघडलें गेलें तरी हें कर्नल कीटिंज यांच्याच श्रमाचें फळ होय. मि. चेस्टर म्याकनाटन हे या संस्थेचे पहिले प्रिन्सिपाल होत. हे स्वभावानें फार मनमिळाऊ असून हे व यांच्या सुस्वभावी पत्नी कालेजच्या हितासाठीं रात्रंदिवस अंतःकरणा पासून झटत असत. या गृहस्थांनीं राजकुमारांस १८८७ व १८८९ सालीं प्रत्येक रविवारीं दिलेलीं बोधपर व्याख्यानें पुस्तकरूपानें छापिलीं आहेत. लॉर्ड कर्झन साहेबांची स्वारी १९०० सालीं येथें आली होती तेव्हां त्यांनीं कालेजांत दिलेल्या आपल्या भाषणांत या पुस्तकाची योग्य स्तुति केली आहे. हें पुस्तक वाचलें ह्मणजे म्याकनाटन साहेबांच्या प्रेमळ अंतःकरणाचें व कर्तव्यदक्षतेचें चित्र मनावर चांगलें ठसतें.

# भाग ११.

## सामान्य माहिती.

१ शेतकी—२ वसूल—३ व्यापार—४ दुष्काळ—५ शिक्षण—६ न्याय-खातें—७ आरोग्य.

१

सौराष्ट्र हा मुलूख शेतकीला योग्य असा आहे. समशीतोष्ण हवा, माफक पाऊस, नदी, नाले, तळीं, विहिरी यांची विपुलता, व वरीच सुपीक जमीन इत्यादि साधनामुळें शेतकी चांगली होण्यास हरकत नाहीं. तथापि शेतकीचें काम चांगल्या प्रकारें होत नाहीं. शेतकऱ्याच्या हातून निभावेल त्यापेक्षां अधिक जमीन तो करण्यास घेतो, व त्यामुळें त्याची विलक्षण त्रेधा उडते. सौराष्ट्रांतील शेतकरी जरी विशेष मेहनती नाहीं तरी तो हत्यारें वापरण्यांत कुशल असून शेतकीची माहिती त्यास पुष्कळ असते. प्रांतांत जनावेरंही चांगलीं होतात. विशेषेंकरून पांचाळ देशांत घोड्यांची निपज चांगली होते. गीरच्या गाई व ह्मशी प्रसिद्ध आहेत. मोर्वी व माळिया* नजीकच्या रणांत उंट चांगले होतात. झालावाड व हालारांतील गाढवें प्रसिद्ध आहेत.

सौराष्ट्रांतील जमीन मुख्यत्वें करून दोन प्रकारची आहे—काळी व गोराडू अथवा तांबडी. काळी जमीन तांबडीच्या आठ पट चांगली असते. काळी जमीन पांच प्रकारची आहे. 'कांपाळ' -अथवा मळीची जमीन; हींत उत्तम प्रकारचा कापूस होतो. 'काळी बेसर' ह्मणजे साधारण भुऱ्या रंगाच्या जमिनींतही कापूस पिकतो, व पाणी पाजून गहूं व जवही करितात. 'नरम कराळ' जमीन फार मऊ असते व हिच्यांत लहान लहान ढेंकळें होतात. 'कठण कराळ' जमीन बरीच खोल व कठीण असते व तींत

* मियाणी माळियां

पिंवळ्या मातीची मिसळ असून खालीं खारें पाणी असतें. 'रेचक' जमीन कांहींशी खारी असून मनस्वी चिकट असते व ती पाणी बिलकुल घेत नाहीं. तांबडी जमीनही चार जातींची आहे. 'कांपाळ' अथवा मळीची जमीन. दुसरी 'मलीन' जमीन फार मऊ असून तिच्या खालीं उत्तम गोडें पाणी सांपडतें. 'रेताळ' जमिनींत तीन चतुर्थांश रेती मिसळलेली असते. व 'रेचक' काळ्या रेचक जमिनीप्रमाणें चिकट व खारी असते आणि हिच्यांत पाणी मुळींच जिरत नाहीं. याशिवाय आणखी दोन तीन जातींच्या खडकाळ जमिनी आहेत.

प्रांतांतील उत्तम प्रकारचा सुपीक प्रदेश बराच भादर नदीच्या किनाऱ्यावर आहे. या नदीचा उगम जसदन जवळ आहे व ती पुढें नैर्ऋत्येकडे वहात जाऊन आटकोट, जेतपूर, धोराजी, उपलेटा व बांटवा या गांवांवरून वहात जाऊन आरबी समुद्रास मिळते. महुवा, लिलिआ वगैरे गोहिलवाडांतील भागांत फार सुपीक जमीन आहे. तेथें सात आठ हातांवर सुंदर गोडें पाणी लागतें, व उत्कृष्ट फळफळावळ भाजीपाला उत्पन्न होतो. वरील सर्व ठिकाणीं जमिनीचा कस कमी न होऊं देतां उसांचें उत्पन्न थोडें थोडें करितां येतें. सोरठप्रांतांत चोरवाडचीं विड्याचीं पानें सर्व सौराष्ट्रांत किंबहुना सर्व गुजरातेंत उत्तम ह्मणून वाखाणतात. हालार प्रांतांत खंबाळिया सभोंवारचा प्रदेश बराच सुपीक आहे. गोंडळ व झालावाडचा कापूस फार प्रसिद्ध आहे. झालावाड व गोहिलवाडांतील पूर्वेकडील भागांत पुष्कळ कापूस पिकतो. हालारांत पश्चिमेकडे उत्तम प्रकारची ज्वारी, बाजरी, गहूं व इतर धान्यें पिकतात. आणि सोरठेंत दक्षिणेस कापूस व धान्याचें उत्पन्न चांगलें होतें. सौराष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यावर खंबायतच्या आखाताजवळ लिंबडीमधील भाळप्रदेशांत चार नद्यांचा कचरा पावसाळ्यांत वाहून येतो व या मळींत थंडीच्या दिवसांत विशेष मेहेनत न करितां गव्हांचें उत्पन्न फारच चांगलें येतें.

शेतकीचा धंदा करणारे लोक मुख्यत्वेंकरून हिंदूंमध्यें ब्राह्मण, कुणबी,

सठवारा, रजपूत, आहीर, मेर आणि कोळी; व मुसलमानांमध्यें मोमना, घांची, बोहोरा, सिंधी, जत आणि मियाणा हे होत. या सर्वांत हुषार ह्मणजे ब्राह्मण व कुणबीच आहेत. इकडील शेतकरीवर्ग दक्षिणेकडील शेतकऱ्यांपेक्षां कांहींसा अधिक सुखी आहे. कुणबी लोक फार घामट असतात, परंतु एकंदरींत वर्तनानें सरळ, निर्व्यसनी व धर्मशील असतात. शेतसारा जरी माफक आहे तरी शेतकरीवर्ग बराच कर्जबाजारी आहे. सत्याहात्तरच्या दुष्काळाचे दुष्परिणाम नाहींसे होतात तोंच फिरून गेल्या दोन, तीन वर्षांतील दुष्काळाचा पेंच येऊन त्यांच्या गळीं बसल्यामुळें सध्यां त्यांची फार वाईट स्थिति आहे.

जमिनींतील उत्पन्नापैकीं कापसासंबंधीं थोडी माहिती येथें देणें जरूर आहे. कापसाच्या मुख्य जाती तीन आहेत (१) 'लालियुं' (२) 'ढांकणियुं' 'घुमर' अथवा 'दाबळियुं' व (३) 'लबरकुवा.' लालियुं कापसाचीं बोंडें कापूस तयार झाला ह्मणजे फुटतात. ह्या जातीचा कापूस लवकर तयार होतो व यास किडीची भीतीही कमी, परंतु बोंडांतून कापूस बराच खालीं पडून खराब होतो यामुळें त्याचा तितका भाव उतरत नाहीं. लालियुं कापूस मुख्यत्वेंकरून गोहिलवाडांत व दक्षिण झालावाडांत होतो. ढाकणियुं कापसाचीं बोंडें कापूस तयार झाला तरी मिटलेलींच रहातात; त्यामुळें खालीं पडून कापसाची खराबी होत नाहीं. वर सांगितलेल्या ठिकाणीं खेरीज करून इतरत्र बहुतेक याच जातीचा कापूस करितात. मांगरोळ जवळच्या एका विहिरीच्या नांवावरून 'लबरकुवा' हें नांव तेथील कापसास पडलें. या विहिरी जवळची जमीन कापसास विशेषेंकरून मानवते व तेथील कापूस जरी फारच थोडा होतो, तथापि सुंदर रेशमी धाग्याचा असतो. साधारणपणें खोल काळ्या जमिनींत ओल चांगली रहात असल्यामुळें व चुन्याचा अंश असल्यामुळें तेथेंच कापूस चांगला पिकतो. साधारणपणें आक्टोबर महिन्यांत कापसास फूल पडून फेब्रुआरींत कापूस

तयार होतो. सरासरीनें दर एकरास सरकीसकट २६० पौंड कापूस तयार होतो. सौराष्ट्रांतील कापूस वढवाणाहून, व भावनगर, जाफराबाद, वेरावळ, जोडिया, पोरबंदर, ववाणिया या बंदरांहून मुंबईस जाऊन '**फेअर धोलेरा**' ( Fair Dholera ) या नांवानें त्यास चांगला भाव येतो.

जमिनीच्या मालकीसंबंधानें येथेंच दोन शब्द लिहिले पाहिजेत. जमिनीच्या मालकीसंबंधी सौराष्ट्रांत जो विलक्षण घोंटाळा माजला आहे त्याची गुंतागुंत सोडविणें फारच प्रयासाचें काम आहे, व त्यासाठीं इंग्रज सरकारास एक निराळ्याच कोर्टाची स्थापना करावी लागली होती. संस्थानिकांचे व गिराशियांचे तंटे इतक्या भानगडीचे असत कीं ते तोडण्यासाठीं एका मोठ्या स्वतंत्र अंमलदाराची नेमणूक करून इ. स. १८७३ पासून ते १८९९ पर्यंत सव्वीस वर्षें सतत हे कज्जे चालले होते व सध्यां थोडीशी निरवानिरव झाली आहे असें ह्मणण्यास आधार काय तो राजस्थानिक कोर्टाचें बंद होणें हाच होय. नाहीं तर वास्तविक पहातां सर्वत्र या बाबतींत व्यवस्था लागलेली आहे, असें ह्मणतां येणार नाहीं.

जमिनीच्या हक्कासंबंधीं द्योतक मुख्य शब्द ह्मणजे गिरास हा होय. यासंबंधीं थोडासा उल्लेख पूर्वीं केलेलाच आहे. गिरास व गिराशिया यासंबंधीं सविस्तर हकीकत देऊं गेल्यास एक स्वतंत्र पुस्तकच होईल. सध्यां इतकेंच सांगणें पुरे होईल कीं संस्थानिकांनीं वेळोवेळीं आपल्या भाईबंदांस दिलेल्या इनामामुळें व त्यांमध्यें पुढें असंख्य वांटे पडल्यामुळें हा सर्व घोंटाळा माजला आहे. निरनिराळ्या जातींच्या रजपुतांच्या टोळ्या जसजशा सौराष्ट्रांत येत गेल्या व मुलूख जिंकूं लागल्या तसतसें प्रत्येक टोळीच्या मुख्यानें जिंकिलेल्या मुलखापैकीं कांहीं भाग आपापल्या नातेवाइकांस दिला. या भागास 'कपालग्रास' ह्मणत व ही गिरास वंशपरंपरेनें चाले. या गिराशियांच्या अंगीं धमक असली ह्मणजे ते आपल्या करामतीनें अधिक मुलूख मिळवून आपल्या गि-

गमेंत सामील करीत. या प्रकारानें मुलूख मिळवीत ते जर बरेच शक्तिमान् झाले तर ते मूळ घराण्यापासून तुटून स्वतंत्र बनत. ज्यांच्यामध्यें इतकी कर्तबगारी नसेल किंवा ज्यांस दैव अनुकूल नसेल ते शेजारच्या एकाद्या संस्थानिकाच्या आश्रयास राहून 'मूळ गिराशिया' हें नांव पावत. गिराशिया स्वतंत्र झाला ह्मणजे तो '*तालुकदार' बने व ठाकूर, रावळ, राणा

* राजा, राणा, रावळ, ठाकूर, भुमीया, आणि रावत अशीं सौराष्ट्रांतील निरनिराळ्या संस्थानिकांचीं निरनिराळीं नांवें आहेत. राणा हें नांव सर्वांत मोठें असून तें जातींतील मुख्यासच फक्त लावितात. शिवाय राजा हा स्वतंत्र असला पाहिजे, ह्मणजे त्यानें आपल्या जातींत कोणासही खंडणी देतां कामा नये. मोंगलबादशहास किंवा मराठ्यांस जरी तो खंडणी देत असला तरी त्यास स्वतंत्र ह्मणण्यास हरकत नाहीं. वास्तविक पहातां ही पदवी फक्त नवानगर, पोरबंदर व ध्रांगध्रा येथील संस्थानिकांसच लावावयाची, परंतु इतरांसही सौराष्ट्रांत राजे ह्मणण्याची चाल पडली आहे. याप्रमाणें औपचारिकपणें राजा ही पदवी धारण करणारामध्यें मोर्वी, भावनगर, वढवाण, लिंबडी वगैरे संस्थानिकांची गणना होते. राजाला महाराजा राजाश्री असें ह्मणतात. राजा व राणा यांत कांहीं फरक नाहीं. राजा व राणा यानंतर दुसऱ्या दर्ज्याची पदवी ह्मणजे रावळ ही होय. व भावनगरच्या संस्थानिकांचें हेंच खरें नांव होय. राजा, राणा, व रावळ यांच्या मुलांस कुंवर ह्मणजे राजपुत्र ह्मणतात. कुंवरांच्या मुलांस जर जहागीर मिळाली असेल तर त्यास ठाकूर ही संज्ञा मिळते. ठाकुराच्या मुलांसही वडील जिवंत असेपर्यंत कुंवर ह्मणतात. ठाकुराच्या मरणानंतर त्याचा वडील मुलगा गादीवर बसतो व बाकीच्या मुलांस भुमिया किंवा गिराशिया ह्मणूं लागतात. राजा ही पदवी घेऊन ती वापरण्यास जे असमर्थ असतात त्या संस्थानिकांस रावळच्या खालची पदवी जी ठाकुर ती मिळते. मोठ्या कुळांतून उतरून निराळ्या पडलेल्या शाखेच्या मुख्य संस्थानिकांसही ठाकूर ह्मणतात. आपल्या कुळाच्या मुख्य राजास ठाकुरास रोख खंडणी, किंवा घोडा, किंवा नोकरी यांपैकीं कोणत्या तरी रूपानें प्रजाधर्म दाखवावा लागतो. स्वतःच्या हद्दींत राजाप्रमाणेंच ठाकुराची सत्ता स्वतंत्र असते. राजा व ठाकुर खेरीज इतर जमीनदारास भुमिया ह्मणतात. रावत ही बहुमानाची पदवी आहे. रावत ह्मणजे शूर व ही पदवी प्रथम राजानें दिलेली असते व पुढें वंशपरंपरेनें चालते.

अथवा राजा हें नांव घेत असे. गिराशिया या दर्जास येऊन पोंचला ह्मणजे त्यास साहजिकच आपलें राज्य जसेंच्या तसेंच आपल्या वडील मुलाच्या हातीं जावें असें वाटे. आपल्या इतर मुलांस तो लहान लहान गिराशी देत असे, व हे गिराशिया बनत. हे लोक आपआपल्या संस्थानिकांचे ताबेदार खरे परंतु इतर सर्व तऱ्हेनें स्वतंत्रच असत.

या प्रकारें मुख्य राज्याचे जरी तुकडे पडले नाहींत तरी गिराशीचे तुकडे पडून अगदीं खरावी होई. हल्लीं या वांट्याच्या योगानें कित्येक गिराशींचे इतके तुकडे पडले आहेत कीं एका साधारण कुटुंबाचेंही पोषण होतां होत नाहीं. काठी जहागिरदारांमध्येंही जहागिरीचे मुलांमध्यें सारखे भाग पाडतां पाडतां कित्येक सुंदर जहागिरींचें अतोनात नुकसान झालें आहे. सौराष्ट्रांत मुसलमान जहागिरदार थोडेच आहेत. परंतु त्यांच्यांतही दायविभागाची चाल असल्यामुळें गिराशीचे तुकडे झाले आहेत. यांच्यामध्यें वडील मुलास एक भाग अधिक मिळतो इतकाच फरक आहे. या भागास 'मोहतप' ह्मणतात. या तोडातोडीच्या चालीमुळें सौराष्ट्रांत कित्येक ठिकाणीं तर एकेका खेड्यांत भागीदारांची संख्या १०० पर्यंत येऊन बसली आहे, व गिरासेंत एक प्रकारचा मान वाटत असल्यामुळें व प्रजोत्पत्तीचा धंदा अव्याहत चालत असल्यामुळें हा प्रकार कोठवर जाईल याचा नेम नाहीं.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत मोठमोठ्या संस्थानिकांपासून ते एका खेड्याच्या शतांशाच्या मालकापर्यंत सर्वांस आपआपल्या प्रजेच्या सर्व गुन्ह्यांची चवकशी करून देहांत प्रायश्चित्तापर्यंत शिक्षा देण्याचा पूर्ण अखत्यार होता. लढाई किंवा तह करण्याचा, व्यापारासंबंधीं पाहिजे ते कायदे करण्याचा, किल्ले व तटबंदी करण्याचा वगैरे सर्व प्रकारचे हक्क त्यांस असत. संस्थानिकांच्या ताब्यांतील गिराशियालोक जोंपर्यंत खंडणी वेळेवर देत असत तोंपर्यंत त्यांच्या अंतर्व्यवस्थेंत संस्थानिक कोणत्याही

प्रकारें हात घालीत नसत. लढाईंत मदत केल्याबद्दल जमिनीच्या तुकड्याचेही तुकडे बक्षीस देणें, कारागीर लोकांस आपलें काम करण्यास लावणें, घरच्या लग्नकार्यांत नजराणे घेणें वगैरे गोष्टींत सुद्धां संस्थानिकांप्रमाणें गिराशियालोक आपले हक्क चालवीत.

कर्नल वॉकरनें १८०७ त जेव्हां प्रांताच्या खंडणीची व्यवस्था केली त्या वेळेस सौराष्ट्राची अशी स्थिति होती. त्या वेळेस जी व्यवस्था मुकरर ठरली तीमध्यें अद्याप बिलकुल फरक झालेला नाहीं. परंतु लहानसान तत्व्यांसंबंधी पुढें राजस्थानी कोर्ट स्थापन झालें वगैरे हकीकत दुसरीकडे आहेच. येथपर्यंत जमिनी विषयीं व तिच्या हक्कसंबंधां विषयीं साधारण ठोकळ माहिती झाली. याहून ज्यास्त सूक्ष्म बावती विषयीं एवढ्या आकुंचित वर्णनांत ज्यास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

२

सौराष्ट्रांत एक राज्य नसल्यामुळें प्रांताच्या वसुलाचा अंदाज करणें फार कठीण काम आहे. तथापि कर्नल वॉकरच्या वेळीं ह्मणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं ५१,९५,५५० रुपये वसुलाचा अंदाज केला होता व त्यापैकीं खंडणी दाखल ९,७९,८८० रुपये जात असत. पुढें १८८१ सालच्या अंदाजावरून दिसून आलें कीं वसुलाची रक्कम १,६५,५०,३१० रुपयेपर्यंत वाढली ह्मणजे तिपटीहून अधिक झाली व खंडणी १०,७७,५७० रुपये ह्मणजे सुमारें पूर्वी इतकीच राहिली. कर्नल वॉकरच्या वेळेस गाईकवाडी मुलूख अवघा १२०००चा होता परंतु पुढें थावराथावर झाल्यावर १८८२ च्या दुष्काळांत गाईकवाडानें जुनागढ व काठी मुलखावर असा कांहीं हात मारला कीं वसूल एकदम ३,५४,५२० रुपये होऊन बसला. या प्रकारें जुनागढचा बराच मुलुख गेला तरी १८०८ त वसूल ५,०५,००० होता तो १८८१ त २०,००,००० पर्यंत वाढला. भावनगरचाही वसूल असाच वाढला ह्मणजे ७,००,००० होता

तो २३,००,००० झाला व गोंडळचा ४,००,००० पासून १२,००,००० ला चढला. याप्रमाणेंच सर्व लहान संस्थानांचेही वसूल वाढत गेले. लहान जमीनदारांच्या जमिनींचे मात्र भाग पडून पडून त्यांची स्थिति फार कंगाल होऊन गेली आहे.

सौराष्ट्रांतील वसुलाचा आंकडा बरोबर काढणें हें मोठ्या नांवाजलेल्या आंकडेपंडितासही दुरापास्तच. वर दिलेले आंकडे साधारण मानानें मात्र खरे समजावे. संस्थानिकांच्या जमाखर्चांत विलक्षण घोंटाळा असतो व जेव्हां जमाखर्चाच्या तोंडमिळवणीची अडचण पडते तेव्हां रकमांच्या रकमा खासगी खात्यांत घुसडून देतात ह्मणजे झालें. राजाच्या भायातांस गांवें देतात तींही केव्हां केव्हां हिशेबांत येत नाहींत, व आलींच तरी कांहीं तरी अजमासानें त्यांचें उत्पन्न लिहून जमेच्या व खर्चाच्या बाजूंची तोंडमिळवणी करून टाकतात. या व अशा दुसऱ्या अडचणींमुळें प्रांताच्या वसुलाची रक्कम नक्की समजणें कठीण पडतें.

वसुलाची मुख्य बाब ह्मटली ह्मणजे जमीनमहसूल होय. जमिनींतील उत्पन्नाचा नियमित भाग व थोडीशी रोखी मिळून एकंदर भरती होते. अजमासें उत्पन्नाचा तिसरा व केव्हां केव्हां तर अर्धा भाग कापून घेतात. समुद्रकिनाऱ्यावरील संस्थानांत उत्पन्न होणाऱ्या जिनसा खुष्कीच्या मार्गानें संस्थानाबाहेर नेल्यास त्यांच्यावर जकात द्यावी लागते. बंदरांची भरभराट व्हावी या हेतूनें ही व्यवस्था केलेली असते. पूर्वी बहुतेक बंदरांत मिठाचें उत्पन्न एक बरेंच असे. संस्थानच्या हद्दींत जकात चुकवून आणलेली अफू पकडल्यास त्यापैकीं $\frac{2}{3}$ सरकारी तिजोरींत जमा होते. अफूचें व्यसन या प्रांतीं बरेंच असल्यामुळें ही एक उत्पन्नाचीच बाब आहे. याशिवाय घरपट्टी, कारागीर, दुकानदार, गवळी, धनगर व मजूर वगैरे लोकांकडून घेतले जाणारे लहान लहान कर आहेत. धेडलोकांकडून चामड्यावर कर घेतात, व धीवरलोकांकडून माशांवर कर

घेतात. दारूच्या गुत्त्यांवर विशेष कर आहेत. याशिवाय पूर्वी गुन्हेगारांकडून आलेला दंडाचा पैसा ह्मणजे एक उत्पन्नाची चांगलीच बाब असे. बहुतेक फौजदारी गुन्ह्यांची तडजोड दंड दिल्यानें होत असे व सधन मनुष्याकडून दंडही पण त्या मानानेंच जबर घेत. याप्रमाणेंच दिवाणी खटल्यांतही रिवाज होता. एकंदरींत दिवाणी व फौजदारी न्यायाच्या एक प्रकारच्या विक्रयानें दरबारच्या तिजोरींत बरीच भर पडत असे. पुढें इंग्रजी झाल्यावर ही चाल बंद करावी लागली व निरनिराळ्या कोर्टांचा अंमल बसला, परंतु तिजोरींतील तूट जबर स्टांपांनीं भरून आली; ह्मणजे गुन्हेगारास एकट्यासच विचाऱ्यास पैसे द्यावे लागत, त्याला दुसऱ्या बाजूनेंही थोडासा हातभार लाविला! राजस्थानिक कोर्टानें ज्यांचे हक्क नक्की केलेले आहेत अशा लहान लहान जमीनदारांकडून "सुधारा कर" ह्मणून एक कर हल्लीं इंग्रजसरकारच्या परवानगीनें घेतला जातो. याशिवाय मोठमोठ्या शहरीं म्युनिसिपालिट्यांची स्थापना होऊन तेही कर बसविले आहेत. सुमारें १८६५ पासून १८८० पर्यंत बहुतेक संस्थानिकांनीं आपल्या मुलखामधून जाणाऱ्या मालावर जकात ठेविली होती परंतु ही जकात प्रांताच्या व्यापारास घातुक असल्यामुळें संस्थानिकांच्या संमतीनें बंद करण्यांत आली. दर्याकिनाऱ्यावरील शहरांतून तेथें उत्पन्न होणारा व जमिनीच्या मार्गानें बाहेर जाणाऱ्या मालावर मात्र काय ती आतां जकात आहे.

या सर्व वसुलाची व्यवस्था संस्थानिकांच्या केवळ मर्जीवरच असल्यामुळें पद्धतवार जमाखर्च कोठेंही फारसा दृष्टीस पडत नाहीं हें साहजिकच आहे. तथापि लोकलज्जेस्तव जमाखर्च ठेवावा लागतो. परंतु कित्येक रकमा खाजगी खात्यांत पडून जातात व त्यांचा खरा उपयोग कोणीकडे झाला हें समजत नाहीं. खर्चाच्या मुख्य बाबींपैकीं खंडणीची रक्कम जरी पूर्वीइतकीच आहे तरी राज्यांतील इतर खर्च पुष्कळच वाढला आहे.

शहराभोंवतीं तटबंदी करणें व टोलेजंग राजवाडे बांधणें यापलीकडे इमारत कारखान्यांतून कांहीं कामें होत नसत. प्राचीन काळीं झालेल्या विहिरी व तलाव यांची दागदुजी करणें सुद्धां मधील धामधुमीच्या वेळेस बनलें नाहीं. परंतु सर्वत्र शांतता झाल्यावर असल्या गोष्टींकडे लक्ष्य देण्यास फुरसद सांपडली व लोकोपयोगी कामें प्रांतांत हळुहळु होऊं लागलीं. त्याप्रमाणेंच न्यायपद्धतींत सुधारणा होऊन लोकांस साधारणपणें तरी न्याय मिळूं लागला. तथापि कित्येक दिवसपर्यंत शिक्षण, दवाखाने, यांची वाण लोकांस फार भासत असे. परंतु त्या मार्गानेंही सुधारणा होऊं लागली. अशा खर्चाच्या बाबी हळुहळु वाढूं लागल्या तेव्हां अर्थातच संस्थानिकांस अद्वातद्वा खाजगी खर्च करणें कठीण जाऊं लागलें. धूर्त संस्थानिक होते त्यांनीं वेळ ओळखून वें आपल्या प्रजेच्या सुखाकडे लक्ष्य देऊन आपल्या राज्याची व्यवस्था चांगल्या प्रकारची राखिली. परंतु स्वतःच्या चैनीपलीकडे राजाचें विशेष कांहीं कर्तव्य आहे हें ज्यांच्या स्वप्नींही नाहीं अशा संस्थानिकांचें इंग्रजी अंमला खालीं कसचें चालणार ? संस्थानिकांच्या राज्यांतील अंतर्व्यवस्थेंत होतां होईल तों हात घालावयाचा नाहीं हें इंग्रजी राजकारणाचें धोरण सर्वत्रच आहे. परंतु संस्थानिक जेव्हां अगदींच कर्तव्यपराङ्मुख होऊन अनन्वित प्रकार करूं लागतो, किंवा इतर कांहीं कारणामुळें संस्थान अगदीं कर्जांमध्यें बुडून जातें व लोक फारच कुरकुर करूं लागतात तेव्हां तो कदाचित् एखाद्या पोलिटिकल एजंटास कसाबसा थोपवून धरील, परंतु शेवटीं ब्रिटिश सरकारास संस्थानची व्यवस्था आपल्या हातांत घ्यावी लागते. संस्थानिकास नेमणुकीवर स्वस्थ बसवितात व एक सरकारी कारभारी नेमून *तो सर्व कारभार पहातो. संस्थान कर्जमुक्त झाल्यावर व संस्थानिकाची वर्तणूक सुधारल्यावर सरकारास योग्य वाटेल तर पुनः राज्य त्याच्या स्वाधीन करतात.

---

* याला Manager अथवा Administrator ह्मणतात.

व्यवस्थेंत सर्वत्र सुधारणा होऊं लागली तेव्हां संस्थानिकांना एकत्र मिळून कामें करण्याची किंमत समजून येऊं लागली, व प्रांताच्या सामान्य सुधारणेसाठीं निरनिराळे फंड उभे करण्यांत आले व शेवटीं सर्व फंड एकत्र करून एक मोठा समाईक फंड केला.* या फंडाची व्यवस्था पोलिटिकल एजंटाच्या मार्फत होते. सर्व संस्थानच्या कारभाऱ्यांची सभा भरून निरनिराळया संस्थानच्या वर्गणीचे आंकडे ठरविलेले आहेत. वेगवेगळे दहा पांच फंड असल्यापेक्षां एकच मोठा फंड असावा हें अधिक सोईचें हें उघड आहे.

## ३

सौराष्ट्राच्या सभोंवारच्या समुद्रकिनाऱ्याचा विस्तार सुमारें पांचशें मैल आहे, व सौराष्ट्रांतील कोणच्याही गांवाहून समुद्र ६० । ७० मैलांपेक्षां

---

* पूर्वी निरनिराळे असलेले फंड खालीं लिहिल्याप्रमाणें होते:—

| | |
|---|---|
| सडका. | रु. १६७२६० |
| बालहत्या. | २०९४८० |
| एजन्सी ग्याझीट. | ४३१७० |
| मोहसाळ. | ९१४८० |
| जप्ती. | २१०४० |
| सिव्हिल स्टेशन. | ५०३६२० |
| नजराणा. | ७६९२० |
| रेजिस्ट्रेशन. | ७२४८० |
| राजस्थानिक कोर्ट. | ९६११० |
| दवाखाने. | ३१३४० |
| सामान्य सुधारणा. | ८६४९० |
| शिक्षण. | ५३००६० |
| किरकोळ. | २३८१० |
| एकूण | १९५३२६० |

दूर नसल्यामुळें या प्रांताचा परदेशाशीं व्यापार पूर्वींपासूनच पुष्कळ असे. पूर्वीं एकंदर व्यापाराचीं ६२ बंदरें होतीं, परंतु १८४२ त त्यांपैकीं १२ बंद झालीं. व उरलेल्या ५० पैकीं हल्लीं चांगला व्यापार फक्त १२ च बंदरांत चालतो व इतर बंदरें बंद पडलीं आहेत. हीं *बारा बंदरें व मुंबई-बडोदा रेलवेचें सौराष्ट्रांतील नाक्यावरचें ठिकाण वढवाण याच ठिकाणीं फक्त प्रांतांतील मालाची मुख्य घडामोड होते. घोघा, दीव, सोमनाथ पाटण, मांगरोळ पोरबंदर हीं प्राचीन काळापासून सौराष्ट्रांतील प्रसिद्ध बंदरें आहेत. मांगरोळ हें टोलेमीसही माहीत होतें ह्मणतात. पुढें सोळाव्या शतकांत मलबारीं मंगळूराशीं घोटाळा होऊं नये ह्मणून फिरंगीलोक याला सोरठी मांगळोर ह्मणूं लागले. याच शतकांत दीव बेटाचेंही महत्व फार वाढलें होतें. गुजरात, तांबडा समुद्र व इराणचें आखात येथील येणारीं जाणारीं गलबतें या बंदरास हमेश लागत असत. आणि ह्मणूनच हें फिरंग्यांचे मनांत इतकें बसलें, व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें १५३६ त तें त्यांनीं बळकाविलें. फिरंग्यांच्या ताब्यांत गेल्यापासून त्याचें महत्व हळुहळु कमी होत गेलें. हिंदूंची यात्रेची जागा ह्मणून, व पुढें हिंदुस्थानांतून अरबस्थानांत व इराणांत जातांना मुसलमान लोकांची उताऱ्याची जागा ह्मणून सोमनाथपाटणचें महत्व मनस्वी वाढलें होतें. अवरंगजेबाच्या मृत्यू पर्यंत घोघा, सोमनाथपाटण, मांगरोळ, व पोरबंदर ह्यांची चांगलीच भरभराट होती. पुढें घोघा हें प्रथम पेशव्यांच्या व नंतर इंग्रजांच्या हातांत गेलें. हल्लीं भावनगर भरभराटींत आल्यापासून घोघा अगदींच बसलें. हल्लीं मुख्य, व्यापार ह्मटला ह्मणजे भावनगर, महुवा, वेरावळ, बेडी, जोडिया व पोरबंदर येथेंच चालतो. व इतर ठिकाणीं अगदींच किरकोळ असतो. पैकीं जवळ जवळ अर्धा एकट्या भावनगरांतच चालतो.

* हीं बारा बंदरें ह्मणजे जोडिया, वेडी, सलाया, पोरबंदर, नवीबंदर, मांगरोळ, वेरावळ, जाफराबाद, महुवा, घोघा, भावनगर व धोलेरा हीं होत.

इंग्रजसरकार, गाईकवाड सरकार, व फिरंगी यांचीं बंदरें खेरीज करून सौराष्ट्रांतील आयात व निर्यात व्यापार अनुक्रमें रु. २,१७,२७,५८० चा व रु. १,६०,६८,८७० चा असा आहे.* प्रांतांत बाहेरून येणारे मुख्य जिन्नस, ह्मटले ह्मणजे धान्य, साखर, धातू, किराणे जिन्नस, रंग, हस्तिदंत, किरकोळ माल, कापसाचें सूत, रेशीम, खजूर, सुपारी, नारळ, इमारती-लांकूड, दोरखंड, तूप, तेल, काकवी, तंबाकू, महूडा, अफू व दारू हे होत. प्रांतांतून बाहेर जाणारे जिन्नस कापूस, धान्य, तेल, लोंकर आणि दगड हे होत. पैकीं कापसाचा व्यापार फारच मोठा. दिवाळी-नंतर सुमारें दोन महिने कापसाचा व्यापार फार चालतो. वढवाणास आगगाडी येण्याचे पूर्वीं झालावाडांतील सर्व कापूस धोलेऱ्यास जात असे व तेथून पुढें मुंबईस जाई. वढवाणास गाडी झाल्यावर धोलेरा अ-जीवात बसलें. पुढें वढवाणहून भावनगरास आगगाडी झाल्यावर आतां बराच कापूस भावनगरास जाऊन तेथून मुंबईस रवाना होतो. कापसाचा व्यापार मुख्यत्वेंकरून वाणी, भाट्ये, लुआणा, मेमाण व खोजा हे लोक करितात. वढवाण व भावनगरास कांहीं इंग्रजांचे एजं-टही कापसाचा व्यापार करितात व यांचे दाबाचे कारखानेही आहेत. अमेरिकेशीं लढाई १८६३ सालीं चालली असतां येथें कापूस पुष्कळच पिकवीत असत पण पुढें तितकी किफायत होईना ह्मणून कित्येक काप-साच्या शेतांत हल्लीं इतर धान्यें पिकवितात.

सौराष्ट्रांतील मुख्य कलांमध्यें नवानगरचें सोनेरी कलाबतूचें व बांध-णीचें काम प्रसिद्ध आहे. रेशमी व किनखाबी कामही सुबक करितात. कुंकू, गुलाल, सुगंधी तेलें, अगरबत्त्या, नानाप्रकारचीं अत्तरें व हरतऱ्हेचें सुगंधी सामान फार उत्कृष्ट तयार करितात. मांगरोळास हस्तिदंताचें जडाव काम व चंदनी कोरींव काम फार सुंदर करितात. कुंडला व मुळी

* हे आंकडे १८८० सालचे आहेत. त्यानंतरचे आंकडे मिळाले नाहींत.

येथें देशी जिनें, वढवाणास साबण, व ध्रांगध्र्यास दगडी जातीं व इतर दगडी सामान तयार होतें. भावनगरास यंत्रावर सुती काम थोडेंसें होतें.

४

इ. स. १५५९ पूर्वींच्या दुष्काळाची माहिती मिळत नाहीं. पण या सालीं 'जगडूशहाचा दुष्काळ' सौराष्ट्रांत पडला. जगडूशहा नांवाच्या एका वाणी शेट्यानें दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर धान्याचीं मोठ-मोठीं कोठारें भरून ठेविलीं, व दुष्काळाचा कहर उसळला तेव्हां लोकांत इतकें धान्य वांटलें कीं याचें नांव चोंहीकडे प्रसिद्ध होऊन दुष्काळासही पण त्याचेंच नांव मिळालें. राजकोटच्या आजी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर जगडूशहाचा कोठा ह्मणून अद्यापि एक ठिकाण प्रसिद्ध आहे.

इ. स. १६३१ त (संवत १६८७) सौराष्ट्रांत फारच मोठा दुष्काळ पडला. याला संवत ८७ वरून 'सतियांशियो' ह्मणतात. हा पहिला सतियांशियो. गुजरातेंत व दक्षिणेंत पाऊस न पडल्यामुळें या दुष्काळाचें स्वरूप भयंकर होतें. गरीबलोक एक एक भाकरीस आपलीं मुलें विकण्यास तयार होते, परंतु घेणारेच मिळत नसत. मिरात-इ-अहमदी ग्रंथांत या दुष्काळाचें वर्णन आहे. नेहेमीं थोडा दानधर्म करणाऱ्या व खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या लोकांवर रस्त्यांत भीक मागण्याचा प्रसंग आला. लोक कुत्र्याचें मांस विकूं लागले होते. हाडांची भुकी पिठांत मिसळली जाई. मनुष्यें एकमेकांस खाऊं लागलीं. मेलेल्या माणसाची पुढील व्यवस्थाही होईना. खुनाच्या भीतीनें एकट्यादुकट्या किंवा विनहत्यारी मनुष्याची बाहेर पडण्याची छाती होत नसे. अन्न किंवा काम मिळेल या आशेनें गरीब लोक मोठमोठ्या शहराकडे लोटले. शहरांच्या रस्त्यामध्यें पुष्कळ परके लोक मेलेले दृष्टीस पडत. त्या बापड्यांचा अंत्यविधि करण्यासही कोणी मिळत नसे. पुष्कळ लोक प्रांतांतून बाहेर गेले. असंख्य लोकांनीं पटापट प्राण सोडले. प्रांतांत गुरेंढोरें उरलीं नव्हतीं ह्मटलें तरी

चालेल. शेतसारे माफ केले होते तथापि दुष्काळ फारच भयंकर असल्यामुळें प्रांतास वर डोकें काढण्यास पुष्कळच दिवस लागले. अमदाबाद, सुरत वगैरे ठिकाणीं मोठमोठीं अनाथगृहें काढिलीं होतीं.

इ. स. १६४७ त दुष्काळ पडला होता परंतु त्याविषयीं माहिती मिळत नाहीं. पुढें १६८१ त पुनः दुष्काळ पडला परंतु तो इतका भयंकर नव्हता. आयात धान्यावरील जकात माफ केली होती. नंतर १६८६ त पाऊस कमी पडल्यामुळें धान्यावरील जकात माफ करण्याची पाळी आली होती. १६९४ व १६९६ या सालीं धान्याची चणचण होती व कमी दरानें धान्य विकण्याचीं दुकानें निघालीं होतीं.

इ. स. १७१८ त (संवत १७७५) सौराष्ट्रांत पुनः दुष्काळ आला. याला 'पंचोत्रा' ह्मणतात. या वेळीं बाजरीचा भाव रुपयास दोन शेर झाला होता. या सालीं एक दोन वेळ पाऊस पडला खरा, परंतु अवेळीं पडल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. गरीब लोकांनीं रानांतील झाडांचीं मुळें उकडून खाऊन रक्षण केलेले प्राण पुढें उद्भवलेल्या रोगास खर्चीं पडले. १७२३ त ही थोडासा दुष्काळ होता.

इ. स. १७३१ (संवत् १७८७) या वर्षीं दुसऱ्या 'सतियांशिओ' दुष्काळानें आपलें उग्र स्वरूप प्रकट केलें. या वर्षीं चवदा दिवस सारखा संततधार पाऊस पडला. पावसापूर्वींही धारण महागच होती तेव्हां पूर्वीं एकदोन वर्षें धान्याची टंचाईच होती असें दिसतें. मनस्वी पावसानें चोहींकडे पूर येऊन रस्ते बंद होऊन गेले. घोड्यांस व ढोरांस *वैरण मिळेना व त्यांना झाडपाल्यावर कसें तरी पोसावें लागलें. धान्याची धारण रुपयाला अर्धा शेर होऊन बसली. पावसाळा संपल्यावर ताप व महामारी यांच्या साऱ्या आल्या. आजूबाजूच्या दुष्काळपीडित लोकांची अमदा-

* दहा दिवस सारखा पाऊस झाल्यास वैरण होत नाहीं असा अनुभव आहे.

वादेंत एकच गर्दी झाली. मुसलमानांचीं प्रेतें नेण्यास माणसें मिळणें मुष्कील झालें; मग अंत्यविधि करण्याचें दूरच राहिलें. हिंदूंच्या प्रेतांच्या दहनविधीस लांकूडफांटा मिळेनासा झाला. प्रेतें साबरमतींत फेंकून देत व तेथें तीं जनावरांच्या भक्ष्यस्थानीं पडत. . . .

मुसलमानी ग्रंथांतील या दुष्काळाच्या हकीकतींत एक विलक्षण गोष्ट सांपडते. मारवाडी लोकांनीं कित्येक मुसलमानी स्त्रियांस आणिलें व त्यांच्या मस्तकावर जव जाळून व त्यांना गोमय चारून शुद्ध केलें व हिंदू बनविलें. पूर्वीं अवरंगजेबानें जोधपूर जिंकून घेतलें ते वेळीं जबरीनें लोकांस बाटविल्याबद्दल आपण सूड घेत आहों असें मारवाडी ह्मणत. याप्रमाणें पवित्र केलेल्या स्त्रिया मारवाडांत पुष्कळ पाठविल्या गेल्या. पूर्वींही एकदां गिझनीच्या महमदाच्या वेळीं ( १०२४ ) त्याच्या सैन्यापैकीं लोक अनहिलवाडच्या राजा भीमदेवानें पकडून त्यांस हिंदू बनविलें होतें. या वेळेस हिंदूंनीं सांपडलेल्या तुर्की, मोंगल व अफगाण अविवाहित स्त्रियांशीं खुशाल लग्नें लाविलीं. इतर स्त्रियांस उलटी व जुलाब देऊन त्यांनां वांटून घेतलें. " वाईट बायका वाईट माणसांच्या हवालीं केल्या, व उत्कृष्ट स्त्रिया उत्कृष्ट माणसांच्या वांट्यास आल्या; कुलस्त्रियांस सरदार लोकांनीं घेतलें व नीच बटकी तसल्याच लोकांच्या हातीं पडल्या." चांगल्या सभ्य लोकांच्या दाढ्यामिशांचें मुंडण करून सुंता न केलेल्यांस शेखावत रजपूत ज्ञातींत व सुंता केलेल्यांस वाढेले रजपुतांत घेतलें. वाढेल ह्मणजे सुंता केलेले असें ह्मणतात. हलक्या प्रतीच्या मुसलमानांस कोळी, खांट, मेर आणि बाबरिया या जातींमध्यें घेण्यांत आलें.*

या दुष्काळांत गरीब लोक रुपरुपयास मुलें विकीत. या सतियांशियोची

---

* तरीख-इ-सोरठ.

स्मृति लोकांच्या मनांत कायमची आहे. गुंजरातींत एक पोवाडा आहे तो नेहेमीं भाट लोक ह्मणत असतात.

१७४७ (संवत १८०३) चा दुष्काळही मोठा होता. याला 'तिलोत्तरा' अथवा तीनचा दुष्काळ ह्मणतात. या दुष्काळांत विशेष ह्मटलें ह्मणजे हें होय कीं पावसाचें एक टिपूसही पण दृष्टीस पडलें नाहीं. गरीब लोकांनीं रानांतील झाडांचीं मुळें व मेलेल्या जनावरांचें मांस खाऊन उदरनिर्वाह केला. पाण्याच्या टंचाईपुढें धान्याची महागाई कांहींच नाहीं असें झालें. लोक घरेंदारें सोडून गेल्यामुळें कित्येक खेडीं ओस पडलीं, तीं पुढें १७६० पर्यंत चांगल्या स्थितींत आलीं नाहींत. गुजराते पेक्षां दुष्काळ सौराष्ट्रांत अंमळ कमी भासला. पेंवांतील ज्वारी सौराष्ट्रांतील लोकांस बरीच उपयोगास आली.

१७५१ व १७५९ या वर्षांच्या दरम्यान व १७६४ आणि १७७४ मध्येंही प्रांतांत धान्याची टंचाई थोडीबहुत होतीच. पुढें १७८० त व पुनः १७८५ त महागाई व पीकपाण्याची पुष्कळ तूट पडली. १७९० चा दुष्काळ मात्र प्रखर होता खरा. हा संवत् १८४७ त पडल्यामुळें याला 'सुडताळो' ह्मणतात—(सुडताळी=४७). तरीख-इ-सोरठ ग्रंथांत या दुष्काळाचें वर्णन आहे. "भाकरीच्या तुकड्यासाठीं कित्येक हिंदू मुसलमान झाले व मुसलमान हिंदूही पण बनले. आरब वगैरे दंगेखोर लोकांनीं मनस्वी दंगाधोपा केला. धान्याची अत्यंत महर्गता होती व वैरण केशराच्या भावानें विके. लहान मुलांचा विक्रय होऊं लागला व केव्हां केव्हां तर मुलांना टाकून लोक पळून जात. सौराष्ट्रांत इतर भागांपेक्षां नवानगर येथें दुष्काळाचें स्वरूप अंमळ कमी उग्र होतें." १८०४ मधील महर्गता इतकी नांव घेण्याजोगी नव्हती.

---

* संवत सत्तर सत्यांशीए सृष्टि तजावी सत्य
अकळाव्या अठ्यांसीए विधविध पाडी विपत्य ॥

नंतर इ. स. १८११ त दुष्काळानें जो अनामा केला तो १८१५ त सर्व मुलूख उजाड करून मग त्यानें हात आटोपला. १८११ त सौराष्ट्रांत पावसाच्या कमतरतेमुळें धान्याची चणचण होती व मारवाडांतील दुष्काळामुळें ती फारच वाढली. लोकांच्या झुंडींच्या झुंडी मारवाडांतून सौराष्ट्रांत शिरल्या व त्यामुळें धान्याचा भाव चढून रोगाची साथ पसरली. प्रांतांतील गुन्ह्यांची संख्याही मनस्वी वाढली. १८१२ त दुष्काळ कच्छमध्यें आला. काठेवाडांत पाऊस पडला नाहीं व झालावाडांत टोळ पडले. धान्य महाग झालें व लोकांचे हाल होऊं लागले. १८१३ त दुष्काळाचें स्वरूप वाढतच गेलें. १८१४ त पावसानें प्रळय करून सोडला व पिकाची नासाडी करून सर्व देश धुवून टाकिला. या सर्व हालअपेष्टेचा कळसच जणु १८१५ त सौराष्ट्रांत व गुजरातेंत उंदीर व घुशी मनस्वी माजल्या. अशीं एकामागून एक अरिष्टें आल्यामुळें प्रांत उध्वस्त होऊन शेंकडो गांवेंच्या गांवें ओस पडलीं. मोर्वीच्या मुलखांत ६० पैकीं ४५ गांवें नाहींशीं झालीं व नवानगर परगण्यांत सुमारें १०० गांवें पार नाहींशी होऊन दुसऱ्या दोन तीनशें गांवांस असा धक्का पोंचला कीं अद्यापही त्यांनीं आपलीं डोकीं वर कादिलीं नाहींत. उंदीरघुशींच्या साथीच्या कारणाविषयीं जरी नक्की कांहीं अंदाज करतां येत नाहीं तथापि पाण्याची टंचाई, हवेची उष्णता, वगैरे स्थितींत अशा प्राण्यांची उत्पत्तीच अधिक होत असावी असें दिसतें. टोळ गुजरातेपेक्षां सौराष्ट्रांत कमी होते तथापि झालावाडांत व गोहिलवाडांत त्यांनीं कहर उडवून दिला. दुष्काळानंतर आजारानें आपला अंमल सुरू केला. १८१३ च्या दुष्काळांत गरीब लोक मुलांस विकून टाकीत व फेंकून देत, इतकेंच नव्हे तर कित्येक अर्भकें क्षुधाविष्ट लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडत असत. संस्थानिक व श्रीमान व्यापारी यांनीं मनस्वी पैसा खर्च करून लोकांचे क्लेश हलके करण्याची व त्यांचे प्राण वांचविण्याची पराकाष्ठा केली, तथापि हजारों मनुष्यें व गुरेंढोरें

सर्वभक्षक काळाच्या नित्यविस्तृत जबड्यांत जाऊन पडलीं. १८१४ ( संवत् १८६९ ) सालीं दुष्काळ अतोनात आल्यामुळें याला 'अगणोत्तरो' ह्मणतात. या दुष्काळाची स्मृति लोकांच्या मनावर अद्याप इतकी दृढ आहे कीं आणभाक घेण्यांत 'अगणोत्तरिओ' फार वापरतात. 'मी खोटें बोलत असेन तर ६९ चा दुष्काळ मला बाधो' असें अजूनही ऐकूं येतें. संवत ७० सालीं ह्मणजे दुष्काळाचें स्वरूप कमी विक्राळ होतें असें नाहीं. १८१५ ( संवत १८७० ) साल ओल्या दुष्काळाचें होतें व अति वृष्टीनें व नंतर रोगाच्या साथीनें लोक अगदी हैराण होऊन गेले. हा सतत पांच वर्षें प्रांतांत जो कहर उसळून राहिला होता त्या सर्वांचें कारण भाविक लोक १८१२ च्या शेंडेनक्षत्राच्या माथीं मारतात.

इ. स. १८२० त अतिवृष्टीमुळें धान्य महाग झालें व रोगराईमुळें मृत्यूची संख्याही वाढली, परंतु केवळ दुष्काळच पडला नव्हता. १८२५ त थोडी महर्गता व १८२६ त झालावाडांत टोळ व १८३४ त हीं दोन अरिष्टें आलीं होतीं. १८३८ तील पावसाच्या अभावामुळें झालेलीं दुःखें कमी करण्यासाठीं नवानगरच्या जामरणमलजीनें कोठा व लाखोटा या नांवाच्या दोन इमारती व एक तळें बांधिलें व लोकांचा दुवा घेतला. इतर संस्थानिकांनींही लोकांसाठीं पुष्कळ मेहेनत घेतली. १८४६–५७–६१ व ६४ या सालीं महर्गता होती परंतु लोकांस ह्मणण्यासारखा त्रास पोंचला नाहीं. १८६९ त भयंकर टोळधाड आल्यामुळें बरसातीचीं पिकें अजीबात नाहींशीं झालीं; तथापि हिंवाळ्यांतील पिकें उत्तम आल्यामुळें फारसें नुकसान भासलें नाहीं.

नरमांसभक्षण व उंदीरघुशी खेरीज करून इतर सर्व गोष्टींची १८७७ च्या दुष्काळांत समृद्धि होती. या भयंकर दुष्काळाचा उपक्रम १८७५ तच झाला, व या वर्षीं सप्टंबर महिन्यांतच राजकोटांतील विहिरी कोरड्या पडल्या, व धान्याच्या महर्गतेचीं चिन्हें दिसूं लागलीं. पुढील

वर्षींही पावसानें दगा दिला व जमिनीचा वसूल थकला. पुढें १८७७ सालीं सौराष्ट्रांत कोठेंही जून, जुलै व आगष्ट महिन्यांत बिलकुल पाऊस पडला नाहीं. सप्टेंबर महिन्यांत बरेच ठिकाणीं पाऊस झाला तथापि बरसातीचीं ज्वारी व बाजरीचीं पिकें सपशेल बुडाल्यामुळें गरीब लोकांचा मुख्य आधार तुटला. कापसाचें उत्पन्न अगदींच झालें नाहीं. हिंवाळ्यांतील पिकेंही अगदींच सुमार उतरलीं व तशांत उत्तरेकडे पांखरांची धाड पडली व गव्हांस तांबेरा आला. अशा प्रकारें लोकांची सर्वतोपरी त्रेधा उडाली होती तरी ते कसाबसा धीर धरून होते. या वर्षीं गुरांचे फारसे हाल न होतां कित्येक ठिकाणीं तर गुरें पुष्ट झालीं. परंतु १८७८ च्या अतिवृष्टीनें दक्षिणेकडील सर्व पिकें वाहून गेलीं, व जीं थोडींबहुत उरलीं होतीं त्यांवर टोळांची धाड पडली. हे टोळ पांच रंगांचे होते—तांबडे, पिंवळे, गुलाबी, उदी व हिरवे. या वर्षींच्या जबर पावसामुळें जरी हे टोळ नाश पावले तरी त्यांच्या अंड्यांपासून दुसरे टोळ उत्पन्न होऊन त्यांनीं हिंवाळ्याच्या पिकांची नासाडी करून टाकिली. दुष्काळाचा परिणाम श्रीमंत लोकांवर भरपूर झाला नाहीं हें सहन न होऊनच जणु अतिवृष्टीच्या पाठोपाठ तापाची भयंकर साथ आली व तिनें गरीबांस व श्रीमंतांस सारखेंच जमीनदोस्त केलें. प्रांतांतील कामधंदे अजीबात बंद पडले. सशक्त लोकांस अशक्त लोकांना एकटें सोडून जाववेना, व अशक्त लोकांस काम करवेना अशी स्थिति झाली. पुढें पाळें, मुळें व पानें खाण्याची वेळ आली व तशांत प्रांतांत सर्वत्र मरकी शिरली. मुलेंच नव्हे पण लोक बायकाही विकूं व सोडून देऊं लागले. जेथें कांहींच इलाज चालला नाहीं तेथें उपासमारीनें लोकांनीं पटापट प्राण सोडिले. अशी प्रांताची सर्वतोपरी दैना होऊन गेली. या प्रकारें प्रत्येक वर्ष मागील सालास चांगलें ह्मणवी अशा तऱ्हेनें दुष्काळानें आपलें अक्राळविक्राळ स्वरूप सतत पांच वर्षें प्रांतांत सर्वत्र दाखविलें.

दुःखांत सुख येवढेंच कीं घेर व भाल मुलखांत हमेश पाणी भरून रहावयाचें परंतु पावसाच्या टंचाईमुळें तेथें चांगलें पीक आलें. श्रावक, स्वामीनारायण, महाजन, व इतर धर्मसंस्थांनीं आपलें औदार्य चांगल्या प्रकारें व्यक्त करून मनुष्यांचे व जनावरांचे पुष्कळ जीव बचाविले. लहान लहान जमीनदारांनीं सुद्धां आपआपल्या लोकांची होईल तितकी व्यवस्था करण्याची स्तुत्य खटपट केली. समुद्रकिनाऱ्यावरील गांवांतील लोकांचे प्राण समुद्रांतील माशांमुळें चांगलेच बचावले.

५

इ. स. १८४२ पर्यंत इंग्रजी पद्धतीवर शिक्षण देण्याची सोय या प्रांतीं विलकुल नव्हती. म्यालेटसाहेब पोलिटिकल एजंट असतां

---

* इ. स. १८९९ सालीं सुरू झालेला दुष्काळ अद्याप संपला नाहीं. संवत १९५६ (१८९९) पावसानें मुळींच दगा दिला व संवत १९५७ सालीं एकदांच कायतो पाऊस पडला परंतु पिकें मुळींच आलीं नाहींत. गेल्या वर्षींचाही पावसाळा अगदीं वाईट गेला व पूर्वींच्या दोन वर्षांच्या दुष्काळानें लोक अगदींच हैराण होऊन गेले असल्यामुळें त्यांच्यांत विलकुल त्राण राहिलेलें नाहीं; तेव्हां यंदाचे दिवस कठीण जातील हें उघड आहे. या दुष्काळची सविस्तर हकीकत यंदाचे हाल संपून चांगले दिवस आल्यावर लिहिली पाहिजे. सध्यां इतकेंच सांगणें पुरे आहे कीं पूर्वींच्या सर्व दुष्काळांपेक्षां या दुष्काळाचें स्वरूप अत्यंत भयंकर आहे. सरकारच्या आंकड्यांवरूनच मुळीं गेल्या वर्षीं पांच लाख लोक मेले. दुष्काळच्या खर्चामुळें सौराष्ट्रांतील बहुतेक संस्थानिक कर्जबाजारी होऊन बसले आहेत. कर्जाच्या पेंचांतून निभावले असे संस्थानिक फारच थोडे आहेत. समाधानाची गोष्ट येवढीच कीं बहुतेक संस्थानिकांनीं पैसे खर्चून व परिश्रम करून पुष्कळ लोकांचे प्राण वांचविले. लोकांनींही वर्गण्या करून आपल्यापरी पुष्कळ मेहेनत केली. राजकोटचे प्रसिद्ध गृहस्थ रा. रा. **सीताराम नारायण पंडित** यांनीं एका **स्वतंत्र अनाथगृहाचा** खर्च सुमारें पंधरावीस हजार रुपये एकट्यांनीं केला इतकेंच नव्हे तर आपले इतर व्यवसाय बाजूस ठेऊन ते आपला अमोलिक वेळ मोठ्या कळकळीनें या परोपकाराच्या कामीं खर्चीत असत.

नवानगर, जुनागढ, ध्रांगध्रा वगैरे संस्थानिकांनीं वर्गणी देण्याचें कबूल केलें व इंग्रज व गाईकवाड सरकारां कडूनही वर्गणी येणार होती. बालहत्या फंडाचे सुमारें १,००,००० रु. ही सरकारनें शिक्षणाच्या कामीं देण्याचें कबूल केलें. हा सर्व जम जमण्यास बराच वेळ लागला. प्रथम सरकारचा विचार मुंबई इलाख्याच्या एज्युकेशन बोर्डावरच सर्व व्यवस्था सोंपविण्याचा होता. परंतु सौराष्ट्राची आपणास चांगली माहिती नसल्यामुळें आपल्या हातून येवढें जोखमीचें काम निभावणार नाहीं असें बोर्डानें सांगितलें; व असेंही सुचविलें कीं शिक्षणा संबंधीं सर्व काम एका स्थानिक कमेटीकडे सोंपवून स्थानिक अधिकाऱ्यांनीं या कामीं विशेष मेहनत घ्यावी. याप्रमाणें इ. स. १८५२ त एज्युकेशन बोर्डानें गोष्ट आंगाबाहेर टाकिल्यावर शिक्षणाचें काम मागेंच पडावयाचें, परंतु या वेळेस कर्नल ल्यांग सारखा हुषार व उद्योगी पोलिटिकल एजंट असल्यामुळें त्यानें नेट धरून, निरनिराळ्या संस्थानिकांकडून वर्गणी जमा करून कामास झपाट्यानें सुरुवात केली. पूर्वीं कमेटींत पोलिटिकल एजंट व त्याचे चार असिस्टंट हेच फक्त होते, तें आतां पोलिटिकल एजंट, पहिला असिस्टंट व तीनचार संस्थानांतील हुषार मुखत्यार यांची कमेटी केली. याप्रमाणें १८५३ त राजकोटास शाळा स्थापन होऊन तेथील हेडमास्तरानेंच प्रांतांतील इतर शाळांवर देखरेख करावी असें ठरलें. शिक्षणखात्याचें वर्षाचें उत्पन्न सुमारें २०००० रुपये होतें. इ. स. १८६५ त राजकोटच्या हेडमास्तरावरील प्रांतांतील शाळा तपासण्याचा बोजा काढून त्या कामासाठीं एका स्वतंत्र इन्स्पेक्टरची नेमणूक झाली. संस्थानिकांच्या मनांत शाळांमध्यें मुलींच फी असूं नये असें होतें. परंतु पोलिटिकल एजंटास ती गोष्ट पसंत पडली नाहीं. नवीन व्यवस्थेप्रमाणें १८६५ पासून १८८२ पर्यंत शिक्षणखात्याची चांगलीच भरभराट झाली. इ. स. १८६५ त ७१ शाळा होत्या त्या १८८२ त ६३० झाल्या व विद्यार्थी ४१८९ चे ठिकाणीं

३६८४८ झाले. शिक्षणाबद्दल पूर्वीं २०००० रुपये खर्च होत असे परंतु आतां तो खर्च २,१९,४९० पर्यंत वाढला. त्या प्रमाणानें इन्स्पेक्टरासही चार मदतनीस दिले. चांगले गुजराती शिक्षक मिळण्याची अडचण पडूं लागल्यामुळें राजकोट येथें, १८७२ त एक ट्रेनिंग कॉलेजाची स्थापना केली. पुढें हळुहळु राजकोट, भावनगर, जुनागढ, नवानगर येथें हायस्कुलासाठीं सुंदर इमारती होऊन शिक्षणाचें काम भरभराटीस आलें. काठेवाड हायस्कूल ह्मणजे राजकोट येथील शाळा हिचा माट्रिक्युलेशन परिक्षेंत पूर्वीं पासून बराच वर नंबर लागत असे परंतु सध्यां शाळेची स्थिति असावी तशी नाहीं. हल्लीं सौराष्ट्रांत दोन आर्ट्स कालेजें आहेत, १० हायस्कुलें आहेत व ४६ आंग्लो व्हॅर्नाक्युलर स्कुलें आहेत. याशिवाय सर्व प्रांतांत मिळून गुजराती शाळा ८२० वर आहेत. सर्व हायस्कुलांत एकंदर विद्यार्थी जवळ जवळ ३००० आहेत. आंग्लो व्हॅर्नाक्युलर स्कुलांत ३७०० आहेत व गुजराती शाळांत ५५००० आहेत. मुलींच्या शिक्षणाचीही हळुहळु व्यवस्था होऊं लागली व सध्यां राजकोटास एक मुलींसाठीं ट्रेनिंग कॉलेज आहे, व प्रांतांत ९२ मुलींच्या शाळा आहेत व त्यांत ९०० मुलींना शिक्षण मिळतें. कर्नल कीटिंज पोलिटिकल एजंट हे फार उद्योगी गृहस्थ होते व यांच्या कारकीर्दींत राजकोटास राजकुमार कॉलेज स्थापन करण्याचें ठरलें. शिक्षणाचा खरा प्रसार सौराष्ट्रांतील संस्थानिकांमध्यें शिक्षण चांगलें मुरल्याशिवाय होणें नाहीं हें जाणून कीटिंज साहेबांनीं राजकुमार कॉलेजाची कल्पना काढिली व पुढें लवकरच ह्मणजे १८६८ त कर्नल अँडरसन यांनीं या कॉलेजाच्या पायाचा दगड बसविला, व १८७० च्या डिसेंबर महिन्यांत मुंबईचे गव्हरनर सर सीमोर फिटजराल्ड यांनीं कॉलेजाच्या सुरुवातीचा समारंभ केला. सुरुवातीस फक्त पांचच विद्यार्थी होते. परंतु चेस्टर म्याकनाटन सारख्या दीर्घोद्योगी, निश्चयी व प्रेमळ पुरुषाची प्रिन्सिपालचे जाग्यावर नेमणूक झाल्यामुळें कॉलेजची भरभराट होत गेली. हल्लीं सौरा-

ष्ट्रांत व गुजरातेंत गादीवर असलेल्या संस्थानिकांपैकीं बरेच या कॉलेजचे जुने विद्यार्थी *आहेत. गिराशियांच्या मुलांसाठीं तालुकदारी गिराशिया स्कूल ह्मणून वढवाणास एक शाळा १८८० सालीं स्थापन झाली. राजकुमार कॉलेज व वढवाण गिराशिया स्कूल या दोनही ठिकाणीं विद्यार्थी कॉलेजांतच रहातात व सर्वस्वी प्रिन्सिपालच्याच ताब्यांत असतात. हल्लीं दोन वर्षांपूर्वी गोंडळच्या ठाकुरानें आपल्या गांवीं गिराशिया कॉलेज काढिलें आहे. तेथें नवीन पद्धतीची व्यवस्था फार चांगली असून रहाण्याची सोय निराळ्या प्रकारची आहे. या शाळेंत मांसभक्षणाची मना आहे. सर्व मुलांनीं एकत्र निजलें पाहिजे. निजण्याच्या मोठ्या खोलींत प्रत्येकीं एक पलंग घालून एका मास्तराच्या देखरेखीखालीं सर्वत्रानीं असावयाचें. येथें शिकण्याची व्यवस्था विशेष चांगली असून शास्त्रीय शिक्षणावर विशेष मेहनत घेतली जाते. गोंडळच्या नदीस बांध घालून पाणी अडविलें आहे. व कांठावर एक सुंदर शोभिवंत पांढऱ्या दगडाची इमारत कॉलेजसाठीं बांधून दिली आहे. गोंडळ येथें हायस्कूल नसल्यामुळें या कॉलेजासच म्याट्रिक्युलेशनचा एक वर्ग जोडून दिला आहे.

६

सुधारलेली न्यायपद्धति इंग्रज येण्यापूर्वी सौराष्ट्रांत नव्हती हें सांगणें नकोच. एकानें दुसऱ्यास दुखापत केल्यास तो त्याचा संधि पाहून सूड घेई. एखादा दरोडेखोर कोणत्याही संस्थानिकाच्या पाठीं पडला ह्मणजे त्याला हमेश आश्रय मिळे. यामुळें रजपूत व गिराशिया लोकांमध्यें 'बहारवटिआ' अथवा कायद्याचें बंधन झुगारून देऊन लुटालूट करणाऱ्या लोकांचा वर्ग वाढला. 'बहार' ह्मणजे बाहेर व 'वाट' ह्मणजे रस्ता यावरून बहारवटिआ शब्द निघालेला आहे व त्याचा अर्थ रस्ता सोडून नि-

* कॉलेजच्या व्यवस्थेसंबंधी टीका करण्याचें हें स्थळ नव्हे; नाहीं तर इतका पैसा खर्च करून राजे लोकां साठीं काढिलेली संस्था चालविण्याच्या प्रकारा संबंधीं बरेंच लिहितां येण्या जोगें आहे.

घालेला मनुष्य असा आहे. प्रांतांत बंदोबस्त नसल्यामुळें या बहारवटिआ लोकांस पुष्कळच फावे, व त्यांचें जेथें ठाणें असेल त्याच्या आसपासच्या लोकांस त्यांचा फारच उपद्रव होई.

राजे लोकांचीं न्यायाचीं कोर्टें नसल्यामुळें, व लोकांस योग्य इनसाफ न मिळाल्यामुळें देण्याघेण्याचा वसूल करण्याचे अनेक प्रकार प्रचारांत आले होते. कर्जदाराच्या घरीं जाऊन धरणें घ्यावयाची चाल सर्वत्र होती. कांहीं लोक कर्जाची उजागरी करण्याकरितां **त्रागा** करून स्वतःस दुखापत करून घेत. केव्हां केव्हां **झांसा** करण्याचीही चाल असे. कोणी जर एखाद्याची इस्टेट लाटून बसला असेल तर त्याच्या घरास एक कागद चिकटवीत व त्यांत लिहिलेलें असे कीं अमुक मुदतींत जर इस्टेट परत केली नाहीं तर घरास आग लावली जाईल. यालाच **झांसा** ह्मणत. **अग्निपरीक्षे**चाही ( ordeals ) प्रचार नव्हता असें नाहीं. कोणच्याही प्रकारानें पद्धतवार कायद्याचीं बंधनें नसल्यामुळें शपथाही घेण्याच्या चाली होत्या. त्यांपैकीं तापलेल्या तेलाच्या कढईतून जिन्नस काढून देऊन आपणास दोषमुक्त करून घेण्याची 'कडकडीत' चाल पुष्कळ प्रचलित होती. तद्वतच महादेवाच्या पिंडीवरील निर्माल्य हातीं घेऊन शपथ घेण्याची 'थंडी' चालही होती. या सर्व रीती हिंदुस्थानांत, कदाचित् पृथ्वीवर चोहींकडे, केव्हांना केव्हांतरी प्रचारांत होत्याच, परंतु आश्चर्य इतकेंच कीं सौराष्ट्रांत त्या परवांपर्यंत होत्या व अजूनही कोठें कोठें सांपडतील.

न्यायपद्धति अशा स्थितींत असतां खेडेगांवांतील पोलीसपाटला शिवाय इतर पोलीस नव्हतें हें निराळें सांगणें नकोच. प्रवासाच्या वेळीं लोकांस आपले प्राण व चीजवस्त संभाळणें मोठ्या मुष्किलीचें होई. किनाऱ्यावर वाघेर लोकांचा सुळसुळाट मनस्वी असे. प्रांतांत चोऱ्या वगैरे झाल्यास दाद लागत नसे व राजाकडे वरदी पोंचलीच तर वर लिहिलेल्या मार्गांनीं चवकशी होत असे. तुरुंग तर मुळींच नव्हते, परंतु राजवाड्यांतील ए-

खाचा घाणेरड्या भुयारांत कैद्यांना टाकून देत. त्यांच्या पायांत दिवसां फक्त मोठमोठ्या सांखळ्याच असत, परंतु रात्रीं खोडेही घालीत. इ. स. १८२० त इंग्रज सरकारनें जेव्हां " सौराष्ट्रांतील व्यवस्था आपल्या हातीं घेतली तेव्हां प्रांताची स्थिति याप्रमाणें होती. पूर्वीं कोणत्याही प्रकारच्या वादाच्या बाबीसंबंधीं संस्थानांत हात घालण्याचा अधिकार गाईकवाड-सरकारास असे, तोच अधिकार पुढें इंग्रजांकडे आला; तेव्हां त्यांनीं १८३१ त दुबळ्या संस्थानिकांच्या मुलखांत झालेल्या खुनांची चवकशी करण्यासाठीं व संस्थानिकांनीं एकमेकांस उपद्रव दिल्यास त्याचाही निवाडा करण्यासाठीं एक फौजदारी कोर्ट स्थापिलें. या कोर्टाचे अध्यक्ष पोलिटिकल एजंट असून तीन चार संस्थानिक मेंबर असत. कितीही वाईट अपराध असला तरी अपराध्यास अगदींच थोडी शिक्षा करण्याकडे संस्थानिकांची प्रवृत्ति असल्यानें पुष्कळ बहारवटियांसही नांवाची मात्र शिक्षा होऊन ते सुटून जात. बहारवटियांच्या गुन्ह्यांस कांहीं ताळतंत्र असत नसे. खून करणें, गांवांचीं गांवें जाळून टाकणें, माणसांचे नाक कान कापून त्यांस विद्रूप करणें, मालमत्तेचें विनाकारण नुकसान करणें वगैरे गोष्टींचें त्यांना कांहींच वाटत नसे. असल्या बेहुकमी व दुष्ट लोकांचें पारिपत्य करण्याचे वेळीं त्यांच्या वडिलोपार्जित इस्टेटीस धक्का पोंचूं नये अशी राजे लोकांची नेहेमीं शिफारस असे व त्यामुळें या लोकांना चांगली दहशत बसत नसे. अशा अडचणी असतांनाही इंग्रजी झाल्यापासून प्रांताची व्यवस्था फारच सुधारली हें प्रांजलपणें नमूद केलें पाहिजे.

इ. स. १८६३ त कर्नल कीटिंज यांच्या पोलिटिकल एजंटींत सर्वत्र सुधारणा होऊन संस्थानिकांचे वर्ग झाले व त्यांचे दिवाणी व फौजदारी हक्क मुकरर ठरले वगैरे हकीकत दहाव्या भागांत येऊन गेलीच आहे. शिवाय प्रांताचे मुख्य चार विभाग होऊन प्रत्येकीं एक गोऱ्या प्रांतआफि-

सराच्या नेमणुकीसंबंधीं माहिती पहिल्या भागांत आहे. पोलिटिकल असिस्टंटाच्या हातीं दिवाणी कामांत डिस्ट्रिक्ट जज्जाची व फौजदारी कामांत जिल्ह्यांतील डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटची सत्ता असते. यावर अपील पोलिटिकल एजंटकडे असतें व त्याच्या हाताखालील ज्युडिशिअल असिस्टंट नांवाचा कामगार त्याच्या नांवानें चवकशी करून हुकूम सोडितो.

राजकीय कज्जे, ह्मणजे संस्थानिकांच्या जमिनीसंबंधीं, अधिकाराच्या हद्दीसंबंधीं व कुटुंबांतील कज्जांसंबंधीं सर्व खटले, प्रथम असिस्टंट पोलिटिकल एजंटकडे जातात व तेथून पोलिटिकल एजंटकडे, मुंबईसरकाराकडे व सेक्रेटरी आव्ह् स्टेटकडे अनुक्रमें अपिलें होतात. राजकीय कज्जांत फी घेत नाहींत. असल्या कज्जांचा निकाल लावतांना कायद्याचीं सामान्य तत्वें स्थूल मानानें पाळलीं जातात, परंतु कायद्याच्या पद्धतीचे पाचपेचाची फारशी पर्वा राखीत नाहींत. पोलिटिकल आफिसर कायद्याच्या पद्धतवार नियमांवरून अचुक उडी मारतात खरे, परंतु नेहेमींच्या प्रचारांत दिसून येत असलेली कायद्याची दिवसगत होऊं देत नाहींत असें मात्र नाहीं. कित्येक कज्जे वर्षेंन्यावर्षें सरकारी आफिसांतील कपाटांत कुजत पडलेले असतात. सेक्रेटरी आव्ह् स्टेटकडून अखेरचा निकाल आल्यावर सुद्धां निवळ अंमल बजावणीस केव्हां केव्हां कित्येक वर्षें लागतात, त्यांतून पोलिटिकल एजंटाच्या निकालाविरुद्ध स्टेट सेक्रेटरीचा निकाल असल्यास आनंदच !

पोलिटिकल असिस्टंटाच्या हाताखालीं एक नेटिव डेप्युटी असिस्टंट असतो व त्याच्याकडे कांहीं अधिकार सोंपविलेले असतात. याचें ठाणें प्रांताच्या मुख्य ठिकाणींच असतें. शिवाय सर्वत्र पसरून राहिलेल्या अगदींच लहान लहान तालुकदारांच्या लहान कज्जांचा निकाल लावण्यास व बंदोबस्त करण्यासाठीं निराळीं ठाणीं करून तेथें ठाणदार नांवाचा एक कामगार नेमिलेला असतो. जिल्ह्यांतील साधारण मामलेदाराच्या दर्ज्याचा हा अंमलदार असतो.

राजस्थानिक कोर्टाविषयीं उल्लेख पूर्वीं दहाव्या भागांत आलेलाच आहे. हें कोर्ट आतां काम न उरल्यामुळें १८९९ साली बंद करण्यांत आलें. पोटसंस्थानिकांचे कज्जे ज्या त्या संस्थानिकांवर सोंपविले. निरनिराळ्या संस्थानिकांच्या राज्यांत आतां बराच योग्य न्याय होत असतो. संस्थानिकांचे अधिकार वगैरेंबद्दल पूर्वीं लिहिलेंच आहे. हळूहळू सुधारणा होत चाललेली आहे ही आनंदाची गोष्ट होय.

सौराष्ट्रांत चोंहींकडे निरनिराळ्या संस्थानिकांचा अंमल असल्यामुळें प्रांतांत सर्वत्र एकच पोलीस असणें शक्य नाहीं. त्यामुळें चांगला बंदोबस्त राखणें फारच अवघड व जोखमीचें काम आहे. प्रत्येक संस्थानाचें निरनिराळें पोलीस आहे व एका संस्थानच्या हद्दींत गुन्हा करून अपराधी दुसऱ्या संस्थानच्या हद्दींत गेला ह्मणजे फार घोंटाळा पडतो. संस्थानिकांच्या हद्दीखेरीज करून एजन्सी, सिव्हिल स्टेशनें, व ठाणीं येथील बंदोबस्त ठेवण्यासाठीं एजन्सी पोलीस खातें आहे. पूर्वीं पोलिटिकल एजंटाच्या ताब्यांत ९३७ गाईकवाडी स्वार व १३६ प्यादे असत. परंतु गाईकवाडी स्वारांच्या हातून चांगलें काम होत नसे ह्मणून इ. स. १८८४ त गाईकवाडी कॉंटिंजेंटच्या बद्दल हल्लींचें एजन्सी पोलिस खातें स्थापिलें गेलें. पुढें १८९३ सालीं आलिव्हंट साहेब पोलिटिकल एजंट असतां प्रांतांतील रेलवे पोलीसही एजन्सी पोलिसांत सामील केलें. या फेरफारामुळें पोलिसखातें पुष्कळ सुधारून कित्येक बाबींतील विनाकारण होणारा खर्च वांचला. गाईकवाडी कॉंटिंजेंट खेरीज लोकलफंडाच्या खर्चानें ठाणा पोलीस असे तेंही एजन्सी पोलीसमध्यें सामील करण्यांत आलें. प्रांतआफिसराचे हाताखालीं 'व्हिलेज पोलीस' ह्मणजे खेडेगांवांतील पोलीस असतें. हें पोलीस पोलिटिकल असिस्टंटचे ताब्यांत ठेवण्याचें कारण बरोबर समजत नाहीं, परंतु एजन्सी पोलीस व हें एकत्र केल्यास फायदा होईलसें दिसतें.

एजन्सी पोलीसवर एक सुपरिंटेंडंट नांवाचा इंग्रज अंमलदार असतो, तो जिल्ह्यांतील सुपरिंटेंडंटच्या दर्ज्याचाच असतो. त्याच्या हाताखालील एकंदर प्रदेशाचें क्षेत्रफळ जरी एका जिल्ह्यापेक्षां अंमळ कमी असलें तरी पोलिस ठाणीं प्रांतांत सर्वत्र पसरलेलीं आहेत. सौराष्ट्र प्रांत साधारण ब्रिटिश जिल्ह्याच्या तिप्पट मोठा आहे व या प्रांतांत पोलिसाचें एक ठाणें ईशान्येच्या टोंकास तर दुसरें नैर्ऋत्येस असा प्रकार असल्यामुळें येथील सुपरिंटेंडंटाचें काम इलाख्यांतील इतर सुपरिंटेंडंटांच्या कामापेक्षां अधिक जोखमीचें आहे व ह्मणूनच येथें अनुभविक व हुषार माणसाची नेमणूक करणें जरूर असतें. प्रांत विस्तृत असून ठाणीं मुलूखभर पसरलेलीं आहेत येवढेंच नव्हे तर लहानमोठ्या संस्थानिकांशीं वरचेवर संबंध येत असल्यामुळें साधारण पत्रव्यवहार मनस्वी वाढतो. पांच सात मोठमोठीं संस्थानें खेरीज करून इतर संस्थानांत चांगल्या प्रकारचें पोलीस असणें कठीणच, यामुळें एजन्सी पोलिसांस मदत होणें तर लांबच परंतु कामांत व्यत्यय येण्याचा मात्र संभव फार. 'नांव सोनुबाई व हातीं कथलाचा वाळा' या ह्मणीप्रमाणें कित्येक संस्थानिकांची सत्ता मोठी असते परंतु उत्पन्न बेताबाताचेंच असल्यामुळें त्यांना हलक्या पगाराचे व बेवाकफ लोक मोठ्या जोखमीच्या कामावर ठेवावे लागतात व यामुळें बंदोबस्ताची पंचाईत पडावी हें साहजिकच आहे.

एजन्सी पोलिसांत सध्यां ८०० शिपाई व २०६ स्वार मिळून १००६ पोलिसची संख्या आहे. जिल्ह्यांतील पोलिसा इतकीच हुषारी व तितकेंच काम असतां शिपाई व अंमलदार यांचे पगार जिल्ह्यांतील पोलिसांच्या पगारांपेक्षां थोडे कमी आहेत. खात्याचा एकंदर वार्षिक खर्च सुमारें २०००० रुपये आहे.

७

सौराष्ट्राची, व विशेषेंकरून ह्यालार व काठेवाड परगण्यांची, हवा निरोगी होय. एप्रिल पासून जून पर्यंत उन्हाळ्याच्या वेळीं तर प्रांतांत बहु-

तकरून रोगराई नसतेच. बरसातींत तुरळक विकार असतो, पण आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत तापाचा आजार बराच असतो. नोव्हेंबर पासून मार्च पर्यंत थोडाबहुत ताफ असतोच व डिसेंबर व जानेवारी हे ऐन थंडीचे महिने अंमळ कठीण जातात. सौराष्ट्रांतील पाणी साधारणतः चांगलें व निरोगी आहे. कित्येक ठिकाणच्या पाण्यापासून मूतखड्याचा विकार केव्हां केव्हां उत्पन्न होतो असें ह्मणतात. कांहीं थोड्या ज्ञाती खेरीज करून लोक सामान्यतः गलिच्छ असतात.

या प्रांतांत यात्रेचीं इतकीं स्थानें असूनही साधारण मानानें पहातां महामारी वगैरे रोगांच्या साथी इकडे फारशा येत नाहींत व आल्या तरी फारशा फैलावत नाहींत. इ. स. १८११ व १२ च्या दुष्काळामुळें गुजरातेंत जो प्लेग सुरू झाला तो सुमारें दहा वर्षें प्रांतास त्रास देत होता. त्याचा १८१६ त सौराष्ट्रांत मोर्वी येथें प्रवेश झाला, व तेथून धोलेच्यास पोंचून तो आसपासच्या प्रदेशांत पसरला. लोक अत्यंत घाबरून गेले व असंख्य लोक मेले. नंतर प्लेगची स्वारी लिंबडीस येऊन पोंचली, व तेथें तर अनर्थच होऊन गेला, व दीड दोन हजार माणूस हां हां ह्मणतां मेल्यावर लोक जिकडे तिकडे सैरावैरा पळत सुटले, व त्या वर्षीं ( १८२० ) अतिवृष्टि झाल्यामुळें तर प्लेग आसपास फारच फैलावला. पूर्वी गेलेल्या दुष्काळामुळें प्लेगमधील मृत्यूची संख्या फारच वाढली. प्रांतांतील दलदलीच्या जागेंत हमेश तापाचा आजार असेच तो या वर्षीं मनस्वी वाढला. लोक तर पराकाष्ठेचे गलिच्छ, कित्येक लोक कपडे कुजून जाईपर्यंत बदलीतही नसत. मोठमोठ्या शहरांमध्यें अत्यंत गर्दी झाली असतां उंच उंच तटबंदीमुळें लोकांस पुरती हवाही मिळत नसे. हीं सर्व कारणें एकवटून त्यांनीं प्लेगला चांगलीच मदत केली तर प्लेग प्रांतांत फोंफावेल यांत नवल तें कोणतें? हें वर्ष संपतांच प्लेगनेंही आपला अवतार संपविला. या प्लेगचे दोन प्रकार असत; एक ताप व खोकला आणि दुसरा

प्रकार बदांचा. देशी किंवा विलायती औषधांचा कांहींच इलाज चालला नाहीं व लागलेले लोक बहुतेक सर्वच मेले. न्हावी वदें कापून कांहीं इलाज करीत परंतु सर्व व्यर्थ. गोऱ्या डाक्टरांवर लोकांचा बिलकुल विश्वास नव्हता.

सौराष्ट्रांतील मुख्य आजार ह्मटला ह्मणजे ताप होय. साधारण पाहिलें तर दिसून येईल कीं प्रांतांतील ताप पावसाच्या प्रमाणांत असतो. ज्या वर्षीं अधिक पांऊस त्या वर्षीं तापही पण अधिक असतो, व पावसानें दगा दिल्यास ताप त्रास देत नाहीं.

पूर्वीं स्वाभाविकपणें इंग्रजी औषधांवर लोकांची श्रद्धा बिलकुल नव्हती व इ. स. १८३६ त जेव्हां राजकोटास प्रथम दवाखाना आला त्या वेळीं तेथें जाणारे लोक फारच विरळा. पुढें १८६६ त भावनगर संस्थानांत इंग्रजी दवाखाना निघाला, व नंतर हळुहळु इतर संस्थानांत दवाखाने झाले. लोकांचीही श्रद्धा वाढत चालली व सध्यां सौराष्ट्रांत चोंहीकडे इंग्रजी दवाखाने दृष्टीस पडतात. देशी वैद्यकीचा धंदाही चालतो परंतु तो पूर्वींपेक्षां पुष्कळच आतां मंदावला आहे हें साहजिक आहे.

या ठिकाणींच राजकोटांतील एका अत्यंत उपयोगी संस्थेसंबंधीं माहिती देणें जरूर आहे. ती संस्था ह्मणजे देशी जिनसां मधून इंग्रजी औषधाच्या कृतीची प्रयोगशाला ही होय. या प्रकारची संस्था हिंदुस्थानांत दुसरी नाहीं असें ह्मणतात. ही प्रयोगशाळा येथें १८९८ च्या जुलै महिन्यांत स्थापन झाली व देशी वैद्यांना औषधें तयार करण्याची युरोपीय अथवा पाश्चात्य पद्धति दाखवून देण्याचा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. ठाणादेवळीचे तालुकदार आझम लक्ष्मण मेरामण यांनीं उदारपणें ३१००० रुपये दिल्यामुळें प्रयोगशाळा व त्या शाळेचे मुख्य साहेबांचा बंगला वगैरे इमारती बांधून झाल्या. या मोठ्या देणगीमुळें या प्रयोगशाळेस आझम लक्ष्मण मेरामण यांचें नांव दिलें आहे. प्रयोगशाळेचा चालू खर्च सौराष्ट्रांतील कांहीं "संस्थानिक" वर्गणीनें देतात. लंडन

येथील फार्मास्यूटिकल सोसायटी आव्ह ग्रेट ब्रिटन (Pharmaceutical Society of Great Britain) येथून 'डिप्लोमा' मिळविलेले एक गृहस्थ राजकोटच्या प्रयोगशाळेचें काम चालवीत असतात. त्यांच्या मदतीस एक मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत शिकलेले गृहस्थ व एक देशी वैद्य असे आहेत.

प्रयोगशाळेची इमारत बरीच विस्तृत आहे. विद्यार्थ्यांस सप्रयोग व्याख्यानें देण्यासाठीं एक चांगली निराळी मुद्दाम जागा केलेली आहे. नंतर मध्यें एक मोठा विस्तृत हॉल आहे त्यांत सभोंवार औषधें तयार करण्याची सामुग्री टेबलें मांडून त्यांवर ठेविलेली आहे. मध्यावरही एक लांबचीलांब टेबलांची रांग आहे. या टेबलांवर विद्यार्थी लोक प्रयोग करीत असतात. प्रत्येक विद्यार्थ्यास सुमारें ३–३॥ फूट लांबीची जागा असते व तेथें प्रत्येकास निरनिराळी प्रयोगाच्या सामुग्रीची तयारी ठेविलेली असते. प्रयोगशाळेच्या युरोपिअन डिरेक्टरासाठीं प्रयोग करण्यास एक निराळीच खोली आहे, व या गृहस्थांचें आफीसही स्वतंत्र आहे. या आफिसांतच सूक्ष्म वजनें करण्यासाठीं दोन सुंदर रासायनिक ताजवे ठेविलेले आहेत. प्रयोगशाळेच्या पश्चिमेस डिरेक्टरचा बंगला आहे. एकंदरींत संस्था चांगली उपयुक्त होण्यासारखी आहे. मात्र उपयोग करून घेणारा पाहिजे.

या संस्थेचे मुख्य उद्देश तीन आहेत:–(१) देशी वैद्यांस युरोपियन पद्धतीनें औषधें तयार करण्यास शिकविणें; (२) या देशांतील वनस्पतींचा उपयोग अत्यंत फायदेकारक रीतीनें कसा करून घ्यावा हें येथील वैद्यांस शिकविणें; व (३) औषधें तयार करण्याच्या देशी पद्धतीचा लक्षपूर्वक अभ्यास करणें.

प्रयोगशाळेंत विद्यार्थी दोन वर्षें शिकतो व दोन वर्षांत त्याचा साधारण अभ्यास पुरा होतो. दोन वर्षांतील अभ्यासाचा क्रम ह्मणजे खालीं लिहिलेल्या विषयांचें साधारण ज्ञान होय.

१ औषधें तयार करण्याचा सप्रयोग अभ्यास.

२ रसायनशास्त्राचा सप्रयोग अभ्यास.

३ रसायनशास्त्राचीं तत्वें.

४ औषधें तयार करण्याचीं तत्वें.

५ औषधींचे धर्म.

६ वनस्पतिशास्त्र.

प्रयोगशाळेंत शिकण्यासाठीं २२ विद्यार्थी घेतात व तेंवढ्यांसच जागा आहे. वैद्य लोकांसही या विषयांची थोडी थोडी रुचि लागूं लागली आहे असें दिसतें, ही फार संतोषाची गोष्ट आहे. या प्रयोगशाळेचा थोडेच वर्षांत कांहीं तरी लोकांस फायदा होईल तर इतका खर्च करून चालविलेल्या संस्थेचें चीज झालें असें ह्मणतां येईल. सध्यांचे डिरेक्टर मि. ली हे फार सज्जन गृहस्थ असून आपल्या विद्यार्थ्यांस फार आस्थापूर्वक शिकवितात व कोणीही गेल्यास प्रयोगशाळेंतील सर्व व्यवस्था समजाऊन सांगण्यास व कोणत्याही प्रकारें मदत करण्यास नेहेमीं तत्पर असतात. प्रयोगशाळेचें काम प्रथम इमारतीपासूनच यांच्या देखरेखीखालीं झालें असल्यामुळें अस्सल अर्वाचीन धाटणीवर झालें आहे. इमारतींत पाण्याची जाण्यायेण्याची व्यवस्था व 'ग्यास'ची व्यवस्था फार उत्तम असल्यामुळें फार चांगली सोय झाली आहे. ही संस्था राजकोटासच नव्हे तर अखिल सौराष्ट्रास भूषणभूत आहे. तद्वतच ती उपयोगी होवो हें परमेश्वरापाशीं मागणें आहे.

# भाग १२.

## लोक.

रजपूत–काठी–लुआणा व भाट्ये–श्रावक व मेश्री पाणी–भाट अथवा बारोट आणि चारण–वाघेर, संघार, मियाणा, व जत–नागर औदीच व श्रीमाळी ब्राह्मण–वैष्णव महाराज.

सौराष्ट्रांतील मूळच्या लोकां विषयीं फारशी माहिती मिळत नाहीं, तथापि कोळी व भील हे पूर्वीचे लोक असून त्यांस अहीर लोकांनीं हळुहळु ताब्यांत आणिलें असावें असें दिसतें. पुढें निरनिराळ्या जातींच्या रजपुतांच्या स्वाऱ्या झालेल्याची हकीकत पूर्वीं येऊन गेलेलीच आहे. पूर्वीं उल्लेख केलेल्या जातींमधून रजपुतांमध्यें असंख्य पोटभेद झाले आहेत हें देशाचारास अनुरूपच आहे. सौराष्ट्रांतील जमिनीचा बराच भाग रजपुतांच्या ताब्यांत आहे हें उघडच आहे, रजपुतांच्या मुख्य मुख्य जातींमध्यें पाहिलें तर जाडेजांची संख्या सर्वांत अधिक आहे. त्यानंतर झाला व गोहेल हे अनुक्रमें येतील.

पूर्वीं रजपुतांमधील मुख्य गुण ह्मटले ह्मणजे त्यांचें स्वाभाविक शूरत्व, अमर्याद शारीरिक सहनशक्ति व अत्यंत उतावीळपणा हे होत. रजपूत ह्मणजे शरीरानें मजबूत, घोड्यावर बसण्यांत व नेम मारण्यांत हुषार, मोठा तलवारबहादर, हरतऱ्हेचीं हत्यारें वापरण्यांत पटाईत, लढाईच्या कामांत पुरा वाकबगार, मोठा मानी, स्वदेशाचा व स्वकुलाचा अत्यंत अभिमानी व नखशिखांत मर्दानी बाण्यानें खचलेला असावयाचा. रजपुताचा बच्चा यत्किंचित्तही अपमान सहन करण्यापेक्षां मोठ्या आनंदानें मृत्यु पतकरी, अशीं शेंकडों उदाहरणें इतिहासांत सांपडतील. दिलेलें वचन पाळण्यासाठीं किंवा केलेली प्रतिज्ञा सिद्धीस नेण्यासाठीं असंख्य रजपुतांनीं समरांगणांत आपल्या अमोलिक प्राणांच्या आहुती दिलेल्या आहेत. रजपूत

स्त्रियाही अशाच सत्यव्रत वीरपत्नी व वीरमाता असत. आपले पती धारातीर्थीं पतन पावल्यावर एक क्षणाचाही विलंब न लावितां या अग्निसाक्ष सहगमन करीत हें सुप्रसिद्धच आहे.

अर्वाचीन इंग्रजी सुधारणेच्या व आधुनिक गोड शांततेच्या, दिसण्यांत सुंदर परंतु अत्यंत भयंकर, रगाड्याखालीं असले उदात्त व अमोलिक गुण चुरडून जावे हें साहजिकच आहे, परंतु आश्चर्य इतकेंच कीं चरकांत पडलेल्या वर निर्दिष्ट केलेल्या उत्कृष्ट गुणरूपी सुंदर बीजांपासून निराळ्या परंतु तितक्याच किंबहुना अधिक मनोहर गुणरसाची निष्पत्ति होण्याचें एकीकडेसच राहून कांहीं विलक्षणच प्रकार नजरेस येत आहे. हें लिहिणें इकडील रजपूतकुलोत्पन्न लोकांस अंमळ कडू लागेल खरें परंतु इतिहास लिहिणारास वस्तुस्थिति वर्णिल्या शिवाय सुटका नाहीं. असो. राजकार्यकुशल, तलवारबहादर, सत्यप्रिय, व प्रजारंजनदक्ष पूर्वजांच्या वंशांत जन्म घेतलेला असून हल्लींच्या संस्थानिकांत तितक्या तर राहूं द्या परंतु साधारण हल्लींच्या मनूस साजे अशा दर्ज्याचीही वर्तणूक सांपडणें विरळा. कांहीं अपवादा दाखल उदाहरणें कदाचित् सांपडतील. परंतु दयालु इंग्रज सरकारानें राज्यसुखाचा थोडा अनुभव घेण्याची सोय ठेविली असतांही पहावें तर इकडे एक संस्थानिक अत्यंत कर्जबाजारी झाल्यामुळें इंग्रजसरकार त्याच्याकडून राज्याची व्यवस्था काढून घेत आहे, तर दुसरीकडे प्रजेस उपद्रव देऊन दुसरा संस्थानिक आपली तिजोरी भरण्याच्या उद्योगास लागलेला दृष्टीस पडतो. एकीकडे औरस पुत्रास बाजूस ढकलून राखेच्या पोरास गादीवर बसविण्यासाठीं गरीब प्रजेपासून मिळविलेल्या लाखों रुपयांचा चुराडा करितांना एखादा संस्थानिक नजरेस येईल तर इकडे ज्या रजपूत स्त्रियांची सहनशीलते बद्दल व मर्यादे बद्दल सर्व दुनियेंत इतकी ख्याति त्यांच्या पवित्र वंशांत जन्मास येऊन राजघराण्यांतील कुमारिका आपले गृहकलह चव्हाट्यावर आणून वडिलांनीं ठरविलेले शरीरसंबंध न आवडल्यामुळें "मला हा

पति नको " अशा अनुचित कागाळ्या परकीय सरकारच्या कानावर घालण्यास स्वदस्तुरचीं पत्रें लिहून तोंडें वेंगाडतांना दिसतील, अशी स्थिति झाली आहे. यापरतें देशाचें दुर्दैव तें कोणतें ? ज्या रजपूतावतंसांनीं पूर्वकाळीं उत्तम प्रकारें धर्माचा सांभाळ केला व गोब्राह्मणप्रतिपाळासाठीं आपले प्राणही खर्ची घातले त्यांचेच कित्येक वंशज आज धर्माची आठवण शिमग्यांतील अचकट विचकट प्रकारापुरती, अथवा दसऱ्यास रेड्याचा प्राण घेण्यापुरती, अथवा मोठमोठ्या यात्रा भरून अनन्वित प्रकार करण्यापुरतीच करतांना दृष्टीस पडतील. असो.

सध्यांचा रजपूत सरदार ह्मणजे त्याच्या वेषावरून ओळखावयाचा. तलवार, कट्यार वगैरे त्याच्या पोषाखाचे भाग खरे परंतु त्यांचा उपयोग करण्याची वेळ कधींही येत नाहीं. बायकांमध्यें गोषाची चाल मोठ्या काळजीनें कायम राखिली आहे. सृष्टींतील चंद्रसूर्यांचा प्रकाशही मोठ्या मिनतवारीनेंच त्यांस मिळतो. त्यांचा नेहेमीं प्रसंग ह्मणजे नीच कुळंबिणींशीं व नीचतर खोजे लोकांशीं. अशा रीतीनें वेळ घालविण्याचें नशीबीं आल्यामुळें, व बेताबाताचें (मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल) शिक्षण असल्यानें वाचनाची रुचि असणें शक्य नसल्यामुळें या बिचाऱ्या अबलांचीं आयुष्यें गांवच्या रिकाम्या गोष्टी व चहाड्याचुगल्या करण्यांत जातात हें ठीकच आहे.*

---

* स्त्रियांस या वेळीं कितपत मान मिळत असेल यासंबंधीं रासमाळेंत एक गोष्ट आहे. 'एके वेळीं बादशाह्मनें एक अत्यंत निर्लज्ज, व एक अत्यंत मर्यादशील, तसेंच एक फार भेकड व एक अतिशय धीट अशीं चार मनुष्यें आपणापुढें आणण्याविषयीं बिरबलास आज्ञा केली. बिरबलानें अर्थात आज्ञा मान्य केली व तो लवकरच एका स्त्रीस घेऊन बादशाहापुढें आला. मी चार माणसें सांगितलीं असतां तूं एकट्या बायकोसच घेऊन आलास हें कसें असें बादशाहानें पुसतां बिरबल उत्तर देतोः—"महाराज, आपण सांगितलेल्या चारही जातीच्या लोकांचे गुण या एका व्यक्तींत एकवटलेले आहेत. ही आपल्या वडील दिराच्या देखत बुरखा

ओढील, परंतु लग्नाच्या मिरवणुकींत एखाद्या फाजील मनुष्यासही लाजवितील अशीं विचकट गाणीं ह्मणण्यासही मींगें सरणार नाहीं; रात्रीं नवऱ्यानें पाणी मागितल्यास हिला काळोखाची कोण भीति? तेंच आपल्या प्रियपात्रसख्यास भेटण्यासाठीं जावयाचें असल्यास त्याच काळोखांत, डोंगरदऱ्यांतही तिला मार्ग दिसूं लागतो." **मु**सलमानांच्या आगमना नंतरच स्त्रियांचा याप्रमाणें उपमर्द होऊं लागला हें सहज सिद्ध करून देतां येईल. त्या पूर्वीं स्त्रियांस किती बहुमानानें वागवीत हें **वि**शाखदत्ताच्या एका गीतीवरून दिसून येईल.

**गुणवत्युपायनिलये स्थितिहेतोः साधिके त्रिवर्गस्य ।**
**मद्भवननीतिविद्ये कार्याचार्ये * * * * ॥**

**मु**सलमानांचें चक्र देशावर आल्यानंतर वर लिहिल्या प्रमाणें सर्वांगसुंदर अशा स्त्रीरत्नाचें आस्ते आस्ते झनानखान्यांत स्त्रीयंत्र कसें बनलें हें स्पष्ट करून दाखविणें हें स्त्रियांचे हक्क प्रतिपादित करणाऱ्या आधुनिक सुधारकांचें काम होय.

इकडे स्त्रियांचा हा चंचल स्वभाव **सर वॉल्टर स्कॉट**नें किती सुंदर शब्दांनीं वर्णिला आहे पहा.

O Weman! in our hours of ease
Uncertain, coy, and hard to please,
And variable as the shade'
By the light quivering aspen made;
But when pain and anguish wring the brow
A ministering angel thou.

**[ सलज्ज स्त्रिये तूं सुखाच्या प्रसंगीं ।**
**तशी चंचला भीरुही अंतरंगीं ॥**
**तुझ्या रंजना कोण होती प्रयास ।**
**असे ठाउकें मात्र कामी जनास ॥ १ ॥**
**सदा हालतें पिप्पलीं पर्ण जैसें ।**
**मला वृत्ति तूझी गडे तेंवि भासे ॥**
**असे हे विलास स्त्रिये तूं करीशी ।**
**विनोदें सुखज्योतितें कंपवीशी ॥ २ ॥**

रजपूत लोक दिसण्यांत बहुशः देखणे असतात. नाक सरळ व शेवटीं आंकडीदार असतें. तरुण वयांत यांचे डोळे मोठे व पाणीदार दिसतात व तोंड लहान असतें. चेहेरा अंमळ लांब असतो. मिशा व कल्ले यांचा झोंक राखण्याची व उतारवयांत कलप करण्याची ह्यांनां फार हौस. ज्वानींत हे जरी सडपातळ, चपळ व तरतरीत असे दिसतात तरी धिप्पाड किंवा मजबूत बांध्याचे नव्हत. गेल्या शतकाच्या आरंभीं इंग्रजी अंमल झाल्यामुळें सर्वत्र शांतता झाली तेव्हांपासून संस्थानिकांस परचक्रांची वगैरे कांहींच भीति न राहिल्यानें हे रजपूत वीर मुख्यत्वेंकरून झनान्यांतच आयुष्य कंठूं लागले. परंतु अलीकडे फिरून फेरबदल होऊन कांहीं खेळण्यासाठीं व कांहीं साहेब लोकांच्या ओळखी करून घेण्यासाठीं ह्मणून तरी बहुतेक संस्थानिक-बाहेर पडतांना दृष्टीस पडतात. अलीकडील रजपुतांस ऐदी खुशालचेंडू ह्मटल्यास फारसा वस्तुस्थितिविपर्यास होईल असें वाटत नाहीं. पूर्वींप्रमाणें स्वसंरक्षणार्थ नेहेमीं तत्पर रहाण्याची सध्यां आवश्यकता न राहिल्यामुळें, व जीवनार्थ कलहाचा आधुनिक पेंच गळ्यांभोंवतीं अजून चांगलासा न बसल्यामुळें हल्लींचे रजपूत वीर आंगणांत बसून, सभोंवार गांवांतील आपले स्नेही व आश्रित गोळा करून उत्साहशून्य व संकल्पशून्य असे गांवच्या चकाट्या पिटीत आयुष्याचा व्यय करीत असतात. ते आल्यागेल्याचा परामर्ष चांगला घेतात परंतु बहुतेक वेळ ह्मणजे हुक्का अथवा अफीण पिण्यांत, फार तर गुराढोरांची तपासणी करण्यांत, मुलांचे रिकामे लाड करण्यांत, यात्रेच्या वगैरे मिषानें इकडे तिकडे भटकण्यांत असाच व्यर्थ जातो. कामाचा

---

मरी जैं नराचें मुख म्लान होतें ।
मनस्तापपीडा तया दुःख देते ॥
मनाच्या हराया उदासीनतेतें ।
तुझी गोड सेवाचि कामास येते ॥ ३ ॥ ]

व यांचा उभा दावा असल्यानें रजपूत इनामदार कितीही दरिद्री असला तरी त्याला कारभारी हा हवाच. एखादा चाणक्ष वाणी अथवा बुभुक्षित ब्राह्मण याचीच या कामीं बहुतेक योजना व्हावयाची, व हे गृहस्थ कामाची नीट व्यवस्था लावितात हें सांगणें नकोच. स्वतःच्या रिकामपणास धक्का न पोंचतां रजपूत इनामदाराच्या तर्फे जर एखाददुसरा कज्जा कोर्टांत चालू राहील तर त्याला त्याचा कंटाळा नसतो इतकेंच नव्हे तर असले कज्जे त्यांच्या इभ्रतीस जरूरच होत असें त्यास वाटतें. त्याच्या कारभारांत घोंटाळा हा असावयाचाच. मूळचा स्वभाव उदार व दिलदार असल्यामुळें या पुरुषास दुसऱ्याकडून आपलें येणें असेल त्याबद्दल जिकेरी करणें बिलकुल आवडत नाहीं. पहिल्यापासून खर्चिकपणाची संवय असल्यामुळें लग्नकार्यांत वगैरे सढळ हातानेंच यथास्थित पैसे उधळतात. घरांत मुलगे मोठे झाले कीं इस्टेटीच्या वांटणी संबंधीं तंटे सुरू झालेच ह्मणून समजावें, व बायकाही बऱ्याच असल्यामुळें भांडणें सदैव चाललेलींच असतात. कित्येक बायका असल्या तथापि एखादें तरी अंगवस्त्र याला असावें लागतें; ह्मणजे बायकांच्या अंगांत बरोबर रीतीनें भांडण्याची करामत नसेल तर ही बया माप पुरें भरण्यास नेहेमीं तत्परच असते. खेडे गांवांतील गिराशियांचा आयुष्यक्रम याप्रमाणेंच बहुशः असतो.*

---

*"शांततेच्या वेळीं सुखावलेला रजपूत ह्मणजे त्याचा आयुष्यक्रम सुस्त व कंटाळवाणा असतो. दिवस बराच वर आला ह्मणजे हा बिछान्यांतून बाहेर निघावयाचा व लागलीच हुक्क्याची तयारी. तमाखू नंतर आधुनिक चहा कापीचाही आस्वाद तो घेतो. हें सर्व आटपल्यावर त्याच्या प्रसाधनविधीस सुरवात होते, व नंतर परमेश्वराचीही आठवण करण्यास तो विसरत नाहीं. याप्रकारें सकाळ खर्ची पडते, तोंच भोजनाची वेळ होते. भोजना नंतर मित्रमंडळींत हुक्का फिरत असतो व गप्पासप्पाही पण चालतात. इतके सर्व व्यवहार संपतात तों दोन प्रहर होते व पुढील दोन तीन तास वामकुक्षींत जावयाचे. सुमारें तीन वाजण्याच्या सुमारास उठून,

रजपुतांत लग्नाचे दोन प्रकार आहेत. मुलगी जर फारच मोठ्या घराण्यांतील असेल तर तिच्याशीं लग्न लाविण्यासाठीं वर स्वतः जातो, नाहीं तर बहुशः तो आपली तलवार कुळंबिणी बरोबर नवरीकडे पाठवितो. या तलवारी बरोबर लग्न लावून नंतर मुलीस नवऱ्याकडे आणि-

---

हात तोंड वगैरे स्वच्छ धुवून मग आमचे रजपूत बहादर दिवसाच्या मुख्य उद्योगास लागतात. हा उद्योग ह्मटला ह्मणजे कुसुंबा अथवा अफीणीच्या लाल प्याल्यावर तडाखा होय. विस्तृत दिवाणखान्यांत अथवा केव्हां केव्हां बगीच्यांतील आराम-बंगल्यांत सर्व मित्रमंडळ एकत्र जमलें ह्मणजे अफीण निघते. पितळेच्या खलबत्त्यांत अफीणीची भुकी करून ती पाण्याशीं मिसळतात. नंतर ती एका झारींत गाळतात व झारीच्या तोटींतून ती हळुहळु ठाकूरसाहेबांच्या हातांत थोडी थोडी घालतात. पाहुणे मंडळीपैकीं प्रत्येकजण अफिणीची निंदाच करीत असतो व आपल्यास ती बिलकुल मानवत नाहीं असेंही पण प्रत्येक ह्मणावयाचाच. परंतु एका-पाठीमागून एक येऊन प्रचाराप्रमाणें दोनतीन ठिकाणीं ठाकूरसाहेबांच्या हातास हात लावून, देवाचें नांव घेऊन, इष्टमित्रांची आठवण करून व त्यांचें अभीष्ट चिंतून आपल्या धन्याच्या हातावरील अमृततुल्य अफीणीचें सत्व पार चाटून जातो. हें आचमन घेतल्यावर प्रत्येक जण ठाकुराचा हात धुवून टाकितो, व आपल्या स्वच्छ धोतरानें पुसतो, ह्मणजे दुसऱ्या पाहुण्यास मोकळीक झाली. हा विधि (थंडक) उरकून ताजीतवानी झालेली ही सर्वत्र मंडळी नंतर सोंगट्या, फांसे, बुद्धिबळें वगैरे व्यवसायांत गुंग होतात. केव्हां केव्हां गाणेंबजावणें व नायकिणींचा नाचही चालतो. हे सर्व प्रकार संपल्यावर अथवा चालत असतांनाही नित्यसज्ज खुषमस्करे जे **भाट** अथवा **चारण** यांचा प्रवेश होतो. याप्रमाणें सायंकाळ झाली ह्मणजे मशालजी मशाली आणून सर्वत्र लखलखाट करून सोडतात, व त्याबरोबर सर्वत्र मंडळी उठून ठाकूरसाहेबांच्या गादीस रामराम करितात. पुनः मंडळी आपआपल्या जागीं बसून खेळ, गाणें, नाच, चकाट्या यांचा पूर्वीप्रमाणें सपाटा सुरू होतो. आठ नवांच्या सुमारास ठाकूरसाहेबांची स्वारी ताटाच्या व हुक्याच्या तयारीस लागते. वास्तवीक पाहिल्यास हुक्का हा केव्हा बंदच पडत नाहीं. याप्रमाणें हा हल्लींच्या रजपूत तालुकदारांचा दिनक्रम आहे." **रासमाळा.**

तात. रजपूत लोक शिवभक्त व विष्णुभक्त असून ते आपआपल्या कुलस्वामिनी मातेसही भजतात. लग्न झाल्याबरोबर रजपूत जोडपें माताजीच्या, दर्शनास मोठ्या थाटमाटानें जातें, व जमल्यास आणखी एखादी यात्राही करून येतें. रजपुतांच्या मुली पुष्कळ दिवसपर्यंत लग्नाशिवाय रहातात; केव्हां केव्हां तर २५ वे वर्षींही मुलीचें लग्न होतें. आपल्या मुलीस योग्य वर मिळणार नाहीं, या भीतीनें जाडेजा रजपुतांत बालहत्येची एक अत्यंत निंद्य व दुष्ट चाल असे, व जाडेजांच्या मुली जन्मल्याबरोबर मारल्या जात असत. इंग्रजी अंमल झाल्यावर ही असुरी चाल मोठ्या प्रयासानें बंद करण्यांत आली.

**काठी** लोकांच्या मूळ ठिकाणा संबंधीं जरी निश्चयपूर्वक विधान करतां येत नाहीं तरी ते मूळचे मध्य आशियांत रहाणारे असावेत हें पुष्कळ संभवतें. बहुधा ते मुसलमानांच्या अंमलास त्रासून केव्हांतरी हिंदुस्थानांत उतरले असावेत. उत्तर हिंदुस्थानांतून हे सौराष्ट्रांत कसे आले याविषयीं वर्णन पूर्वीं येऊन गेलेंच आहे. इतर मुख्य जातींप्रमाणें यांच्यांतही असंख्य पोटभेद आहेत. काठी लोक ह्मणजे फारच रानवट असत व पेंढारी लोकांप्रमाणें लुटालूट करूनच तात्पुरते सौख्यानें दिवस कंठावयाचे अशी त्यांची पद्धत असे. कांहीं मुलूख मिळवून आपल्या ताब्यांत ठेवावा हें प्रथम त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. त्यांनां शेतीची बिलकुल चाड नव्हती, व लुटीचा माल ठेवण्यासाठीं व वेळ आल्यास आश्रय घेण्यासाठीं एखादा किल्ला झाला ह्मणजे त्यांनां दुसऱ्या कोणच्याही गोष्टीची वाण वाटत नसे. परंतु मुसलमानी सत्ता जेव्हां मोडकळीस आली त्या वेळेस त्यांनां मुलूख काबीज करण्याची इच्छा झाली. त्यांचें वावटळ थेट मध्यभागांत जाऊन पोंचलें व त्यांनीं जसदन, आलगधानानी वगैरे मुलूख जिंकून घेतला. ते हळुहळु अमरेळीच्या सीमेवर जाऊन पोंचले व बाबरियावाडच्या हद्दीवर कुंडला वगैरे ठाणीं त्यांनीं स्थापन केलीं. सरवैयांनीं चितळ त्यांच्या

स्वाधीन केलें व इतर रजपुतांकडूनही त्यांनां आणखी बरींच ठिकाणें मिळालीं.

याप्रमाणें लुटारूंच्या कोटींतून जमीनदारांच्या कोटींत येऊन दाखल झाल्यावर काठी लोक अंमळ संभावितपणानें वागूं लागले, तथापि त्यांचें सुधारणेचें काम फारच धिमेपणानें चाललें होतें. इ. स. १८०८ त वॉकर साहेबानें काठी लोकांसंबंधीं येणेंप्रमाणें उद्गार काढले आहेतः—"लुटालूट व दरोडे यांसंबंधीं मात्र काठी लोकांची प्रसिद्धि आहे. याप्रकारें आयुष्य क्रमण करणें ह्मणजे लांछनास्पद किंवा गर्हणीय आहे असें ते मुळींच समजत नाहींत. उलट ते आपण केलेल्या नासधुशीबद्दल व जुलमाबद्दल फुशारकी मारतात व कोणत्याही प्रकारचा पडदा न ठेवितां प्रसिद्धपणें आपणांस दरोडेखोर ह्मणवितात. जवळ कांहीं मालमत्ता नसल्यामुळें व रहाण्याचें ठिकाण स्थायिक नसल्यामुळें स्वतःपेक्षां पुष्कळ अधिक शक्तिमान संस्थानिकांच्या रागाची ते बिलकुल पर्वा करीत नाहींत. ते आपला स्वच्छंद व्यवहार बेफिकिर चालवितात. या सतत धुमाकुळामुळें उत्पन्न होणारी अस्वस्थता व दुःखें या प्रांतांत सर्वत्र दृष्टीस पडतात."

वॉकर साहेबानें याच्या अगदीं उलट प्रकारही पण नमूद करून ठेविला आहे. वाळा काठ्यांच्या हातांतील जेतपूरचितळचा मुलूख तेथील सुव्यवस्थेमुळें चांगल्या भरभराटींत असे. येथील लोकांस वॉकर साहेब सुधारलेले काठी ह्मणतो. सरवैयांकडून यांनां चितळ सुमारें १७३५ त मिळालें. पुढें अमरेळीचा एक व्यापारी जुनागढच्या अंमलदारांच्या झोरतलबीस व जाचास त्रासून चितळ येथें आश्रयास गेला. आपल्या मालमत्तेपैकीं जितकी ते परत मिळवून देतील त्याचा अर्धा वांटा काठ्यांस देण्याचें सावकारानें कबूल केलें. काठ्यांनीं अमरेळीवर जाऊन सावकाराची सर्व मालमत्ता परत मिळविली व सर्वच आपण लाटण्याचा विचार करून त्याला ठार मारण्यास ते उद्युक्त झाले. या अघोर कृत्याकडून

त्यांचीं मनें त्यांच्यापैकीं एका बायकोनें वळविलीं, व नंतर त्यांनीं त्याची मालमत्ता परत दिली इतकेंच नाहीं परंतु त्यानें देऊं केलेला हिस्साही पण ते घेईनात. या उदार वर्तणुकीचें फळ त्यांस लवकरच मिळालें, कारण तो सावकार चितळ येथें कायमचा राहिला येवढेंच नव्हे तर ही गोष्ट ऐकून इतर कित्येक व्यापारीही चितळ येथें येऊन राहिले. आसपासच्या जमीनदारांनीं काठी लोकांचा आश्रय केला व जुनागढच्या नबाबानें त्यांना मेंदरडा, बिलखा आणि जेतपूर हे प्रांत तोडून दिले. काठ्यांनीं पाहिलें कीं प्रामाणिकपणाचा मोबदला चांगला मिळतो; यामुळें पुढें त्यांनीं लुटालूट वगैरे सर्व सोडून देऊन चांगल्या राज्यव्यवस्थेबद्दल नांव मिळविलें.

अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास जेतसूर खाचर हा मोठा नांवाजलेला पुंड असे. आपली हुषारी व साहस यांहींकरून तो स्वतःच्या कुळाचा पुढारी झाला होता, व इकडे तिकडे बऱ्याच स्वाऱ्या करून लिंबडी, धंधुका, रामपूर वगैरे ठिकाणीं त्यानें खंडणी बसविली होती. अशाच एका स्वारीमध्यें तो मारला गेला व त्याची जागा त्याचा पुतण्या वादसूर-खाचर यानें घेतली. वादसूरनें लुटालूट सोडून दिली व सर्वत्र व्यवस्था लावून ३२ गांवांचें सुंदर वतन तयार केलें आणि तेथें तो उत्कृष्ट रीतीनें काम पाहूं लागला.

कांहीं धाडशी व उपद्व्यापी काठी लोकांनीं गीरच्या डोंगरांत आपलीं ठाणीं केलीं व आसपासच्या मुलखास उपद्रव देण्याचें आरंभिलें. जुनागढच्या नबाबाशीं व आपआपसांत तंटे करून त्यांनीं गीरच्या सभोंवारच्या प्रांतांत अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं मनस्वी उच्छाद करून सोडिला. विसावदरच्या हिश्शा संबंधीं वाळा राणिंग व वाळा मात्रा या दोघांमध्यें पुष्कळच लढा पडला व दोघांनींही पाळीपाळीनें कायद्याचीं बंधनें तोडून टाकून जंगलांतच मृत्यूची भेट घेतली. राणिंगवाल्याचा मुलगा बावावाला हा मोठा प्रख्यात लुटारू होता. यानें १८२० त क्या-

पटन ग्रांट नांवाच्या गाईकवाडी आरमारावरील गोऱ्या अधिकाऱ्यास पकडून चार महिने कैदेंत ठेविलें होतें त्यामुळें याचें नांव अद्यापही प्रसिद्ध आहे. हा अंमलदार गीरच्या डोंगरांतून अमरेळीस कांहीं कामासाठीं जात असतां बावावाल्याची व त्याची गांठ पडली. बावावाल्यानें टोपीवाल्यास पकडून कैद केलें व चार महिनेपर्यंत त्याचे पुष्कळ हाल केले. बावावाला १८२४ त मारला गेला व काठ्यांचा वडिलार्जित मुलूख बहुतेक सर्व जुनागढच्या नबाबाच्या हातांत पडला. बावावाल्याचें गुणवर्णन एका गीतांत केलें आहे व तें अद्यापही चारण लोक गातात.

याप्रमाणें खुमाण काठीही १८ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं सौराष्ट्रांत आग्नेयीकडे बंडाळी करीत होते. हे कुंडल्याचा सुपीक प्रदेश लाटून बसले होते व तेथून भावनगरच्या ठाकुरास न जुमानतां त्याच्या मुलखास मनस्वी उपद्रव देत. भावनगरास त्या वेळीं वखतसिंहजी राज्य करीत होता. हा फार राजकार्यकुशल असल्यामुळें त्यानें काठ्यांमध्यें आपआपसांत कलह उत्पन्न केला व नंतर त्यांना चांगलें जेरीस आणिलें. आपल्या उदरनिर्वाहा पुरता मुलूख ठेवून घेऊन इतर कुंडल्याचा सर्व मुलूख काठ्यांनीं वखतसिंहाच्या स्वाधीन केला. तसेंच बोटाद व गढडा येथील खाचरकाठ्यांसही वखतसिंहजीनें नरम करून आपल्या हाताखालीं आणिलें. आतां सर्वत्र शांतता झाल्यामुळें तर काठ्यांची सत्ता अजीबात बसली आहे. जेतपूर, चितळ, जसदन येथील मोठीं वतनें खेरीज करून नांव घेण्यासारखें काठ्यांच्या हातांत कांहीं राहिलें नाहीं. बगासरा, चोटिला, बाबरा, पालियाड वगैरे वतनें आहेत खरीं परंतु दायविभागाच्या योगानें त्यांचे लहान लहान भाग पडत आले आहेत व असेंच पुढें चालल्यास लवकरच त्यांची दुर्दशा उडेल यांत शंका नाहीं.

काठी लोकांचा पूर्वीं पासून धनगरी पेशाच असल्यामुळें त्यांना जनावरांचा शोक फार आहे. अद्यापही पुष्कळ काठी लोकांस गाईह्मशींचे मोठमोठे

कळप राखण्याची फार हौस असते. ते आपल्या घोड्यांची अत्यंत काळजी घेतात व त्यांचा त्यांना अभिमान असतो. काठी हे सूर्योपासक आहेत व बहुतेक कृत्यांत ते सूर्यचिन्ह वापरतात. हें चिन्ह कोळ्याच्या आकृतीचें असतें आणि कोळ्याचे पाय ह्मणजे सूर्यकिरणें होत. याच्याखालीं ‘ सूर्यनी साख ’ ह्मणजे सूर्याची साक्ष असें लिहिलेलें असतें. त्यांचें मुख्य देवालय थान येथें होतें परंतु तें पुढें मुळीचे परमार लाटून बसले. हिंदू लोकांच्या सहवासामुळें ते हिंदूंच्या देवांविषयीं व ब्राह्मणांविषयीं पूज्यबुद्धि राखतात. हे मनस्वी धर्मभोळे असतात, व शापशकुनांवर यांचा भरंवसा फार. आल्यागेल्याचा पाहुणचार ते फार उत्कृष्ट करतात व एकंदरींत फार मनमिळाऊ व गमती असतात. सरस्वतीचें व त्यांचें अगदींच वांकडें व ते अत्यंत आळशी असल्यामुळें गप्पा मारण्यांत व मौजा मारण्यांतच त्यांचा बहुतेक वेळ जातो. ते कामकाजांत बिलकुल मन घालीत नाहींत. खाण्यापिण्यांत गाय व हरीण खेरीज करून इतर कोणचाही निर्बंध ते राखीत नाहींत.

काठी बायका फार सुंदर असतात व त्यांची नीतिमत्ता फार चांगली असते. काठी लोक आपल्या बायकांस फार उत्तम प्रकारें वागवितात. धर्माचा जरी अटकाव नाहीं तरी काठी बहुतकरून एकच लग्न करितो. विधवाविवाहास कोणचाही प्रतिबंध नाहीं परंतु असले विवाह बहुशः होत नाहींत; मात्र वडील भाऊ मेल्यास लहान भावास वडील भावाच्या विधवेशीं लग्न लावावें लागतें.*

रजपूत व काठी यानंतर जमिनीच्या मालकीचे तिसरे हिस्सेदार ह्मणजे **मुसलमान**लोक होत. यांच्या राज्यासंबंधीं विशेष माहिती तर येऊन

---

* **बाव**रिया व **अ**हीर हे जरी **का**ठी लोकांचे पोटभेद नव्हते तरी या दोनही जातीचें **का**ठी लोकांशीं पुष्कळ साम्य आहे. त्यांच्या संबंधीं विशेष माहिती लिहिण्याइतकें त्यांचें महत्व नाहीं.

गेलेलीच आहे. मुसलमानांच्या संस्थानांत अग्रगण्य ह्मणजे जुनागढ हें होय. मुसलमानी अंमल इतका पसरलेला व इतका चांगल्या प्रकारें प्रांतांत बसलेला असूनही आजमितीस मुसलमानी संस्थानें सोरठेंत जुनागढ, बांटवा, राणपूर, मांगरोळ आणि अमरापूर व झालावाडांत बजाना व दसाडा हींच कायतीं आहेत. पैकीं जुनागढ पहिल्या वर्गांत व बजाना चवथ्या वर्गांत आणि इतर सर्व त्याच्याही खालींच आहेत. लोकसंख्येच्या सुमारें सहाव्या हिश्शानें प्रांतांत मुसलमानांची संख्या आहे. मेमण, बोहरी वगैरे निरनिराळ्या जातींसंबंधी विशेष माहिती लिहिण्यांत तात्पर्य नाहीं.

जमिनीच्या मालकीचे चवथे हिस्सेदार गाईकवाड आहेत. सौराष्ट्रावर सर्वत्र गाईकवाडाची खंडणी व सार्वभौम सत्ता तर होतीच, परंतु त्याशिवाय गाईकवाडानें स्वतःही थोडासा मुलूख राखला होता. इ. स. १८०५ त इंग्रजांचा गाईकवाडाशीं तह झाला तेव्हां हा मुलूख फक्त १२००० चाच होता, परंतु पुढील १५ वर्षांत विठ्ठलराव देवाजीनें सुमारें ३॥ लाखांचा मुलूख यांत सामील केला. गाईकवाड हे जातीचे मराठे असल्यामुळें त्यांच्याविषयीं येथें लिहिण्याची जरूर नाहीं.

येथें जमिनीच्या वतनदार लोकांची हकीकत संपली. आतां प्रांतांतील इतर लोकांविषयीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. शेतकी व व्यापार यासंबंधीं लिहितांना या दोन महत्वाच्या धंद्यांत पडलेल्या लोकांची थोडी थोडी हकीकत परोक्षरीतीनें आलेलीच आहे. व्यापारामध्यें मुख्य ह्मणजे लुआणा, भाट्ये व वाणी हे लोक आहेत. मुलताना जवळच्या लोहाणपुराहून आल्यामुळें यांना लुआणा हें नांव मिळालें असें ह्मणतात. हे विष्णुभक्त आहेत. मद्यमांस घेण्यांत हे पाप समजत नाहींत. यांच्यामध्यें विधवाविवाह प्रचलित आहे. यांची संख्या प्रांतांत सुमारें ६०००० आहे. भाट्ये लोक त्या मानानें कमी ह्मणजे अवघे ६००० असतील.

हा वर्ग फार श्रीमान् व व्यापाराच्या कामांत फार साहसी आहे. ह्यांचें ठिकाण हालार प्रांतांत खंबाळिया हें होय. हे आपणास जेसलमीरच्या भाटी (यादवकुळ) रजपुतांचे वंशज ह्मणवितात. पुढें मुसलमानांच्या त्रासानें पंजाबांतून सिंधमध्यें, सिंधमधून कच्छ येथें व तेथून सौराष्ट्रांत हे उतरले असावेत. हे वैष्णव असून धर्माच्या बाबतींत फार कडक असतात. हे विधवाविवाह व मद्यमांससेवन करीत नाहींत.

वाण्यांची संख्या सौराष्ट्रांत जवळ जवळ दोन लाख आहे. यांच्यामध्यें मुख्य भेद दोन आहेत, श्रावक व मेश्री अथवा वैष्णव, पैकीं दोन तृतीयांश श्रावक आहेत. *श्रावक लोक सर्व प्रांतभर असे कांहीं पसरलेले आहेत कीं ज्यांत श्रावकांचीं एकदोन घरें नाहींत असे गांव सांपडणें विरळा.

---

* जैन धर्म बौद्ध धर्माच्या पूर्वींचा नसला तरी तितका जुना आहे खरा. दोनही वैदिक धर्मास मानीत नाहींत व त्या धर्माच्या अगदीं विरुद्धच आहेत. दोनही धर्मांचें "अहिंसा परमो धर्मः" हें मुख्य किंबहुना एकच तत्व आहे. आमच्या चार युगांच्या बदली जैन लोक सहा मानतात व त्यांस "आरा" ह्मणतात. तिसऱ्या आरेंत कश्यपाच्या वंशांतील नाभिराज होऊन गेला. याची पत्नी मारूदेवी या दोघांचें अपत्य ऋषभदेव, ज्याला आदिनाथ ह्मणतात; हाच जैनलोकांचा पहिला 'तीर्थंकर' होय. एकंदर २४ तीर्थंकर होऊन गेले पैकीं शेवटचा महावीरस्वामी विक्रम संवतापूर्वीं ४७० व्या वर्षीं ह्मणजे इ. स. पू. ५२६ व्या वर्षीं निर्वाणाप्रत पोंचून परमेश्वराशीं तादात्म्य पावला. सौराष्ट्रांत जैन लोकांचीं यात्रेचीं मुख्य ठिकाणें दोन आहेत, एक पालिटाण्या जवळील शत्रुंजय पर्वत व दुसरी गिरनार पर्वत. शत्रुंजय पर्वतावरील देखावा फारच विलक्षण मौजेचा आहे. येथें शेंकडों देवालयांची एकच गर्दी उडून गेली आहे. यात्रेकरूनें येथें रात्रीं रहातां कामा नये व कांहीं खातां कामा नये, सर्व यात्रा दिवसा आटपून घेतली पाहिजे. सर्व यात्रा यथासांग करून प्रदक्षिणा वगैरे घालण्यास ९९ दिवस लागतात. हें स्थान पहिला तीर्थंकर जो आदिनाथ त्याला अर्पण केलें आहे. आदिनाथाच्या व इतर साधूंच्या संगमरवरी दगडांच्या अनेक मूर्ती देवालयांतून बसविलेल्या आहेत व त्यांच्यावर उत्कृष्ट जवाहीर मुबलक घातलेलें आहे.

श्रावक लोकांत पोटभेद बरेच आहेत. श्रावक लोक व्यवहारांत मोठे धूर्त असतात व मानापमानाची त्यांना फारशी चाड नसते. हे मुख्यत्वें-करून पेढ्या, व्यापार, व्याजबट्टा वगैरे धंद्यांत असतात; परंतु अलीकडे त्यांच्यापैकीं पुष्कळ कारकुनी पेशांत शिरले आहेत. परंतु व्यापारांत त्यांची धूर्तता फार प्रसिद्ध आहे.* मेश्री अथवा वैष्णव वाण्यांचे मोढ, सोरठिया, व कपोल असे तीन मुख्य भेद आहेत. गोहिलवाड व सोरठ येथेंच बहुतकरून हे रहातात.

रबारी, भरवाड (धनगर गवळी वगैरे) मेर, महीया, कोळी, गेडेया, कुणबी वगैरे जातींचें करीत वसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या प्रांतांत भाट अथवा बारोट आणि चारण या दोन जाती मात्र बऱ्याच प्रसिद्ध आहेत. भाट हें आपण शंकराच्या कपाळाच्या घामापासून उत्पन्न झालों असें मानितात. हे प्रांतांतील कवि होत व वंशावळी तयार करणें हें यांचें मुख्य काम आहे. वास्तविक पहातां भिक्षेवर यांनीं उदरनिर्वाह करावयाचा, परंतु इतर जातीप्रमाणें यांनींही धर्माचार सोडून दिला असून हल्लीं हे लोक व्याजबट्ट्याचा व्यापार पुष्कळ करितात, व कांहीं शेतकीही करितात. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं कोणचाही दस्तऐवज

---

दुसरें स्थान जें गिरनार पर्वत येथें जरी इतकीं देवालयें नाहींत तरी तें फारच भव्य व मनोहर आहे. हें बेविसावा तीर्थंकर जो नेमिनाथ त्याला अर्पण केलें आहे. या डोंगरावर चढण्याचें अवघड असल्यामुळें व या स्थानीं गेल्याशिवाय यात्रेची पूर्णता होत नसल्यामुळें गिरनारच्या यात्रेस पुष्कळच महत्व आलें आहे. जैन देवालयांत जैनलोकांस पुजारी होतां येत नाहीं परंतु भोजक ब्राह्मण किंवा इतर कोणत्याही जातीचे ब्राह्मण पुजारी असतात.

* खेडेगांवांतील वाण्याच्या दुकानाचें वर्णन करून पुढें गरीब भोळ्या रयतेस लुबाडून हा वाणी मोठा शेटजी कसा बनतो व रयतेवरून नंतर गिराशिया लोकांवर आपला पगडा तो कसा बसवितो, व शेवटीं संस्थानिकांसही पैसे कर्जाऊ देऊन त्यांसही आपल्या हातांत कसा घेतो याचें वर्णन 'रासमाळेंत' केलें आहे. तें जिज्ञासूंनीं पहावें.

एखाद्या भाटाच्या साक्षीशिवाय कायदेशीर मानला जात नसे. इ. स. १८०७ त जेव्हां कर्नल वॉकरनें सौराष्ट्रांतील संस्थानिकांकडून खतें लिहून घेतलीं तेव्हां त्यांतील प्रत्येकावर एखाद्या भाटाची अथवा चारणाची जामिनगिरीची सही होती. यांचीं शरीरें पूर्वी मोठीं पवित्र मानिलीं जात असत ह्मणून यांना खुनाची वगैरे भीति नसे. यामुळें मोठमोठे खजिने इकडून तिकडे नेतांना बरोबर यांना पाठविण्यांत येत असे. प्रत्येक लहानमोठ्या रजपूत कुळांत एक भाट हा असावयाचाच,—भाटाचीं जेवढीं ह्मणून यजमान घराणीं असतील तितक्यांकडे त्याची वर्षांतून एक फेरी व्हावयाची. त्याचें काम ह्मटलें ह्मणजे यजमानाच्या कुळांतील पूर्वजांच्या पराक्रमाचें वर्णन करावयाचें, व त्याची अधिक उणी स्तुति करून यजमानास खुष करून सोडावयाचें. तसेंच यजमानाच्या कुटुंबांत झालेले जन्म, मृत्यू, लग्नकार्यें वगैरे सर्व तो आपल्या पुरातन चोपडींत लिहून ठेवितो. या सर्व कृत्यांबद्दल त्याला यजमाना कडून चांगलें वेतन मिळतें. कित्येकांस तर संस्थानिकां कडून जमिनीही मिळतात. मारवाड व राजपुतान्यांतील भाट जे चोऱ्या करतात, दरोडे घालतात, गुरेंढोरें पळवितात, घोडे लांबवितात त्यांच्यापेक्षां सौराष्ट्रांतील भाट एकंदरींत अब्रूदार आहेत. चारण व भाट यांच्यामध्यें फारसा फरक नाहीं.

आतां प्रांतांतील बंडखोर लोकांविषयीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. बंडखोरांत अग्रगण्य ह्मणजे जे वाघेर यांची संख्या अवघी पांच किंवा साहाशें असेल. या गलिच्छ, अज्ञानी, अब्रूची बिलकुल चाड नसणाऱ्या लोकांविषयीं इतिहासाच्या भागांत अनेकवेळां उल्लेख येऊन गेलेलाच आहे तेव्हां त्यांच्याबद्दल येथें लिहीत बसत नाहीं. संघार लोक हेही फार दंगेखोर होत. तेराव्या शतकांतील चांचे लोकांचा पुढारी संगण नांवाचा होता त्याचे हे वंशज असें ह्मणतात. संगणानें आपला दरारा पश्चिमेकडे खंबाळिआ व दक्षिणेस पोरबंदरपर्यंत नेला. पुढें संगणाचा

मुलगा भीमजी याच्यावेळीं गुजरातचा सुलतान महमद बेगडा यानें द्वारका व बेट जिंकून घेतलें व यांचे लोकांस हांकून लाविलें. परंतु भीमजीनें पुनः परत येऊन बेट परत घेतलें व मुसलमानही द्वारकें-तून मागें हटले. संघार हे लोक वाघेऱ्यांहूनही क्रूर व धाडशी होते व कित्येक दिवसपर्यंत तर संघार शब्द चांचे लोक या अर्थींच वापरीत. हे मुसलमान आहेत परंतु पूर्वी हिंदू असून पुढें बाटून मुसलमान बनलेले.

बंडखोर जातींपैकीं तिसरी मोठी जात ह्मणजे मियाणा लोक होत. यांची संख्या सुमारें तीन हजार आहे. यांचें मूळ ठिकाण ह्मणजे सिंध होय आणि तेथें ते धीवरांचा धंदा करितात, परंतु भुज व माळिआ येथें त्यांचा मुख्य धंदा ह्मणजे चोरीचा. हे लोक कच्छ मध्यें पुष्कळच त्रिवस आहेत. माळियाचा पहिला ठाकूर मोरजी याचें आपला भाऊ मोर्वीचा ठाकूर याशीं भांडण झालें तेव्हां त्यानें आपलया सहायासाठीं या लोकांस बोलाविलें. पुढें माळियाची स्वतंत्र गादी स्थापन करण्या-मध्येंही यांनीं मोरजीस पुष्कळ मदत केली व त्यामुळें त्यानें त्यांस जमीनजुमला देऊन माळियाचे स्थायिक रहिवाशी करून सोडिलें. या-प्रमाणें माळियांत शिरकाव झाल्यावर त्यांनीं नंतर माळियाच्या ठाकुरांस पुढें पुरे पुरे करून सोडिलें, व ते बिलकूल अनावर होऊन बसले. लुटालूट व कायद्याची बेदरकारी यांबद्दल त्यांची सौराष्ट्रांत फारच ख्याति आहे. मियाणालोक शरीरानें उंच, धिप्पाड असून मजबूत व चलाख असतात, ते घोड्यावर बसण्यांत व बंदुकीनें नेम मारण्यांत पटाईत आहेत. तसेंच ते शूर व धीट असून बुद्धिमान् व हुषार असल्यामुळें उत्तम शिपायांत जे गुण पाहिजेत ते त्यांच्यामध्यें आहेत. परंतु दिलगिरीची गोष्ट इतकीच कीं त्यांना वाईट दिशा लागल्यामुळें त्यांच्यामधील अ-मूल्य गुणांचें चीज न होतां त्यांचें नांव दरोडेखोरांत अग्रगण्य होऊन बसलें आहे. ते माळियाच्या ठाकुरास अगदींच डोईजड झाले होते.

नवानगरच्या किनाऱ्यावरूनही मियाणे लोक आढळतात, परंतु ते इतके दंगेखोर नाहींत.

हे लोक मैदानांत जेथें तेथें गवताच्या झोंपड्या बांधून रहातात. एकेका ठिकाणीं अजमासें २०–२५ कुटुंबें झोंपड्या करून रहातात व येथून मग दरोडे घालण्याच्या उद्योगास लागतात. चोरीचा माल लपविण्यांत यांची विलक्षण शिताफी आहे. यांना ताळ्यावर आणण्यासाठीं वेळोवेळीं पुष्कळच यत्न केलेले आहेत व त्यांच्या पुढाऱ्यांकडून आणाशपथाही घेतलेल्या आहेत, पण सर्व व्यर्थ. माळियाच्या ठाकुरानेंही त्यांना वठणीला आणण्यास पुष्कळ यत्न केले, परंतु त्यांनीं त्याला अगदींच जुमानलें नाहीं. शेवटीं १८८० तें त्यांचीं हत्यारें काढून घ्यावीं लागलीं, व आतां ते थोडेसे बेतानें असतात. मियाणे लोक देखणे असतात व त्यांच्या बायकाही सुंदर असतात, परंतु फारशा नीतिमान् असतात असें नाहीं. दोघांनाही काळे कुरळे केंस असतात व त्यांचा रंग सांवळा असतो. पुरुष चपळ असून रांकट असतात. ते पायांत तंग विजारी घालतात. मग अंगांत पैरणी असल्या तर असल्या. बायका अंगभर लुगडें न नेसतां परकरासारखा 'घागरा' नेसतात. हे शेतकीच्या कामास अगदीं नालायक असून काटकसर ह्मणजे काय पदार्थ हें या बिचाऱ्यांस बिलकुल माहीत नाहीं. हे मुलखाचे आळशी व कर्जबाजारी असतात. गुराढोरांवर ते निर्वाह करितात व तीं बहुतकरून चोरून आणिलेलींच असतात. लिहिणें वाचणें किंवा शिकण्याची नुसती इच्छा यांचें नांवच नको. ते आपणास मुसलमान ह्मणवितात, परंतु त्यांची रहाण्याची रीतभात वगैरे रजपुतांची असते.

लुटारूंची चवथी जात ह्मणजे जत ही होय. पंजाबांतील जाटलोकांचेच हे वंशज असावेत. मुसलमानी धर्म स्वीकारून हे सौराष्ट्रांत आल्यावर कित्येक पिढ्यांपर्यंत यांनीं लुटालुटीनेंच उदरनिर्वाह चालविला. यांपैकीं कांहीं कच्छच्या रणाच्या पूर्वेस येऊन राहिले व बजाणा जवळ त्यांनीं २४ गांवें

मिळविली. यावरूनच या प्रदेशास छोटें 'जतवाड' ह्मणतात. हे लोक मोठे उपद्यापी आहेत. हे गुराढोरांचा व्यापार करितात, परंतु त्यांत चोरीचा व्यापार बराच असतो. हे श्रम करण्यास जबरे असून चोऱ्या वगैरे करून लांबलांबच्या मजला मारण्यांत मोठे वस्ताद असतात. ते धीट व बानवट असून देखणे असतात.

सौराष्ट्रांत ब्राह्मणाच्या मुख्य जाती ह्मटल्या ह्मणजे तीन आहेत—**नागर, औदीच,** व **श्रीमाळी.** **नागरांची** संख्या सुमारें दीड लाख आहे. वडनगरा **नागर** हे पूर्वीचे अस्सल **नागर** असें ह्मणतात. पुढें **विसनगरा, साठोद्रा, चित्रोद, प्रश्नोरा** व **क्रश्नोरा** असे पुष्कळ भेद पडले. आपल्या ज्ञातींत बायका न मिळाल्यामुळें दुसऱ्या जातींतील बायका केलेल्या **नाग**रांचा बारड ह्मणून एक वर्ग आहे. या वर्गातील लोकांचा **नागर** जरी तिरस्कार करितात तरी तो वर्ग वाढतच चालला आहे. **सौराष्ट्रांत** कोठें कोठें **प्रश्नोरा नागर** असतात, परंतु बहुतेक नागर वडनगरीच आहेत. जुनागढ, **भावनगर** आणि **नवानगर** हीं नागरांचीं मुख्य वेटें होत. इ. स. १८४२ त **नागरांची** सुमारें १२६३ कुटुंबें होतीं. **नागर** लोक मोठे धूर्त, सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारे व अत्यंत महत्वाकांक्षी असल्यानें **सौ**राष्ट्राच्या राजकारणांत त्यांचें पूर्वीपासूनच फार वजन आहे. कारकुनी पेशाचे लोकांत मुख्यत्वेंकरून **नागर, वाणी, ब्राह्मण, पार्शी, मुसलमान, ब्रह्मक्षत्रिय व कायस्थ** ह्या जाती आहेत. यांत **नागर** व **वाणी** हे मुख्य तट आहेत. **नागर** हे पूर्वीपासूनच या कामांत चांगले वाकबगार असल्यामुळें व त्यांच्यामध्यें चांगला संप असल्यामुळें **वाण्यापेक्षां** यांची चलती अधिक आहे. सार्वजनिक बाबतींत वाण्यापेक्षां **नागर** व ब्राह्मण हे पुष्कळच अधिक पुढाकार घेतात. **वाणी** ह्मटला ह्मणजे स्वतःपुरतें व फार तर स्वजातीपुरतें पहाणारा.

**नागर**लोक धर्माचे आचार पाळण्यांत बाहेरून तरी अत्यंत कडक अ-

सतात. नागर दुसऱ्या कोणच्याही जातीच्या हातचें अन्न खात नाहीं. त्याची त्रिकाळ स्नानसंध्या चुकत नाहीं. इतक्या धार्मिकपणास केवळ अनुरूपच त्याची व्यवहारांतील नीतिमत्ता असते किंवा कसें हें सांगणें कठीण आहे.*

तथापि हा त्यांचा धार्मिक बाणा त्यांच्या पुष्कळच उपयोगीं पडतो; तुकोबा ह्मणतात त्याप्रमाणें 'व्यापार करीती संसाराचा.' चांगले धर्मशील लोक नागरांमध्यें सांपडणार नाहींत असें नव्हे, परंतु साधारण मानानें, नागर ह्मटला ह्मणजे जेवढा धर्माचा खटाटोप करितो त्यांत ह्मणजे परमेश्वरभक्तीच केवळ भरलेली असते असें नाहीं. वरकरणी धर्माचा जेवढा अवडंबर असतो त्याच्या मानानें अंतःकरणांत उपरति पाहिली तर फारच थोडें प्रमाण सांपडेल. 'अंगीं लावूनिया राख। डोळे झांकुनि करिती पाप।' असाच प्रकार फार.

नागरयुवतींची त्यांच्या अनुपम सौंदर्याबद्दल सौराष्ट्रांत पूर्वीपासून फार ख्याति आहे. या लोकांत गोषाची चाल नसल्यामुळें लग्नाचा वगैरे थाट रस्त्यानें चालला असतां उत्कृष्ट वस्त्रालंकारभूषित असा नागरयुवतीजनसमूह मोठ्या कौतुकानें पहाण्यास एखादा 'वेदाभ्यासजड' जरठसुद्धां क्षणभर सानंदाश्चर्यानें विधात्याची कर्तृत्वशक्ति वाखाणीत उभा राहील.

औदीच व श्रीमाळी ब्राह्मण पांढरपेशांमध्यें आहेत, तथापि मुख्यत्वेंकरून ते भिक्षुकी करितात. या जातीचे पुष्कळ ब्राह्मण शेतकींतही सांपडतील. भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे ब्राह्मणंही थोडे आहेत असें

---

* तुकारामबावा ह्मणतात:—

टिळा टोपी माळा देवाचें गवाळें। वागवी वोंगळें पोटासाठीं ॥ १ ॥
तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडीं। लटिकी धरी बोंडी नासिकाची ॥ २ ॥
कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे। प्रेमेंवीण गळे दाटताती ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे मावेचे मईद। त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ४ ॥

नाहीं. याशिवाय राजगोर, पोकरणा, गिरनार, सोमपुरा, गुगळी, सारस्वत, अबोटी, कंडोलिया, मोढ वगैरे ब्राह्मणांमध्यें पुष्कळ जाती आहेत.

एकंदरींत पहातां सौराष्ट्रांतील सामान्य लोक, महाराष्ट्रांतील लोकांपेक्षां चांगले कपडे वापरतात. पुरुष खादीची विजार व अंगरखा घालतात. बायका गाचीं किंवा ठिपकेदार लुगडीं नेसतात व तसल्याच प्रकारच्या चोळ्या घालतात. या चोळीसच आपल्या तिकडे कांचोळी ह्मणतात. हा सामान्य अथवा हलक्या प्रतीचा ह्मणजे शेतकरी व मजूर यांचा पोषाख झाला. यांचें खाणें ह्मणजे बाजरीची भाकरी व त्यावर थोडीशी भाजी किंवा लोणचें. ज्यांच्याजवळ थोडा पैसा असतो ते थोडी डाळ व तूप घेतात. श्रीमान लोकांशिवाय भात कोणी खात नाहींत.

सौराष्ट्रांतील खेडेगांवाची सामान्य रचना ह्मणजे दोन सुतारांचीं घरें, दोन लोहारांचीं, दोन शिंप्यांचीं, दोन कुंभारांचीं, एखादें चांभाराचें, दोन न्हाव्यांचीं, चार धनगरांचीं, आठ, दहा धेडांचीं, तीनचार वाण्यांचीं, व आठ, दहा पसाइत्यांचीं (ह्मणजे रामोशी रखवालदारांचीं) अशीं असावयाचीं. या सर्व लोकांस त्या त्या खेडेगांवाच्या मालकाशीं करारमदार करावे लागतात, व ज्याच्या त्याच्या धंद्याच्या मानानें त्यांना करही द्यावे लागतात. इकडे वेठीचा प्रकार पुष्कळच प्रचारांत आहे. खेडेगांवांतील विशेष महत्वाचा मनुष्य ह्मणजे पटेल हा होय व त्याची जागा वंशपरंपरेनें चालत आलेली असते. याला इनाम जमीन असते व लोकांकडूनही वेळोवेळीं याला थोडीबहुत प्राप्ति असते. त्याचें काम ह्मणजे धर्माच्या बाबतींत जरूरीची व्यवस्था करणें, देवळें, तळीं, विहिरी इत्यादि सार्वजनिक कामांसाठीं वर्गण्या गोळा करणें, गांवांत बंदोबस्त राखणें इत्यादि, इत्यादि. सौराष्ट्रांतील गांवांमध्यें एक संस्था फारच नावाजण्याजोगी असते. प्रत्येक गांवांत वर्गणी करून आल्यागेल्याचा पाहुणचार करण्याची चांगली व्यवस्था केलेली असते. हा पाहुणचार ह्मणजे श्रीमान लोकांचा (आवळा

देऊन कोहाळा काढावयाचा) पाहुणचार नव्हे, तर या चोऱ्यांत (या संस्थेस चोरा अथवा झांपा ह्मणतात) गरीब अनाथांचीच फक्त सोय होते. हा चोरा पटेलाच्या ताब्यांत असतो व त्याची व्यवस्था नीट ठेवणें हें त्याचेंच काम आहे. पटेला शिवाय प्रत्येक खेड्यांत हवालदार अथवा फौजदार व पसाइता अथवा रखवालदार असतो. याशिवाय हल्लीं पोलीसपटेलचीही नेमणूक होत असते. गांवच्या पटेलासच बहुशः पोलीसपटेलची कामगिरी सांगतात. पोलीसपटेलच्या ताब्यांत पसाइते असतात, हे बहुतकरून मुसलमान, रजपूत, कोळी, अहीर, महिया, मेर वगैरे जातींतून निवडतात, व त्यांस नोकरी बद्दल जमीन असते.

याप्रमाणें हें सौराष्ट्रांतील मुख्य मुख्य जातींच्या लोकांचें वर्णन आटोपलें. निरनिराळ्या जातींत प्रचलित असलेल्या चालीरीतींचें विस्तृत वर्णन करण्यास या लहानशा पुस्तकांत अवकाश नाहीं. वर दिलेल्या हकीकतीवरून सौराष्ट्रांतील लोकांचें सामान्य स्वरूप वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

या प्रांतांतील जैन लोकांसंबंधीं उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे. वैदिकधर्माच्या लोकांमध्यें दोन पंथांचे लोक आहेत, एक शैव व दुसरे वैष्णव. पैकीं वैष्णवांविषयीं दोन शब्द लिहिणें जरूर आहे. गुजरातेंत, सौराष्ट्रांत, व इतर कांहीं ठिकाणीं वाणी व भाट्ये वैष्णवांचे धर्मगुरू सुमारें ४० आहेत. या धर्मगुरूचें नांव महाराज व याला विष्णु—कृष्णाचा अवतार समजून ह्या दोन जातींचे लोक महाराजास आपलें 'तन, मन, धन' अर्पण करून त्याची अनन्यभावानें पूजा अर्चा करितात. महाराजा जरी अवतारी पुरुष मानला जातो तरी तो मोठा ऐषआरामी व भोक्ता असून त्याच्यामध्यें विरक्ततेचा लेशही नसतो. या धर्मगुरूची चैन चालविण्यास पैशाची वाण पडण्याचा संभवच नाहीं, कारण निरनिराळ्या धार्मिक कृत्यांबद्दल महाराजाचे कर मोठे जबरे असतात. भाविक लोक महाराजाचें अनन्यभावें पूजनअर्चन करितात, व निरनिराळ्या उपासनेच्या किंमतीही

साधारणपणें ठरलेल्या आहेत. मलबारी शेठजींनीं आपल्या "गुजरात व
त्ती" पुस्तकांत या किंमतींची यादी दिली आहे ती येणेंप्रमाणें:—
"जांच्या दर्शनास रु. ५, महाराजांच्या अंगस्पर्शास रु. २०, पादप्रक्षाल-
रु. ३५, महाराज झोंपाळ्यावर बसले असतां झोंका घालण्याचा मान
जे असल्यास रु. ४०, महाराजांच्या अंगास उटी लावण्यास रु. ४२,
ारीं बसण्यास रु. ६०, या मदनमूर्तीसमवेत एका खोलींत रहाण्याचें
नुपम सौख्य पाहिजे असल्यास ५० पासून ५०० रुपये द्यावे लागतात
शिवाय आणखीही प्रकार आहेत. महाराजांची अथवा त्यांच्या सेव-
ांची लाथ पाहिजे असेल तर रु. ११, चाबूक हवे असतील तर रु. १३
सक्रीडेची फी १०० पासून २०० रुपये, व महाराजांच्या मुखत्याराक-
न रासक्रीडा करविल्यास फक्त ५० पासून १०० च रुपये पडतात!! या
महाराजांची उष्टी पानसुपारी खाण्याचें मनांत असल्यास रुपये १७ द्यावे लाग-
तील, व त्यांनीं स्नान केलेलें अथवा त्यांचीं मलिन वस्त्रें धुतलेलें पाणी पिण्याचें
महत्पुण्य पदरीं बांधावयाचें असल्यास रुपये १९ मोजावे लागतील!!!"

याशिवाय लहानसहान कर पुष्कळ आहेत, व या महाराजांच्या पवित्र विक्रीच्या बाजारांत हरतऱ्हेचे चित्रविचित्र जिन्नस आढळतात, परंतु महाराजांचें मनोहर स्वरूप ध्यानांत येण्यास वरील मासले पुष्कळ झाले. या अमंगळ बाजारांतून वाचकांस नेल्यामुळें विटाळ झाला असेल त्याबद्दल ते क्षमा करितील अशी आह्मी आशा करितों. प्राचीन सुधारणेचा टेंभा मिरविणाऱ्या आपल्या राष्ट्रांत एका अत्यंत उदार व श्रीमान ज्ञातींत धर्माच्या पवित्र व विमल नांवानें कसले अनन्वित व लाजिरवाणे प्रकार चालतात ह्याचें दिग्दर्शन करणें जरूर वाटलें. मुंबईचे प्रसिद्ध आन्स्टी ब्यारिस्टर ज्या महाराजांस काठीच्या टोंकानेंही शिवण्यास तयार

नव्हते त्यांचें अधिक वर्णन करून व त्यांच्या वर्तनावर टीका करून आह्मीही आपली लेखणी, या पुढें विटाळूं इच्छीत नाहीं.*

---

* सौराष्ट्रांतील असंख्य पंथांपैकीं, स्वामीनारायण पंथ बराच फैलावलेला आहे. या पंथाच्या अहिंसा वगैरे तत्वांचा काठी लोकांवर व इतर उपद्व्यापी लोकांवर चांगला परिणाम, होऊन त्यांचीं मनें ताळ्यावर आलीं असें पुष्कळ लोकांचें ह्मणणें आहे; परंतु या पंथाचा उपक्रम सौराष्ट्रांतील इंग्रजी अंमलाबरोबरच झाला असल्यामुळें दंगेधोपे बंद करण्याचें श्रेय स्वामीनारायणास देण्यापेक्षां इंग्रजांस देणें आह्मांस योग्य दिसतें. या धर्मपंथाची इतर हकीकत वाचली व ऐकिली ह्मणजे त्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होत नाहीं. स्वामीनारायणास पैसा गोळा करण्याचा हव्यास मनस्वी होता, व महाराजांप्रमाणें अनन्वित प्रकार जरी फारसे ऐकिवांत नाहींत, तथापि या पंथाच्या अध्यापकांतही उपरतीचा अंश नसतो ह्मटलें तरी चालेल.

# भाग १३.

## सौराष्ट्रकविवृंद.

**यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो**
**भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः।**
**हर्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु बाणः**
**केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय*॥**

प्रसन्नराघव.

स्कंदपुराण व भट्टिकाव्य—नरसी मेहेता—मेहेराज केशव—नाथजी मालजी—मुक्तानंद व कालिदास—रणछोडजी अमरजी दिवाण—करसनदास मूळजी—मनोरदास स्वामी—नागजी—दलपतराम डाह्याभाई—अमरजी जीभाई शुक्ल—मणिशंकर जटाशंकर—भोजो भगत—केशवलाल हरिराम—हिराचंद कानजी—कमळा कुंवरी—हरदास—गट्टूजी घनश्यामजी.

प्रस्तुत भागांत सौराष्ट्रांतील कविवृंदाविषयीं दोन शब्द लिहावयाचे आहेत. राजकोट येथील वॉटसन संग्रहालय नांवाच्या उपयुक्त संस्थेचे क्युरेटर वे. वल्लभजी हरिदत्त आचार्य या सद्गृहस्थांनीं पुष्कळ परिश्रम करून सौराष्ट्रांतील कवीं विषयीं बरीच माहिती मिळविली आहे, व ती त्यांनीं कृपा करून आनंदानें मला दिली हे त्यांचे मजवर मोठे उपकार आहेत. या माहितीचा हा भाग लिहिण्यांत फार उपयोग झाला व महाराष्ट्र वाचकांस यापेक्षां विस्तृत वर्णनाची रुचि लागण्याचा जर संभव असता

---

* जिचा केशकलाप ह्मणजे **चोर**, **म**यूरकवि हाच जिचीं कर्णभूषणें, **भास** हा जिचें हास्य, जिचा विलास ह्मणजे कविकुलगुरु **का**लिदास, जिचा हर्ष ह्मणजे **श्रीह**र्षकवि, **बाण** हाच जिच्या हृदयामध्यें वास करणारा **म**दन, (पंचबाण), ती **कविताकामिनी** कोणाच्या मनांत कौतुक उत्पन्न करणार नाहीं सांग बरें ?

तर सौराष्ट्रांतील वाङ्मया संबंधीं आणखी बरीच माहिती मिळाली असती. परंतु येथें मुख्य मुख्य कवींचें अगदींच त्रोटक वृत्त लिहावयाचें आहे.

प्राचीन ग्रंथांपैकीं मुख्य ग्रंथ ह्मटला ह्मणजे स्कंदपुराण हा होय. या ग्रंथाचीं प्रभासखंड, नगरखंड, काशीखंड व ब्रह्मोत्तरखंड अशीं चार खंडें इकडे प्रसिद्ध असून त्यांच्या संस्कृत हस्तलिखित प्रती कोठें कोठें आहेत. हा ग्रंथ फार प्राचीन गणला जातो, तथापि तो बराच अलीकडील असावा असें दिसतें. प्रसिद्ध भट्टिकाव्याचा कर्ता वलभीचा (वळा) रहिवाशी होता. या नंतर मध्यंतरींच्या कवीं विषयीं फारशी माहिती मिळत नाहीं.

पंधराव्या शतकाच्या सुरुवातीसच प्रसिद्ध कवि व साधु नरसी मेहेता याचा जन्म जुनागढास इ. स. १४०४ त झाला. हा जातीचा नागर ब्राह्मण होता. यानें परमेश्वरसहायानें पुष्कळ अद्भुत कृत्यें केलीं अशी प्रसिद्धि आहे. आपल्या महिपतीच्या भक्तविजयांत नरसी मेहेत्याचें सुरस वर्णन आहे. याचीं काव्यें व पदें पुष्कळच आहेत, व तीं सर्व भक्तिरसानें ओतप्रोत भरलेलीं आहेत. या प्रांतीं प्राकृत कवितेचा उपक्रम करून तिचा प्रघात यानेंच पाडला. शास्त्री लोकांचें चोंहींकडे वर्चस्व असतांना, व प्राकृत भाषेस कोणी विचारीत नसे अशा वेळीं प्राकृत कविता करून तिची लोकांत अभिरुचि उत्पन्न करणें लहान सहान काम नव्हतें, परंतु अशा विकट कामास योग्य असे अनेक सद्गुण मेहेताजीच्या अंगीं परिपूर्ण भरले होते. आपल्या शूद्र कवीप्रमाणें मेहेताजीची वाणी रसाळ व वर्तनक्रम शुद्ध व निष्कारा असल्यामुळें त्याच्या कवितेंत कृत्रिमत्व बिलकुल नसे व लहान थोरांस ती सारखीच प्रिय होई व अद्यापि आहे. जुनागढच्या रा. मंडलिकाच्या वेळेस हा होऊन गेला व याच्या मरणानंतर लवकरच जुनागढास सुलतानशाहीचा अंमल बसला. मेहेताजीचें घर व रुमाल जुनागढास अद्यापि आहे. महाराष्ट्रशूद्रकवीप्रमाणेंच हाही मोठा साधु होता. भक्ति व वैराग्य याच्या अंगीं पूर्ण बाणलीं असल्यामुळें याची

बायको व मुलगा मेला तेव्हां 'त्रास चुकला' अशा अर्थाचा एक दोहरा याने केलाः—

" भलुं थयुं भागी जंजाळ ।
सुखें भजीशूं जयगोपाळ ॥ "

सोळाव्या शतकांतील प्रसिद्ध कवि ह्मणजे नवानगरचा लुआणा जातीचा मेहेराज केशव हा होय. यानें हिंदी व गुजराती अशा दोनही भाषांत कविता केली आहे. हिंदू व मुसलमान या दोन जातींत सलोखा करण्याचा स्तुत्य प्रयत्न यानें पुष्कळ केला. सोळाव्या शतकांत मुसलमानी अंमल पूर्णपणें बसला असल्यामुळें हिंदू व मुसलमानांत एकमेकांविषयीं प्रेमभाव वाढणें अत्यंत इष्ट होतें व या दृष्टीनें पहातां मेहेराजाची योग्यता खरच मोठी आहे. हा मोठा साधु होता व यानें काढलेला खीजडा (शमीवृक्ष) नांवाचा पंथ अद्यापही प्रसिद्ध आहे. सुरतेंत याचें मंदिर आहे, व इतर ठिकाणींही एकंदर सुमारें २६ मंदिरें आहेत. ज. इ. स. १५८२.

सतराव्या शतकांत नाथजी मालजी नांवाचा जुनागढचा नागर ब्राह्मण कवि होऊन गेला. हा जुनागढचा कारभारी होता, व त्याचा विनति नांवाचा करुणरसपर ग्रंथ प्रसिद्ध आहे. याला नबाबानें एकदां कैदेंत टाकिलें तेव्हां तुरुंगांत यानें हा ग्रंथ लिहिला. यांत श्रीकृष्णाचें वर्णन केलें आहे व कविता फार सुरस आहे. या ग्रंथामुळें कवीची कारागृहांतून सुटका झाली. ज. इ. स. १६४८.

अठराव्या शतकांतील कवींपैकीं फक्त तिघांविषयींच येथें उल्लेख करावयाचा आहे. पैकीं पहिला मुक्तानंद गढड्याचा स्वामीपंथी साधु रामानंदाचा शिष्य होता. हिंदी, गुजराती व व्रज या तीनही भाषांत हा लिहीत असे. वेदांत व उपासना या विषयांवर याचीं पदें फार प्रसिद्ध आहेत व गुजरातींत गायनाच्या पदांचा प्रचार यानेंच प्रथम पाडिला. ज. इ. स. १७६१. मुक्तानंदाचा समकालीनच कालिदास ह्मणून एक कवि

होऊन गेला. याची भाषा सरळ व रसाळ आहे व याचें ध्रुवाख्यान फार प्रसिद्ध आहे. ज. इ. स. १७६१.

पुढें इ. स. १७६८ त **रणछोडजी अमरजी दिवाण** याचा जुनागढास जन्म झाला. हा जातीनें नागर ब्राह्मण असून आग्रही शिवभक्त असे. गुजरातींत 'गरबा' नांवाचा छंद यानेंच सुरू केला व त्या वेळेपासून हा छंद अत्यंत लोकप्रिय आहे. याची हिंदी व गुजराती दोनही भाषांत कविता पुष्कळ व चांगली आहे. हा जुनागढचा दिवाण असतांना यानें फारसी भाषेंत **सोरठ-इ-तवारीख** नांवाचा सोरठ व नवानगरचा इतिहास लिहिला. हा सौराष्ट्रांतील पहिलाच इतिहास ग्रंथ होय. याचीं भक्तिपर पदें फार सुरस आहेत. याला नरसी मेहेत्याचा अवतार समजतात.

एकोणिसाव्या शतकांत सौराष्ट्रास भूषणीभूत असे बरेच सत्कवी होऊन गेले. **करसनदास मूळजी** हा महुव्याचा वाणी असून यानें नीतिवचन, संसारसुख, कुटुंबमित्र वगैरे ऐहिक विषयांवर सुंदर ग्रंथ लिहिले आहेत. हा गुजरातेंतील सुधारकाग्रणी विलायतेस जाऊन आला होता. यानें वैष्णव महाराजांचे अनाचार उघडकीस आणिले व त्यामुळेंच महाराजा लायबल केस या नांवानें प्रसिद्ध असलेला कज्जा पुष्कळ दिवस मुंबईच्या हाय कोर्टांत चालला होता, व त्यांत महाराजांचीं बरींच बिंगें उघडकीस आलीं. हा स्त्रीशिक्षणाचा मोठा पुरस्कर्ता होता व यानें मोठा स्वार्थत्याग करून कित्येक गुजराती शाळा स्थापन केल्या. करसनदास इ. स. १८३२ चे सुमारास मुंबईस होता.

दुसरा प्रसिद्ध कवि ह्मणजे **मनोरदास स्वामी** हा होय. हा वसावडा नागर होता. याचें मनहर पद नांवाचें काव्य भक्ति व वेदान्त विषयांवर प्रसिद्ध आहे. यानें भगवद्गीतेवर पदबोधिनी टीका लिहिली आहे. या कवीचा मूर्तिपूजेवर कटाक्ष होता व स्वामीनारायण मताचें यानें खंडण

केलें होतें. याची कविता हिंदींत व गुजरातींत आहे. मनोरदास फारसी भाषेंत फार प्रवीण असून उत्तम मुत्सद्दी होता. यानें १८३८ त संन्यास घेतला. स्वामी महाराजांची खोटे दस्तऐवज बनविण्यांत फार ख्याति होती असें ह्मणतात, व याची प्रचीती त्यांनीं अमदावादेच्या जज्जास एकदां स्वतः होऊन आणून दिली होती असें ऐकिवांत आहे.

गाधडक्याचा औदीचू ब्राह्मण नागजी याचा जन्म इ. स. १७८८ त झाला. हिंदी भाषेंत 'कुंडाळेया' छंदांत यानें एक ज्योतिष ग्रंथ लिहिला आहे त्यांत पुढील होणारीं कित्येक वर्षांचीं पाऊसपाण्याचीं भविष्यें लिहून ठेविलीं आहेत, व येथील लोकांचा त्यांवर बराच विश्वास आहे.

दलपतराम डाह्याभाई हा प्रसिद्ध गुजराती कवि वढवाणचा श्रीमाळी ब्राह्मण होता, व याचा जन्म १८२० त ह्मणजे पोलिटिकल एजंटीच्या सुरुवात्तीच्या वर्षींच झाला. याची कविता पुष्कळच आहे व ती तशीच सुरसही पण आहे. हा ऐन इंग्रजींतील कवि समाजसुधारणाप्रिय असून त्याचे बालविवाह व पुनर्विवाह हे दोन मार्मिक गद्यग्रंथ प्रसिद्ध आहेत. उधारीचा झगडा नांवाचा ग्रंथ फार लोकप्रिय आहे. दलपतरामानें 'गरबा' छंद फार प्रचारांत आणिला. उपदेश, नीति, देशसुधारणा, वगैरे विषयांवर फार सरळ, सभ्य, व सुंदर भाषेंत याची कविता आहे ह्मणून शालोपयोगी पुस्तकांत मुख्यत्वें तिचाच प्रवेश झाला आहे. यानें हिंदी भाषेंतही श्रवणाख्यान नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. दलपतरामाच्या कवित्वावर खुष होऊन इंग्रज सरकारनें त्याला सी. आय. ई. हा किताव दिला येवढेंच नव्हे तर पेनशनही पण करून दिलें होतें!

जुनागढचा नागर ब्राह्मण अमरजी जीभाई शुक्ल हा १८१५ त जन्मला. पुनर्विवाहप्रतिबंधकुठार या नांवाच्या गद्यपद्यबंध ग्रंथांत शुक्लजींनीं दलपतरामाचा निषेध केला आहे. हा उत्तम वैदिक असून उत्तर वयांत यानें संन्यास घेतल्यावर एक दोन संस्कृत ग्रंथही लिहिले. भाव-

नगरचे प्रसिद्ध दिवाण गौरीशंकर उदेशंकर यांचा गुरुस्वामी ह्मणून त्यांच्या हयातींत त्याची प्रसिद्धि असे.

इ. स. १८२२ त जुनागढचा नागर कवि **मणिशंकर जटाशंकर** जन्मला. हा जाडा विद्वान् असून फार हुषार होता. नैतिक व धार्मिक विषयांवर याचे फार सुंदर ग्रंथ आहेत. याचीं राजकोटास व जुनागढास स्मारकें आहेत. अमदाबाद येथील गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीनें याचें ३६०००.० रुपयांचें स्मारक केलें आहे.

**भोजो भगत** हा लोकप्रिय कवि सौराष्ट्रांत १८३० च्या सुमारास होऊन गेला. हा अमरेळीचा कुणबी होता. याची कविता नीति व उपदेशपर असून भाषा फार जोरदार व कडक आहे. आपल्या कडीच्या फटक्याप्रमाणें या कवीनें 'चाबका' नांवाच्या छंदांत पुष्कळ कविता केली आहे व तिची या प्रांतांतील लोकांत फार आवड आहे.

मोर्वीचा प्रश्नोरा नागर कवि **केशवलाल हरिराम** इ. स. १८५२ त जन्मला. याची कविता लोकांस फार प्रिय आहे व इ. स. १८९७ त तो निवर्तल्यावर त्याचीं सुरस काव्यें व सुभाषितें केशवकृति नांवाच्या पुस्तकरूपानें नुकतींच प्रसिद्ध झालीं आहेत. हा कवि आर्यधर्मप्रकाश नांवाच्या धर्मसंबंधीं मासिक पुस्तकाचा चालक होता.

**हिराचंद कानजी** हा लिंबडीचा वाणी १८६७ त होऊन गेला. कुमारिकाबोध व कुमारबोध या नांवाचे यानें रचिलेले दोन गुजराती ग्रंथ शिक्षण खात्यांत प्रचलित आहेत. याची कविता उपदेशपर असे, व शृंगारावरही यानें कविता केली आहे. पिंगळादर्श नांवाचा छंदःशास्त्रावर हिंदी भाषेंत यानें केलेला सुंदर ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**कमळा कुंवरी** ही प्रसिद्ध स्त्री नरसी मेहेत्याची सून होय. हिनें पतिविरहाख्यान, कृष्णचरित्र वगैरे सुंदर काव्यें लिहिलीं आहेत. हिच्या कवितेंत भक्ति व करुण हे दोन रस भरलेले आहेत. मेहेताजींनीं प्रतिज्ञा केलेली

कविता हिनें सर्व पुरी केली ह्मणतात. "नरसैयचा स्वामी" असें शेवटीं ती हिची कविता.

हरदास नांवाच्या कवीची वेळ बरोबर समजत नाहीं. हा कुतियाणा चा शिंपी असून यानें रामायणाचे 'चंद्रावळे' केले आहेत. यांना 'हरदासिया' ह्मणतात, व यांची गांवठी लोकांत फार चहा आहे.

जिचें प्रथम पुष्प नरसी मेहेता हें होय त्या सौराष्ट्रकविमालिकेंतील शेवटचें पुष्पही पण तितकेंचें मनोरम आहे. गट्टूजी घनश्यामजी हा विख्यात अंधकवि जुनागढच्या गुसायजी महाराजांचा नातू होय. याची विद्वत्ता फार मोठी असल्यामुळें याला भारतमार्तंड ह्मणतात. सुधारक लोक याची आपल्यांत गणना करितात. शीघ्रकवित्वाबद्दल याची फारच ख्याति आहे. धर्म, भक्ति व उपदेश या विषयांवर याची संस्कृत व गुजराती कविता फारच सुरस, मार्मिक व प्रासादिक आहे. पंडित गट्टूलालजी नें त्यांचीं काव्यें तोंडानें बोलत जाई परंतु लिहीत नसे, यामुळें त्याची कविता फारशी उपलब्ध नाहीं. पंडितजीचें शीघ्रकवित्व इतकें असे कीं कोणत्याही विषयावर पुराण सांगावयास सांगितलें असतां तो प्रसंगास योग्य अशा त्या वेळेसच स्वतः केलेल्या कवितेंत भराभर सांगत असे. हा जन्मतःच कवि होता व शतावधानी असे.

सौराष्ट्रांतील कविवृंदाची ही अशी संक्षिप्त माहिती आहे. महाराष्ट्र वाचकांस गुजराती किंवा हिंदी भाषेचा परिचय नसल्यामुळें यापेक्षां विस्तृत माहिती दिल्यास कंटाळवाणी होईल, ह्मणून प्रमुख कवींचें थोडक्यांत गुणवर्णन केलें आहे व आतां येथेंच हा भाग पुरा करितों.

---

# भाग १४.

## उपसंहार.

यत्रानेकः क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको
यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र चान्ते न चैकः ।
इत्थं चेमौ रजनिदिवसौ दोलयन्द्वाविवाक्षौ
कालः काल्या भुवनफलके क्रीडति प्राणिशारैः* ॥

भर्तृहरि.

आतां पूर्वी लिहिलेल्या इतिहासाचें फिरून एकदां अवलोकन करून आणखी दोन शब्द लिहावयाचे आहेत ह्मणजे पहिल्या पुस्तकाची समाप्ति झाली. तिसऱ्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें सौराष्ट्रावर निरनिराळ्या हिंद राजांचा अंमल असतांना प्रांतांतील लोकांस फारसा त्रास पोंचत नसे. बौद्धधर्मी लोक जरी आपल्या धर्माविषयीं अत्यंत अभिमानी असत तरी अशोकामध्यें स्वधर्माचा फाजील आग्रह बिलकुल नव्हता. या अत्यंत नीतिमान् व दयाळ राजाच्या कारकीर्दीत जीं अनेक लोकोपयोगी कृत्यें झालीं त्यांमुळें सर्व प्रजा मोठ्या आबादानींत होती. पुढें क्षत्रप, गुप्त, वलभी वगैरे वंशांचे राजे राज्य करीत असतांनाही प्रांताची सुबत्ता कमी झालेली दिसत नाहीं. येवढी गोष्ट खरी कीं अशोकाच्या वेळची लोकांमधील सत्यप्रीति व धर्माची आवड हीं पुढें कमी होत चाललीं होतीं. अशोकाचे वेळीं हिंदुस्थानांत आलेला एक ग्रीक प्रवाशी व पुढें ७००–८०० वर्षांनीं आलेला एक चिनी प्रवाशी यांचीं सौराष्ट्रांतील लोकांचीं वर्णनें ताडून पहातां ही अवनति लक्ष्यांत येईल. ग्रीक प्रवाशानें हिंदू लोक धार्मिक व नीतिमान्

---

* जेथें होते बहुतचि तिथें राहिला एक आतां
एकाचे ते बहु परि पुन्हां शून्य हो काळ जातां ।
कालीसंगें भुवनफलकीं क्रीडतो काल तत्र ।
टाकी फांसे रजनिदिन हे सोंगट्या प्राणिमात्र ॥

आहेत अशी प्रशंसा केली आहे. परंतु सात, आठ शतकें लोटल्यावर सौराष्ट्रांत आलेला चिनी प्रवाशी प्रांतांतील संपत्तीचें वर्णन करितो खरा आणि तेथील लोकांस फार नांवें ठेवितो. हा ह्मणतो "सौराष्ट्रांतील लोक दुष्ट चालीचे, तामसी प्रकृतीचे व हलक्या स्वभावाचे असून त्यांना विद्येची अभिरुचि बिलकुल नाहीं." असो. ज्यास आह्मी प्राचीनकाळ असें ह्मटलें आहे त्या काळीं सौराष्ट्रांत मुख्य वस्ती ह्मणजे किनाऱ्या किनाऱ्यानेंच होती. समुद्रकिनाऱ्यामुळें सौराष्ट्राचें इतर देशांशीं पुष्कळच दळणवळण होतें, परंतु किनाऱ्याची पंधरा सोळा मैलांची पट्टी खेरीज करून मध्यभागीं सर्वत्र दाट जंगल होतें. या प्रांताच्या व विशेषेंकरून सोमनाथाच्या संपत्तीची कीर्ति दूरवर पसरली होती, व ह्मणूनच १०२४ त गझनीचा महमद मोठ्या सैन्यानिशीं सोमनाथावर चालून आला. जुनागढावरून सोमनाथास जाण्यास जरी वाट होती तथापि महमद किनाऱ्या किनाऱ्यानेंच सोमनाथावर गेला.

किनाऱ्यावरील प्रदेशाची जरी इतकी भरभराट झाली होती तथापि नवव्या शतकाच्या अखेरीस चूडासमा रजपुतांनीं वंथळीस स्थापिलेलें राज्य हळुहळु बळावत चाललें होतें, व पुढें बाराव्या शतकांत जेव्हां अनहिलवाडचा अंमल चांगला बसला तेव्हां सुद्धां जुनागढचें राज्य घेण्यास अनहिलवाडच्या सिद्धराजास मोठेच प्रयास पडले, व शेवटीं अंतस्थ दगलबाजीच्याच सहायानें जुनागढ हातीं आलें. इ. स. ११२५ त सिद्धराजानें जुनागढ घेतल्यावर स्वतंत्र चूडासमा राज्याचा कांहीं वेळ लोप होऊन अनहिलवाडचा अंमल सर्वत्र बसला. अनहिलवाडच्या राज्याचे सुपरिणाम सौराष्ट्रांत लवकरच दिसून आले. प्रथमच प्रांतांत सैन्य आणण्यासाठीं सिद्धराजानें जंगलांतून एक सुंदर रस्ता केला, व ठिकठिकाणीं तलाव, विहिरी, वगैरे बांधून सर्व सोयी केल्यामुळें प्रांतांतील दळणवळण वाढलें. सिद्धराज व त्याच्या नंतर कुमारपाल या दोघांनींही लोकांस सुखी करून

सर्वत्र नांव मिळविलें. अशोकाच्या नंतर विद्वत्तेची व विद्वानांची हेळणा होऊं लागली होती, परंतु अनहिलवाडच्या राजांच्या अंगीं परमेश्वरभक्ति व विद्याभिरुचि चांगलीच असल्यामुळें विद्वानांची संभावना पूर्ववत् सर्वत्र होऊं लागली. "राजा कालस्य कारणम्" हा न्याय हिंदुस्थानास विशेषें करून लागू आहे, व त्या अन्वयें लोकांमध्येंही धर्माची व विद्येची आवड उत्तरोत्तर सौराष्ट्रांत वाढत चालली. पूर्वीं चिनी प्रवाशानें वर्णन केलेली स्थिति सुधारत गेली, व लोकांचें धार्मिक व नैतिक श्रेष्ठत्व जरी अशोकाच्या प्रजेइतकें उत्कृष्ट नव्हतें, तथापि मध्यंतरींच्या अवनतीचा व पुढें अनहिलवाडचा पाडाव झाल्यानंतरच्या निकृष्ट अवस्थेचा विचार केला ह्मणजे चावड्यांच्या कारकीर्दीची स्तुति केल्यावांचून राहवत नाहीं. मुसलमानांच्या आगमनानें अर्वाचीन अर्ध्या मुर्ध्या सुधारणेचे राठ दुर्गुण प्रांतांत शिरले नव्हते, व अनहिलवाडच्या अंमलांत रयतेचा प्रतिपाळ, शरणागतास आश्रय देणें, निर्मल शौर्य, निष्काम क्षमाशीलत्व, विद्याभिरुचि, स्त्रियांना मोकळीक वगैरे उत्कृष्ट गुण दिसून येत. सौराष्ट्रांत राजा व प्रजा यांचा परस्पर संबंध पूर्वींपासूनच फार प्रेमाचा असे, व एक हजार वर्षांचे धक्के खाऊनही आजपर्यंत प्रजाजनांच्या मनांतील प्रेमाचा अंकुर शाबूद आहे. त्याची योग्य प्रकारें जोपासना करणें व त्याचा सुवृक्ष बनवून त्याच्या मधुर फळांचा आस्वाद घेणें, अथवा तो अंकुर जाळून त्याची राख करणें व प्रजेचीं हृदयें शून्य करून तिचे शाप घेणें हें त्या त्या संस्थानिकांच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे.

गिझनीच्या महमदाची १०२४ तील सोमनाथावरील प्रसिद्ध स्वारी ह्मणजे मुसलमानांचें सौराष्ट्रांत पहिलें आगमन होय. हा प्रांत महमदाच्या मनांत भरला होता खरा, परंतु दुसऱ्या कांहीं अडचणीमुळें त्यास परत जावें लागलें व पुढें अनहिलवाडचें वर्चस्व सर्वत्र पसरल्यावर मुसलमानांस बरेच दिवस अवकाश मिळाला नाहीं. इ. स. १२९७ त अनहिलवाडचें

राज्य आटोपलें, व लवकरच दिल्लीच्या एका सेनापतीनें सोमनाथ लुटलें. इकडे सिद्धराजानें जिंकिल्यावर पुनः जुनागढचें राज्य रानें परत घेतलें होतें, व इ. स. १३६० पर्यंत त्यानें मुसलमानांस दाद दिली नाहीं, परंतु त्या वर्षीं मात्र मुसलमानी अंमल जुन्या सोरठेंत कायमचा वसला. मुसलमानांशीं संबंध आल्यामुळें इतर देशांशीं दळणवळण वाढून व्यापाराची भरभराट होत चालली. परंतु महमदी धर्मवेडामुळें हिंदुधर्माचा छळ होऊं लागला व हिंदु धर्माभिमान्यांचें कोठें कांहीं चालेनासें झालें, व 'जनांत एक व मनांत एक' असले ढोंगी देशांत या वेळेपासूनच निपजूं लागले असावेत. गुजरातेंत दिल्लीचे सुभेदार अंमल करीत असत व इ. स. १३९८ त एका सुभेदारानें पुनः एकदां सोमनाथाचा विध्वंस केला.

गुजरातचे सुभेदार १४०३ त स्वतंत्र होऊन अमदावादचे सुलतान बनले. या सुलतानांशीं जुनागढच्या रांनीं बरेच दिवस टक्कर दिली. परंतु १४७२ त शेवटीं महमद बेगड्याच्या कारकीर्दींत जुनागढच्या रा मंडलीकाचा पराभव होऊन चूडासमा राज्याची अखेर समाप्ति झाली. या पुढें जुनागढास रायजादा जहागिरदार व सुलतानाचा मुसलमान ठाणेदार यांचा संयुक्त अंमल सुरू झाला, तो तसाच १५९१ त भूचर मोरीच्या युद्धांत बादशहाच्या सुभेदाराचा अंमल पूर्णपणें बसून जुनागढास फौजदारी सुरू होईपर्यंत जेमतेम चालला होता.

सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं काठी लोक सौराष्ट्रांत उतरले व ठिकठिकाणीं त्यांनीं आपलीं ठाणीं दिलीं. त्यांच्या पैकीं प्रसिद्ध लोमा खुमाण यानें सौराष्ट्राच्या धामधुमींत बरींच महत्वाचीं कृत्यें केलीं. थोड्या वेळांत काठी लोकांनीं बराच मुलूख हाताखालीं घातला, व पुढें जरी झाला रजपुतांनीं त्यांना झालावाडांतून व जाडेजांनीं हालारांतून हांकून दिलें तथापि इतर ठिकाणीं त्यांचीं लहान लहान राज्यें कायम राहिलीं. काठी लोक प्रथम

आले तेव्हां त्यांचा प्रांतांत फार दरारा असे. हे अंमल रानटी व बरेच क्रूर असल्यामुळें यांस लोक अत्यंत भीत असत हें साहजिकच आहे.

इ. स. १५२६ त सुलतान बहादुर गुजरातच्या गादीवर बसला. याच्या आंगांत हुषारी फारशी नसल्यामुळें फिरंगी लोकांची पाश्चात्य मगरमिठी दिव बेटाभोंवतीं कायमची बसली. प्रांतांत सर्वत्र फारच घोंटाळा माजला, व जो तो स्वतंत्र होण्याच्या उद्योगास लागला. कुव्याच्या झाला रजपुतांनीं गडबड करून बराच मुलूख गमाविला. इकडे कच्छमधून जाडेजा रजपूत खालीं आले व जाम रावळानें १५४० त नवानगर राज्य स्थापिलें. येथील जाम सतराव्या व अठराव्या शतकांत बरेच पराक्रमी होते. नागणी बंदरचे जेठवे, खंबाळियाचे वाढेले, ध्रोळचे चावडे हे पूर्वीच स्वतंत्र झाले होते त्यांना आतां जामनें आपल्या आश्रयाखालीं घेतलें. मोर्वीस फत्तेहखान बलोच हा स्वतंत्र होताच, परंतु ११३० च्या सुमारास तातारखानानें मोर्वी आपल्या राज्यांत सामील केलें. गुजरातेंत सुलतानशाहीच्या उमरावांत १५५४ त तंटे सुरू झाल्यामुळें सौराष्ट्रांतील सरदारांची चढती होत गेली. हळवदचे झालेही हळुहळु वळावत चालले. छायाचे जेठवे जरी जामनगरच्या पेंचांत होते तथापि स्वतंत्रतेच्या मार्गास लागलेले होते. इतक्यांत अकबर बादशहानें १५७३ त गुजरात जिंकून घेतली, परंतु सोरठ परगणा कांहीं वेळ स्वतंत्रच राहिला. याप्रमाणें बाहेरील सर्व दाब नाहींसा झाल्यामुळें सौराष्ट्रांत बेबंदशाही माजली.

मुसलमान लोकांचा सौराष्ट्रांत शिरकाव झाला ही गोष्ट राजकीय दृष्ट्याच फक्त महत्वाची होती असें नाहीं; त्याच्या योगानें हिंदू समाजांत बरीच उलथापालथ झाली. बौद्धधर्मी राजे जरी आपल्या धर्माच्या प्रसाराविषयीं उत्सुक असले, तरी मुसलमानांच्या विपरीत धर्मवेडापुढें त्यांचा आग्रह कांहींच नव्हे. महमदी लोक परधर्माच्या लोकांस अत्यंत पीडा देत. मुसलमान लोक जात्या क्रूर असल्यामुळें त्यांना हिंदू लोक

फार भीत असत, व हळुहळु ते त्यांच्यापासून दूर राहूं लागले. मुसलमानांच्याच भीतीनें इकडे झनान्याचा प्रचार पडला. ही चाल राजेरजवाड्यांत व रजपुतांत इतकी फैलावली कीं केवढाही लहान गिराशिया असो, त्याच्या घरांतील बायकांचीं नेसावयाचीं वस्त्रें फाटकीं असलीं तरी पुरवलीं, परंतु झनान्याच्या पडद्यास एखादें बारीकही छिद्र खपावयाचें नाहीं. मुसलमान येण्यापूर्वीं सौराष्ट्रांत स्वयंवराचीही चाल प्रचलित होती असें दिसतें, परंतु झनान्याच्या पूर्वींच ती नाहींशी झाली असली पाहिजे. लोकांमध्येंही दुटप्पीपणा अधिक वाढत गेला व धर्माचें पाऊल हळुहळु मागें पडत चाललें.

पूर्वीं लिहिल्याप्रमाणें सोळाव्या शतकाच्या अखेरीस सुलतानशाहीचा अंत होऊन याच शतकांत **स्वतंत्र संस्थानांचा** ओनामा झाला. अकबरानें गुजरात जिंकिल्यावर अमदावादचा शेवटचा सुलतान मुझाफर हा १५८३ त दिल्लीहून पळून आला व त्यानें बराच मुलूख परत जिंकून घेतला. सौराष्ट्रांतील जाम सताजी, दौलतखान घोरी, लोमा खुमाण, रायजादा जहागिरदार वगैरेंनीं मुझाफरची बाजू घेऊन त्यांचें व बादशहाच्या सुभेदाराचें **भूचर मोरीस** १५९१ त मोठेंच युद्ध झालें. त्यांत सुभेदाराचाच जय झाला व त्याचा अंमल सौराष्ट्रांत पूर्णपणें बसला, व यापुढें जुनागढ हें बादशहाच्या फौजदाराचें ठाणें बनलें. जुनागढचा फौजदार जरी नांवाला सुभेदाराच्या खालचा अंमलदार होता तरी वास्तविक तो स्वतंत्रच असे. अकबराच्या हयातीपर्यंत सौराष्ट्रांत व्यवस्था ठीक होती परंतु पुढें जहांगीर व शहाजहान यांच्या कारकीर्दींत या प्रांताचा बंदोबस्त अगदींच ढिला पडला व १६ व्या शतकांत स्वतंत्र झालेलीं संस्थानें चांगलींच बळावलीं. या स्वतंत्र संस्थानांस बादशहास खंडणी द्यावी लागे खरी, परंतु ती खंडणी वसूल करतांना फौजदारास व बादशाही फौजेस पुरे पुरे होई. सतराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास शिवाजीचा

उदय होऊन बादशाही सैन्यास बरेंच काम आलें, व तिला मराठ्यांच्या स्वाऱ्या संभाळतां संभाळतां पुरे वाट झाली. ही संधि साधून सौराष्ट्रांतील बऱ्याच संस्थानिकांनीं हातपाय पसरले. यांत प्रमुख ह्मणजे पोरबंदर, ध्रांगध्रा व शिहोर येथील संस्थानिक हे होत. ह्यांपैकीं ध्रांगध्रा व शिहोर हीं सौराष्ट्राच्या नाक्यावरील संस्थानें होत, व या पुढील घडामोडींत यांचा पुष्कळच संबंध येतो. सतराव्या शतकांत मराठ्यांचा संबंध सौराष्ट्राशीं प्रत्यक्ष रीतीनें आला नाहीं. इ. स. १७०७ त अवरंगजेब मरेपर्यंत त्या बादशहानें आपलें राज्य सांवरून धरिलें होतें परंतु नंतर सर्वत्र बखेडा माजला. त्या पूर्वींच सौराष्ट्रांतील बादशाही खंडणीचा वसूल मुलुखगिरी फौजेशिवाय होत नसे. जुनागढचे फौजदार अगदीं निर्बल होऊन गेले होते व जेमतेम आपला मुलूख राखून होते. गुजरातच्या सुभेदारीवर व जुनागढच्या फौजदारीवर भराभर नव्या नव्या नेमणुका व्हाव्या व दोन्हीकडे त्यांच्या प्रतिनिधींच्या मार्फतच काम चालावें हाच पुष्कळ दिवसपर्यंत क्रम चालला. इ. स. १७१९ त जेव्हां महाराजा अजितसिंहाची गुजरातच्या सुभेदारीवर नेमणूक झाली तेव्हां पिलाजी गाईकवाडास चांगलेंच फावलें. अजितसिंहास मोंगलांची सत्ता बिलकुल पसंत नव्हती. व तो मराठ्यांच्या हालचालींकडे जाणून बुजून कानाडोळा करी. ही संधि साधून पिलाजीनें सोनगड येथें आपलें ठाणें बसविलें. पुढें १७२२ त मराठ्यांनीं प्रथम सिहोरवर हल्ला केला परंतु तेथें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. तथापि या वेळेपासून मराठ्यांचा प्रवेश सौराष्ट्रांत होऊन पुढें त्यांच्या स्वाऱ्या या प्रांतावर वरचेवर होऊं लागल्या. पिलाजी फिरफिरून सौराष्ट्रांत येई परंतु त्याचा नीट जम बसेना. सौराष्ट्रांतील खंडणीचा वसूल बादशहाच्या मुलुखगिरी फौजा करीतच असत. इ. स. १७२७ त पिलाजीच्या हातीं बडोदा शहर आलें, व पुढें मराठ्यांचा कायमपणें सौराष्ट्रांत शिरकाव होऊन १७३५ त जेव्हां दमाजी सौराष्ट्रांत खंडणी वसूल करण्यास आला तेव्हां त्याला कांहींच अडचण पडली नाहीं. पुढील वर्षीं

ह्मणजे १७३६ त विरमगांव मराठ्यांच्या हातीं आलें व त्यामुळें सौराष्ट्राचा रस्ता खुला होऊन मराठे प्रतिवर्षी खंडणी वसूल करूं लागले. मधून मधून सुभेदाराची फौजही वसुलास येई व अशानें सौराष्ट्रांतील संस्थानिकांस खंडणीचा दुवार जाच पोंचे. खंडणीच्या वेळीं नवानगरच अंमळ दंडेली करी, परंतु पोरबंदरचें कांहीं चालत नसे. ध्रांगध्रा नाक्यावरच असल्यामुळें त्याला बरेच धक्के खावे लागत. शिहोरचा कारस्थानी सरदार एकदम खंडणीची भरपाई करून मोकळा होई. इ. स. १७५३ त मराठ्यांनीं अमदाबाद घेतलें व १७५७ त तें शहर कायमचें मराठ्यांच्या ताब्यांत आलें. या वेळेपासून मराठ्यांची खंडणी कायदेशीर झाली.

मराठ्यांनीं अमदाबाद घेण्याच्या पूर्वी ह्मणजे १७४८ तच जुनागढास शेरखान बाबी स्वतंत्र होऊन तो आपणास नबाब ह्मणवूं लागला होता. यामुळें मराठ्यांनीं अमदाबाद जिंकून घेतलें तेव्हां सौराष्ट्रांत बादशाही मुलूख मुळींच नव्हता. लहान मोठे राजे स्वतंत्र होऊन बसले होते व फुरसदीचा वेळ ते आपसांत भांडणें करण्यांत घालवीत असत. या परस्परांतील कज्जांचा मराठ्यांस चांगलाच उपयोग होई. कारण या वेळेच्या सुमारासच पेशवे व गाईकवाड यांच्या सत्तेस उत[illegible] लागली होती, व त्यांस सौराष्ट्राकडे विशेष लक्ष्य [illegible] फावत नसे. अशा संधीस जर सौराष्ट्रांतील संस्थानिक [illegible]लते तर त्यांची स्वतंत्रता कायम राहून त्यांना कदाचित् म[illegible]ध्यां जाचांतून आपली सुटका करून घेतां आली असती. परंतु ही [illegible]द्धि त्यांना सुचली नाहीं व सौराष्ट्रांत अंतस्थ कलह वाढतच गेला. प्रत्येक बलिष्ठ संस्थानाचें लक्ष्य दुसऱ्याचा पाडाव करून आपल्या मुलखाचा विस्तार करण्याकडेच असे व या हांवीपुढें त्यांस दुसरें कांहीं दिसत नसे.

असो. अठराव्या शतकाच्या द्वितीयार्धापासून सौराष्ट्रांत पांच मुख्य संस्थानें झालीं. ईशान्य व आग्नेयीच्या नाक्याच्या ठिकाणीं ध्रांगध्र्याचें झाला संस्थान व भावनगरचें गोहेल संस्थान अशीं दोन बरींच ब[illegible]

संस्थानें होतीं. उत्तरेस नवानगरचा जाडेजा रजपूत जाम
होऊन बसला होता. पश्चिमकिनाऱ्यावर पोरबंदरचें जेठवा
बरेंच वाढलें होतें. आणि या सर्वांच्या मध्यावर आतां जुनागढचें
मुसलमानी संस्थान आलें. बादशाहीच्या वेळेपासून चालत
आपला सौराष्ट्रांत खंडणी वसूल करण्याचा हक्क जुनागढ स्वतंत्र
सुद्धां चालेल तेथें चालवीत असेच.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकाच्या शेवटीं सौराष्ट्र
वाडी सत्ता अंमळ ढिली पडली होती. गाईकवाड व
१८०५ त जो तह झाला तो गाईकवाडास आपली
फार उपयोगीं पडला. पुढें १८०७ त कर्नल वॉकर
व त्यानें व गाईकवाडी अंमलदारांनीं मिळून सौराष्ट्रांतील खंडणी
मुकरर केली. इ. स. १८१२–१३ च्या दुष्काळांत गाईकवाडी
दारांनीं जुनागढ व काठी यांच्याकडून बराच मुलूख बळकाविला.
च्यांचे हक्क इंग्रजांस प्राप्त झाले तेव्हां लहानमोठ्या सर्व संस्थानांच्य
डणीसंबंधीं बहुतेक कायमची व्यवस्था झाली, व अद्यापपर्यंत ती
चालू आहे. इ. स. १८२० त इंग्रजांनीं सौराष्ट्रांत आपला एजं
मिला व गाईकवाडी खंडणीचाही वसूल इंग्रजांच्या मार्फतच होऊं लागला.
याप्रमाणें सौराष्ट्रावरील सार्वभौम सत्ता इंग्रजांच्या हातीं पडली.

सौराष्ट्रांत इंग्रजी सुरू झाल्यावर संस्थानें सर्व बहुतकरून थंड झालीं,
परंतु वाघेरे लोकांनीं वरचेवर मनस्वी उपद्रव दिला. इंग्रजांनीं यांचीं व
मियाणा वगैरे इतर बंडखोर जातींचीं पुष्कळ बंडें मोडून शेवटीं सर्वत्र
शांतता केली. वाघेरेलोकांनीं शेवटच्या १८६८ च्या युद्धांत दोन गोऱ्या
अंमलदारांचे बळी घेतले, परंतु त्या वेळेपासून या लोकांचा उपद्रव अगदीं
कमीसा झाला.

सौराष्ट्रांत इंग्रजी झाल्यापासून प्रांतांत सर्वत्र हळुहळु शांतता होऊन लोकांस पुष्कळ सुख होऊं लागलें. काठी, रजपूत व शेवटीं मराठे यांनीं प्रांतांतील लोकांस पुरेपुरें करून सोडिलें होतें. जिकडे तिकडे दंगाधोपा पसरल्यामुळें जो तो नेहेमीं विवंचनेंत असे. संस्थानिकांस प्रजेच्या हिताची कळकळ बिलकूल न वाटून ते एकमेकांत कज्जे उपस्थित करण्यांत चूर असत. अशा वेळेस सामान्य लोकांत जोम न रहाणें साहजिकच आहे. सत्य व निस्पृह माणसाची चाड अशा वेळीं कशी रहाणार ? संस्थानिकांचें वांकडें पाऊल पडत असल्यास त्यांस सत्य व सरळ परंतु अप्रिय असा हिताचा उपदेश करणारे कांहीं लोक धीरानें पुढें उभे राहिलेच तरी नीच जुलमाच्या व नीचतर स्वार्थैकपरतेच्या प्रचंड लाटेनें ते उलथे पडून त्यांचा नाश व्हावा हें स्वाभाविकच होय. नदीच्या प्रचंड ओघापुढें मोठमोठीं झाडें उमळून पडतात, परंतु लव्हाळा ज्याप्रमाणें वांकून राहून आपला बचाव करून घेतो तद्वतच यावेळींही वाऱ्यास पाठ देणारे, प्रसंगापुरते गोड बोलणारे, सत्यासत्याची विशेष पर्वा न करणारे, स्वहितापुढें देशहितास तुच्छ लेखणारे, अंगांतील आंगरख्याप्रमाणें सहज आपले धनी बदलणारे, ठोक्यासरशीं पोंचा पडणारे, सदैव नम्र असे स्वधर्मपराङ्मुख व स्वाभिमानशून्य लोक निपजले यांत नवल नाहीं. नेहेमीं पायाखालीं तुडविल्यामुळें मैदानांतील गवताची जात जशी आस्ते आस्ते नरम होत जाते त्याप्रमाणें असंख्य धक्के खावे लागून सौराष्ट्रांतील सामान्य लोकांमधील पुष्कळ उदात्त गुणांचा लोप होऊन व त्यांचा जोम नाहींसा होऊन ते नेभळे बनले असें आह्मांस वाटतें. कारकुनी बाण्याची बुद्धिमत्ता कायम राहिली, परंतु इतर सरळ उपाय न चालल्यामुळें वक्रनीतीचा उपयोग करून त्यांना आपला कार्यभाग साधून घेणें भाग पडे. ह्मणूनच इकडच्या मुत्सद्दीवर्गांत नेटाचे व सीधे पुरुष सांपडणें अंमळ कठीण पडतें. इकडे एक प्रचलित उक्ति आहे तिचा अर्थ असा आहे. "काठी जहागिरदारांस जेरीस आणून आपला कार्यभाग साधून घेतला पाहिजे, व मुसलमानांस खुष

ठेवून आपलें काम चांगलें साधेल. जहागिरदार रजपूत असेल तर त्याची उपासमार व हाल करूनच त्यास तांळ्यावर आणावयास पाहिजे."*

वर लिहिल्याप्रमाणें राज्यकारभारांत कुनीतीचें बीज पेरलें गेलें असतांही व प्रांतांत कोठेंही स्वास्थ्य नसतांही सौराष्ट्राचा व्यापार चांगला चालला होता. इंग्रजी व आगगाडी येण्यापूर्वीं सर्वच व्यापार बंदरांतून चालत असे व सौराष्ट्रांतील बंदरांची सर्वत्र फारच प्रसिद्धि असे, व अद्यापही कांहीं बंदरांचा व्यापार बराच मोठा आहे. व्यापारांतील हुषारी व कांहीं अंशीं सचोटी हे गुण येथील लोकांत दृष्टीस पडतात. येणाऱ्या जाणाऱ्याचा परामर्ष सौराष्ट्रांत फार उत्तम प्रकारें घेतला जात असे व अद्यापही हा सद्गुण लोकांमध्यें कांहीं अंशीं कायम आहे. फिरंगी लोकांकडे जाण्यापूर्वीं दीवचा व्यापार फारच मोठा असे. सिहोरच्या ठाकुराच्या हुषारीनें व दक्षतेनें भावनगरची भरभराट होऊन अद्यापही प्रांतांतील अर्धा अधिक व्यापार याच बंदराच्या वांट्यास येईल. सामान्य लोकांत लष्करी बाण्याचा अभाव असल्यामुळें व प्रांतांस चोहींकडून चांगला समुद्रकिनारा असल्यामुळें व्यापारवृद्धि झाली व लोकांत व्यापारास लागणारे अनेक गुण वाढत गेले. शेतकींत ज्याप्रमाणें सुधारणा बिलकुल नाहीं ह्मटलें तरी चालेल, तशी व्यापाराची स्थिति नसून लोक दिवसेंदिवस अधिक सुधारत चालले आहेत.

ज्यानें सौराष्ट्राचा इतिहास साधारणपणें वाचला असेल त्याला कळून येईल कीं इंग्रजलोक प्रथम आले त्यापूर्वीं सुधारलेली न्यायपद्धति तेथें असणें हें शक्यच नव्हतें. अठराव्या शतकांत रजपूत, काठी व मराठे यांचा एकसारखा धांगडधिंगा चालला असतां प्रांतांतील न्यायदेवता बिचारी स्वस्थपणानें न्याय करणार कशी? तथापि न्यायाचें तत्व मनुष्यस्वभावांत भिन-

*कांठा तो गांठा भला, ताजा भला तुरक
टंटा तो टरवरतां भला, अर्धी भूक अर्धी भरक।

लेलें असल्यामुळें कोणत्या तरी प्रकारचा न्याय हा समाजांत असतोच व या नियमान्वयें सौराष्ट्रांतील ब्रह्मघोंटाळ्यांत सुद्धां जो तो आपापल्यापरी न्याय करून घेतच असे. सुधारलेल्या रीतीप्रमाणें योग्य प्रकारानें किंवा बाहेरून दिसण्यांत तरी योग्य प्रकारानें, न्यायाचा बटवडा होत नसे. ज्याच्या जें हातीं लागेल तें त्यानें घ्यावें व ज्याच्या मनगटांत जोर असेल त्यानें त्याचा बचाव करावा हा सोपा मार्ग सर्वत्र प्रचलित होता.* प्रांतांत सर्वत्र दंडेली असे. निरनिराळ्या संस्थानांच्या योगानें प्रांताचे असंख्य तुकडे पडले असल्यामुळें व संस्थानिकांचा एकमेकांशीं मनस्वी वैरभाव असल्यामुळें एका राज्यांत पुंडाई करून दुसऱ्या मुलखांत शिरलेल्या मनुष्यास बहुतकरून आश्रय मिळे. पुढें हा डाव मनांत राहून गेल्यामुळें या संस्थानिकांच्या मुलखांस दंगाधोपा करण्यास दुसरे संस्थानिक उत्तेजन देत हें उघडच आहे. याप्रमाणें अव्याहत क्रम चालत असे. इतर धंद्याप्रमाणें प्रांतांत दंगाधोपा करून ह्या संस्थानिकाची मदत घेऊन त्या संस्थानिकाचा मुलूख लूट, त्याच्याकडून पैसे खाऊन तिसऱ्यास धमकी दे, तो घाबरला ह्मणजे चवथ्यास नाडण्यास सुरुवात कर हा कित्येक लोकांचा उपजीविकेचा धंदाच होऊन बसला. हाच प्रकार संस्थानांतील खेड्यापाड्यांतून सुद्धां माजला. राजाकडे दाद लागली नाहीं ह्मणजे लोक आपल्याच हातांत न्यायदंड घेऊन एकमेकांचें शासन करीत. लोकांस राजाकडून योग्य न्याय मिळेनासा झाला ह्मणजे, व असा प्रकार वरचेवर होऊं लागला ह्मणजे, बिचाऱ्या सर्वतोपरी गांजलेल्या प्रजाजनानें चोंहींकडून घेरलेल्या जनावराप्रमाणें प्राणाची पर्वा न करितां कोणावर तरी

---

*The good old rule, the simple plan,
That he should take who has the power
And he should keep who can.

WORDSWORTH.

ठेवून आपलें काम चांगलें साधेल. जहागिरदार रजपूत असेल तर त्याची उपासमार व हाल करूनच त्यास ताळ्यावर आणावयास पाहिजे."*

वर लिहिल्याप्रमाणें राज्यकारभारांत कुनीतीचें बीज पेरलें गेलें असतांही व प्रांतांत कोठेंही स्वास्थ्य नसतांही सौराष्ट्राचा व्यापार चांगला चालला होता. इंग्रजी व आगगाडी येण्यापूर्वी सर्वच व्यापार बंदरांतून चालत असे व सौराष्ट्रांतील बंदरांची सर्वत्र फारच प्रसिद्धि असे, व अद्यापही कांहीं बंदरांचा व्यापार बराच मोठा आहे. व्यापारांतील हुषारी व कांहीं अंशीं सचोटी हे गुण येथील लोकांत दृष्टीस पडतात. येणाऱ्या जाणाऱ्याचा परामर्ष सौराष्ट्रांत फार उत्तम प्रकारें घेतला जात असे व अद्यापही हा सद्गुण लोकांमध्यें कांहीं अंशीं कायम आहे. फिरंगी लोकांकडे जाण्यापूर्वी दीवचा व्यापार फारच मोठा असे. सिहोरच्या ठाकुराच्या हुषारीनें व दक्षतेनें भावनगरची भरभराट होऊन अद्यापही प्रांतांतील अर्धा अधिक व्यापार याच बंदराच्या वांट्यास येईल. सामान्य लोकांत लष्करी बाण्याचा अभाव असल्यामुळें व प्रांतास चोहींकडून चांगला समुद्रकिनारा असल्यामुळें व्यापारवृद्धि झाली व लोकांत व्यापारास लागणारे अनेक गुण वाढत गेले. शेतकींत ज्याप्रमाणें सुधारणा बिलकुल नाहीं ह्मटलें तरी चालेल, तशी व्यापाराची स्थिति नसून लोक दिवसेदिवस अधिक सुधारत चालले आहेत.

ज्यानें सौराष्ट्राचा इतिहास साधारणपणें वाचला असेल त्याला कळून येईल कीं इंग्रजलोक प्रथम आले त्यापूर्वी सुधारलेली न्यायपद्धति तेथें असणें हें शक्यच नव्हतें. अठराव्या शतकांत रजपूत, काठी व मराठे यांचा एकसारखा धांगडधिंगा चालला असतां प्रांतांतील न्यायदेवता बिचारी स्वस्थपणानें न्याय करणार कशी? तथापि न्यायाचें तत्व मनुष्यस्वभावांत भिन-

*कांठा तो गांठा भला, ताजा भला तुरंक

टंटा तो टरवरतां भला, अर्धी भूक अर्धी भरक।

लेलें असल्यामुळें कोणत्या तरी प्रकारचा न्याय हा समाजांत असतोच व या नियमान्वयें सौराष्ट्रांतील ब्रह्मघोंटाळ्यांत सुद्धां जो तो आपापल्यापरी न्याय करून घेतच असे. सुधारलेल्या रीतीप्रमाणें योग्य प्रकारानें किंवा बाहेरून दिसण्यांत तरी योग्य प्रकारानें, न्यायाचा बटवडा होत नसे. ज्याच्या जें हातीं लागेल तें त्यानें घ्यावें व ज्याच्या मनगटांत जोर असेल त्यानें त्याचा बचाव करावा हा सोपा मार्ग सर्वत्र प्रचलित होता.* प्रांतांत सर्वत्र दंडेली असे. निरनिराळ्या संस्थानांच्या योगानें प्रांताचे असंख्य तुकडे पडले असल्यामुळें व संस्थानिकांचा एकमेकांशीं मनस्वी वैरभाव असल्यामुळें एका राज्यांत पुंडाई करून दुसऱ्या मुलखांत शिरलेल्या मनुष्यास बहुतकरून आश्रय मिळे. पुढें हा डाव मनांत राहून गेल्यामुळें या संस्थानिकांच्या मुलखांत दंगाधोपा करण्यास दुसरे संस्थानिक उत्तेजन देत हें उघडच आहे. याप्रमाणें अव्याहत क्रम चालत असे. इतर धंद्याप्रमाणें प्रांतांत दंगाधोपा करून ह्या संस्थानिकाची मदत घेऊन त्या संस्थानिकाचा मुलूख लूट, त्याच्याकडून पैसे खाऊन तिसऱ्यास धमकी दे, तो घाबरला ह्मणजे चवथ्यास नाडण्यास सुरुवात कर हा कित्येक लोकांचा उपजीविकेचा धंदाच होऊन बसला. हाच प्रकार संस्थानांतील खेड्यापाड्यांतून सुद्धां माजला. राजाकडे दाद लागली नाहीं ह्मणजे लोक आपल्याच हातांत न्यायदंड घेऊन एकमेकांचें शासन करीत. लोकांस राजाकडून योग्य न्याय मिळेनासा झाला ह्मणजे, व असा प्रकार वरचेवर होऊं लागला ह्मणजे, बिचाऱ्या सर्वतोपरी गांजलेल्या प्रजाजनानें चोंहींकडून घेरलेल्या जनावराप्रमाणें प्राणाची पर्वा न करितां कोणावर तरी

---

*The good old rule, the simple plan,
That he should take who has the power
And he should keep who can.

WORDSWORTH.

तुटून पडावें व मनाची तरी एक प्रकारें शांति करून घ्यावी हें मनुष्यस्वभावानुरूपच आहे. सौराष्ट्रांतील संस्थानिक आपल्या प्रजेस न्याय देण्याविषयीं काळजी घेत नसत इतकेंच नव्हे, तर प्रजाजनांचा व दुसऱ्या एकाद्या संस्थानिकाचा किंवा गिराशियाचा वाद असला तर बिचाऱ्या रयतेस बिलकुल थारा मिळत नसे. अशी स्थिति येऊन पोंचल्यावर प्रांतांत सर्वत्र चोऱ्या व्हाव्या, दरोडे पडावे, दंगा माजावा, पुंडाचा सुळसुळाट व्हावा, गरीब दुबळ्या लोकांच्या जिनगीची व अन्नाची खराबी होत जावी व शेवटीं प्राणघातापर्यंत मंजल येऊन ठेपावी ह्यांत नवल तें काय? दिवसाढवळ्या दरोडे घालणें, प्रतिष्ठित लोकांची इजत भ्रष्ट करणें, जंगम मालमत्तेचें हरण करून तृप्ति न झाल्यामुळें स्थावर जिनगीची नाहक नासधूस करणें, व आपणास दुखाविलेल्या माणसाचा खून करून सूड घेणें, या गोष्टी लाजिरवाण्या वाटत नसत. इतकेंच नव्हे, तर त्यांत कित्येक लोक भूषण मानीत, व जो आपल्यावर झालेल्या जुलमाचा या प्रकारांनीं प्रतिकार न करील तो केवळ नेभळा समजला जात असे. अशा वेळीं प्रांतांतील सर्व संस्थानिकांवर अंमल चालविणारी सार्वभौम सत्ता तरी कोणा समंजस राजाच्या हातीं असावयास पाहिजे होती. अठराव्या शतकांत सौराष्ट्रांत सर्वत्र मराठ्यांची सार्वभौम सत्ता सर्व संस्थानिकांस कबूल असून ते निमुटपणें खंडणीची भरपाई करीत. परंतु सौराष्ट्रांत व्यवस्थितपणें राज्य करण्याची मराठ्यांनीं केव्हांही अपेक्षा केली नाहीं. हंगामावर येऊन खंडणी वसूल केल्यानंतर आपलें कर्तव्य संपलें असेंच त्यांस वाटे. अंतस्थ कारस्थानांतही प्राप्तीचा चांगलाच भाग दिसल्याशिवाय ते फारसें मन घालीत नसत. रानांत चरून यावें, वाटेल तसा आपला बचाव करून घ्यावा व धार काढण्याच्या वेळीं मात्र धन्याचा हुकूम मानावा अशा दुभत्या गाईप्रमाणें सौराष्ट्राची योजना मराठेबहादुरांनीं केली असावी असें दिसतें. खंडणीचा वसूल करून एकदां सौराष्ट्रावर त्यांनीं

पाठ फिरविली ह्मणजे फिरून खंडणीची वेळ येईपर्यंत ते तिकडे लक्ष्य देत नसत. श्रीशिवाजीमहाराजां सारख्या अत्यंत न्यायनिष्ठ व नीतिमान् पुरुषानें रुजत घातलेल्या, बाळाजी विश्वनाथा सारख्या पोक्त राजनीतिनिपुण पुरुषानें जतन केलेल्या, बाजीराव, शिंदे, होळकर यां सारख्या कुशल व राजकारणी योद्धयांनीं वाढविलेल्या, व पुढें थोरल्या माधवरावा सारख्या बुद्धिमान् व न्यायप्रिय पुरुषानें सांवरलेल्या महाराष्ट्रराज्यरूपी तरुवरास त्याच्या प्रतिनिधींची सौराष्ट्रांतील वर्तणूक अत्यंत लांछनास्पद होय; व मराठी राज्याचा केवढाही कट्टा अभिमानी असला तरी त्यासही हें वर्तन पाहून खालींच मान घालावी लागेल असें आह्मांस वाटतें. महाराष्ट्रराज्यवृक्षाचीं जीं निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळीं कलमें रुजलीं त्यांपैकीं दोन ल...ंच्या ज्या फांद्या सौराष्ट्रावर पसरल्या त्यांना अत्यंत कडु व घातुक फलें असें न ह्मटलें तर वस्तुस्थितिविपर्यास होईल.

## पहिलें पुस्तक समाप्त.

आयुष्य हेंचि रत्नपेटी
मार्जी भजनरत्नें गोमटीं
ईश्वरीं अर्पूनिया लुटी
आनंदाची करावी ॥

रामदास.

... दुमत्य।

असावी असें दिसतें. १७.

# सौराष्ट्र.

## पुस्तक दुसरें

### भाग १.

### ध्रांगध्रा संस्थान.*

उत्तरअक्षांश २३° व पूर्वरेखांश ७१° या सुमारास हें संस्थान आहे. चें क्षेत्रफळ सुमारें ११६७ चौरस मैल आहे, व १९०१ च्या खानेसुमारीवरून लोकसंख्या ७०८८० आहे. प्रदेश बहुतकरून सपाटच आहे, व जरी उमरड्याजवळ सुमारें ५०० फूट उंचीच्या लहान लहान टेंकड्या आहेत तथापि मुलखास डोंगराळ ह्मणतां येणार नाहीं. जमिनींत तांबडा, गुलाबी, पिंवळा, सफेत वगैरे तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचा रेतीचा इमारती दगड सांपडतो, व याची सर्व सौराष्ट्रांत व गुजरातेंत फार प्रसिद्धि आहे. कोठें उत्तमकाळी जमीन तर कोठें अगदीं रेताळ असे प्रकार आढळतात. झाडें ाहेत. संख्या वर्षास आयात

* या पुस्तकांत मुख्य मुख्य संस्थानांची विशेष माहिती देण्याचा आमचा आहे. ध्रांगध्रा, नवानगर, पोरबंदर, जुनागढ व भावनगर हें सौराष्ट्रांतील पंचायतन होय; व या संस्थानांची निराळी माहिती अधिक विस्तारानें देण्या केला आहे. या मुख्य संस्थानांच्या बरोबर त्यांच्या कुळांतून उतरलेल्या च्याच जातीच्या इतर लहान लहान संस्थानांचीही माहिती दिली जाईल. ध्रांगध्रा संस्थान व झाला रजपुतांचीं इतर संस्थानें यांचीच हकीकत दिली इतर चार मोठ्या संस्थानांची हकीकत दुसऱ्या भागांत देण्याचा विचार आहे.

फारच विरळा दृष्टीस पडतात व जीं कांहीं आहेत तीं फक्त खेड्यांच्या आसपासच आहेत, व खुद्द ध्रांगध्र्याच्या जवळच्या कुरणांत एक लहानसें खुरटें जंगल आहे. या प्रांतांतून वहात जाणाऱ्या नद्या ह्मणजे बांभण, चंद्रभागा, बिलगंगा व फुलका या होत; परंतु या सर्व साधारण ओढ्यापेक्षां क्वचितच मोठ्या असतील. या सर्व नद्यांच्या पात्रांत विहिरी काढून हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत पिकांस पाणी पाजतात. या संस्थानांत कित्येक सुंदर तलाव आहेत. हळवद व मानर येथें अनुक्रमें सामतसर, व मानसर या नांवाचे तलाव आहेत सीथा येथें अंबाव व चंद्रासर असे दोन चांगले तलाव आहेत, व मालनीआड व कानत्रोडी येथें दोन तलाव सुरेख बांधिलेले आहेत. खुद्द ध्रांगध्र्यास रणमलसर नांवाचें एक तळें आहे व शहरच्या दक्षिणेस एक बरेंच मोठें तळें अलीकडे २० वर्षांपूर्वींच बांधिलेलें आहे. शिवाय प्रांतांत लहान लहान तळीं विपुल आहेत. परंतु फाल्गुनाचे सुमारास सगळीं कोरडीं पडतात. सर्व मिळून विहिरी सुमारें अडीच हजार आहेत. रणाच्या नजीकच्या भागांत पाणी सुमारें १२।१३ हातांवरच लागतें, पण इतर ठिकाणीं कोठें कोठें ४५ हात खोल जावें लागतें. या प्रांतांत हिवाळ्यांत अतिशय थंडी व उन्हाळ्यांत अत्यंत उष्मा होतो, तरी सौराष्ट्रांतील इतर भागांशीं ताडून पहातां हवा एकंदरींत निरोगी आहे. मार्गशीर्ष, पौष महिन्यांत पारा ७३° पर्यंत खालीं उतरतो व वैशाखांत ११८° पर्यंत चढतो. पाऊस सुमारें १४।१५ इंच पडतो.

मुळींच नसल्यामुळें जाळण्याच्या कामीं मुख्यत्वेंकरून शेणीच वा-

हल्लीं हल्लीं इकडे नारळाचीं झाडें आणिलीं आहेत व २०००

दिसूं लागले आहेत. मुख्य पीक ह्मटलें ह्मणजे कापूस होय.

री, ज्वारी, मूग, माठ, हरभरा, तीळ, गहूं, जव, कुळीथ हीं

पिकतात. तंबाकू आणि ऊंसही कोठें कोठें पिकवितात. प्रांतां-

नावा अशा पाळींव जनावरें ह्मणजे उंट, ह्मशी, गाई, मेंढरें, बकरे, घोडे, गाढवें,

असा कुत्रीं व मांजरें हीं होत. दरबारी गाईचा कळप फार सुंदर आहे व कांहीं

गाई वेळेस दहा दहा शेर दूध देतात. ध्रांगध्रा व झालावाडचे बैल सामान्यतः फार चांगल्या जातीचे असतात, व गुजरात, वागड, आणि सिंधमधून उत्तम प्रकारचे बैल वरचेवर आणितात त्या योगानें स्थानिक अवलाद पुष्कळच सुधारते. हालार खेरीज करून ध्रांगध्रा व झालावाडचीं गाढवें इतर भागांतील गाढवांपेक्षां फारच मोठीं व मजबूत असतात. काठेवाड (जुनें); गोहिलवाड व सोरठ येथील घोड्यांपेक्षां ध्रांगध्र्याचे घोडे स्वस्त असून अधिक टणक असतात. या प्रांतांत पूर्वीं सिंह असत, परंतु १८४० पासून ते नाहींसे झाले. रानडुक्कर, विबळ, चित्ता, कोळशिंदा, लांडगा, तरस, कोल्हा, खोकुड, ससा, साळिंदर, नीळगाय, हरीण, सांबर व रानांतील गाढव वगैरे शिकारींचीं जनावरें होत. रानगाढवें रानांत रहातात व रात्रीं चरण्यास गांवांत येतात. हिवाळ्यांत बदकें वगैरे दृष्टीस पडतात.

एकंदर ७०८८० लोकसंख्येपैकीं ६१८५४ हिंदू आहेत व ४४१६ मुसलमान आहेत. मोढ वाणी व श्रीमाळी ब्राह्मण मुख्यत्वेंकरून व्यापार करितात. औदिच जातीचे पुष्कळ ब्राह्मण लोक हळवद येथें शेतकी करितात. प्रांतांत कांहीं बोहरे लोक आहेत ते किरकोळ विक्रीचा व्यापार करितात, परंतु खोजा व मेमण जातीचे मुसलमान फारच थोडे आहेत. मुसलमान आहेत ते सर्व कोणी तेली, वाणी, कोष्टी, किरकोळ दुकानदार व नोकरींतील शिपाई असेच आहेत. सर्व प्रांतांत मिळून २०५०९ घरें आहेत. संस्थानच्या अमलाखालीं, हल्लीं एकंदर १३४ खेडीं आहेत. शिवाय कांहीं वादांत आहेत. खुद्द ध्रांगध्रा शहरची लोकसंख्या १४७७० आहे.

ध्रांगध्रा, हळवद व सीथा हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें होत. वर्षास व्यापाराची घडामोड सुमारें ३०५०९०० रुपयांची होते, पैकीं आयात माल १००५७०० रुपयांचा व निर्यात २७७६४७ रुपयांचा. फक्त कापूसच १७२०८० रुपयांचा बाहेर जातो. आगगाडी होण्यापूर्वीं सर्व

कापूस धोलेऱ्यासच जात असे, परंतु मुंबईच्या व्यापाऱ्यांनीं वढवाण व ध्रांगध्र्यास अडती बसविल्यापासून तेथेंच पुष्कळ कापूस खपतो, धोलेऱ्यास पाठविणें सोयीवार पडत नाहीं. शिवाय फातडीं ८००० चीं व लोंकर २६५६७ रुपयांची बाहेर जाते. बाहेरून येणारे जिन्नस ह्मणजे तूप (८०००० रुपये), धान्य (७६५००० रुपये), आणि धातू (२५०० रुपये), इमारती लांकूड (१०००० रुपये), कापड (३६५०० रुपये), साखर (३०००० रुपये).* ध्रांगध्र्याचा रेतीचा करड्या रंगाचा दगड फारच उत्तम प्रकारचा असतो. या संस्थानांत रणाच्या किनाऱ्यावर ध्रांगध्र्यापासून वायव्येस १४ मैलांवर कुडा येथें वडागर मीठ तिगस्त सालपर्यंत करीत. परंतु त्यापासून इंग्रजसरकारचें नुकसान होऊं लागल्यामुळें कुडा येथील मिठागरें बंद पाडिलीं. सौराष्ट्रांत वडागर मीठ येथेंच काय तें पिकवीत असत. आतां सर्वत्र घसीऊं मिठावरच गुजारा करावा लागतो.† पैशाच्या देवघेवीचा व्यापार मुख्यत्वेंकरून ब्राह्मण, वाणी, अतीत, रजपूत व चारण या जातींचे लोक करितात. सावकारांमध्यें आपआपसांत ४॥ ते ६ टक्के व्याजाचा दर आहे. परंतु व्यापाऱ्यांस पैसे देणें झाल्यास ७॥ पासून ९ टक्क्यांच्या खालीं देत नाहींत. शेतकरी व गिराशिया लोकांस ९ पासून १२ च्या खालीं रक्कम मिळणें कठीण, मात्र स्वतःची जमीन लिहून दिल्यास ९ टक्क्यांनींच रक्कम मिळते. दागिने गहाण टाकिल्यास ६ नें रक्कम मिळूं शकते. सावकाराकडून पैसे काढून व्याजाचे ऐवजीं जमिनीचा कांहीं भाग गहाण टाकण्याचाही रिवाज आहे; या पद्धतीस वटांतर ह्मणतात.

झालावाडांत फार प्राचीनकाळापासून मीठ पिकवीत असत. गुजराते-

---

* हे व वरील इतर आंकडे आमचे मित्र ध्रांगध्रा राजसाहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी रा. रा. गणपतराव पुरुषोत्तम परुळेकर यांनीं कृपा करून आह्मांस दिले.

† या दोन जातींच्या मिठामधील फरक पुढें दिला आहे.

तील सुलतानशाही पूर्वी, व पहिल्या पहिल्या सुलतानांच्या कारकीर्दीत सुद्धां विरमगांव, मांडल, पाटडी वगैरे ठिकाणें झाला रजपुतांच्या ताब्यांत असून झालावाडांत मोडत असत. विरमगांव झालावाडांतील मुख्य शहर असल्यामुळें मुसलमान लोक त्यालाच झालावाड ह्मणत. पुढें त्यास मोठें झालावाड ह्मणूं लागले. महीकांठ्यांतील सादरा हें लहान झालावाड होय. या वेळेस मिठाचा सर्व व्यापार झालांच्याच हातीं असे. परंतु विरमगांव, मांडल, पाटडी एका पाठीमागून एक त्यांच्या हातांतून गेल्यावर मिठाचा व्यापार प्रथम गुजरातच्या सुलतानांकडे आला, व नंतर दिल्लीच्या बादशाहांच्याकडे गेला. हें मीठ फारच उत्कृष्ट असतें व मिठागरांत केलेलें असल्यामुळें त्यास 'वडागर' ह्मणतात. पश्चिमेकडे नवानगरच्या मुलखांत मीठ करतात तें पुटें दिल्या शिवाय करतात त्यास 'घसीऊं' ह्मणतात. मोठीं मिठागरें ह्मणजे तळ्याप्रमाणें बांधून काढून आंत चौकोनी ( गुळाच्या ढेंपींस वाटोळीं करितात त्याप्रमाणें ) घरें पाडतात. तळ्यांत लाटीनें समुद्राचें पाणी घालून तें वाळं देतात. अशीं पुष्कळ पुटें देऊन एकावर एक बरेच थर जमले ह्मणजे ताटांतून बर्फाच्या वड्या कापल्याप्रमाणें तुकडे पाडतात, व याप्रमाणें 'वडागर' मीठ तयार होतें. दुसऱ्या जातीचें मीठ ह्मणजे समुद्राचें पाणी वाळलें ह्मणजे वर बसलेला थर काढून घेतात. यास पुटें न दिल्यामुळें हें अगदीं नरम असतें. यास 'घसीऊं' ह्मणतात. सौराष्ट्रांत सर्वत्र घसीऊं मीठच वापरतात, कारण यावर कर नसल्यामुळें तें फार स्वस्त विकतें. हें मीठ प्रांताबाहेर जाऊं नये ह्मणून संस्थानिकांस खबरदारी घ्यावी लागते, कारण याची सर्व जबाबदारी त्यांच्याच माथीं आहे. वडागर मिठाचे तुकडे खडीसाखरेप्रमाणें दिसतात. मुसलमानी ग्रंथांत झिंझुवाडा येथील मिठाचें वर्णन आढळतें. झाला रजपूत जेव्हां हळवदकडे हटले तेव्हां त्यांनीं कुड्यास मिठागर स्थापन केलें. वेळोवेळींच्या तहनाम्यांत या मिठागराचें नांव ( निमकसार )

आढळतें. झिंझुवाडा, पाटडी वगैरे ठिकाणीं झाले मीठ करीत असत त्याच जातीचें हेंही मीठ असे. पूर्वीं येथें मिठाचा व्यापार फारच मोठा असे; परंतु इंग्रज सरकारांचा मिठावर कर बसून कुड्याचें मीठ सौराष्ट्राच्या बाहेर जाणें बंद झाल्यापासून ध्रांगध्रा संस्थानास मिठाचें उत्पन्न अवघें ३८९२८ मण होत असे. हेंही इंग्रज सरकारांस ठीक न वाटून १९०० सालीं कुड्याचें मिठागर बंद करण्यांत आलें.

## इतिहास.

ध्रांगध्र्याचा राजसाहेब हा झाला वंशांतील आहे. मकवाणा कुळाची झाला ही एक शाखा होय. मकवाणा कुळाची उत्पत्ति मार्कंड ऋषीपासून झाली असें ह्मणतात, व हे मकवाणे नगर पारकर जवळ थला महालांत केरंती येथें राज्य करीत असत. विहिआसदेवाचा मुलगा केसरदेव यानें सिंधच्या हद्दींत दांडगाईनें फार लुटालूट केल्यामुळें तेथील राजानें केरंतीवर स्वारी करून मकवाण्यांस तेथून हांकून लाविलें व केसरदेवास ठार केलें. केसरदेवास हरपाळदेव नांवाचा एक मुलगा होता, तो गुजरातेंत पाटण येथें पळून गेला, व तेथें सोळंकी वंशांतील प्रसिद्ध करण वाघेला याच्या नोकरीस राहिला. करणराजाच्या पट्टराणीस लागलेलें भूत हरपाळदेवानें काढल्यामुळें त्याच्यावर राजाची मर्जी सुप्रसन्न झाली, व राणी त्यास आपल्या भावाप्रमाणें मानूं लागली. करणानें हरपाळदेवास झालावाडांत १८०० व भालांत ५०० गांवांची जहागीर करून दिली. भालांतील ५०० गांवें हरपाळानें राणीस नजर ह्मणून परत दिलीं.*

---

* दुसरी एक कथा अशी आहे कीं हरपाळ एका रात्रींत जितक्या गांवांच्या वेशीस तोरणें बांधील तितक्या गांवांची जहागीर त्याला देण्याचें करणनें कबूल केलें असतां हरपाळानें दैविक शक्तीच्या सहायानें २३०० गांवांस तोरणें बांधलीं, व ज्या ठिकाणीं उजाडलें त्या गांवास 'दीघडीऊ' (उजाडलें) हें सार्थ नांव दिलें.

हरपाळदेव पाटडीस रहात असे. एके दिवशीं राजवाड्या समोरील पटांगणांत मुलें खेळत असतां तेथें एक मस्त हत्ती सुटला. हरपाळाची राणी, प्रसिद्ध सोळंकी वंशांतील प्रतापाची कन्या, माडीवर बसली होती तेथून तिनें हात लांब करून आपल्या मुलास उचलून घेतलें. गुजरातींत ઝાલવું, ह्मणजे पकडणें यावरून ज्या मुलाची अशी अकल्पित रीतीनें सुटका झाली त्याच्या वंशास ઝાલા (झाला) ह्मणूं लागले. त्याच वेळेस एक चारणाचा मुलगा तेथेंच उभा होता; त्याला राणीनें एका बाजूस सारिलें व त्यामुळें तो बांचला. त्या वेळेपासून चारणांच्या या शाखेस "तापरिआ" (તાપરીઆ) ह्मणूं लागले. हरपाळास सोळंकी राणीपासून चार अपत्यें झालीं. १. सोढोजी, हा हरपाळा नंतर गादीवर बसला. २. मांगूजी, याला जांबू परगण्याची जहागीर मिळाली व हल्लींचा लिंबडी येथील ठाकूर याचाच वंशज होय ३. शेखराजजी, यास सचाणा व चोरवडोदरा येथील जिवाईचे हक्क मिळाले, व याचे वंशज अद्यापपर्यंत चोरवडोदरा व साणंद परगण्यांत वतनदार आहेत. ४. उमादेवी नांवाची मुलगी.

सोळंकी राणी ता. ६ एप्रिल, १११५ (संवत् ११७१ चैत्र वद्य १३) या दिवशीं मरण पावली. झाला रजपूत हिला दैविक शक्ति मानून हिची पूजा करितात, व चैत्र वद्य १३ स जर एखादा पुढें टाकण्याजोगा सण पडला तर तो तिच्या सन्मानार्थ त्या दिवशीं पाळीत नाहींत. हा दिवस ते मोठा दुःखाचा मानतात. भाट लोक ही 'मेली' असें न ह्मणतां तिचें अमरत्व दाखविण्यासाठीं 'अंतर्धान' पावळी असें ह्मणतात.

ही राणी मेल्यानंतर हरपाळदेव पाटडीहून जाऊन धमा गांवीं राहिला व त्यानें थरपारकरच्या सोढ्या राजाची कुंवरी राजकुंवरबा हिच्याशीं लग्न लाविलें. हिला नऊ पुत्र झाले.*

---

* १. खवडजी, यानें एका काठिआणीशीं लग्न लाविलें. खवड काठी जातीचा हा

२. हरपाळदेव इ. स. ११३० त मरण पावला व त्याचा वडील मुलगा सोढोजी त्याचे पाठीमागून गादीवर बसला. हरपाळदेवापासून हल्लींचा ध्रांगध्र्याचा राजसाहेब हा ४१ वा राजा.[३] सोढोजी ११६० त मरण पावला.

३. दुर्जनसालजी (मुलगा) ११६० ते ११८५.

४. जालकदेवजी (मुलगा) ११८५–१२१०.

५. अर्जनसिंहजी (मुलगा) १२१०–१२४० हा मोठा कृष्णभक्त असल्यामुळें याला द्वारकादासजी ह्मणत.[४]

६. देवराजजी (मुलगा) १२४०–१२६५.

७. दुदोजी (मुलगा) १२६५–१२८०.

८. सूरसिंहजी (मुलगा) १२८०–१३०५.

९. सांतळजी (मुलगा) १३०५–१३२५. यानें गुजरातच्या उत्तर भागांत सांतळपूर नांवाचें गांव वसवून आपला सर्वांत धाकटा मुलगा सुरजमलजी यास तें जहागीर दिलें.* वागड मधील गेडीच्या राण्यांचा व थराद आणि मोरवाडा येथील वाघेल्या ठाकुरांचा पूर्वज लुणोजी वाघेला यानें सुरजमलजीस सांतळपुरांतून हांकून लाविलें व लढाईत ठार केलें.

---

मूळ पुरुष होय. २. खोडाजी, याचे वंशज खोडासा- रजपूत हे अद्याप पाटण परगण्यांत आहेत. ३. जोगूजी, हा वागड येथील जोगू रजपुतांचा मूळ पुरुष. ४. राणोजी, हा वागड येथीलच राणक रजपुतांचा मूळ पुरुष. ५. बापूजी, याचे वंशज मोलेसलाम झाले हल्लीं चंडोतर आणि मांडवा येथें रहातात. ६. बळवंत, याचे वंशज बळवंत रजपूत हल्लीं कच्छमध्यें आहेत. ७. लोणकजी, याच्या वंशजांस लोणी रजपूत ह्मणतात व हे काशीच्या आसपास रहातात. ८. देवजी, हल्लीं मारवाडांत असलेल्या देवैयत रजपुतांचा हा मूळ पुरुष. ९. विठलजी, याच्या वंशजांसंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं.

* हें जाडेजा रजपुतांचें ठिकाण हल्लीं पालनपूर एजन्सीखालीं आहे.

सांतळजीनें मुसलमानांची मदत घेऊन लुणोजीस सरधार मधून हांकून काढिलें, परंतु तो लढाईत स्वतः पडला.

१०. वजेपालजी (मुलगा) १३२५–१३२६.

११. मेघपालजी (मुलगा) १३२६–१३३१.

१२. पद्मसिंहजी (मुलगा) १३३१–१३४०.

१३. उदेसिंहजी (मुलगा) १३४०–१३५२.

१४. वेगडजी (मुलगा) १३५२–१३६८. यानें हळवद जवळ वेगडवाव हें गांव वसविलें.

१५. रामसिंहजी (मुलगा) १३६८–१३८५. यानें ध्रांगध्रा प्रांतांतील रामपूर हें गांव वसविलें.

१६. वीरसिंहजी (मुलगा) १३८५–१३९२.

१७. रणमलसिंहजी (मुलगा) १३९२–१४०८. हा मारवाडांत राठोड रजपुताच्या एका मुलीशीं लग्न करण्यासाठीं गेला असतां मारवाडांतील बारमेर कोटड्याच्या राठोडांनीं त्याला कैद केलें, परंतु १३९४ त त्याच्या मुलानें (सतरसाल) मोठें लष्कर नेऊन त्यांचीं सुटका केली.

१८. सतरसालजी (मुलगा) १४०८–१४२०. हा मोठा विख्यात पुरुष होता. यानें आपली राजधानी मांडल येथें आणिली. आपल्या बापाशीं विश्वासघात केल्याबद्दल सूड घेण्यासाठीं सतरसालजीनें बारमेर कोटड्यावर गाढवांचा नांगर फिरविला. गुजरातच्या सुलतान अहमदशहा विरुद्ध यानें तीनदां बंड केलें परंतु तीनही वेळां त्याचें कांहीं चाललें नाहीं. मिरात्-इ-सिकंदरी व तबकात-इ-अकबरी या दोन्हीमध्यें त्याचें नांव आढळतें. याला सुलतानजी असेंही ह्मणत, व याणें सुलतानपुर ह्मणून गांव वसविलें. सतरसालजीस एकंदर १२ मुलगे होते पैकीं वडील मुलगा जेतसिंहजी त्याच्यानंतर गादीवर बसला. दुसरा राघवदेवजी हा माळव्यांतील मांडू येथील सुलतान हुषंग घोरीच्या दरबारीं गेला

व तेथें त्यानें इतकें नांव केलें कीं माळवा झालावाड नांवाचा प्रदेश त्याला जहागीर मिळून त्यानें रायपुरा येथें आपली राजधानी केली. याचे वंशज उज्जयनीच्या ताब्यांतील नरवर संस्थानांत आहेत.

१९. जेतसिंहजी ( मुलगा ) १४२०—१४४१. याचे कारकीर्दींत गुजरातच्या सुलतानांशीं लढाया होऊन पाटडीहून राजधानी उठवून कुव्यास आणावी लागली.

२०. वनवीरजी ( मुलगा ) १४४१—१४६०.

२१. भीमसिंहजी ( मुलगा ) १४६०—१४६९.

२२. वाघोजी ( मुलगा ) १४६९—१४८६ याच्या कारकीर्दींत शहाजादा खलीलखान* सोरठचा सुभेदार होता व तो जुनागढास रहात असे. वाघोजी वंडखोर असल्यामुळें खलीलखान त्याच्यावर चालून गेला व दोघांची ध्रांगध्र्यापासून ६ मैलांवर सैदपूर येथें चकमक झाली व खलीलखानास माघार घ्यावी लागली. यामुळें सुलतान महमदास राग येऊन तो मोठें सैन्य घेऊन कुव्यावर चालून आला. वाघोजीनेंही आपल्या ताब्यांतील जहागिरदार वगैरे लोक एकत्र करून स्वसंरक्षणाची तयारी केली, परंतु अन्नपाण्याची तूट आल्यामुळें तो जेरीस आला, व शेवटीं एकदम छापा घालून कांहीं उपयोग झाल्यास पहावा ह्मणून त्यानें तयारी केली. शहरांतून बाहेर पडण्याचे पूर्वीं त्यानें झनान्यावरील पहारेकऱ्यांना आपल्या निशाणावर चांगलें लक्ष्य ठेवण्याविषयीं हुकूम केला. निशाणावर शक्तिमातेची प्रतिमा काढलेली होती व लढाईत निशाण पडल्या बरोबर चितांवर चढावें असें आपल्या राण्यांस त्यानें सांगून ठेविलें. लढाई चालली असतां निशाणवाल्यानें निचाऱ्यानें थकून निशाण खालीं ठेविलें व ही वरदी मिळाल्या बरोबर आपला पति नाश पावला असें समजून वाघोजीच्या साध्वी स्त्रियांनीं राजवाड्यांतील एका विहिरींत उड्या टाकून प्राण सोडिले. इ-

* हा पुढें गुजराथचा सुलतान मुझफर झाला.

कडे वाघोजी निकरानें लढून कुव्यास परत आला, परंतु राण्यांच्या मरणाचें वर्तमान ऐकून तो निराश झाला व जिवावर उदार होऊन पुनः बाहेर पडला, आणि शौर्यानें लढत असतां, व शत्रूंस कापून कांढीत असतां त्यानें आपल्या पुष्कळ सरदारांनिशीं आपले प्राण खर्ची घातले. मुसलमानांनीं कुवा शहर लुटून फस्त केलें, आणि याधेळेपासून झाल्यांची राजधानी येथून हालली. कळारिआच्या सोळंकीची मुलगी साहेबकुंवरबा हिच्याशीं वाघोजीचा फक्त 'वाग्निश्चय' झालेला होता, परंतु तिनें त्याच्या मरणाची वार्ता ऐकून सहगमन केलें. कुव्याच्या अनर्थापातामुळें सर्वत्र एकच हाहाकार उडून गेला, व लोकांच्या मनांत इतका धाक बसला कीं तेथून राजधानी निघाली इतकेंच नव्हे तर अद्यापपर्यंत कांहीं दुर्दैवी प्रसंग ओढवल्यास त्याला "कुव्याचा कहर" ( કૂવાનો કેર ) ह्मणतात. वाघोजीस १२ पुत्र होते पैकीं पहिले सहा त्याच्या बरोबरच लढाईंत पडले. त्याचा सातवा मुलगाही पुढें मुसलमानांशीं लढतांनाच मरण पावला. आठवा कुंवर राजोधरजी हा पित्याच्या पाठीमागें १४८६ त गादीवर बसला. झाल्यांस कुव्यामधून काढून लाविल्यावर मुसलमानांनीं तेथें ठाणें वसविलें व एक मशीद बांधली.

२३. राजोधरजी ( मुलगा ) १४८६–१५०० राजोधरजी कुव्याहून निघाला तो एका रानांत शिरला, व तेथेंच कांहीं दिवस होता. तो एके दिवशीं शिकारीस बाहेर पडला असतां त्याच्या घोड्यासमोरून त्याच्याकडेच एक ससा धांवत येतांना त्याला दिसला. ससा हें स्वभावतः अत्यंत भित्रें जनावर असतां इतक्या धिटाईनें आपल्या समोर येतांना पाहून त्या जमिनीतच कांहीं विलक्षण गुण असला पाहिजे असें राजोधरजीस वाटलें. या गोष्टीचा त्याचें मनावर इतका परिणाम झाला कीं त्याच ठिकाणीं संवत १५४४ ( इ. स. १४८८ ) माघ वद्य १३ च्या मुहूर्तावर त्यानें नवीन राजधानीचा पाया घातला. हेंच प्रसिद्ध हळवद शहर.

हल्लींच्या हळवद शहराच्या ईशान्येस पूर्वी फक्त एक लहानसें खेडें मात्र होतें. हळवद येथें पुष्कळ साध्वी स्त्रिया पूर्वकाळीं सती गेल्या व त्यांचे यादगिरीचे दगड अद्यापीही शहराच्या शूरत्वाची, वीर्याची व पातिव्रत्याची साक्ष देत आहेत. राजोधरजीस ३ पुत्र व एक कन्या अशीं ४ अपत्यें होतीं. पैकीं २ पुत्र व १ कन्या इदरच्या राणीपासून झालेली, व चवथा पुत्र मुळीच्या लगधीरजी परमाराच्या कुंवरीपासून झालेला राणोजी या नांवाचा होता.

२४. राणोजी (मुलगा) १५००–१५२३. राजोधरजी मरणोन्मुख असतां मुळीचा लगधीरजी आपल्या नातवास हळवदच्या गादीवर बसविण्याचा मनांत संकल्प करून राजसाहेबांचा समाचार घेण्याच्या मिषानें पुष्कळ लोकांसहवर्तमान हळवदास आला. त्यानें हळुहळु मुख्य मुख्य सरदारांस व फौजेस वश करून घेतलें. राजसाहेब निवर्तल्यावर वडील दोन कुंवर दहनक्रियेसाठीं शहरा बाहेर गेले असतां लगधीरजीनें शहरचे दरवाजे बंद केले व सैन्यांत पुष्कळ इनामें वांटून राणोजीस गादीवर बसविलें. वडील कुंवर अजोजी व सजोजी यांनीं शहरांत येण्याविषयीं पुष्कळ खटपट केली, परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं त्यांनीं अमदाबादच्या सुलतानाकडे दाद मागितली, परंतु तेथें लगधीरजीनें २००,००० रुपयांचा नजराणा देऊन पूर्वीच व्यवस्था लावून ठेविली होती. राणोजीनें राणकपूर नांवाचें गांव वसविलें. कोणी मलीक नखण या नांवाच्या इसमानें आपल्या बापाच्या मरणाबद्दल सूड घेण्यासाठीं राणोजीचा १५२३ सालीं खून केला. राणोजीस तीन पुत्र होते.

२५. मानसिंहजी (मुलगा) १५२३–१५६४. संस्थानचें कामकाज न पहातां हा आपला सर्व वेळ फाजील थट्टामस्करींतच घालवीत असे. एकदां शिमग्याच्या सणांत होळीच्या दिवशीं फारच विचकटपणा केल्यामुळें वांटीआ प्रागजी नांवाचा दरबारांतील एक इसम त्यास रागें भरला, परंतु त्याच्या खुद्द प्रधानानें एक अक्षरानेंही त्यास उपदेश केला नाहीं. याप्र-

माणें ठपका दिल्यामुळें वांटीआ प्रागजीवर मानसिंह बिलकुल न रागावतां प्रधानाच्या कृतीबद्दल त्यास फार वाईट वाटलें. आपली निस्पृहपणें कानउघाडणी केल्याबद्दल प्रागजीचे उलट त्यानें फार उपकार मानले व इतःपर आपली वर्तणूक सुधारली. त्याचा पहिला पराक्रम ह्मणजे दसाड्यावर स्वारी करून मलीक बखणचा मुलगा शुहाजील यास त्यानें ठार केलें व आपल्या बापाच्या खुनाचा सूड घेतला. सुलतान बहादुरशहा माळव्यांत असतां झालावाडचा जहागिरदार खानखानन यास त्यांनें मानसिंहजीची खबर घेण्यास पाठविलें. खानखानानानें दसाडा एकदम परत घेतलें इतकेंच नव्हे तर मानसिंहजीस प्रांतांतून अजीबाद हांकून काढिलें. मानसिंहजी कच्छकडे पळून गेला व रावानें त्याला आश्रय दिला. मांडल, विरमगांव, हळवद वगैरे मानसिंहजीचा सर्व मुलूख सुलतानानें खालसा केला. मानसिंहजीनें भूज जवळ मानकुवा नांवाचें एक खेडें वसविलें. तेथून आपले दोन भाऊ व प्रागजी बकराणिआ यांना बरोबर घेऊन तो झालावाड प्रांतांत थेट विरमगांवपर्यंत लुटालूट करीत असे. या स्वाऱ्या करतांना त्याच्यावर कित्येक प्रसंग गुजरले परंतु तितक्यांतूनही तो मोठ्या शिताफीनें निसटून गेल्याच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. एके प्रसंगीं चराडीच्या धेडांनीं त्यास चांगली मदत केल्यामुळें त्या गांवास पुढें धेडांची चराडी ह्मणूं लागले. विकानेरच्या ठाकुराची मुलगी मानसिंहाची सावत्र आई होय. तिचीच बहीण गुजरातच्या सुलतान बहादुरशहास दिली होती. मानसिंहाच्या सावत्र आईनें त्याला मुलखांत परत येऊन सुलतानास शरण जाण्याविषयीं सांगून पाठविलें, व असें केल्यास त्याचें राज्य परत देण्याचेंही वचन दिलें. मानसिंहजी हिकडे लक्ष्यच देईना, व चोहींकडे लुटालुटीचा क्रम त्यानें अव्याहत चालविला. सुलतानाच्या अंमलदारांनीं त्याला पकडण्याचे प्रयत्न करण्याची पराकाष्ठा केली, परंतु तो त्यांस दाद देईना. तथापि शेवटीं त्याच्याच लक्ष्यांत आलें कीं सुलतानाची शक्ति फार मोठी व आपण फार केलें तर लुटालूट करून वरचेवर आपला

जीव धोक्यांत घालणार, तेव्हां सुलतान बहादुरशहाच्या उदार स्वभावावर भरंवसा ठेऊन स्वतः त्याची गांठ घेण्याचा त्यानें निश्चय केला. सुलतान सौराष्ट्रांतील दीव बेटांत वरचेवर जात असे. मानसिंहजीचा हा बेत कायम ठरल्यावर बहादुरशहा एकदां दीव येथें गेला असतां, सुलतानाच्या छावणींत त्याच्या खासगी निजावयाच्या तंबूंत नखशिखांत हत्यारबंद होऊन मानसिंहजी सुलतानापुढें अचुक जाऊन उभा राहिला. कोण, काय, वगैरे प्रश्न पुसले असतां मानसिंहजी उत्तर करितोः—"मी झालावाडचा राजा आहें व माझें राज्य मला परत मिळावें ह्मणून सुलतानास विनंति करण्यास मी आलों आहें." असें ह्मणून त्यानें आपली ढाल, तरवार, व जंबिया सुलतानाच्या पायांवर ठेविली. अशा रीतीनें शरण आलेला पाहून, व त्याच्या प्रसन्न व उदार मुद्रेवर संतुष्ट होऊन, सुलतानानें त्यास त्याची हकीकत विचारिली व मानसिंहजीनेंही मोकळ्या मनानें ती इत्थंभूत कळविली. सुलतानानें त्याचा बहुमानानें सत्कार करून त्याला हळवदचें राज्य परत दिलें, मात्र मांडल आणि विरमगांव हीं परत दिलीं नाहींत. मानसिंहजीस तीन पुत्र होते, पैकीं वडील रायसिंहजी हा त्याच्या पाठीमागून गादीवर बसला.

२६. **रायसिंहजी** (मुलगा) १५६४–१५८४. आसपासच्या सरदारांशीं युद्ध करून व जय संपादून यानें आपलें वजन चांगलें बसविलें. एकदां रायसिंहजी आपला मामा ध्रोळचा ठाकूर जाडेजा जसोजी याचे येथें वाड्यांत सोंगट्या खेळत बसला असतां बाहेर नगाऱ्याचा आवाज ऐकूं आला. जसोजीनें संतापून विचारिलें कीं ध्रोळच्या आसपास नगारा वाजविण्याची कोणाची छाती झाली व आपल्या लोकांस चवकशी करण्याविषयीं हुकूम केला. तपास करून माणसांनीं कळविलें कीं मकणभारती नांवाचा एक मोठा योगी द्वारकेची व हिंगळाज मातेची यात्रा करण्यास चालला आहे व त्याची नौबत वाजत आहे. त्यावरून जसोजी

शांत होऊन योग्याच्या बरोबर कज्जा करणें आपलें शील नव्हे असें म्ह-णाला. एखाद्या राजानें ध्रोळजवळ डंका वाजविल्यास आपण काय क-राल असें रायसिंहजीनें विचारिलें. जसोजी उत्तर करितो कीं एखाद्या राजानें जर डंका वाजविण्याचें धारिष्ट केलें तर त्याचे नगारे फोडून मी त्यास चालता करीन. जसोजीच्या उर्मटपणाचा तिरस्कार येऊन राय-सिंहजी निघून गेला व मोठें सैन्य जमा करून ध्रोळ नजीक आला व तेथें त्यानें मोठ्यानें ढोल पिटले. जसोजीनें त्याला थांबविण्यासाठीं आ-पली पराकाष्ठा केली परंतु सर्व व्यर्थ. शेवटीं आपलें सैन्य एकत्र करून त्यानें लढाईची तयारी केली. लढाई मोठी निकराची झाली परंतु अखेर ध्रोळचा पराभव होऊन जसोजी मारला गेला व रायसिंहजी विजयश्री मिळवून हळवदास परत आला. याचा सूड साहिबजी घेईल असे जसो-जीनें मरणसमयीं उद्गार काढले. साहिबजी हा कच्छच्या राव खेंगाराचा भाऊ होय. हा जसोजीचा निधनकाळचा निरोप एका चारणानें त्यास जाऊन सांगितला. साहिबजी कसा तरी बाहेर निघेल तर बरें असें राव खेंगारास झालें होतें. त्याला ही संधि आयतीच पथ्यावर पडली, व बरोबर सैन्य देऊन साहेबजीस रणापलीकडे रावानें जसोजीची प्रतिज्ञा पुरी कर-ण्यासाठीं पाठविलें. तो माळिआ येथें असतांच रायसिंगजीनें त्याला गां-ठिलें. लढाईत पुष्कळच रक्तस्राव झाला व शेवटीं साहिबजी मारला गेला आणि रायसिंहजीस बऱ्याच जखमा झाल्या. तोही मेलाच असें समजून दोनही सैन्यें आपआपल्या ठिकाणीं परतलीं. याच सुमारास मकणभा-रती आपल्या परिवारासह हिंगळाजमातेहून परत माळिआस आला. ते सर्व रणांगणावर जाऊन पहातात तों रायसिंहजी जीवंत होता. त्यांनीं रायसिंहजीस दिल्लीस नेलें व त्याची चांगल्या प्रकारें शुश्रूषा केली. तो त्यांचे जवळ दोन वर्षें राहिला. इतक्यांत खानखानान यास सुलतान मुझाफरवर स्वारी करण्यासाठीं दिल्लीहून गुजरातेंत जाण्याचा हुकूम झाला. रायसिंहजीनें ही संधि पाहून खानास गांठिलें व आपलें राज्य आपणास

परत मिळण्याबद्दल विनंति केली. खानानें त्याला झालावाडास पाठविलें, व तेथें त्याला लोकांनीं ओळखून राज्यावर बसविलें; रायसिंहजी खानखानानाकडे गेला त्या वेळेस खान दरबारांत होता, तेव्हां एक्कोमल नांवाचा एक दरबारी पहिलवान रायसिंहजीच्या योग्याच्या वेषाकडे नाक मुरडून त्याला टोंचून बोलला, व रायसिंहजी उलट बोलल्यावर पहिलवानानें त्यास एक धक्का मारला. रायसिंहजी जवळ कांहीं हत्यार नसतांनाही तो एक्कोमलाशीं भिडला व त्यानें त्यास इतक्या जोरानें पाडिलें कीं एक्कोमल तेथच्या तेथेंच मरण पावला. ही कुस्ती चालली असतां रायसिंहजीच्या हाताचा धक्का राजवाड्याच्या एका भिंतीवर इतक्या जोरानें बसला कीं मधला एक धोंडा निखळला. या प्रसंगाचें वर्णन पुढील दोहऱ्यांत आहे.

## दोहरा.

**कटारी अमरेशरी, तोगारी तरवार ॥**
**हथल रायासंघरी, दिल्लिरे दरबार ॥ १ ॥**

( अमरसिंहाचा खंजीर, तोगाजीची तरवार, व रायसिंहजीची मुष्टि. यांनीं दिल्लीच्या दरबारांत नांव केलें ).

रायसिंहजी पुनः गादीवर बसल्यावर त्यानें पुनः आसपासच्या सरदारांशीं लढण्यास सुरुवात केली, व अखेर घंटिला गांवाजवळ देद्यांशीं लढत असतां तो रणांगणावर मृत्यु पावला. इलिअटच्या पांचव्या पुस्तकाच्या ४४४ व्या पानांत त्याच्या मरणाची खालील हकीकत दिलेली आहे.

"हळवदच्या आसपासच्या लोकांशी रायसिंहजीनें वैरभाव संपादन केला असल्यामुळें ते सर्व त्याच्यावर हल्ला करण्यास एकत्र जमले. तो चोगाण येथें असतांनाच त्याला या बंडाची बातमी लागली. तो एकदम त्यांना सामना देण्यास निघाला व एके दिवशीं चांदण्या रात्रीं त्यांच्या नजीक येऊन ठेपला. त्यांनीं त्याला निरोप पाठविला कीं तूं खरा रायसिं-

ह्जी असशील तर आमच्यावर रात्रीं हल्ला करणार नाहींस. मोठ्या उदारपणानें त्यांचें ह्मणणें कबूल करून तो झोंपी गेला. त्याच्या शत्रूंनीं हीं संधि साधली व आपल्या लोकांस दिलासा देऊन ते हळुहळु त्याच्याजवळ सरकले, आणि सूर्य उगवतांच सर्व त्याच्यावर तुटून पडले. सोबतच्या ८० लोकांसहवर्तमान तो पायींच लढला व शेवटीं तेथेंच मरण पावला."

पूर्वीं माळिआ येथें रायसिंह्जी मेल्याची बातमी जेव्हां त्याच्या राण्यांनीं ऐकिली होती तेव्हां त्यांनीं बांगड्या फोडून व दागिने काढून टाकून विधवांचा वेष घेतला होता. खांनखानाना बरोबर रायसिंह्जी परत आला तेव्हां तो भैल असा समज झाला असल्यामुळें त्या त्याच्याकडे जाईनात. बावची चोहाण कुंवरी फक्त त्याच्या कडे गेली. तिची ही वर्तणूक लोकांस इतकी दोषार्ह वाटली कीं नादोला चोहाणां बरोबर आजपर्यंत झाले लग्नव्यवहार करीत नाहींत.

रायसिंह्जीच्या कारकीर्दींत अकबर बादशहानें गुजरात प्रांत जिंकून मोंगल बादशाहींत सामील केला.

रायसिंह्जीस चार राण्या होत्या, पैकीं नवानगर संस्थानांतील खिलोस घराण्यांतील जाडेजा रजपूत जातीच्या राणीपासून त्याला दोन पुत्र व एक कन्या झाली. वडील पुत्र चंद्रसिंह्जी हा रायसिंह्जी मागून गादीवर आला.

२७. चंद्रसिंह्जी १५८४–१६२८. चंद्रसिंह्जीनें सीथा नजीकचा चंद्रासर तलाव बांधला व थान जवळच्या महानदीस यानेंच सांदासर नांवाचा बांध घातला. जोधपूरचा राजा सूरसिंह्जीची कुंवरी* सत्यभामा हिच्याशीं चंद्रसिंह्जीनें लग्न केलें. या वेळेस वेजलपूर हें गांव कांहीं राठोडांस बक्षिस दिलें. चंद्रसिंह्जीची बहीण जामनगरच्या जाम जसाजीस दिली होती. एके दिवशीं बुद्धिबळें खेळत असतां नवराबायको भांडलीं, व बोलाचालींत आपण माझ्या भावास हरवाल तर खरें असें

* हिच्या दुसऱ्या बहिणीनें दिल्लीच्या जहांगीर बादशहाशीं लग्न लाविलें होतें.

चंद्रसिंहाची बहीण झणाली. येवढ्यावरून जामनें हळवदवर पुष्कळ वेळां सैन्य पाठविलें परंतु त्याचें कांहीं चालेना. शेवटीं शंकरदास नांवाच्या नागरानें दगलबाजी केल्यामुळें चंद्रसिंह शत्रूंच्या हातीं सांपडला व त्यास त्यांनीं नवानगरास आणिलें, तेथून त्याची लवकरच सुटका झाली. परंतु चंद्रसिंहजीस सहा पुत्र होते. चंद्रसिंहजीच्या पुत्रपौत्रांनीं वरींच राज्यें स्थापन केलीं व तीं अद्यापही आहेत, झणून यांच्याविषयीं कांहीं माहिती देणें जरूर आहे. पहिले तीन पुत्र प्रथिराज, असकरणसिंह, व अमरसिंह यांच्यांत गादीसंबंधीं तंटा झाला व असकरणसिंह आणि अमरसिंह यांनीं एकत्र होऊन व अमदाबादच्या सुभेदाराची मदत घेऊन प्रथिराजास पकडलें व अमदाबादेस कैदेंत टाकिलें. प्रथिराज येथेंच शेवटीं मरण पावला. "प्रथिराजास सुलतानजी व राजोजी असे दोन पुत्र होते ते भादलीस जाऊन राहिले होते. माहिआ व बावरिआ लोकांपासून जामच्या मदतीनें सुलतानजीनें वांकानेर परगणा जिंकून घेतला आणि हळवदशीं युद्ध चालविलें, परंतु शेवटीं माथकच्या लढाईत तो मारला गेला. वांकानेर येथें अद्यापपर्यंत याचेच वंशज राज्य करीत आहेत. याप्रमाणें वांकानेरचे राजसाहेब हे ध्रांगध्र्याच्या वडील घराण्यांतून उतरलेले आहेत. वांकानेरच्या संस्थानिकास राजसाहेब झणतात व संस्थान दुसऱ्या वर्गांत मोडतें. संस्थानांत ८७ गांवें असून वसूल अजमासें २००००० रु. आहे. वढवाण हें अद्यापपर्यंत हळवदच्या गादीच्या वारसास जहागीर असे त्याप्रमाणें तें प्रथिराजाच्या ताब्यांत होतें. परंतु प्रथिराजास कैद केल्यावर तें अर्थातच हळवदांत खालसा झालें होतें. सुलतानजीचा लहान भाऊ राजोजी यानें वढवाण जिंकून घेतलें. राजोजीस तीन पुत्र होते पैकीं सलाबतसिंह आणि उदयसिंह हे अनुक्रमें वढवाणच्या गादीवर बसले. उदयसिंहानंतर त्याचा मुलगा भगतसिंह गादीवर आला. राजोजीचा तृतीय पुत्र भावसिंहजी ह्याचा पुत्र माधवसिंह हरा-

वतीस गेला. याचाच वंशज प्रसिद्ध झालमसिंह यानें राजपुतान्यांतील झालेरा पाटण येथें गादी स्थापिली. या माधवसिंहाचे दोन पुत्र अर्जुनसिंह आणि अभयसिंह वढवाणास परत आले व त्यांनीं तेथें भगतासिंहाचा प्राण घेतला. अर्जुनसिंह वढवाणास राज्य करूं लागला. सध्यांचा वढवाणचा ठाकूर हा याचाच वंशज होय. वढवाण संस्थान दुसऱ्या वर्गांत मोडतें व यांत जरी फक्त ३१ च गांवें आहेत तथापि वसूल सुमारें ५००००० रु. आहे. माधवसिंहाचा दुसरा पुत्र अभयसिंह चूडा येथें जाऊन तेथें राज्य करूं लागला. व अद्यापही याचेच वंशज तेथें आहेत. चूडा हे तिसऱ्या वर्गांतील ठाकूर होत, व यांच्या ताब्यांत १४ गांवें असून सुमारें २००००० रु. वसूल आहे.

चंद्रसिंहाचे इतर तीन मुलगे अभयसिंह, राणोजी व रामसिंह यांस निरनिराळ्या गिराशी मिळाल्या; पैकीं अभयसिंहास लखतर मिळालें. हल्लींचा लखतरचा ठाकूर हा याचाच वंशज होय. लखतर या तिसऱ्या वर्गांतील संस्थानांत ५१ गांवें मोडतात, पण वसूल अवघा १००००० रु. च आहे.

२८. असकरणजी (मुलगा) १६२८–१६३४. चंद्रसिंहाच्या पाठीमागून त्याचा द्वितीय पुत्र असकरणजी गादीवर आला, परंतु त्याच्या भावानें त्याचा लवकरच खून करून स्वतः गादी बळकाविली.

२९. अमरसिंहजी (बंधु) १६३४–१६४५. अमरसिंहजीनें गादी बळकावली खरी, परंतु त्याचा पुतण्या वांकानेरचा सुलतानजी त्यास स्वस्थ बसूं देईना. सुलतानजी हळवदच्या मुलुखावर वारंवार स्वाऱ्या करूं लागल्यामुळें सरहद्दीवर शांतता रहावी ह्मणून अमरसिंहजी माथक येथेंच येऊन राहिला. अमरसिंहजीचे सहायकारी मुळीचा परमार व कांहीं काठी लोक यांनीं वांकानेरच्या एका गांवांतील गुरें पळविलीं. पण सुलतानजीनें त्यांना गांठून गुरें परत मिळविलीं आणि शत्रूंस सरहद्दी बाहेर काढून लाविलें. परंतु इतक्यांत अमरसिंहाच्या लोकांची त्यांना कुमक

मिळाली व वांकानेरच्या हद्दींतील भीमगढा आणि ओल या दोन गांवांच्या मध्यें लढाई होऊन तींत सुलतानजी मारला गेला. या रणांगणास अद्या-पीही सुलतानजीचें रण ह्मणतात. येथें एक ल्हानसें देवालय बांधलें आहे व तेथें पडलेल्या योध्यांचे चबुतरेही (પાળિયા) आसपास पुष्कळ आहेत.

३०. मेघराजजी (मुलगा) १६४५–१६६१. हा फार धर्मनिष्ठ असून, सिद्धपूर, नर्मदा, द्वारका, सोमनाथपाटण वगैरे ठिकाणीं यात्रा करून आला होता. धर्मादायांत व ब्राह्मण भोजनांत यानें पुष्कळ पैसा खर्च केला. मेघराजजीस नऊ राण्या होत्या, पण पुत्र एकच होता.

३१. गजसिंहजी (मुलगा) १६६१–१६७३. याच्या वेळीं राज्यांत सर्वत्र शांतता होती. चंद्रसिंहजी, जसवंतसिंहजी, व जगोभाजी असे याला तीन पुत्र होते. चंद्रसिंहजी व त्याचा मुलगा आसकरणजी या दोघांचा एका चारणानें खून केला होता. जसवंतसिंहजीस मालवण वगैरे गांवें पूर्वींच गिरास मिळालेलीं होतीं, व पुढें गादीही त्यासच मिळाली. चंद्रसिंहजीची कन्या जोधपूरच्या अजितसिंहजीस दिली होती. अजितसिंहजीचा बाप जसवंतसिंहजी राठोड याला गुजरातची सुभेदारी मिळाली, तेव्हां आपल्या सुनेच्या सांगण्या वरून जसवंतसिंहजी झाल्यावर त्यानें स्वारी केली.

३२. जसवंतसिंहजी (मुलगा) १६७३–१७१८. वर लिहिल्याप्रमाणें जोधपूरच्या जसवंतसिंह राठोडानें अमदाबादचा सुभेदार असतां हळवदवर स्वारी केली व जसवंतसिंह झाल्यास हळवदहून काढून लाविलें. तो तेथून वाराहीस निघून गेला. नझर अलीखानास हळवदची जहागीर दिली व त्यानें तेथें ६ वर्षें राज्य केलें. पुढें वांकानेरच्या चंद्रसिंहजीनें खानास बाहेर काढिलें व तीन वर्षेंपर्यंत राज्य केलें. अवरंगझेब बादशहाकडून हळवद व तेथील मिठागरें यांची सनद घेऊन १६८२ त जसवंतसिंह परत आला व त्यानें चंद्रसिंहजीस हांकून दिलें.

इ. स. १७१५ त जोधपूरचा अजितसिंह हाच गुजरातचा सुभेदार होऊन सौराष्ट्राची खंडणी वसूल करण्यास आला. या वेळेस त्यानें जसवंतसिंहाकडून खंडणी वसूल केली. पुढें अजितसिंह नवीनगरवर गेल्यावर आपल्या घोडेस्वारांनिशीं जसवंतसिंहानें त्याची पिच्छा पुरवून जाम तमाचीस चांगली मदत केली. जसवंतसिंहाच्या शौर्यानें जामला बरीच मदत झाली, तथापि त्याला २००००० रुपये खंडणी व २५० कच्छी घोडे द्यावे लागले. अजितसिंहानें द्वारकेची यात्रा यथासांग करून अमदाबादेस परत जातांना वाटेंत हळवद शहर तोफांनीं उडविण्याचा प्रयत्न केला, परंतु तेथें त्याचें कांहीं चाललें नाहीं. चंद्रसिंहजीची कन्या व अजितसिंहजीची राणी बाई झिंजुबा अद्यापि जसवंतसिंहजीस पाण्यांत पहात असे, व पुढें अजितसिंह सुभेदार नसल्यामुळें उघडपणें हळवदवर सैन्य पाठवितां येईना. तिचा द्वेषाग्नि शांत न होऊन तिनें शेवटीं १७१८ त ५ रजपुतांना बावांचीं सोंगें देऊन जसवंतसिंहाचा खून करण्यास पाठविलें. हे पांचही असामी हळवदास जाऊन राजेश्वर तलावाच्या कांठीं कांहीं दिवस राहिले. एके दिवशीं जसवंतसिंह पालखींतून तलावावरून जात होता व बरोबर नोकर लोकही अगदीं थोडे होते. ही संधि गांठून हे रजपूत बावा त्याच्या अंगावर घुसले व आपल्या जंबियांनीं त्याला त्यांनीं तेथेंच ठार केलें. या पांचांपैकीं एक सांपडला व मारला गेला परंतु बाकीचे हातीं लागले नाहींत. जसवंतसिंहानें १७०९ त (संवत १७६५) हळवद येथें भला मोठा राजवाडा बांधला. या वाड्यांत एके ठिकाणीं जसवंतसिंहाच्या मरणाची हकीकत कोरलेली आहे. प्रतापसिंह, मानसिंह, मेघराज व आमाभाई असे जसवंतसिंहजीस चार पुत्र होते. याच राजाच्या कारकीर्दींत गुजरातचा सुभेदार दाऊदखान पन्नी सौराष्ट्राची खंडणी वसूल करण्यासाठीं मुलुखगिरीवर आला असतां हळवद येथें थांबून त्यानें जसवंतसिंहाच्या मुलीशीं लग्न केलें.

३३. प्रतापसिंहजी (मुलगा) १७१८–१७३०. या राजाच्या कारकीर्दींत नवानगरच्या जाम हरधोळजीनें आपला सावत्र भाऊ जाम रायसिंहजी याचा खून करून स्वतः गादी बळकाविली. एका गुलामाच्या मुलीनें रायसिंहजीचा लहान मुलगा तमाची यास पेटींतून लपवून भूज येथें त्याची मावशी बाई रत्नाजी होती तिच्याकडे नेलें. बाई रत्नाजी ही हळवदच्या राज प्रतापसिंहजीची बहीण होय. हिनें आपल्या पुतण्याचें चांगलें पालन केलें. हिच्या सांगण्यावरून प्रतापसिंहजीनें आपली मुलगी गुजरातचा सुभेदार सरबुलंदखान (मुबारिझ-उलमुल्क) यास दिली, व आपली एक पुतणी गुजरातचा सेनापति सलाबत महमदखान बाबी याला दिली. पुढें या दोघांच्या मदतीनें राज प्रतापसिंहजीनें हरधोळजीस बाहेर काढून लाविलें व जाम तमाचीस गादीवर बसविलें. प्रतापसिंहजीस रायसिंहजी, कलाभाई, आणि वजाभाई असे तीन पुत्र होते.

३४. रायसिंहजी (मुलगा) १७३०–१७४५. इ. स. १७३० त रायसिंहजीनें ध्रांगध्याचा किल्ला बांधला व दरवर्षी कांहीं वेळ हेंच राजधानीचें शहर असे. वाटावदर नजीक नदीवर यानें एक गांव वसवून त्याला रायसिंहपूर नांव दिलें. हा राजा फार शहाणा होता व यानें फटाया कुमारांच्या जहागिरी कमी करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मुलांनीं या कृत्याविरुद्ध बंड उठविलें, व वडील मुलाचें (गजसिंहजीचें) बंडांत आंतून अंग होतें. रायसिंहाचा दुसरा मुलगा शेषाभाई हा चंचळ व धाडशी स्वभावाचा असून या बंडाचा पुढारी होता. लहान मुलांच्या जहागिरी कमी करण्यांत मुख्य फायदा वडील मुलाचाच असतां तोच जेव्हां बंडांत सामील असें रायसिंहजीनें पाहिलें तेव्हां त्यानें आपल्या सर्व मुलांस परत बोलावून त्यांना जहागिरी करून दिल्या. रायसिंहजीच्या ७ पुत्रांपैकीं गजसिंहजी व शेषाभाई हेच दोन प्रसिद्धीस आले.

३५. गजसिंहजी ऊर्फ भाभोजी (मुलगा) १७४५–१७८२. शेषा-

भाईस इतरांप्रमाणें मिळालेली गिरास पसंत न पडून, व कायद्याचे बंधन न आवडून तो पुंडाई करण्यास* निघून गेला. ध्रांगध्र्यापैकीं नारीचाणा त्यानें जिंकून घेतलें व पुढें गजसिंहजीच्या सहाय्यानें खवड काठींचा पराभव करून सायला जिंकिलें. हळुहळु आसपासचीं खेडीं जिंकून घेऊन या पुंडानें शेवटीं सायल्याचें राज्य स्थापन केलें. सायला हें तिसऱ्या वर्गांतील संस्थान असून तेथील संस्थानिकांस ठाकूर ही संज्ञा आहे. संस्थानांत ३८ गांवें असून वसूल सुमारें पाऊणलाख रुपये आहे.

महीकांठ्यामधील वरसोड्याच्या चावडा ठाकुराची कुंवरी जिजीबा हिजपासून गजसिंहजीस जसवंतसिंहजी नांवाचा पुत्र झाला. जिजीबा शेषाभाईस भीत असे व गजसिंहजीवर शेषाभाईचें पुष्कळ वजन असल्यामुळें ती वरसोड्यासच रहात असे. जिजीबा गेल्यावर तर शेषाभाईचें वर्चस्व मनस्वीच वाढलें. गजसिंहजी कांहीं दिवस हळवद येथें व कांहीं दिवस ध्रांगध्र्यास रहात असे. मराठ्यांनीं १७५३ त अमदावाद सर केलें, व पुढें जरी मोमीनखानानें अमदावाद परत घेतलें तरी १७५८ त पेशवा व गाईकवाड यांच्या हातांत गुजरातची सत्ता कायमची आली. शेषाभाईनें हळुहळु हळवदची गादी बळकावण्याचा घाट घातला, व सैन्य एकत्र करून गजसिंहजीस पदच्युत करण्याची तयारी केली. गजसिंहजीस या बेताची गुप्तपणें बातमी आल्यामुळें तो बावलीस पळून गेला व शेषाभाईनें राज्य हाताखालीं घातलें. लवकरच बावलीचा राणा कालाभाई याच्या मदतीनें गजसिंहजीनें आपलें राज्य परत घेतलें, परंतु शेषाभाईनें ध्रांगध्रा काबीज

* याची एक दंतकथा प्रसिद्ध आहे. गजसिंहजी व शेषाभाई हे दोघे नेहेमींप्रमाणें एका ताटांत जेवावयास बसले असतां त्यांचा बाप रायसिंहजी यानें पोळीचे दोन तुकडे करून दोघां भावांस निरनिराळे देण्यास सांगितलें. शेषाभाईस याचा विषाद वाटून त्यानें असें करण्याचें बापास कारण विचारिलें. तूं सर्वच खाऊन जाऊन वडील भावास कांहींच राहूं देणार नाहींस असें बापानें उत्तर देतांच शेषाभाई रागानें उठून जो चालता झाला तो परतला नाहीं.

करून लढाईची तयारी केली. हें वृत्त समजतांच बाई जिजीबा जसवंतसिंहजीस घेऊन वरसोड्याहून सीथ्यास आली, व धोळका आणि विरमगांवच्या कसबातियांच्या मदतीनें ध्रांगध्रा परत घेण्याची अतिशय खटपट करूं लागली. त्या प्रयत्नांत तिला यश आलें नाहीं. कर्मधर्मसंयोगानें याच सुमारास पेशव्यांचा अंमलदार भगवंतराव सौराष्ट्रांतील खंडणी वसूल करण्यासाठीं आला. जिजीबानें भगवंतरावास वश करून घेतलें व राधनपुरच्या बाबीचीही तिला मदत मिळाली. या दोघांच्या सहाय्यानें जिजीबानें शेषाभाईस ध्रांगध्र्यांतून बाहेर काढलें. शेषाभाईस ध्रांगध्र्याच्या बाहेर बहुमानानें जाण्यास परवानगी मिळाली. जिजीबानें ध्रांगध्रा शहर ताब्यांत घेऊन मराठ्यांस खंडणी व नजराणा दोन्ही दिलीं. गजसिंहजीच्या मृत्यूपर्यंत जिजीबा व जसवंतसिंह ध्रांगध्रा व सीथा येथेंच राज्य करीत असत, व गजसिंह हळवद येथें राज्य करी. दोघेही अर्धी अर्धी खंडणी देत. इ. स. १७५९ त सदाशिव रामचंद्रानें ध्रांगध्र्यावर स्वारी केली तेव्हां जिजीबास मदत करण्यासाठीं गजसिंहजीनें फौज पाठविली. मराठ्यांनीं ही संधि पाहून गुप्तपणें एक टोळी पाठवून हळवदवर रात्रीं हल्ला केला. गजसिंहजीनें कांहीं वेळ टिकाव धरिला परंतु शेवटीं त्याला शरण जाणें भाग पडलें. मराठ्यांनीं १,२०,००० रुपये दंड घेऊन त्यास सोडून दिलें. गजसिंहजी १७८२ त मरण पावला. याला सात पुत्र होते.

३६. जसवंतसिंहजी (मुलगा) १७८२–१८०१. गजसिंहजीचा वडील पुत्र जसवंतसिंह १७८२ त गादीवर आला. याचें सर्व आयुष्य ध्रांगध्र्यासच गेलें असल्यामुळें त्यानें ध्रांगध्रा हेंच राजधानीचें शहर केलें, व यापुढें हळवद-ध्रांगध्रा येथील झाला रजपुतांचें हें मुख्य ठिकाण होऊन बसलें. एकदां कांहीं काठी लोकांनीं ध्रांगध्र्याच्या अंमलांतील एका खेड्यांतील गुरें हांकून नेलीं. ही गोष्ट सायल्याच्या शेषाभाईच्या कानीं आल्याबरोबर त्यानें गुरांची सुटका केली, परंतु तो स्वतः जखमी झाला. या कामगिरीबद्दल जसवंतसिंहजीनें लिया गांव शेषाभाईस दिलें. सरधा-

रच्या काठी लोकांनीं उमरड्याचीं गुरें पळविल्यामुळें जसवंतसिंहानें सरधार लुटिलें. गजसिंहजीच्या कारकीर्दींत गिराशिया लोकांनीं अधिकाधिक मुलूख बळकावण्याचा क्रम चालविला होता. जसवंतसिंहजीनें या सर्वांचें पारिपत्य करून या वेळेसच दिल्लीची बादशाहत मोडकळीस आली असल्यामुळें आणखी बराच मुलूख सर केला. जसवंतसिंहजीनें राज्यांत चोंहीकडे बंदोबस्त राखून सर्व प्रकारची व्यवस्था करण्यांत बरेच श्रम घेतले. जसवंतसिंहजीच्या कारकीर्दींत भूजचा सेनापति जमादार फत्तेह महंमद यानें मेरामण खवासाचा मोड करण्यासाठीं नवानगरवर बऱ्याच स्वाऱ्या केल्या, परंतु रक्तस्रावाशिवाय त्यांचा कांहीं परिणाम झाला नाहीं. या सर्व प्रसंगीं दोनहीं बाजूंस याचें नातें असल्यामुळें जसवंतसिंहजीच मध्यस्थीस असे. या कामगिरीबद्दल १७९६ त नवानगरपासून याला फळा गांव मिळालें. जसवंतसिंहजीचीं पांच लग्नें झालीं होतीं व त्याला सात पुत्र होते.

३७. रायसिंहजी (मुलगा) १८०१–१८०४. जसवंतसिंहजीचा वडील पुत्र रायसिंहजी त्याच्या पाठीमागून १८०१ त गादीवर बसला, परंतु यानें तीन वर्षें राज्य केलें नाहीं तोंच तो मरण पावला. यास दोन बायका व तीन पुत्र होते, पैकीं वडील पुत्र अमरसिंह १८०४ त गादीचा मालक झाला.

३८. अमरसिंहजी (मुलगा) १८०५–१८४३. याच राजाच्या कारकीर्दींत १८०७ त बडोद्याचे रेसिडेंट कर्नल वॉकर व गाईकवाड सरकारचे प्रतिनिधि बाबाजी आप्पाजी यांनीं सौराष्ट्रांतील खंडणीची रक्कम मुकरर केली. याच सुमारास वढवाण बरोबर कज्जा चालला असल्यामुळें, व जत व मियाणा लोकांनीं वरचेवर स्वाऱ्या करून भंडावून सोडिल्यामुळें ध्रांगध्र्याचा मुलूख बराच ओसाड पडला होता व प्रांतांत सर्वत्र गरीबीचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. पुढें १८२० त पोलिटिकल एजंटी झाल्यावर ध्रांगध्रा हळूहळू डोकें वर करूं लागलें. अमरसिंहजीनें १८१४ त झिंजुवाडा सर केलें, परंतु १८१६ त खंडणीची बाकी थकल्यामुळें या तालुक्याची व्यवस्था गाईकवाड सरकारच्या तर्फें विठ्ठलराव देवाजी पहात

असे. इ. स. १८२१ त ह्या तालुका खालसा करून अमदाबादच्या कलेक्टरच्या ताब्यांत देण्यांत आला. अमरसिंहानें ध्रांगध्र्यास रामजीचें सुंदर देवालय बांधिलें. इ. स. १८२० त कच्छ प्रांतांतील वाघडच्या सिंधी व कोळी लोकांनीं रण ओलांडून ध्रांगध्र्याचा उत्तरभाग ओस करून बरीच लूट नेली. अमरसिंहजीनें सरहद्दीवरील गांवोगांवीं ठाणीं बसवून कच्छच्या रावानें नुकसान भरून द्यावें ह्मणून ब्रिटिश सरकाराकडे मागणी केली. कच्छच्या रावास स्वतःचीच प्रजा आवरेना ह्मणून ब्रिटिश सरकारनें अमरसिंहजीचें नुकसान कच्छकडून भरून देवविण्यास क्यापटन म्याक मर्डो याला पाठविलें. तो ध्रांगध्र्यास व मोर्वीच्या ताब्यांतील वंटिला येथें कांहीं वर्षें राहिला व शेवटीं त्यानें रावाकडून २००००० रुपये देवविले. यापैकीं कांहीं रक्कम परस्पर भायातांना देऊन बाकीची वांटून देण्यासाठीं त्यानें दरबारच्या स्वाधीन केली. नुकसानी भरून देतांना ज्या किंमती घातल्या होत्या त्यांची सध्यांच्या किंमतींशीं तुलना करण्यासाठीं खालील कोष्टक दिलें आहे.

| क्यापटन् म्याक मर्डोनें दिलेल्या किंमती रु. | | १८६८तील किंमती | १८९८तील किंमती | १९०१तील किंमती |
|---|---|---|---|---|
| घोडा | १०० | २०० | ३०० | ३५०–४०० |
| तट्टू | १२ | ३० | ३० | ३० |
| उंट | ५० | ८० | ८० | १०० |
| गाडा | ५० | ८० | ६० | ५० |
| नांगर | ५ | १० | १३ | १३ |
| बैल | ३० | ७५ | ७५ | ७५–१०० |
| गाय | १९ | २५ | ३५ | ५० |
| ह्मैस | ३० | ५० | ७५ | १००–१२५ |
| मेंढी | २ | ३ | ३ | ३½ |
| गाढव | १४ | २५ | १५ | २० |

अमरसिंह मोठा दानशूर होता व त्याची दानधर्माबद्दल फार प्रख्यातीहि असे. त्यानें अमरपूर व हामीरपूर हीं दोन गांवें वसविलीं. अमरसिंहाचीं सहा लग्नें झालीं होतीं व त्यास दोन पुत्र होते. पैकीं इ. स. १८४३ त अमरसिंहजी मृत्यु पावल्यावर वडील पुत्र रणमलसिंहजी गादीवर वसला.

३९. रणमलसिंहजी (मुलगा) १८४३-१८६९. गादीवर बसला तेव्हां रणमलसिंहजीचें वय ३२ वर्षांचें होतें. यानें ध्रांगध्र्याच्या किल्ल्याची दागदुजी करून सीथा व उमरडा येथें नवीन किल्ले बांधिले, आणि हळवद येथें नवीन राजवाडा उभा केला. सीथा येथील चंद्रासर सरोवराची दुरुस्ती करून ध्रांगध्रा येथें रणमलसर नांवाचें एक सुंदर सरोवर रणमलसिंहजीनेंच बांधिलें. हा राजा विद्याव्यासंगी होता व संस्कृत, फार्सी, उर्दू व गुजराती या भाषा उत्तम प्रकारें जाणत असे. तरुण वयांत याला शिकारीचा फार नाद असे, व ध्रांगध्र्यांतून सिंह नाहींसे होण्यापूर्वीं यानें बऱ्याच सिंहांची शिकार केली होती. गादीवर येण्यापूर्वीं संस्थान बरेंच कर्जबाजारी झालें होतें, परंतु तें सर्व कर्ज फेडून, व आपले भायात व जहागिरदार यांच्याशीं प्रेमभावानें वागून रणमलसिंहजीनें मोठ्या चातुर्यानें राज्यांत सर्वत्र व्यवस्था व आबादानी राखिली, व अखिल सौराष्ट्रांत चांगलें ह्मणवून घेतलें. रणमलपूर, राजपूर, गध्रा, घंटिला वगैरे गांवें यानें वसविलीं. प्रवासाचा बराच शोक असल्यामुळें रणमलसिंहजी पुष्कळ ठिकाणीं हिंडला. हा बराच धार्मिकही असे. सोमनाथ पाटण, गिरनार, तुळशीशाम वगैरे पवित्र स्थळीं यात्रेस जाऊन, नंतर पुढें नाशीकत्रिंबकास गोदावरीचे पुण्यदर्शनासाठीं रणमलसिंहजी गेला होता; पुढें १८६७ सालीं काशीयात्रेस गेला व नाथद्वारा, पुष्कर, शामळाजी, गोकुळ, वृंदावन, मथुरा, प्रयाग, वगैरे तीर्थांचें दर्शन घेऊन १८६८ त ध्रांगध्र्यास परत आला. इ. स. १८६३ त रणमलसिंहजीस के. सी. एस्. आय्. हा बहुमानाचा किताब मिळाला. सौराष्ट्रांतील सं-

स्थानिकांपैकीं किताबाचा शिक्का यासच पहिल्यानें बसला. रणमलसिंहजी २६ वर्षें उत्कृष्ट प्रकारें राज्य करून आपले वयाचे ५९ वे वर्षी इ. स. १८६९ त निवर्तला. याचीं तीन लग्नें झालीं होतीं, पैकीं नवानगरचा भायात जाडेजा राधूभाई याची कन्या बाराजीबा ऊर्फ व्रजकुंवरबा इच्यापासून झालेला पुत्र मानसिंहजी हा रणमलसिंहजीचे मागून गादीवर बसला.

४०. मानसिंहजी (मुलगा) १८६९–१९००. मानसिंहजी राज्यावर आल्यानंतर दुसऱ्या वर्षी बहुचराजी व अंबाजी येथील यात्रा करून पुढें लवकरच त्यानें राज्यांत शिक्षणासाठीं जागजागीं गुजराती शाळा स्थापिल्या. खुद्द ध्रांगध्र्यास एक इंग्रजी शाळा व मुलींची शाळा झाली. मंगळपूर, मेरपूर, व मानपूर अशीं तीन गांवेंही यानें वसविलीं. याच वर्षी ह्मणजे १८७० त डयूक आफ् एडिंबरा याची स्वारी हिंदुस्थानांत आली त्या वेळेस भेटीसाठीं मानसिंहजी मुंबईस गेला, व या गोष्टीचे स्मरणार्थ राजकोटच्या सिव्हिल स्टेशनमध्यें एक धर्मशाळा बांधण्यासाठीं यानें १५००० रुपये दिले. ही विस्तीर्ण इमारत उतारूच्या अत्यंत सोयीची आहे, व कित्येक उतारू येथें उतरून ध्रांगध्र्याच्या राजसाहेबांस आज तागायत दुवा देत आहेत. मानसिंहजीच्या पुत्राचीं तीन लग्नें झालीं होतीं; १ राजकोटच्या ठाकुराची कुंवरी बाजीराजबा, (२) भादरव्याचा वाढेला संस्थानिक तखतसिंहजीची कुंवरी माजिराजबा, आणि (३) धरमपूरचा राजा नारायण देवजी याची वहीण कुशळकुंवरबा. यापैकीं माजिराजबा हिला १८७२ त पुत्र झाला. ह्याचें नांव अजितसिंह व हाच सध्यां ध्रांगध्र्याच्या गादीवर राज्य करीत आहे. इ. स. १८७५ त प्रिन्स आफ् वेल्सची स्वारी हिंदुस्थान पहाण्यास आली तेव्हां मानसिंहजी मुंबईस गेला व परत आल्यावर त्यानें ध्रांगध्र्यास एक मोठा दवाखाना बांधिला. प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें ७७ सालच्या मोठ्या दरबारांस

जाण्याचें मानसिंहजीस बनलें नाहीं, तथापि त्याला के. सी. एस्. आय्. ह्या किताब मिळाला व त्याला सलामीच्या अधिक चार तोफा वाढविल्या, व पुढें त्यास एक पताकाही बक्षीस दिली. मानसिंहजीस तीन पुत्र व तीन कन्या अशीं ६ अपत्यें होतीं. वडील पुत्र वारल्यामुळें त्याचा पुत्र अजितसिंह गादीचा मालक झाला. हेच सध्यां ध्रांगध्र्याच्या गादीवर राज्य करीत आहेत. पूर्वी निर्देश केल्याप्रमाणें १९०० सालीं वडागर मीठ उत्पन्न करण्याचें इंग्रज सरकारनें राजसाहेबाशीं तह करून बंद केलें. मानसिंहजीच्या कारकीर्दीतील हीच शेवटची महत्वाची गोष्ट होय. याचे मरणसमयीं संस्थान मनस्वी कर्जांत बुडून गेलें आहे. ध्रांगध्र्यास आणिलेला आगगाडीचा स्वतंत्र फांटा, गेल्या दोन सालचा भयंकर दुष्काळ, सध्यांचे राजसाहेब व मानसिंहजी यांच्यामधील बेबनाव, मानसिंहजीचा आपल्या इतर पुत्रपौत्रांविषयीं मनस्वी प्रेमभाव, ह्या व इतर अनेक कारणांमुळें राजसाहेब अजितसिंहजीच्या हातांत संस्थान अत्यंत कर्जबाजारी स्थितींत आलेलें आहे. या बूड नसलेल्या भांड्याची दुरुस्ती करून आपल्या वडिलोपार्जित जहागिरीस पुनः नांवारूपास आणणें हें राजसाहेबांच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे.

४१. अजितसिंह (नातू) १९००—मानसिंहजीचा वडील पुत्र जसवंतसिंहजी याच्या पोटीं संवत् १९२८ पौष शुद्ध अष्टमीस ह्मणजे ता. १८ ज्यानेवारी १८७२ इसवी रोजीं राजसाहेब अजितसिंहजींचा जन्म झाला. इ. स. १८८० त जसवंतसिंहजी निवर्तल्यावर अजितसिंहजीस राजकोट येथील राजकुमार कॉलेजांत दाखल केलें. येथेंच त्यांनीं लष्करी शिक्षणही पण थोडें बहुत घेतलें. कॉलेजांत मिळण्यासारखें शिक्षण पुरें झाल्यावर पुढें अजितसिंहजींनीं अलीकडील संप्रदायाप्रमाणें हिंदुस्थानांत प्रवास केला. याप्रमाणें सर्व शिक्षण यथासांग झालें ह्मणजे कुंवरास संस्थानच्या कामाची माहिती करून देण्याचा

रिवाज आहे, परंतु मानसिंहजीशीं अजितसिंहजीचा अगदींच वेबनाव असल्यामुळें हा योग घडून येणें शक्य नव्हतें, ही मोठी दिलगिरीची गोष्ट होय. तेव्हां राज्यकारभाराची माहिती करून घेण्याऐवजीं अजितसिंहजीस स्वस्थ निरुद्योगी होऊन बसणें भाग आलें. इकडे संस्थानचा पाय दिवसेंदिवस कर्जांत खोलच चालला होता, व शेवटीं 'गंडस्योपरि पिटकः' या न्यायानें २८९९ सालची दुष्काळाची स्वारी आली. दुष्काळांत तेरावा महिना येऊन कर्नल हंटर हा पोलिटिकल एजंट व सवाईलाल ध्रांगध्र्याचा दिवाण या दुकलीच्या कारकीर्दींत त्याचें अवडंबर करून ध्रांगध्रा संस्थानचा पूर्वापार चालत आलेला वडागर मीठ पिकविण्याचा हक्क इंग्रज सरकारनें काढून घेतला. याप्रकारें संस्थानच्या तिजोरींतून पैका बाहेर जाण्याचे मार्ग एका पाठीमागून एक खुले होत गेल्यामुळें खजिना रिकामा होऊन उलट देणेदारांच्या जळवा संस्थानास लागल्या. अशा स्थितींत मानसिंहजी इ. स. १९०० च्या नवंबर महिन्याच्या १९ तारखेस वारला व त्याच वर्षीं डिसेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस राजसाहेब अजितसिंह गादीवर वसले. असंख्य छिद्रें पडलेल्या नौकेचें सुकाणू हातीं धरणाऱ्या नाविकावर केवढी जवाबदारी असते हें नुकतेच राज्यपदावर आरूढ झालेले तरुण राजसाहेब अजितसिंहजी जाणून असतीलच, व आपल्या हुषारीनें व कर्तबगारीनें राज्यकारभार चालवून ते संस्थानरूपी नौकेची दागडुजी करून तिला इंग्रजी साम्राज्याच्या कृपाछत्राखालीं सुखासमाधानांत ठेवितील व वाडवडिलांचे आशीर्वाद व प्रजाजनांचा दुवा घेतील अशी आह्मांस आशा आहे. राजसाहेब जात्या उदार व दयाळू आहेत, तद्वतच ते उद्योगी, सहनशील व कारभारांत दक्ष होवोत अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

# भाग २.

## झाल्यांचीं इतर संस्थानें.*

**वांकानेर**—हें गांव पताळीवोकलो व मुच्छु या नद्यांच्या संगमावर वसलेलें आहे. पूर्वेकडील बाजू खेरीज करून वांकानेर सभोंवती या नद्यांचें कडेंच बनलें आहे. वांकानेर राजकोटच्या ईशान्येस सुमारें २४ मैल आहे. वांकानेर खालीं सुमारें ८७ गांवें आहेत व प्रांताचें उत्पन्न २००००० रुपये आहे. टपाल आफीस, तार आफीस, शाळा, दवाखाना, धर्मशाळा वगैरे सोयी उत्तम आहेत. सुती कापड विणण्याचे माग पुष्कळ असून कोष्टयांचीं सुमारें १२५ घरें आहेत. देशी कपडा, तूप, व थोडें धान्य व कापूस हे जिन्नस व्यापारा साठीं प्रांतांतून बाहेर जातात. आयात माल ह्मणजे धातू, इमारती लांकूड, व विलायती कापड हा होय. प्रांतांत इमारतीचा पोरबंदरी दगडही बराच सांपडतो. येथें उत्तम प्रतीचीं कुलपें होतात व कातड्याचें मजबूत सामानही होतें. प्रांताचें क्षेत्रफळ ३९५ चौरस मैल आहे. हें दुसऱ्या वर्गांतील संस्थान पूर्वीं झालावाडांत होतें तें सध्यां कामाच्या सोयीसाठीं हालार प्रांताखालीं घेतलें आहे. येथील संस्थानिकास राजसाहेब ह्मणतात.

वांकानेर शहराचा देखावा फार मनोहर आहे. शहराच्या पश्चिमेच्या बाजूस लहान लहान टेंकड्या आहेत त्यांवर हल्लीं राजवाडा व इतर टुमदार बंगले बांधलेले आहेत. टेंकड्यांच्या पायथ्याशीं वसलेल्या व दोन नद्यांनीं वेष्टित अशा अर्धवर्तुलाकृति शहराचा देखावा सूर्योदयाचे वेळीं फारच हृदयंगम असतो. शहरापासून आठ दहा मैलांवर जडेश्वर ह्मणून एक स्थान आहे, त्याची सृष्टिसौंदर्याबद्दल फार ख्याति आहे.

ह्या संस्थानाची स्थापना कशी झाली हें पहिल्या भागांत येऊन गेलेंच

---

* दुसऱ्या वर्गांतील संस्थानांचीच फक्त हकीकत या भागांत दिलेली आहे.

आहे. संस्थानचा मूळ संस्थापक सुलतानजी यानें वेळोवेळीं पुष्कळ स्वाऱ्या करून हळवदशीं आपलें वैर आमरण चालविलें. शेवटीं इ. स. १६२३ त ईदर येथून हा आपल्या बायकोस घेऊन येण्याकरितां चालला असतां हळवदच्या सैन्यानें खास माथक येथें गांठलें. या लढाईत सुलतानजी पडला, व ईदरची कुंवरी सती गेली. सुलतानजीचा मुलगा मानसिंहजी वांकानेरच्या गादीवर बसला. मानसिंहजीनें हळवदवर सारखे हल्ले चालविले होते परंतु त्यांतून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं. हा १६५३ त मरण पावला. त्याचा मुलगा रायसिंहजी गादीवर आला व १६७९ त मरण पावेतों त्याच्या हातून हळवदचें कांहीं नुकसान झालें नाहीं. गुजरातचा सुभेदार महाराजा जसवंतसिंह यानें राज जसवंतसिंहजीस हळवद येथून हांकून लावून तें राज्य एका मुसलमान सरदारास जहागिरी दाखल देऊन टाकिलें होतें तें रायसिंहजीचा मुलगा चंद्रसिंहजी वांकानेरच्या गादीवर १६७९ त आला तेव्हां त्यानें आपण जिंकून घेतलें. परंतु १६८२ त राज जसवंतसिंहजीनें तें पुनः परत मिळविलें. चंद्रसिंहजीनें वांकानेरास १७२१ पर्यंत राज्य केलें व त्याच्या नंतर त्याचे दोन पुत्र प्रभुराज व केशरीसिंह यांनीं अनुक्रमें १७२८ व १७४९ पर्यंत राज्य केलें. इ. स. १७४९ त भारोजी आपल्या बापाच्या गादीवर आला. या सुमारास वांकानेर परगण्यांत काठ्यांचा फार सुळसुळाट झाला होता. जुनागढचा प्रसिद्ध दिवाण अमरजी याच्या सहाय्यानें भारोजीनें काठ्यांचें चांगलें पारिपत्य करून त्यांस मुलखांतून पार हांकून लाविलें. यानें हळवदही घेतलें होतें ह्मणतात; परंतु तें त्याच्याकडे राहिलें नाहीं. पण ही केवळ दंतकथाच दिसते. भारोजी हा जात्या शूर व साहसी होता. यानें राजकोटच्या ताब्यांतील साजडिआली गांव लुटलें व त्याचा बचाव करण्यासाठीं आलेल्या ठाकूर लाखोजीचा पराभव करून त्यास मागें फिरविलें. भारोजीचा वडील मुलगा त्याच्या हयातींतच मेला होता ह्मणून रायसिंह-

जीचा मुलगा केसरीसिंह भारोजीच्या पश्चात् १७८४ त गादीवर बसला. तो लवकरच ह्मणजे १७८७ त मरण पावला. याचा पुत्र चंद्रसिंहजी (दुसरा) आपल्या बापाच्या मागून गादीवर बसला. यास झोसीजीही ह्मणतात. भीमोऱ्याचा बीजोढांढल यानें वांकानेरचीं गुरें पळवून नेल्या-मुळें चंद्रसिंहजीनें सुदामडा गांव लुटलें. चंद्रसिंहजीनें प्रांतांत लूट करणाऱ्या काठ्यांचेंही पारिपत्य केलें. वढवाणच्या प्रथिराजबरोबर अमदाबादेहून परत येत असतां यानें वाटेंत गाईकवाडी अंमलदारांशीं तंटा केला व रक्तस्रावापर्यंत मजल येऊन ठेपली. पुढें या कृत्याबद्दल त्याला गांव देऊन भूदंड भरावा लागला. कर्नल वॉकर व बाबाजी आप्पाजी हे जेव्हां १८०७ त खंडणीची रक्कम मुकरर करण्यासाठीं आले तेव्हां कबुलायतीवर चंद्रसिंहजीनेंच सही केली. इ. स. १८३९ त चंद्रसिंहजी मरण पावल्यावर त्याचा पुत्र वखतसिंहजी गादीवर बसला. हा अत्यंत धर्मनिष्ठ होता व नेहेमीं धर्मकर्मांत गढून गेलेला असे. सोमनाथ, द्वारका, गिरनार वगैरे सौराष्ट्रांतील सर्व यात्रा यानें केलेल्या होत्या. याचा वडील पुत्र जसवंतसिंहजी १८४४ तच मरण पावला, तेव्हां वखतसिंहजी १८६० त वारल्यावर त्याचा नातू बनेसिंहजी (जसवंतसिंहाचा पुत्र) गादीवर बसला. बनेसिंहजीनें २० वर्षें राज्य केलें. पडीत जमीन वहिवाटींत आणण्यासाठीं व नवीं गांवें वसविण्यासाठीं यानें पुष्कळ श्रम केले. हा सार्वजनिक कामांमध्यें सुढ्या हातानें पैसे खर्चीत असे. नदीस पूर आला ह्मणजे शहरास पूर्वीं फार इजा होत असे त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं ह्मणून बनेसिंहजीनें शहराच्या संरक्षणार्थ एक मोठी भिंत बांधिली. बनेसिंहजी १८८१ त मृत्यु पावला व त्याचा मुलगा गगूभा (अमरसिंह) गादीवर आला. हा या वेळेस अवघा २ वर्षांचा होता तेव्हां संस्थानाची व्यवस्था एजन्सीच्या तर्फे होऊं लागली.

राजसाहेब अमरसिंहजी यांचा अभ्यास राजकुमार कॉलेजांत झाला व

नंतर त्यांनीं इंग्लंडची मुशाफरी केल्यावर १८९९ सालीं ते राज्यकारभार पाहूं लागले. हे तरुण, हुषार व मनमिळाऊ असून आपल्या संस्थानचा कारभार मोठ्या हौसेनें पहातात. आज दोन वर्षें चालू असलेल्या दुष्काळामुळें संस्थानास थोडें कर्ज आहे खरें तथापि त्याबद्दल राजसाहेबांस बिलकुल दोष देतां येत नाहीं. सुमारें १८ वर्षें संस्थानची व्यवस्था एजन्सीच्या तर्फे झाली असूनही राजसाहेब कारभार पाहूं लागतांना दुष्काळाच्या वर्षीं तिजोरी रिकामी असावी ह्याचा दोष राजसाहेबांवर कसा देतां येईल?

लिमडी—हें गांव लिमडी-भोगावो या नदीच्या उत्तर तीरावर आहे. वढवाणच्या आग्नेयीस सुमारें १८ मैलांवर हें वसलेलें आहे. वढवाणहून भावनगरास जो आगगाडीचा फांटा जातो त्यावर लिमडी आहे. या संस्थानांत सुमारें ४० खेडीं आहेत व वार्षिक उत्पन्न अजमासें २५०००० रुपये आहे. या दुसऱ्या वर्गांतील संस्थानिकास ठाकूर साहेब ह्मणतात.

प्रसिद्ध हरपाळदेवाचा द्वितीय पुत्र मांगूजी हा लिमडीच्या ठाकुरांचा मूळ पुरुष होय. जांबु व कुंडणीची जहागीर मांगूजीस मिळाली होती व तो तेथेंच राज्य करीत असे. मांगूजीच्या नंतर त्याचा मुलगा मधुपाळ अथवा मुंजपाळ हा गादीवर आला. जुनागढच्या चूडासमा राच्या मुलीबरोबर मुंजपाळानें लग्न केलें. त्यांचा पुत्र धवल अथवा धामल यास वेरावळ पाटणच्या वाज पुलाजीनें आपली मुलगी देऊन बरोबर ७ गांवेंही दिलीं. इ. स. ११९४ त दिल्लीच्या सुलतान कुतुबुद्दीन इबाकनें धामलास जम्बूहून हांकून काढिलें तेव्हां तो आपल्या सासऱ्याकडे गेला व तेथून त्यानें नवीनच जहागीर मिळवून किनाऱ्यावर धामलेज नांवाची राजधानी स्थापन केली. याचा मुलगा काळजी यानें कुंडणी हें राजधानीचें शहर केलें. भनराज, लाखो, भोजराज, करणसिंह, आस्करण, साधोजी,

वगैरे, वगैरे पुष्कळ ठाकूर होऊन गेले. अमदाबादचा सुलतान महंमद बेगडा यानें जंबु जिंकून घेतलें होतें तें साधोजीनें मोठ्या युक्तीनें व शौर्यानें परत मिळविलें. पुढें अस्करणजी नांवाच्या एका ठाकुरानें जंबूहून शियाणीस राजधानी आणिली. अस्करणजीचा मुलगा अदेराजजी याची छावणी एके वेळीं घाघरेटियाच्या तळ्यावर असतां वढवाणचा चंद्रसिंहजी मेथली जिंकून वढवाणास परत जात होता. चंद्रसिंहजीच्या मनांत त्याच तळ्यावर मुक्काम करण्याचें आलें ह्मणून त्यानें चारणाबरोबर अदेराजजीस तेथून निघून जाण्याविषयीं निरोप पाठविला. या निरोपास अदेराजजीनें भीक न घातल्यामुळें दोघांची लढाई जुंपली व चंद्रसिंहजीचा मोड झाला. या लढाईसंबंधीं एक कविता चारण लोक ह्मणत असतात. अदेराजजीचा नातू हरभमजी यानें राजधानी लिंमडी येथें आणिली. पालिआडच्या काठी लोकांबरोबर हरभमजीचे वारंवार तंटे होत. हरभमजी १७८६ त मरण पावला व त्याचा मुलगा हरीसिंहजी गादीवर आला व याच्याच कारकीर्दींत कर्नल वॉकरनें खंडणी मुकरर केली. या हरीसिंहजीचे प्रपौत्र ठाकुरसाहेब जसवंतसिंहजी हे १८६२ त लिमडीच्या गादीवर आले. व हे अल्पवयी असल्यामुळें त्यांच्या मातोश्री राज्यकारभार पाहूं लागल्या, परंतु त्यांच्या हातून राज्य सुरळीत चालेना ह्मणून सरकारानें १८६७ त व्यवस्था आपल्या हातांत घेतली. जसवंतसिंहजींचा अभ्यास राजकुमार कॉलेजांत होऊन ते पुढें विलायतचा प्रवासही करून आले. ठाकुरसाहेब जसवंतसिंह यांना १८७६ त मुखत्यारी मिळाल्यापासून संस्थानचा कारभार सुयंत्र चालला आहे. सर जेम्स फरगसन यांच्या कारकीर्दींत यांना मुंबईच्या गव्हरनरच्या कायदेकौन्सिलाचे सभासद नेमिलें होतें. हे मनमिळाऊ व धार्मिक आहेत व प्रजेच्या हितासाठीं झटत असतात. एवढा भयंकर दुष्काळ पडला असतांही संस्थानास बिलकुल कर्ज नसणाऱ्या सौराष्ट्रांतील फारच थोड्या संस्थानिकांत यांची गणना आहे. यांचा कित्ता गिरवून जर आमचे संस्थानिक आपल्या राज्यांत योग्य व्यवस्था ठेवितील

नंतर त्यांनीं इंग्लंडची मुशाफरी केल्यावर १८९९ सालीं ते राज्यकारभार पाहूं लागले. हे तरुण, हुषार व मनमिळाऊ असून आपल्या संस्थानचा कारभार मोठ्या हौसेनें पहातात. आज दोन वर्षें चालू असलेल्या दुष्काळामुळें संस्थानास थोडें कर्ज आहे खरें तथापि त्याबद्दल राजसाहेबांस बिलकुल दोष देतां येत नाहीं. सुमारें १८ वर्षें संस्थानची व्यवस्था एजन्सीच्या तर्फें झाली असूनही राजसाहेब कारभार पाहूं लागतांना दुष्काळाच्या वर्षीं तिजोरी रिकामी असावी ह्याचा दोष राजसाहेबांवर कसा देतां येईल?

**लिमडी**—हें गांव लिमडी-भोगावो या नदीच्या उत्तर तीरावर आहे. वढवाणच्या आग्नेयीस सुमारें १७ मैलांवर हें वसलेलें आहे. वढवाणहून भावनगरास जो आगगाडीचा फांटा जातो त्यावर लिमडी आहे. या संस्थानांत सुमारें ४० खेडीं आहेत व वार्षिक उत्पन्न अजमासें २५०००० रुपये आहे. या दुसऱ्या वर्गांतील संस्थानिकास ठाकूर साहेब ह्मणतात.

प्रसिद्ध हरपाळदेवाचा द्वितीय पुत्र मांगूजी हा लिमडीच्या ठाकुरांचा मूळ पुरुष होय. जांबु व कुंडणीची जहागीर मांगूजीस मिळाली होती व तो तेथेंच राज्य करीत असे. मांगूजीच्या नंतर त्याचा मुलगा मधुपाळ अथवा मुंजपाळ हा गादीवर आला. जुनागढच्या चूडासमा राच्या मुलीबरोबर मुंजपाळानें लग्न केलें. त्यांचा पुत्र धवल अथवा धामल यास वेरावळ पाटणच्या वाज पुलाजीनें आपली मुलगी देऊन बरोबर ७ गांवेंही दिलीं. इ. स. ११९४ त दिल्लीच्या सुलतान कुतुबुद्दीन इवाकनें धामलास जम्बूहून हांकून काढिलें तेव्हां तो आपल्या सासऱ्याकडे गेला व तेथून त्यानें नवीनच जहागीर मिळवून किनाऱ्यावर धामलेज नांवाची राजधानी स्थापन केली. याचा मुलगा काळजी यानें कुंडणी हें राजधानीचें शहर केलें. भनराज, लाखो, भोजराज, करणसिंह, आस्करण, साधोजी,

वगैरे, वगैरे पुष्कळ ठाकूर होऊन गेले. अमदाबादचा सुलतान महंमद बेगडा यानें जंबु जिंकून घेतलें होतें तें साधोजीनें मोठ्या युक्तीनें व शौर्यानें परत मिळविलें. पुढें अस्करणजी नांवाच्या एका ठाकुरानें जंबूहून शियाणीस राजधानी आणिली. अस्करणजीचा मुलगा अदेराजजी याची छावणी एके वेळीं घाघरेटियाच्या तळ्यावर असतां वढवाणचा चंद्रसिंहजी मेथली जिंकून वढवाणास परत जात होता. चंद्रसिंहजीच्या मनांत त्याच तळ्यावर मुक्काम करण्याचें आलें ह्मणून त्यानें चारणाबरोबर अदेराजजीस तेथून निघून जाण्याविषयीं निरोप पाठविला. या निरोपास अदेराजजीनें भीक न घातल्यामुळें दोघांची लढाई जुंपली व चंद्रसिंहजीचा मोड झाला. या लढाईसंबंधीं एक कविता चारण लोक ह्मणत असतात. अदेराजजीचा नातू हरभमजी यानें राजधानी लिंमडी येथें आणिली. पालिआडच्या काठी लोकांबरोबर हरभमजीचे वारंवार तंटे होत. हरभमजी १७८६ त मरण पावला व त्याचा मुलगा हरीसिंहजी गादीवर आला व याच्याच कारकीर्दींत कर्नल वॉकरनें खंडणी मुकरर केली. या हरीसिंहजीचे प्रपौत्र ठाकुरसाहेब जसवंतसिंहजी हे १८६२ त लिमडीच्या गादीवर आले, व हे अल्पवयी असल्यामुळें त्यांच्या मातोश्री राज्यकारभार पाहूं लागल्या, परंतु त्यांच्या हातून राज्य सुरळीत चालेना ह्मणून सरकारानें १८६७ त व्यवस्था आपल्या हातांत घेतली. जसवंतसिंहजींचा अभ्यास राजकुमार कॉलेजांत होऊन ते पुढें विलायतचा प्रवासही करून आले. ठाकुरसाहेब जसवंतसिंह यांना १८७६ त मुखत्यारी मिळाल्यापासून संस्थानचा कारभार सुयंत्र चालला आहे. सर जेम्स फरगसन यांच्या कारकीर्दींत यांना मुंबईच्या गव्हरनरच्या कायदेकौन्सिलाचे सभासद नेमिलें होतें. हे मनमिळाऊ व धार्मिक आहेत व प्रजेच्या हितासाठीं झटत असतात. एवढा भयंकर दुष्काळ पडला असतांही संस्थानास बिलकुल कर्ज नसणाऱ्या सौराष्ट्रांतील फारच थोड्या संस्थानिकांत यांची गणना आहे. यांचा कित्ता गिरवून जर आमचे संस्थानिक आपल्या राज्यांत योग्य व्यवस्था ठेवितील

तर लोकांस नांवें ठेवण्यास जागा सांपडणार नाहीं. लिमडीहून वढवाण १४ च मैल आहे पण तेथें जावें तों संस्थानांत कांहीं निराळाच प्रकार दृष्टीस पडतो.

वढवाण—हें पुरातन शहर वढवाण-भोगावो या नदीच्या दक्षिण-तीरावर आहे. वढवाण शहरा संभोंवार तट आहे व जुना राजवाडा दुरून फार चांगला दिसतो. हल्लीं चार पांच वर्षांखालीं वढवाणास एक नवीन राजवाडा बांधला आहे त्यांतील रंगाचें काम अर्वाचीन धाटणीवर फार सुंदर केलेलें आहे. वढवाणच्या अंमलाखालीं ३१ गांवें असून संस्थान दुसऱ्या वर्गांत मोडतें. जमीन बहुतेक काळी व सुपीक आहे परंतु कोठें कोठें रेताळ व गोराडू जमीनही आहे. विहिरी कितीही खोल गेल्या तरी वढवाणच्या आसपासचें पाणी खारेंच असतें, व या पाण्यानें पिकें केल्यास जमिनींत पहिलें पीक चांगलें येतें खरें, परंतु त्याच्या योगानें सर्व जमीन इतकी खारी व खराब होऊन जाते कीं पुढें सात आठ वर्षेपर्यंत तींत पावसाळ्याचीं पिकें सुद्धां होत नाहींत. वढवाणची लोकसंख्या सुमारें १७००० आहे व त्यापैकीं नऊ भाग हिंदू व एक भाग मुसलमान आहेत. वढवाणास औदीच ब्राह्मणांचीं सुमारें १००० घरें आहेत व श्रीमाळी वाण्यांचीही वस्ती बरीच आहे. संस्थानचा वार्षिक वसूल सुमारें ५००००० रुपये आहे. आगगाडी होण्यापूर्वी वढवाणचा कापसाचा व्यापार फारच अवाढव्य होता, आणि हल्लीं जरी तो पूर्वीपेक्षां पुष्कळ उतरला आहे तरी तो बराच मोठा आहे. धान्य, तूप, व कापड वगैरेंचा आयात व्यापार पुष्कळ चालतो. जिनें वगैरे घोड्याचें सामान येथें तयार होतें व आसपास खपतें. पाथरवट वगैरे दगडी काम करणारे लोक ध्रांगध्र्याच्या खालोखाल येथेंच हुषार आहेत. वढवाणास देशी साबण पुष्कळ तयार होतो व सौराष्ट्रांत सर्वत्र खपतो.

वढवाण शहरापासून सुमारें ४ मैलांवर वढवाण क्यांप आहे व तेथें

मुंबई—बडोदा रेल्वेचें स्टेशन असल्यामुळें कापसाचा व्यापार मुख्यत्वें करून तेथेंच चालतो. सध्यांच्या ठाकूर साहेबांचे वडील बंधु राज्यावर असतां त्यांनीं वढवाण शहरांत आगगाडी येऊं नं दिल्यामुळें क्यांपचें महत्व फार वाढलें व पुढें जरी भावनगर रेल्वेचा फांटा शहरांतून गेला तरी त्याचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. वढवाण क्यांपांत झालावाडच्या अ. पोलिटिकल एजंटचें ठाणें आहे.

वढवाण शहर फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. याला पूर्वीं अस्थिग्राम ह्मणत असत, कारण शूलपाणी नांवाचा एक मनुष्यभक्षक यक्ष भोगावो नदीच्या तीरावर राहून वढवाणच्या लोकांवर आपली उपजीविका करीत असल्यामुळें त्यांच्या अस्थींचा येथें ढीगच झाला होता. शूलपाणीचा हा असा क्रम चालला असतां जैनलोकांचा २४ वा तीर्थंकर वर्धमान स्वामी हा वढवाणास आला होता. त्यानें शूलपाणीचें मन वळवून त्यास सन्मार्गास लाविलें व शहरास मुक्त केलें ह्मणून त्याला वर्धमानपूर ह्मणूं लागले, व सध्यांचें नांव वढवाण हा याचाच अपभ्रंश होय. पुढें वढवाण वाळा, वलभी, सोळंकी वगैरे वंशांतील लोकांच्या ताब्यांत जाऊन नंतर मुसलमानांच्या हातांत पडलें. वढवाण प्राचीन शहर असल्यामुळें तेथें बरेच ताम्रपट सांपडले आहेत, व त्यांचा पुष्कळ उपयोगही झाला आहे. मुसलमानां नंतर वढवाण हळवदच्या झाला रजपुतांकडे गेलें व अद्यापही त्याच वंशांतील संस्थानिक तेथें राज्य करीत आहेत. पूर्वीं हळवदच्या गादीच्या वारसास वढवाण जिवाई दाखल मिळत असे. अनहिलवाडचा सिद्धराज जयसिंह जुनागढच्या रा खेंगाराचा पराभव करून त्याची राणी राणिकदेवी हिला घेऊन वढवाणास आला व त्यानें तिला वश करून घेण्यासाठीं पुष्कळ यत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले. रा खेंगारास व राणिकदेवीच्या दोन मुलांस सिद्धराजानें ठार केलें होतें त्यामुळें राणिकदेवीनें सिद्धराजास शाप देऊन ती वढवाणच्या भोगावो नदींत सती गेली, व तिचें थडगें नदीच्या दक्षिणतीरावर अद्यापि आहे.

"वढवाणच्या स्वतंत्र राज्याच्या स्थापनेसंबंधीं हकीकद ध्रांगध्र्याच्या इतिहासा खालीं येऊन गेलीच आहे. प्रसिद्ध मांधवसिंहाचा पुत्र अर्जुनसिंह यानें वढवाणच्या ठाणेदारास हांकून लाविलें व तेथें १७०७ त स्वतंत्र राज्य स्थापिलें. हाच सध्यांच्या ठाकुराचा मूळ पुरुष होय. अर्जुनसिंह हा बुद्धिमान पुरुष होता व त्यानें रिकाम्या लढायांत वेळ न घालवितां आपल्या राज्यांत व्यवस्था चांगली केली. अर्जुनसिंह १७३९ त मरण पावला व त्याची राणी हाडा अमरसिंहाची मुलगी देवकुवरबा ही श्रावण वद्य ५ सं. १७९५, श. १६६१, इ. स. १७३९ या दिवशीं सती गेली. तिची कवर राणिकदेवीच्या कबरे शेजारीं आहे व वढवाणच्या ठाकुरांची दहनक्रिया याच ठिकाणीं होते. हिला हाडी माता ह्मणतात, व वढवाण किंवा चुडा येथील राजघराण्यांत लग्न झालें ह्मणजे नवीन जोडप्यास हिचें दर्शन घ्यावें लागतें. अर्जुनसिंहास एकंदर पांच मुलगे होते. अर्जुनसिंह १७६५ त मरण पावल्यावर त्याचा वडील पुत्र चंद्रसिंह गादीवर आला. चंद्रसिंहाचा लिमडीच्या ठाकुराशीं नेहेमीं लढा असे, व एकदां यांचें तुंबळ युद्ध होऊन त्यांत चंद्रसिंहजीनें फार थोड्या लोकांनिशीं लिमडीच्या मोठ्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत वढवाणच्या आरबांचा जमादार गोरिंभो यानें फारच पराक्रम केला, किंबहुना जयाचें सर्व श्रेय त्यालाच दिलें पाहिजे. या स्वामिकार्यनिष्ठ जमादाराच्या नोकरीचें पुढें चीज न होतां त्या बिचाऱ्यास आत्महत्या करण्याचा प्रसंग आला ही फार खेदाची गोष्ट होय. ज्या आरबांनीं चंद्रसिंहास प्रसंगीं मदत केली त्यांचा पगार न मिळाल्यामुळें ते बिथरून गेले असतां त्यांचा नाईक गोरिंभो यानें त्यांना पुष्कळ वेळपर्यंत थोपवून धरिलें होतें, परंतु शेवटीं ठाकुराच्या चुलत्यानें पुनः पुनः दिलेलीं वचनें मोडल्यामुळें ते आपल्यावरच घसरतील असें वाटून बिचाऱ्या गोरिंभोजच प्राणत्याग करावा लागला हा वढवाणच्या राजघराण्यास लहानसा कलंक नव्हे!"

चंद्रसिंह १७७८ त मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा प्रथिराज गादीवर बसला. प्रथिराजास पीठोभाई ह्मणत व याच्यावर प्रजेची फार प्रीति असे. हा बापाप्रमाणेंच शूर होता व आसपासच्या मुलखांत लुटालूट करी, परंतु याच्या मुलखांत गडबड करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. याच्या पराक्रमाच्या पुष्कळ गोष्टी प्रचलित आहेत. इ. स. १८०५ त एक वेडगळ लढाई उद्भवली व तिच्या योगानें प्रांताची नासधूस बरीच झाली. या लढाईत वढवाण एका बाजूस व लिमडी, ध्रांगध्रा, सायला आणि चूडा हीं दुसऱ्या बाजूस होतीं. वढवाणास भाईबंदांची व काठी लोकांची चांगली मदत असल्यामुळें त्यास हार खावी लागली नाहीं तथापि वढवाणचें फार नुकसान झालें. ही लढाई अगदीं क्षुल्लक कारणावरून उपस्थित झाली होती, तथापि तिनें वढवाणचीं चार गांवें खेरीज करून सुमारें १६० गांवें उजाड करून सोडिलीं. इतर संस्थानांसही ही लढाई बरीच बाधली. पुढें १८०६ त एकदांचा तह झाला, पण लवकरच प्रथिराज मरण पावला. त्याच्या पाठीमागून जालमसिंहजी गादीवर आला. हा केवळ सव्वा वर्षाचा असल्यामुळें त्याची आई बाईराजबा हीच कारभार पहात असे. याच सुमारास कर्नल वॉकरची स्वारी सौराष्ट्रांत आली व इतर संस्थानांबरोबर वढवाणच्याही खंडणीची रक्कम नक्की झाली. बाईराजबा ही हुषार स्त्री होती व तिनें वढवाणची तटबंदी दुरुस्त करून खेड्यापाड्यांचीही स्थिति सुधारली, व शेजारच्या संस्थानिकांशीं सलोख्यानें राहून राज्य नांवारूपास आणिलें. जालमसिंहजी १८२७ त मरण पावला व त्याचा एकुलता एक मुलगा राजसिंहजी हा एकच वर्षाचा असल्यामुळें राज्याचीं सूत्रें बाईराजबा हिच्याच हातीं राहिलीं. पुढें बाईराजबा व राजसिंहाची आई बाजिराजबा यांच्यामध्यें तंटा उपस्थित होऊन बाईराजबास ध्रांगध्रा येथें जाऊन राहणें भाग पडलें. या वेळेस राजकोटास पोलिटिकल एजंटी स्थापन होऊन वढवाणास एक ब्रिटिश अंमलदार रहात असे, परंतु तो संस्थानांत फारशी ढवळाढवळ करीत नसे. बाईराजबानें आ-

पणास मदत करण्याबद्दल ब्रिटिश अंमलदाराशीं पुष्कळ खटपट केली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं तिनें इरीचें मोठी फौज जमा करून जबरदस्तीनें वढवाणांत प्रवेश केला व बिचाऱ्या राजसिंहजीस ताब्यांत घेतलें. बाईराजबा १८५१ त मरेपर्यंत वढवाणास तिची सत्ता कायम होती. राजसिंहजी मध्यें बिलकुल पाणी नव्हतें व त्याची कारकीर्द म्हणजे राजकुलांतील बायांच्या तंट्यांनींच व्यापून गेली होती.

इ. स. १८७५ तें राजसिंह मरण पावला तेव्हां त्याचा नातू दाजीराज गादीवर आला. हा १८८१ त वयांत येईपर्यंत राज्याचा बंदोबस्त ब्रिटिश सरकारच्या हातीं होता. पुढें १८८३ त एका असिस्टंट पोलिटिकल एजंटास बरोबर घेऊन दाजीराज विलायतची सफर करून आला. दाजीराज १८८५त मरण पावला व त्याचा भाऊ बालसिंहजी यास गादी मिळाली. हेच सध्यांचे ठाकूर साहेब होत. ठाकूर साहेबांस साहेब लोकांशीं हिंडण्याफिरण्याचा शोक बराच आहे, व हे जात्या हौशी असल्यामुळें अंमळ खर्चिक आहेत. दाजीराज हुषार व पाणीदार मनुष्य असे, व तसाच तो शहाणाही असल्यामुळें त्याच्या मरणसमयीं संस्थानच्या तिजोरींत बरीच शिल्लक होती. परंतु १८८५ पासून आज १७ वर्षांत संस्थानची स्थिति अशी होऊन बसली आहे कीं सौराष्ट्रांतील अत्यंत कर्जबाजारी संस्थानांची यादी केल्यास वढवाणचें नांव पहिलें घालावें लागेल, व असाच क्रम चालल्यास इंग्रज सरकारास संस्थानची व्यवस्था आपले हातीं घ्यावी लागेल. परमेश्वर ठाकूर साहेबांस व त्यांच्या सल्लागारांस सुबुद्धि देवो व त्यांचे हातून रयतेचें कल्याण होऊन वरचा प्रसंग न येवो अशी आह्मी आशा करितों.

समाप्त.

माझे मज कळों येती अवगुण ।
काय करूं मन अनावर ॥ १ ॥

आतां आड उभा राहें नारायणा ।
दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥

वाचा वदे परी करणें कठीण ।
इंद्रियां आधीन झालों देवा ॥ ३ ॥

तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास ।
न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

तुकाराम.

## परिशिष्ट.

[पहिलें पुस्तक छापून संपल्यावर आमचे मित्र रा. रा. व्यंकटेश त्रिंबक **चांफेकर** बी. एस्. सी. बी. ए. यांस सौराष्ट्रांतील भूगर्भरचनेसंबंधीं थोडी माहिती या पुस्तकासाठीं लिहिण्याविषयीं आह्मीं विनंति केली. रा. रा. चांफेकर यांनीं भूगर्भशास्त्राचा अभ्यास केला असल्यामुळें, व त्यांचें या प्रांतांत बरेंच वास्तव्य असल्यामुळें या कामास ते योग्य आहेत. त्यांनीं आमची विनंति मान्य करून सदरील भाग लिहिण्याचे श्रम घेतले हें त्यांच्या नैसर्गिक चांगुलपणांस उचितच आहे. या लहान पुस्तकासाठीं सौराष्ट्रांतील सृष्टिरचनेचें चित्र काढून तें मराठी वाचकांपुढें ठेऊं दिलें हे रा. रा. **चांफेकर** यांचे आमच्यावर व परंपरेनें मराठी वाचकांवर मोठे उपकार आहेत.]

## सौराष्ट्राची भूगर्भरचना.

**पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां**
**विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।**
**बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं**
**निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥**

**भवभूतिः.**

**जेथें रम्य वनांतरीं विहरिणी सिंधू नदी पावना**
**तेथें शुष्क मरुस्थली दिसतसे जी त्रास देई जनां ।**
**होते शैल जिथें पयोधि उसंळे तेथें अजी भूवरी**
**भूराधाकुचयुग्मशिल्परचना दावी जणूं हा हरी ॥**

एकोणिसाव्या शतकांतल्या शेवटल्या दिवसाच्या दिनमणि अस्तंगत होईपर्यंत शास्त्रवेत्त्यांनीं असंख्य अद्भुत शोध लाविले व निसर्गदेवतेच्या अतर्क्य शक्तीचें चित्र ट फ करणाऱ्या मनुष्यापुढेंही लखलखीत उभें केलें, याचा जर विचार केला तर *भूगर्भशास्त्रवेत्त्यांनीं सौराष्ट्राविषयीं ज्या कांहीं

* [भूगर्भशास्त्रवेत्ता ह्मणजे Geologist ]

गोष्टी लिहून ठेविल्या आहेत, त्यांपैकीं चार दोन गोष्टी या छोटेखानी ग्रंथांतही लिहिल्या शिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

सौराष्ट्र ऊर्फ काठेवाड हें. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील आंब्याच्या कैरीच्या आकाराचें द्वीपकल्प, ही शाळेंत शिकतांनां लहानपणापासूनच झालेली आमची दृढ समजूत होती. पाश्चिमात्य विद्वानांची सौराष्ट्र हें चौरस द्वीपकल्प आहे अशीच सकृद्दर्शनीं समजूत झाली असावी असें दिसतें; व थोडा विचार केला तर ही समजूत खरी आहे असें दिसून येईल. ह्मणजे द्वारकेपासून दीव बेटापर्यंत व दीवपासून पेरीम बेटापर्यंत रेषा काढून चौरस कल्पिला तर ह्याची सत्यता लक्षांत येईल.

सौराष्ट्राच्या भौगोलिक व भौगर्भिक परिस्थितीकडे पाहिलें तर हें द्वीपकल्प ज्वालामुखी शक्तीनें निर्माण झालेलें ह्मणजे ज्वालामुखी बेट अगर बेटांच्या समूहावर ह्याची मुहूर्तमेढ उभारलेली असावी असें दिसतें. सौराष्ट्रांतील डोंगरांचा रोंख नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे असा जातो. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश रूक्ष असून विशेष सुपीक नाहीं, दक्षिणेकडील सुपीक आहे. प्रसिद्ध गिरनारपर्वताच्या पायथ्याशीं दाट जंगलें आहेत. जसें जसें नैर्ऋत्येकडे जावें तसतसे डोंगर एकापेक्षां एक उंच उंच दृष्टीस पडतात. यापैकीं बरडा डोंगर २००० फूट उंच असून गिरनार ३६६६ फूट उंच आहे.

भूगर्भशास्त्रवेत्त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें सौराष्ट्र हें अगदीं परवांपर्यंत बेट असून त्यास द्वीपकल्पाचें स्वरूप अगदीं अलीकडेसच प्राप्त झालें आहे. पण ब्रह्मदेवाची जवळ जवळ एक अहोरात्र ह्मणजेच बहुतकरून या भूगर्भकोविदांच्या 'अलीकडे' आणि 'परवां' या शब्दांचा अर्थ समजावयाचा. हा भूगोल बराच थंड होऊन, त्यावरील वातावरणांत वीज व पाऊस यांची येरझार सुरू झाल्यापासून आजपर्यंत जो काळ लोटला, त्याचे भूगर्भशास्त्रज्ञांनीं चार

भाग कल्पिले आहेत. ह्यांपैकीं पहिल्या कालांत सेंद्रिय प्राणी अस्तित्वांतच आला नव्हता. भूगर्भांतील सुवर्णभांडारें व रत्नांचीं आगरें ह्या वेळचीं आहेत असें समजतात. ह्या कालास भूगर्भशास्त्रांत निर्जीव काल (azoic period) अशी संज्ञा आहे. दुसऱ्या कालांत अगदी क्षुद्र कोटींतील सेंद्रिय जंतू व मत्स्य वर्गांतील जलचर प्राण्यांच्या उत्पत्तीस आणि दगडी कोळसा व पोंवळीं यांच्या अस्तित्वास प्रारंभ झाला. ह्या कालास जीवोदय काल (palæo-zoic period) ह्मणजे जीवकोटी कालाचा अरुणोदय काल अशी संज्ञा आहे. तिसरा काल ह्मणजे अति विशाल अशा स्थलचर व व्योमचर प्राण्यांच्या उत्पत्तीचा काल होय. या कालांत तीस तीस, चाळीस चाळीस फूट लांब असलेल्या पाली व सरडे यांच्यासारख्या स्थलचर व व्योमचर प्राण्यांचीच या भूतलावर वसति होती असें मानिलें आहे. यास मध्यम जीव काल (meso-zoic period) ह्मणतात. व चवथ्या कालांत सस्तन ह्मणजे आंचळाच्या प्राण्यांचा उदय मानला असून तदनंतर प्राणिवर्गांत श्रेष्ठ मानलेल्या मनुष्याच्या उदयाचीं चिन्हें दृष्टिगोचर झालीं असावीं असें मानलें आहे. ह्यास नवजीव काल (neo-zoic period) अशी संज्ञा आहे. ह्यांचेही आणखी पोटभेद कल्पिले आहेत.

ह्या नवजीव कालांत ह्मणजे या भूगोलावर सस्तन प्राण्यांची वसति झाल्यानंतर कांहीं काळ पावेतों सौराष्ट्र हें एक बेट होतें. सौराष्ट्रांतील हल्लींचें झालावाड हें त्या वेळीं खाऱ्या पाण्याचें सरोवर होतें. ह्या ५००० चौरस मैल क्षेत्रफळाच्या सरोवराचा खंबायतचें आखात व कच्छचें लहान रण यांशीं उघडपणें 'जलव्यवहार' होता. त्या काळीं सौराष्ट्र बेट होतें असें मानण्यास सबळ कारणें आहेत. कच्छचे लहान रणापासून तों थेट खंबायतचे आखाता पर्यंत जेथें तेथें मृण्मय भूमी (alluvial beds) व क्षारस्थली (salt-beds) यांचीच मालिका लागते. सौराष्ट्राच्या इतर भागांपेक्षां हा भाग सखल आहे. भोगावो नदीस पावसाळ्यांत पूर आला

ह्मणजे हा सर्व प्रदेश एक जलनिधीच आहे असें भासतें. एका काळीं समुद्राशीं संयुक्त असल्यानें ह्या जमिनींत क्षार फार आहे. पावसाचें पाणी मुरल्यावर जमिनींतून क्षार उभरून येतो व पुढें तो वाळला ह्मणजे जिकडे तिकडे मिठाचें पापुदरे बनतात.

एका काळीं सिंधु नदी खंबायतच्या आखातास अगर लाहोरापर्यंत सरळ उत्तरेस गेलेल्या समुद्राच्या एका टोंकास मिळत असावी असें भूगर्भशास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. हिंदुस्थानचा नकाशा ध्यानांत आणला तर सिंधु नदी पतिगृहीं जातांना सरळ नाकासमोर जायचें सोडून आपल्या उजव्या बाजूस मुरडत मुरडत हल्लीं असलेल्या ठिकाणीं कसकशी गेली असेल त्याची कल्पना सहज करतां येईल.

आपल्या आंसाभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेस फिरण्याच्या पृथ्वीच्या दैनिक गतीमुळें विषुववृत्ताकडे वाहाणाऱ्या सर्व नद्यांचा आपल्या उजव्या वाळवंटांत अधिक सलगीनें घर्षण करण्याचा रोंख असतो. याच नियमाप्रमाणें सिंधु नदीही क्रीडा करीत करीत खंबायतच्या आखातांतून लहान रणांत व लहान रणांतून हल्लीं आहे तेथें गेली असावी. वर सांगितलेल्या मृण्मय भूमी ह्याच गोष्टीचें दर्शक होत. नदी ज्या ज्या प्रदेशांतून वहात असते त्या प्रदेशांत नदीच्या पुराबरोबर आलेला गाळ नदीच्या दोन्ही बाजूंस सांचत जातो. उत्तर हिंदुस्थानांत सिंधु व ब्रह्मपुत्रा यांमधील प्रदेशांत बहुतेक सर्वत्र या गाळाच्या योगानें बनलेल्या मृण्मय भूमी याचप्रमाणें बनल्या असून त्या नवजीव कालांतल्या आहेत असें भूगर्भशास्त्रवेत्त्यांनीं ठरविलें आहे. दुसऱ्या पुष्कळ गोष्टींचा काल निश्चित करण्यास ह्या मृण्मय भूमी फार महत्वाच्या आहेत.

याच सुमारास सौराष्ट्राचा नैऋत्य भाग मध्य आफ्रिका व अरबस्थान यांशीं संयुक्त असावा असें कित्येकांचें ह्मणणें आहे. जसा जसा हा जोडणारा सांधा भूगर्भस्थ शक्तीनें पाण्याख खालावत चालला तसतसा सौरा-

ष्ट्राचा हा नैऋत्य भाग वरवर येऊं लागला. कदाचित् ज्या ज्वालामुखी शक्तीनें गिरनार वगैरे पर्वतांस पृथिवींतून वर लोटलें त्याच शक्तीचें हें कार्य असावें. सिंधु नदी लहान रण सोडून मोठ्या रणाकडे जाऊं लागली तशी ह्या झालावाड सरोवरासही प्रेमभरती येऊन तेंही हळुहळु उथळ होऊं लागलें. व सौराष्ट्रास द्वीपकल्पाचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें असावें. व एका काळीं विरमगांवापर्यंत पसरलेलें असें जें लहान रण तेंही हळुहळु संकुचित होऊं लागलें व त्यास हल्लीं असलेला आकार प्राप्त झाला असावा.

खनिजशास्त्रवेत्त्यांनीं निरनिराळ्या रीतीनें झालेल्या दगडांस निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. मृण्मय स्थली, स्लेटपाटीचे दगड, पोरबंदरी चुन्याचे दगड, खडू, हे सर्व पाण्यांत झालेले ह्मणजे ह्यांच्या द्रव्यांचे थर पाण्यांतले पाण्यांत एकावर एक सांचून घट्ट झालेले होत. चकमकीचे दगड, काळवत्री दगड, व दुसरे इमारतीचे काळसर दगड, हे सर्व अग्नीच्या कार्यानें झालेले, ह्मणजे ज्वालामुखी पर्वतांच्या मुखांतून निघालेल्या उष्ण रसांच्या (Lava) योगानें झालेले. यावरून ही गोष्ट अगदीं उघड आहे कीं जेथें जेथें आजकाल चुन्याचे दगड, पाटीचे दगड, वगैरेच्या खाणी सांपडतात ते ते प्रदेश एकाकाळीं जलमय असले पाहिजेत, व जेथें चकमक व काळवत्री दगड सांपडतात तेथें ज्वालामुखींचा अंमल एकदां गाजत असला पाहिजे. कोंकणपट्टींत सह्याद्रीचे डोंगराळ प्रदेशांत व देशावर जे काळसर ओबड धोबड दगड खाणींतून काढतात अगर सुटेच पडलेले असतात त्यांस इंग्रजींत ट्रॅप (Trap) व बॅसल्ट (Basalt) अशी संज्ञा आहे. मलबार टेंकडीवर मुंबईमध्यें व कोंकण किनाऱ्यावर जिकडे तिकडे ह्यांचे उभेच्या उभे सुळके दृष्टीस पडतात. सौराष्ट्रांत ट्रॅप व चुन्याचे दगड विपुल आहेत. भावनगर येथें शिहोर व बर्डा येथील डोंगरांत ट्रॅपच्या खाणी सांपडतात. तसेंच मध्य सौराष्ट्रांत मुख्यत्वें करून चोटीला येथें

ट्रॅप विपुल आहे. गिरनार पर्वताचा मध्यस्तंभ ट्रॅपचाच आहे. कोंकणपट्टींतील ट्रॅप, सौराष्ट्रांतील ट्रॅप, व अरबस्थानांतील ट्रॅप, सर्व समकालीन होत. सौराष्ट्रीय ट्रॅप बहुतकरून चुन्याच्या दगडांच्या थरावर सांपडतो. ह्यावरून असे अनुमान निघतें कीं पहिल्यानें हा प्रदेश पाण्याखालीं असावा व नंतर वर आला असावा. कांहीं काळानंतर ज्वालामुखी पर्वतानें आपला आ पसरला, व त्यांतूनच हा ट्रॅप ह्या चुन्याच्या दगडांच्या थरांतून वर आला असावा. ज्या ज्या भूभागांतून हीं ट्रॅपच्या उष्ण रसाचीं अजस्र कारंजीं उडूं लागलीं त्या त्या भागांत मैलच्या मैल लांब व रुंद अशा ट्रॅपच्या खोल खाणीं शिवाय कांहीं सांपडत नाहीं. ह्या ज्वालामुखीच्या उष्णतेनें पुष्कळ जातींचीं द्रव्यें एकत्र वितळून झालेले Obsidion नांवाचे बिलोरी कांचे सारखे दगड राणपूर व जाफराबाद येथें सांपडतात. ह्या सर्व ट्रॅपमय प्रदेशावरून ज्या योगानें हा ट्रॅप बनला असेल त्या ज्वालामुखींच्या भयंकर व अवाढव्य स्वरूपाची कांहींशी कल्पना करतां येते. सौराष्ट्रांत झालावाडामध्यें कांहीं भूभाग मध्यमजीव कालांतील असावेत असें अनुमान आहे. अगदीं जुन्यांत जुन्या काळचे भूभाग असे हेच.

सौराष्ट्राच्या पश्चिमभागांत फक्त मृण्मय भूमी व पाण्यांत झालेल्या दगडाच्या खाणी आहेत. नवजीव कालांतही बरेच अलीकडे तयार झालेले दगड असावेत. ह्यांच्या थरांची उंची दीव बेटापासून हळुहळु वाढत जाऊन पश्चिमेस पोरबंदरच्या किनाऱ्याजवळ समुद्रसपाटीवर साठ फूट होते. येथील दगड हलके, भुऱ्या रंगाचे, व छिद्राळ असे असतात पण इमारतीसाठीं हे उत्तम मानिले आहेत. ह्या दगडांची उत्तम जात 'पोरबंदरी दगड' या नांवानें प्रख्यात आहे. मुंबईस व इतर ठिकाणीं हा दगड येथून इमारती साठीं मुद्दाम नेतात. या दगडां संबंधीं एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी आहे, ती ही कीं जर ह्या दगडाचे कांहीं कण घेऊन सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें पाहिले तर अगदीं सूक्ष्म जलचर जंतूंच्या

बहिःकवचाचे हे बनले आहेत असें दिसून येईल. ह्या प्राण्यांपैकीं कांहीं चलनी नाण्यासारखे वाटोळे असतात ह्मणून ह्या दगडास शिक्केशाही चुन्याचा दगड (Nummulitic-lime Stone) असें ह्मणतात. बफन नांवाच्या एका पाश्चिमात्य विद्वानानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—" the very dust of this Earth has been alive", "या पृथ्वीच्या धुळींत सुद्धां जीव आहे," व हें अक्षरशः खरें आहे. सुरतेजवळ जो अशाच तऱ्हेचा शिक्केशाही दगड सांपडतो तो ट्रॅपच्या वर आहे. तेथें काय परिस्थिति असावी ह्याची कल्पना वाचकांस आतां करतां येईल.

वर सांगितलेल्या ह्या साठ फूट उंचीच्या भूमीच्या वरील थरांत कोणत्याही प्रकारच्या गत प्राण्यांच्या अस्तित्वाचीं अस्थिपंजरादिक चिन्हें आढळून येत नाहींत. गत प्राण्यांचीं अस्थिपंजरें अगर त्यांच्या शरीराचा कोणताही अवशिष्ट भाग, अगर त्या भागाचा मातींत उठलेला उठाव, वगैरे भूमींत सांपडलेल्या वस्तू भूगर्भशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें भौगोलिक स्थितीचें अनुमान काढण्यास फार महत्वाच्या आहेत. ह्यावरून हे एवढे थर पाण्यांतून एकदम वर आलेले नसावेत. जर ते एकदम वर आले असते तर ह्या थरांत सांपडलेल्या प्राण्यांचीं अस्थिपंजरें आढळलीं असतीं. पण ह्या थराखालीं समुद्रसपाटीहून बरेच वर असलेल्या थरांत किनाऱ्यावरील जीवन व्यापार करीत असलेल्या हल्लींच्या जलचर प्राण्यां सारख्या प्राण्यांचीं अस्थिपंजरें विपुल सांपडतात. ह्यावरून एका काळीं पाण्यांत असलेल्या ह्या भागाचे थर ज्वालामुखी अगर दुसऱ्या कोणत्या तरी शक्तीनें झपाट्यानें वर येत असावे असें अनुमान करणें गैरवाजवी होणार नाहीं. ज्या ज्वालामुखी शक्तीनें झालावड सरोवराचें सखल मैदान केलें त्या शक्तीच्या नाड्या अजून आंखडल्या नसून सौराष्ट्राचा हा नैऋत्य भाग अथवा बहुतेक पश्चिम भाग उत्तरोत्तर अजूनही वर येत आहे असें भूशास्त्रवेत्त्यांचें मत आहे.*

---

* मुंबईत फ्रेंचपुलाचा पाया खणतांना समुद्राच्या सपाटीहून कित्येक फूट अंत-

सौराष्ट्राच्या उत्तरकिनाऱ्याच्या कांहीं भागापासून ईशान्य कोनापर्यंत पसरलेलें कच्छचें रण, व आग्नेय कोनांत असलेलें खंबायतचें आखात यांचाही भौगर्भिक इतिहास मौजेचा आहे.

कच्छ प्रांतास तिन्हीं बाजूंनीं वेढणारें हें रण सुमारें ९००० चौरस मैल क्षेत्रफळाचें आहे. ह्या रणाचे दोन भाग कल्पिले आहेत, एक लहान रण व दुसरें मोठें रण. दोन्ही रणांची भौगर्भिक व भौगोलिक परिस्थिति सारखीच आहे. जगतीतलावर ह्या रणासारखें दुसरें रण कोठेंही नाहीं. निसर्गदेवतेच्या न्यायमंदिरांत ह्या रणाच्या मालकीविषयीं जमीन व समुद्र यांनीं मांडिलेला दावा अजून चालूच आहे. पण वहिवाटीचा हक्क सांगून जमीन जिंकील असें ह्मणतात. वर्षांतील बहुतेक महिने रण कोरडें असतें, पण पावसाळ्याच्या सुमारास समुद्रानें उग्र स्वरूप धारण केलें ह्मणजे नैऋत्येकडून वाहाणाऱ्या वाऱ्याच्या योगानें रणांत पाणी शिरतें व मे पासून तों सप्टेंबर पर्यंत तें तसेंच राहातें. नंतर तें हळुहळु ओसरतें. सौराष्ट्राच्या नैऋत्येस असलेल्या ह्या रणाच्या भागास लहान रण ह्मणतात. साधारणपणें तें त्रिकोणाकार आहे. याचें क्षेत्रफळ २००० चौ. मैल आहे. रेती व माती आणि वाळूच्या टेंकड्या या शिवाय या रणांत दुसरें कांहींएक

---

रावर एका प्रकारच्या मिश्र शिलांचे थर सांपडले होते. ओहोटीचें पाणी ओसरून गेल्यावर समुद्राच्या उघड्या किनाऱ्यावर लहान शिंपे, कवड्या, माशांचे बखले वगैरे ज्या अनेक वस्तू दृष्टीस पडतात त्यांत वाळू व लहान दगडाच्या गोट्या वगैरे मिळून जो एक घट्ट दगड बनतो तसल्यांपैकीं हे थर आहेत. ह्यांस आपण पाहिजे तर 'संकीर्ण' दगड ह्मणूं. अशा संकीर्ण दगडांचा पंधरा फुट जाडीचा थर सांपडल्यावरून हा बॅक् बेचा भाग अजून वर वर येत आहे; तसेंच ह्या बेटाच्या पूर्वेकडील भागांत गोदीचा पाया खणतेवेळीं समुद्रसपाटीहून बरेच फुटांखालीं झाडाचे बुंधे जशाचे तसे आपल्या पूर्वठिकाणीं जलसमाधिस्थ झालेले आढळले. यावरून हा भाग खालीं खालीं जात आहे असें अनुमान आहे. याचप्रमाणें स्वीडनचे कांहीं भाग वर व कांहीं भाग खालीं जात आहेत.

दिसत नाहीं. झाडपाल्याचें तर नांवच नको. कच्छच्या आखाताजवळ या लहान रणाची समुद्रसपाटीहून उंची सरासरी सहा सात फूट आहे. पूर्वेस उत्तरोत्तर रण सखल होत गेलें आहे. आजूबाजूच्या प्रदेशांतून कांहीं नद्या रणास सरित्पति समजून मोठ्या उल्हासानें येतात. पण ह्या नीरस रणाच्या दर्शनानेंच विरस होऊन पावसाळ्या पर्यंत जमिनींत अंतर्धान पावतात. मृगजळाचें हें रण माहेरघर होय. रेताळ मैदानांत भर दोनप्रहरीं जिकडे तिकडे मिठाचे स्फटिक चमकत असल्यानें कांचेच्या समुद्रासारखा भास होऊन त्यांत पारदर्शक स्फटिकांच्या पायावर जणुं काय सुवर्णमेखलांची तटबंदी असलेली सुंदर नगरी तरंगत आहे असा भास होतो. ह्या रणांतूनही जीवनकलहपर असलेल्या मनुष्यास वारंवार जाण्याचा प्रसंग येतो. रणाच्या कोनाकोनावर रस्ते काढलेले आहेत. प्रवास पायीं अगर उंटावर करतात. रणाच्या हद्दीवर गोड्या पाण्याचा चांगला पुरवठा आहे. शरदतूंत प्रवास करणें फारसें कठीण नाहीं. पण उन्हाळ्यांत डोळे पांढरे व्हायचीच वेळ येते.

पुरातनकालीं हें रण समुद्राचें पात्र असावें असा अंदमास आहे. पण समुद्राचें पाणी कसें सुकलें हें समजण्यास समुद्राचें हें पात्र कोणत्या तरी कारणानें वर आलें असावें अगर समुद्रच खालीं गेला असावा ह्या अनुमानां शिवाय दुसरा मार्ग नाहीं. पूर्वी ह्या रणाचा चढाव फार थोडा असावा ह्मणून पाणी अगदीं रणभर भरलेलें असावें. पण उत्तरोत्तर हा चढाव वाढूं लागला असावा, व समुद्राचें पाणी खालीं खालीं जाऊं लागलें असावें, व शेवटीं शेवटीं तर समुद्राचें पाणी चाळीस पन्नास फूट रुंदीच्या पट्ट्यांतच राहूं लागलें असावें. झिंजुवाड्या कडील लोकां मध्यें अशी एक दंतकथा आहे कीं एका वेळीं रणांत बारमास पाणी पुष्कळ असून मोठीं मोठीं तारवें येत होतीं. रण उथळ होऊन कोरडें पडण्यास ज्वालामुखी शक्ति कारण झाली असावी असें प्रतिपादन करणारे लोक इ. स. १८१९ त

कच्छमध्यें झालेल्या धरणीकंपा नंतर जमिनीच्या भेगांतून लोखंडी खिळे व दुसरें तारवटी लोखंडी सामान बाहेर निघालें होतें असें ह्मणतात. ह्यावरून झिंजुवाडी लोकांच्या ह्मणण्याला वळकटी येते. ह्याच सुमारास सौराष्ट्र किनाऱ्या जवळच रेतींतून एक सोळा फूट उंचीच्या मळाई मातीच्या टेंकडींतून एक फुटकें तारू सुसरी सारखें जणुं काय ऊन्ह खाण्यासच वर आलेलें दृष्टोत्पत्तीस आलें. जागोजाग नांगरासाठीं वापरीत असलेले मोठे दगडही दृष्टीस पडतात. तिकडील लोकही कांहीं कांहीं स्थळें एक वेळ बंदरें होतीं ह्मणून दाखवितात. रणाचे कांहीं भागांत समुद्र जणुं काय आतांच येथून गेला असेल असा भास होतो. ह्या सर्व गोष्टींवरून रणांत एकदां सर्वत्र बरेंच पाणी असावें असें उघड दिसतें. वाळूच्या टेंकड्यांची आंतर रचना पाहिल्यास वाळूच्या थरावर मळाई मातीचे थर व मळाईच्या थरावर पुन्हा वाळूचे थर व मध्यें मध्यें रेताड दगडाचे थर अशी असते. यावरून समुद्र व जमीन आप-आपले हक्क स्थापण्याकरितां पुन्हा पुन्हा हातघाईवर येऊन हमरीतुमरी चालवीत असत असें दिसतें. इ. स. १८१९ सालच्या भूकंपाच्या सुमारास सौराष्ट्राच्या उत्तरकिनाऱ्यावरील कित्येक गांवें जलसमाधिस्थ झालीं. हें ऐकून मुंबईच्या सॅटरडे रिव्ह्यूमध्यें एका गोऱ्या विद्वानानें असें भाकित केलें कीं ज्या ज्वालामुखी शक्तीनें रण उत्तरोत्तर वर वर येत गेलें त्याच शक्तीच्या उलट कार्यानें आतां तें पुन्हा खालीं जाऊं लागलें आहे. सरकारचें ह्या गोष्टीकडे लक्ष गेलें व चवकशी करण्यासाठीं प्रख्यात भूगर्भशास्त्रज्ञ डा. ओल्डहम् यांची योजना झाली. पण भूपटावरील हे सर्व उलाढालीचे खेळ कालाचे असल्या कारणानें कालान्तरानेंच ते समजावयाचे. आजमितीस यांविषयीं सर्व विद्वानांचें ऐकमत्य झालेलें नसल्यां कारणानें कांहींच सांगतां येत नाहीं. ज्वालामुखी शक्तीची हातचलाखी या भूमिभागावर चालू आहे एवढें मात्र खास. पण सिंधु, रूपेण, सरस्वती वगैरे नद्यांतून आलेल्या रेताड मळाईनेंही कदाचित् रण उथळ होत गेलें असेल.

खंबायतच्या आखाताच्या पायथ्याशीं साबरमतीच्या मुखापासून वायव्येस ३५ मैलपर्यंत पसरलेलें असें एक दुसरें रण आहे. पूर्वी समुद्राचें हें एक चिंचोळें नाळें असावें असें ह्मणतात. पण कालावधीनें हेंही आपले हात पाय पसरून बसणार नाहीं कशावरून?

सौराष्ट्राचा आग्नेय किनारा व भडोच आणि सुरत यांमधील समुद्राच्या भागास खंबायतचें आखात असें ह्मणतात. ह्या आखातालीं पुष्कळ नद्या मिळतात ह्मणून त्यांच्या रेताळ मळाईनें ह्या आखाताच्या मुखांत लांबच्या लांब भाव्या ऊर्फ दांड्या पडल्या आहेत. ह्या सर्व दांड्यांस मलाकाच्या दांड्या ह्मणतात. मधून मधून जरी समुद्राचीं खोल नाळीं आहेत तरी उत्तरोत्तर दांड्यांची टोंकें एकमेकांकडे निमुळतीं असल्यामुळें नावाडी लोकांस ह्यांतून जाणें फार धोक्याचें आहे. ओहोटीच्या वेळीं ह्या भाव्यांपैकीं कांहीं बहुतेक उघड्या पडतात. हें आखात उत्तरेकडे अरुंद अरुंद होत गेल्यानें भरतीचें पाणी निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या उंचीपर्यंत वाढतें; व त्यास वेगही फार असतो. भरतीचें पाणी सरासरी १२ फुटांपासून ३४ फुटांपर्यंत वाढतें. आखाताच्या अरुंद भागांतून ओहोटीचें पाणी उतरत असतां समुद्राच्या भरतीचें पाणी आंत जोरानें येऊं लागतें. ह्या बाहुयुद्धांत भरतीची सरशी होऊन पाण्यावर लाटेचा एक लोंढा उत्पन्न होऊन तो फारच वेगानें पुढें सरसावतो. अंवसेपौर्णिमेस ह्याचें स्वरूप फार उग्र असतें. ह्याचा शब्दही फार मोठा असतो. ह्याची उंचीही कधीं कधीं १२ अथवा १५ फूट असते. ह्यास 'घोडा', 'अस्वल' अशींच नांवें दिलेलीं आढळतात. ह्याची फेरी दिवसांतून दोनदां असावयाची. गैरसावध नांवाड्यांस चांगलाच हात दाखविण्यांत ह्याजवळ दया माया कांहीं नाहीं, ह्मणून नावाड्यांस फारच सावध राहाणें भाग पडतें. आखातांत धोक्याचीं स्थानें दाखविण्यास जागोजाग दिवादांड्या व स्तंभ रोंविले आहेत.

आखातास मिळणाऱ्या नद्यांतून दर वर्षी पडत असलेली रेती व इतर

गाळ यांनीं कांहीं वर्षांनीं हें आखात भरून जाऊन व्यापारास तें अगदींच निरुपयोगी होईल व कदाचित् कच्छच्या रणासारखें उघडें पडेल कीं काय अशी शंका मनांत येणें साहजिक आहे. व कांहीं अंशीं हें खरें आहे. पण विद्वान् लोकांनीं बराच तपास केला व प्रयोगही करून पाहिले. त्यांतील स्थूल गोष्टी येणेंप्रमाणें:—आसपासच्या प्रदेशांत एक इंच पाऊस पडला तर आखातांत पाणी १०००००००००० एक अब्ज टन पडतें. इतक्या पाण्यांत गाळ एक कोटी टन असतो. ह्या प्रदेशांत पाऊस सरासरी दरवर्षीं ३६ इंच पडतो. ही पावसाळ्यांतली गोष्ट झाली. त्याशिवायही बाकीचे आठ महिने नद्यांबरोबर गाळ वहात येत असतोच. ह्मणजे दरवर्षीं ४० कोटी टन गाळ आखातांत पडतो. इतका गाळ दरवर्षीं आखातांत जर सांचला तर ३६ चौ. मैल क्षेत्रफळाचें व १० फूट उंचीचें असें एक बेट दरवर्षीं येथें तयार झालें पाहिजे; व या हिशोबानें पाहिलें तर आखात कधींच भरून आलें असतें. पण भरतीच्या पाण्यास फार जोर असल्या कारणानें सगळा गाळ तळापासून निघून पाण्यांत तसाच तरंगत राहून सगळीकडे पसरतो. त्यापैकीं व अगदीं थोडा अंश मात्र आखातांत स्थिरावून सांचतो. ह्या रीतीनें ह्या आंकडेमोड्यांनीं असें अनुमान काढलें आहे कीं आखात भरून येण्यास निदान १००,००० वर्षें तरी पाहिजेत. दुसरें असें कीं बहुतेक गाळ येणार पावसाच्या दिवसांत तर भरती आपलें उलट काम चालविणार दिवसांतून दोनदां. कसेंही असो, परंतु थोडाबहुत गाळ सांचत जात आहे ही गोष्ट आखातांत अजून मोठ्या होत असलेल्या भाड्यांवरून निर्विवाद आहे.

इ. स. १८६६ त मुंबईच्या सॅटरडे रिव्ह्यूमध्यें एकानें असा उल्लेख केला कीं, जरी खंबायतच्या आखातांत नद्यांच्या योगानें गाळ सांचून आखात अरुंद व उथळ होत आहे असें दिसतें तरी वस्तुस्थिति तशी नाहीं. कारण भावनगर, धोलेरा, महुवा, वगैरे सौराष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यावरील

शहरांजवळ असलेल्या समुद्राच्या नाळ्यांचीं तोंडें दिवसें दिवस रुंद होत आहेत व पावसाळ्यांत भरतीच्या पाण्यानें तेथील भाग नाहींसे होत आहेत. व घोघा येथील मुसलमानांचें कबरस्थान तर कांहीं दिवसांनीं समुद्राच्या घशांत अचुक पडेल असा रंग दिसत आहे, वगैरे. ह्या गोष्टीकडे सरकारचें लक्ष गेलें. तपास करतां ह्या गोष्टींत कांहीं तथ्यांश आहे असें डा. ओल्डहमनेंही कळविलें. पण जाफराबाद येथील एका गोऱ्या अंमलदारानें कळविलें कीं गेल्या दाहा बारा वर्षांत येथील समुद्र पंधरा वीस फूट मागें सरला आहे. मांगरोळ, वेरावळ वगैरे बंदरांतही असेच प्रकार दृष्टोत्पत्तीस आले. ह्या सर्व गोष्टींनीं रिव्ह्यूमधील लेखास बळकटी न येतां हे फेरफार स्थानिक असून उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्यांपैकीं नसल्यानें विशेष महत्वाचे नाहींत असें बहुमत ठरलें. दोन गोष्टी मात्र ठाम ठरल्या. पहिली अशी कीं भरतीच्या व ओहोटीच्या पाण्याला फार जोर असल्यानें सगळा गाळ एकत्र न सांचतां सगळीकडे पसरतो. आणि दुसरी अशी कीं भाव्या समान्तर पडत नसल्यानें एका प्रवाहानें कांहीं नव्या बनत चालल्या तर कांहीं मोडत जातात.

गेल्या सोळाशें वर्षांत खंबायतच्या आखातांत व्यापारासंबंधें अनेक परदेशीय लोक येऊन गेले. त्यांनीं ह्या आखाताविषयीं जागोजाग बरेंच लिहून ठेविलें आहे. ह्या लेखांवरून वर सांगितलेल्या कालगतीनें होणाऱ्या लहान सहान फेरफारांहून दुसरे अकटोविकट फरक झाल्याचें दिसून येत नाहीं. लेख फार मार्मिक असून त्या त्या काळची आखाताची स्थिति त्यांत अगदीं हुबेहुब वर्णिली आहे. वर लिहिलेल्या 'अस्त्ली अगर घोडमली' लोंढ्याविषयीं एकजण असें लिहितोः—"बंदरांत येतांना ओहोटीचे वेळीं कोरड्या पडलेल्या वाळवंटांत मीं एक कुत्रा निजलेला पाहिला. कांहीं वेळानें भरती लागली. इतक्यांत बंदराकडून अतिशय वेगानें येत असलेल्या लोंढ्यापुढें कुत्रा जीव घेऊन पळत सुटला. पण आतां काय करावें

असा विचार करतो आहे. इतक्यांत तो त्या अस्वली लोंढ्याच्या मुसंडींत सांपडून गतप्राण झाला." खंबायत, भडोच, वगैरे बंदरें एका काळीं चांगलीं व सोयीचीं होतीं असें कित्येकांनीं लिहिलें आहे. पण ह्यांच्या पाठीमागून आलेल्या कांहींच्या ह्मणण्याप्रमाणें हीं बंदरें त्रासदायक होतीं असेंच दिसतें. सध्यां तर खंबायत ह्यास बंदर हें नांवच साजत नाहीसें झालें आहे.

खंबायतचे आखातांत पेरीम अगर पिराम नांवाचें एक बेट भडोचचे समोर आहे. ह्या बेटासंबंधीं एक दोन गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. हें बेट सौराष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यापासून फक्त ५,७० थार्डांच्या अंतरावर आहे. ह्याची लांबी व रुंदी अनुक्रमें १३०० यार्ड व ५०० यार्ड आहे. समुद्रसपाटीहून हें ६१ फूट उंच आहे. सौराष्ट्रकिनाऱ्यापासून हें इतकें जवळ आहे तरी आश्चर्याची गोष्ट ही कीं, सौराष्ट्रकिनारा व हें बेट यांमधील समुद्राच्या नाल्याची खोली ७५ पुरुष आहे व बेटाच्या पूर्वेस पाण्याची खोली १०० पुरुष आहे. हें बेट पूर्वीं सौराष्ट्राचा भाग असून सौराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्याप्रमाणें समुद्रसपाटीहून हें बरेंच वर आल्यावर ज्वालामुखी शक्तीनें निर्दयपणें सौराष्ट्रापासून त्याची ताटातूट केली असें भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें ह्मणणें आहे. बेटांत उत्कृष्ट गोडें पाणी विपुल आहे. जमिनीच्या सपाटी खालीं २० फुटांवर पाणी लागतें.

सौराष्ट्राची या भागाजवळील भूगर्भरचना व या बेटाची भूगर्भरचना अगदीं सारखी आहे:—तळाशीं रेतीचा पिंवळा दगड, मग नद्यांतील रेताळ मळाई, व पुन्हा दगड. मात्र सौराष्ट्राच्या या भूस्तरांत कोणत्याही जातीचीं अस्थिपंजरें सांपडत नाहींत. बेटांत मात्र भूगर्भशास्त्रज्ञांस अतिशय महत्वाच्या अशा आज काल पृथ्वीवर असलेल्या जातीसारख्या सस्तन प्राण्यांच्या अस्थी सांपडतात. मुंबई व कलकत्ता येथील एशियाटिक सोसाइटीचे संग्रहालयांत व लंडन येथील भौगर्भिक संग्रहालयांत यांपैकीं

कांहीं अस्थी मुद्दाम ठेविल्या आहेत. डायनोथीरिअम् ह्या नांवाचे हत्तीसारखे जंगी प्राणी पृथ्वीवर असत. यांचे दोन्ही सुळे हत्तीच्या सुळ्यांसारखे आंखूड व सरळ नसत पण ते ८।१० फूट लांब बाहेर आलेले असून पुढील पायांकडे वाघनखांप्रमाणें वळलेले असत. पेरीम बेटांत या प्राण्यांच्या अस्थी सांपडेपर्यंत युरोपांतच हे प्राणी होते असें मानलें जात असे. पण नंतर हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या शिवालिक नांवाच्या टेंकडींत याच प्रकारच्या अस्थी सांपडल्या व नंतर पेरीम बेटांतही त्या आढळून आल्या. या शिवालिक टेंकड्यांत *ब्रह्माथीरीयम नांवाच्या प्राण्याच्या अस्थी सांपडतात. ह्या प्राण्यास सांबरासारखीं पण दुहेरी शिंगें, मोठे तिरकस डोळे, व गेंड्यासारखें नाक असतें. ह्या प्राण्याच्या अस्थीही पेरीम बेटांत सांपडल्या. याचप्रमाणें जिराफ गेंडा, हत्ती, यांच्याही अस्थी आढळून आल्या. पण युरोपांत सांपडलेल्या अस्थींशीं यांची तुलना करून पाहतां हिंदुस्थानांतील हे प्राणी युरोपांतील प्राण्यापेक्षां फार मोठे असावे असें विद्वानांचें ह्मणणें आहे. सुसर व गोड्या पाण्यांत राहाणाऱ्या कांसवाच्या अस्थीही संग्रहालयांत पाठविलेल्या आहेत. पण या सर्व अस्थी रेताळ वाळूच्या दगडांच्या थरांत सांपडतात व खाऱ्या पाण्यानें धुवून निघाव्या तशा शुभ्र, कठिण, व जिल्हईदार आहेत. कांहीं अस्थींच्या भोंवतीं खाऱ्या पाण्यांतील क्षुद्र कीटकांचीं घरें चिकटलेलीं आहेत. नर्मदा,

---

* डायनोथीरीयम, ब्रह्माथीरीयम, तसेंच शिवाथीरीयम, विष्णुथीरीयम, वगैरे प्राण्यांचें दर्शन मनुष्यास झालेलेंच नाहीं. पण नदीच्या मळाई मातींत व इतर जमिनीच्या थरांत ज्या अस्थी सांपडतात त्यांचा आकार ध्यानांत घेऊन, तेवढ्यावरूनच मूळ प्राण्यांचे जीवनव्यापार कोणत्या प्रकारचे असतील हें धोरण बांधून ह्या प्राण्यांचे वर्ग निश्चित करून शरीररचनाशास्त्रांत (anatomy) निष्णात अशा विद्वानांनीं स्थान मान पाहून त्यांस नांवें दिलीं आहेत. हिमालय हें हरिहरादिक देवांचें स्थान मानलें आहे, ह्मणून यांत सांपडणाऱ्या कांहीं अस्थींवरून त्या प्राण्यांस शिवाथीरीयम, ब्रह्माथीरीयम, वगैरे नांवें दिलीं आहेत.

गोदावरी, सिंधु, वगैरे नद्यांच्या मुखांशीं ज्या कांहीं सस्तन प्राण्यांच्या अस्थी सांपडतात त्या ठिसूळ, मळकट व खडबडीत आहेत. या वर सांगितलेल्या अस्थी सस्तन प्राण्यांच्या व गोड्या पाण्यांत राहाणाऱ्या प्राण्यांच्या आहेत, तर ह्या पेरीम बेटांतील भूस्तरांत कोठून याव्या, खाऱ्या पाण्याचें त्यांवर कार्य केव्हां झालें असावें, वगैरे प्रश्न सहज उत्पन्न होणारे आहेत. दुसरें असें कीं अशा प्रकारच्या अस्थी हिंदुस्थानांत थोड्या ठिकाणीं सांपडतात, पण सांपडतात तेथें मात्र विपुल सांपडतात. पेरीम बेटांतील रेताळ वाळूच्या दगडांत कोठें कोठें ट्रॅपच्या गोट्या सांपडतात. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन एका गोऱ्या पंडितानें एक अगदीं चमत्कारिक भासणारें विधान केलें आहे तें येणेंप्रमाणेः—जेथें जेथें ह्या अस्थी सांपडतात त्या सर्व प्रदेशांत ह्मणजे साधारणपणें सातपुडा व विंध्याद्रि या पर्वतांच्या दक्षिणेस हिंदुस्थानांत एका काळीं सर्वत्र सपाट प्रदेश असावा, व त्यांत मोठीं मोठीं सरोवरें असावींत. ट्रॅपनीं आच्छादिलेल्या सह्याद्रि वगैरे डोंगरांच्या ऐवजीं सरोवरें व दलदली यांच्या योगानें रमणीय व दाट जंगलांत स्वच्छंदपणें रंवथ करणाऱ्या सस्तन प्राण्यांनीं व सरोवरांत निष्कंटक राज्य करणाऱ्या सुसरी व कांसवें वगैरे जलचरांनीं गजबजलेलीं मैदानेंच असावींत. पण जेव्हां का ज्वालामुखी देवीनें आपलें चंडी स्वरूप धारण केलें तेव्हां ह्यापैकीं कांहीं प्रदेश वरवर येऊं लागले पण बॅसल्ट व ट्रॅपच्या उष्णरसाची त्यांच्या माथीं टोपी बसली. ज्वालामुखीचा अंमल हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर फार कडक रीतीनें गाजल्याचीं जीं अनेक चिन्हें जागोजाग आढळतात त्यांत दोन तीन गोष्टी विशेष नजरेस धरितात त्या याः—जिकडे तिकडे सांपडणारा बॅसल्ट व ट्रॅप व त्यांतही पाण्याखालीं बनलेल्या दगडांच्या थरांवर आढळणारा ट्रॅप; सौराष्ट्रापासून पेरीम बेटाची ताटातूट व त्याच्या चारी बाजूंस पाण्याची आश्चर्यकारक खोली; व बहुतेक सर्व डोंगरांवर ट्रॅपची टोपी. जेव्हां हे प्रदेश वर वर येऊं लागले तेव्हां मैदानांतील पाण्यानेंही नदीमार्ग पाहिला. व ह्या प्राण्यांनींही पा-

ण्याच्या आश्रयानें तिकडचीच वाट धरली. नद्यांच्या पुरा बरोबर दोन्ही कांठावरील मृतप्राण्यांच्या अस्थी वाहून जाऊं लागल्या व गाळाबरोबर मुखांशीं सांचूं लागल्या. "मोठ्या नद्यांच्या मुखांशीं समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा वेग फार असल्या कारणानें तेथें गाळ न सांचतां समुद्रांत तरंगत तरंगत संथ पाण्यांत अगर समोरील किनाऱ्यावर सांचत गेला. याप्रमाणें नर्मदा वगैरे नद्यांतील गाळ सौराष्ट्र किनाऱ्यावर व मलक्काच्या बेटांच्या किनाऱ्यावरून सांचला असावा. ज्वालामुखी देवीच्या फेरतपासणींत सौराष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यावरील कांहीं भाग मातृभूमीपासून वेगळा निघाला त्यासच पेरीम बेट असें नांव मिळालें. इतर नद्यांचीही हीच कथा. पेरीम बेटांत रेतीच्या दगडांत ज्या ट्रॅपच्या गोट्या सांपडतात त्या नदींतून ज्वालामुखीच्या पहिल्या झटक्याच्या वेळेस आलेल्या होत. पेरीम बेटालाही ट्रॅपची टोपी आहेच ती दुसऱ्या झटक्याच्या वेळची, वगैरे, वगैरे." हें टांचण पुष्कळांस कल्पित कादंबरीसारखें वाटण्याचा संभव आहे व तें साहजिक आहे. पण यांत सत्यतेचा बराच अंश आहे. कसेंही असलें तरी पेरीम बेटासंबंधीं सांगड चांगली जुळते हें खास. हे गोरे पंडित सरस्वती देवीचे खरे भक्त. अश्रांत मेहनत, दीर्घ उद्योग व अप्रतिम चौकस बुद्धि अशी याच लोकांमध्यें आढळते. यांत मोबदल्याचा प्रश्नच नाहीं. फक्त ज्ञानार्जन व तज्जन्य समाधान यांवरच त्यांची दृष्टि असते. स्वराज्य-साम्राज्य हें एक कारण असेल, आह्मी नाहीं ह्मणत नाहीं. पण ह्या कामांत तरी हें कारण गौण होय. हल्लीं आपल्यापैकीं चांगले खातेपिते असे किती लोक ऐतिहासिक अगर शास्त्रीय माहिती मिळविण्यांत आपल्या निवृत्तिकालाचा विनियोग करीत असतील? असलेच तर हाताच्या बोटांवर मोजतां येतील इतकेच. असो.

गेल्या शतकांत सौराष्ट्रांत ज्वालामुखीचा प्रभावद्योतक असे धरणी कंपाचे धक्के तीन चारदां बसल्याचें टांचण पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतें.

इ. स. १८१९ त कच्छमध्यें एक भयंकर धरणीकंप झाला व त्याच्या योगानें रणाच्या पश्चिमभागांत, पन्नास मैल लांब, १६ मैल रुंद, व १८ फूट उंच असा एक डोंगर झाला. ह्या कंपाच्या योगानें भुज शहरास फार नुकसान पोंचलें, अमदाबाद येथील कांहीं मशीदी जाया झाल्या, सौराष्ट्रांत कांहीं घरें पडलीं, सरोवरें उथळ होऊन कोरडीं पडलीं व दक्षिण प्रांतासही थोडाबहुत प्रसाद मिळाला.

इ. स. १८६४ त एप्रील महिन्यांत सकाळच्या अकरा वाजल्यानंतर सौराष्ट्राच्या पुष्कळ भागांत एक जब्बर धक्का बसला. धक्क्यापूर्वी दूर होत असलेल्या मेघनादासारखा आवाज जमिनींत होत होता. नंतर पांच सहा सेकंडपर्यंत धरणीस कंप सुटला होता. संध्याकाळीं कित्येक ठिकाणीं पुन्हां धक्का बसला होता. पण ह्या खेपेस कोठें फारसें नुकसान झाल्याचें समजत नाहीं.

इ. स. १८८१ च्या नव्हेंबर महिन्याच्या मध्यरात्रीं राजकोट येथें एक धक्का बसला होता. कंप सुमारें ६ सेकंड राहिला. त्याचा रोंख नैऋत्येकडून आग्नेयीकडे होता. हा धक्का सौराष्ट्राच्या इतर पुष्कळ भागीं समजण्यांत आला होता.

बहुतकरून ज्वालामुखी, धरणीकंप व उष्णोदकांचीं कुंडें हीं सर्व एक जुटीनें असावयाचीं असा नियम आहे. त्याप्रमाणें सौराष्ट्रांतही कित्येक ठिकाणीं तीं आहेत. वायव्येस द्वारकेजवळ ओखामंडल येथें पिंडतारक नांवाचें पवित्र मानिलेलें कुंड आहे. गीरच्या जंगलांत तुळशीशाम नांवाचें फार मनोहर उष्णकुंड आहे. या उष्णोदकांत गंधकाचा अंश असल्या कारणानें खरूज, कांटा, वगैरे बरे करण्याचे औषधी गुण याचे आंगीं आहेत असें ह्मणतात.

या सर्व गोष्टींचा सारांश येणेंप्रमाणें:—

(१) सौराष्ट्र द्वीपकल्पाची मुहूर्तमेढ ज्वालामुखी बेटांच्या समूहावर उभारण्यांत आली असावी.

(२) मध्यमजीव कालांत सौराष्ट्राच्या ईशान्येसच कांहीं जमीन व इतर सर्वत्र पाणी असावें. गिरनार पर्वताच्या माथ्यावर असलेले 'नीस' gneiss नांवाचे दगड ज्वालामुखी शक्तीनें भूगर्भातून पाठीमागून वर आलेले आहेत ते निर्जीव कालाचे नव्हेत.

(३) नवजीव कालाच्या सुमारास सौराष्ट्र हें एक बेट होतें. पश्चिमभागांतील मृण्मय भूमि, व पोरबंदरी दगड, व दुसरे रेताळ दगड ह्याच वेळीं झालेले. झालावाड या वेळीं खाऱ्या पाण्याचें सरोवर होतें.

(४) ईशान्य आफ्रिकेशीं सौराष्ट्राचें एकदां खुष्कीचें दळणवळण होतें. या वेळीं रणांत समुद्राचें राज्य होतें.

(५) सिंधु नदी ह्या सुमारास खंबायतचे आखातास अगर कच्छचे समुद्राच्छादित रणास मिळत होती.

(६) ह्या कालानंतर ज्वालामुखी देवीच्या हातीं राज्यसूत्रें आलीं. लगेच झालावाडचें सरोवर नाहींसें झालें. रणास हल्लींचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. सौराष्ट्राचा ईशान्य आफ्रिकेशीं असलेला संबध तुटला. पश्चिमभागांतील भूभागांत जमत असलेले पोरबंदरी दगडांचे थर पाण्यावर डोकावूं लागले. पेरीम बेटास मातृभूमीचा वियोग घडला, व पुन्हां सर्वत्र शांतता पसरली.

(७) कांहीं कालानंतर ज्वालामुखी देवीनें आपलें कल्पांतप्राय स्वरूप धारण केलें. तिच्या मुखांतून निघालेल्या उष्ण ट्रॅपच्या वृष्टीनें जिकडे तिकडे हाहाःकार झाला व सर्वत्र ट्रॅपचें आच्छादन पडलें. नंतर शांततेचीं पुन्हा शिक्का मोर्तबें झालीं.

(८) सौराष्ट्राचा पश्चिम व नैऋत्य भाग अजूनही वरवर येत आहे.

(९) खंबायतचें आखात दिवसें दिवस नद्यांतील मळाई मातीनें भरत आहे. पण इतक्यांतच तें भरून येईल अशी भीति बाळगण्यास कारण नाहीं.

(१०) रणाचें काय होईल तें सांगवत नाहीं.

(११) ज्वालामुखी शक्तीच्या नाड्या अजून आंखडल्या नसून कोण्या वेळेस त्या काय करतील नकळे.

ह्याप्रमाणें अवनीतलावर हळुहळु निसर्गदेवतेच्या अदृश्य शक्तीच्या योगानें जिकडे तिकडे कोणाच्याही चटकन ध्यानांत आल्या शिवाय कांहीं कांहीं फेरफार चाललेच आहेत. बारकाईनें विचार करणाऱ्या व्यक्तीच्या लक्षांत हे तेव्हांच येतात. तेराव्या शतकांतील प्रख्यात आरबी ग्रंथकार महंमद काझविनी ह्यानें आपल्या लेखांत एका कल्पित गोष्टीच्या रूपानें ह्याची सत्यता दाखविली आहे. ती गोष्ट फार गमतीची वाटल्यावरून येथें दिल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. ती येणेंप्रमाणें:—किड्झ* ह्मणतो, "एके दिवशीं एका भर वस्तीच्या अगदीं जुन्या शहरांतून जातां जातां एका गृहस्थास मीं प्रश्न केला, 'काय हो ह्या शहराची स्थापना कोणीं व कधीं केली हें आपणास ठाऊक आहे काय?' त्यानें उत्तर केलें, 'छे बुआ, आपल्यास कांहीं तें माहीत नाहीं. हें शहर फार मोठें आहे व माझ्या आजा पणजांसही ह्या गोष्टीचो माहिती होती कीं नाहीं तें कांहीं सांगवत नाहीं.' पांचशें वर्षांनंतर पुन्हां त्याच ठिकाणीं मी जाऊन पाहतों तों त्या शहराचा मागमूसही तेथें नव्हता. जवळच जळणासाठीं काटक्या वगैरे गोळा करीत असलेल्या एका कुणब्यास मीं विचारिलें, 'कायरे येथें जें एक मोठें शहर होतें तें कोठें गेलें.' तो ह्मणतो—'काय महाराज तुह्मांला वेड बीड तर नाहीं लागलें; कीं माझी गरीबाची थट्टाच आरंभिली आहे? या पलीकडच्या शेतांत माझे कैक पिढीजादे आजपर्यंत कींवाडकष्ट करून पोट भरीत आले.' ओशाळा होऊन मी घरीं गेलों. पुन्हां पांचशें वर्षांनीं येऊन पाहातों तों तेथें शेत बीत कांहीं एक नसून, समुद्रकिनाऱ्यावरील वा-

* किड्झ हें त्या गोष्टींतील एका पात्राचें सार्थ नांव. ह्या नांवाचा अर्थ काय असावा?

ळवंट होतें व किनाऱ्यावर कोळी लोकांची मासे धरण्यासाठीं होडींतून जाण्याची अगदीं तारंबळच उडून गेली होती. त्यांचेकडे धांवत जाऊन एकास मीं हळूच विचारिलें, 'कायरे कोळीदादा येथें पूर्वी तर एक शेत होतें; असें असून हा येथें समुद्र कोठून आला'. तो ह्मणाला, कांचे 'खानसाहेब तुह्मींच जर आह्मांस असे वेडे वेडे प्रश्न विचारूं लागलांत तर आह्मीं गरीबांनीं काय करावें. माझा बाप, आजा, काका व आणखी कितीतरी लोक आज कैक वर्षें येथें हाच धंदा करीत आले व कित्येकांचे जीवही या समुद्रांतच गेले.' सकाळच्या प्रहरींच त्यास जरासें खजील केल्याबद्दल मला वाईट वाटलें. व त्याला हा अपशकून वाटूं नये ह्मणून त्याच्या हातावर मी अर्धा होन ठेऊन धरीं गेलों. पुन्हा पांचशें वर्षांनीं पाहातों तों तेथें समुद्र नमून पूर्वींचें शेत दृष्टीस पडलें. गाई, बैल, तेथें चारीत असलेलीं कित्येक कुणब्यांचीं मुलें खेळतांना पाहिलीं. प्रश्नाच्या भानगडींत न पडतां पुन्हा पांचशें वर्षांनीं येऊन पाहातों तों पूर्वीं पाहिलेली रमणीय नगरी व्यापारानें अगदीं दुमदुमत असलेली दृष्टीस पडली. तेव्हां मी अगदीं आश्चर्यचकित झालों, व ईश्वरी माया अगाध आहे, देवादिकांसही तिचा अंत लागला नाहीं तेथें मानवाचा काय पाड असा विचार करीत आपल्या उद्योगास लागलों".

जेथें आपलें वास्तव्य असेल मग तें धारवाडांत असो अगर सौराष्ट्रांत असो अथवा झांजीबारांत असो त्या त्या प्रांताची वर सांगितलेल्या गोष्टींविषयीं जर आपण चवकशी करून माहिती मिळवूं लागलों तर "यदा किंचित्किंचिद्बुधजनसकाशादवगतम्" या भर्तृहरीच्या उक्तीची साक्ष पटते व आंग्ल कालिदास जो शेक्सपीअर त्याच्या खालील पद्यपंक्तीचें तत्व मनांत घोळूं लागून एका जातीचें समाधान वाटतें.

" This our life, exempt from public haunt,
Finds tongues in trees, books in running brooks
Sermons in stones, and good in everything. "

**समाप्त.**

सौराष्ट्र

कां रे नाठविसी कृपाळु देवासी ।
पोसितो जगासी एकला तो ॥ १ ॥
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती ।
वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥
फुटती तरुवर उष्णकाळमासीं ।
जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता ।
राहे त्या अनंता आठवूनी ॥ ४ ॥
तुका ह्मणे ज्याचें नांव विश्वंभर ।
त्याचें निरंतर ध्यान करी ॥ ५ ॥

तुकाराम.

REFBK-0000103
REFBK-0000103